१८६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. १६४२
REFBK 0011968
REFBK-0011968

# दगडूबाबा साळी

## [लावण्या व वग]

— संपादक —


श्री. ग. ल. ठोकळ

श्री. शंकरराव खरात

श्री. सर्जेराव पाटील



REFBK-0011968



मराठी तमाशा परिषद प्रकाशन



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ...३५८२३ वि: ......

क्रमांक ......२५८२ ओ: दि: ..........



— एकमेव विक्रेते —

❀ श्री लेखन वाचन भांडार ❀

लक्ष्मीरस्ता, पुणे २.



११९६८


किंमत तीन रुपये

प्रकाशक :

**बाळासाहेब शं. गोरे**

सर चिटणीस

मराठी तमाशा परिषद

महाराष्ट्र राज्य,

४०० गणेश पेठ, पुणे २.

☼ ☼ ☼

आवृत्ति पहिली १९६१

☼ ☼ ☼

मुद्रक :

**मा. र. कारले**

जनसेवा मुद्रणालय,

१९२ शुक्रवार पेठ, पुणे २.

# निवेदन

मराठी तमाशा परिषदेचें हें प्रकाशन रसिकांना सादर करतांना आम्हांला अत्यंत आनंद होत आहे. शाहिरांनीं लिहिलेल्या वाङ्मयाचीं बाडें कित्येक वर्षांपासून अंधारांत आहेत. या उपेक्षित वाङ्मयाचें प्रकाशन व्हावें ही इच्छा अनेक रसिकांची होती व आहे; परंतु पैसे मोजून वाचणारें गिऱ्हाईक मिळण्याची शाश्वती नसल्यामुळें हें वाङ्मय अजून फारसें प्रकाशांत आलेलें नाहीं. राम जोशी, होनाजी बाळ, प्रभाकर, सगनभाऊ, अनंत फंदी, पठ्ठे बापूराव व शाहीर हैबती यांचीं पुस्तकें आज उपलब्ध आहेत; परंतु याच शाहिरांचें वाङ्मय अजून मोठ्या प्रमाणांत अप्रकाशित आहे. ज्या शाहिरांच्या जीवनावर लिहिलेलीं नाटकें व चित्रपट महाराष्ट्रांत गाजले त्यांच्या वाङ्मयाची ही कथा; मग इतर शाहिरांच्या वाङ्मयाला विचारतो कोण !


दगडूबाबा साळी यांचें त्रोटक चरित्र आम्ही या पुस्तकांत देत आहोंत. त्यावरून ते किती श्रेष्ठ दर्जाचे कलावंत व शाहीर होते याची वाचकांना कल्पना येईल. जनतेचें मनोरंजन करून त्याच वेळीं त्यांना बोधामृत पाजण्याचें अवघड कार्य दगडूबाबांनीं करून दाखविलें. या शाहिराचें वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें कार्य अंगावर घेऊन मराठी तमाशा परिषदेनें तें पार पाडलें हें परिषदेस अत्यंत भूषणावह आहे. या वाङ्मयाच्या संपादनाचें कार्य आमच्यावर सोंपवून परिषदेनें आमचा जो गौरव केला, त्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

दिवाळी १९६१ } संपादक



कै. शाहीर दगडूबाबा साळी, शिरोलीकर

जन्म इ. स. ८-९-१८५६ ] [ मृत्यु—२८-१२-१९५३



कै. दगडूबाबांचे घर—
समोर दिसणाऱ्या
खिडकीजवळच त्यांची
बैठक असे



कै. दगडूबाबांचे
कुकडी नदीकांठचे
समाधिमंदिर

# दगडूबाबा साळी (तांबे) शिरोलीकर

## यांचें चरित्र

### कला व कलावंत

कला ही ' जात ' मानीत नाहीं. कलावंताला जात व धर्म नसतो. कला ही निर्मळ पाण्यासारखी असते. पाण्याला-गंगेला-सर्वजन सारखेच, त्याप्रमाणें कलेलाहि सर्व सारखेच.

माणसानें जात, धर्म, पंथ निर्माण केले; पण कलेनें सर्व जाती, धर्म व पंथ यांना समान लेखलें आहे. म्हणून कलेचा उपासक कलावंत जात ओळखत नाहीं, धर्म ओळखत नाहीं, पंथ ओळखत नाहीं आणि म्हणूनच कलावंत हा श्रेष्ठ

वर्णाश्रमधर्मानें वर्ण निर्माण केले. त्यांतून असंख्य जाती जन्माला आल्या आणि आपल्या देशांतील समाजरचना जातीय पद्धतीच्या तत्त्वावर आधारली गेली. माणसाची किंमत किंवा श्रेष्ठत्व त्याच्या गुणांवर किंवा कृतींवर आवलबूंन न राहातां ते त्याच्या जन्मावर व जातीवर अवलंबून राहूं लागले. जातीय पद्धतीमुळें कामाच्या विभागणीबरोबर माणसा-माणसांत कायम स्वरूपी विभागणी झाली.

जातीय पद्धतीच्या समाजरचनेमुळें प्रत्येक जातीचा वेगळा धंदा ठरला. जन्मावरून जात ठरूं लागली व जातीवरून धंदा ठरूं लागला. माणसाची जात व धंदा पक्का झाला आणि जातीवरून धंदा व धंद्यावरून जात ओळखण्याची रूढी पडली. आपल्या देशांतील जातीय पद्धतीच्या समाजरचनेंत असें दुष्ट चक्र फिरूं लागलें आणि या चक्रव्यूहांत असंख्य जाती-जीव भरडून निघाले. त्याच जाती-चक्रव्यूहांत दगडूबाबा यांचे वाडवडील घावले; परंतु दगडूबाबा साळी शिरोलीकर, एक श्रेष्ठ कलावंत. यांनीं आपल्या शाहिरी कलावंताच्या-तमाशा-कलावंतांच्या बळावर हा जातीयपद्धतीचा चक्रव्यूह फोडला आणि कलेला जात नसते, कला ही जात मानीत नाहीं. कलावंताला जात नसते,



कै. दगडूबाबांचे घर—
समोर दिसणाऱ्या
खिडकीजवळच त्यांची
बैठक असे



कै. दगडूबाबांचे
कुकडी नदीकांठचे
समाधिमंदिर

# दगडूबाबा साळी ( तांबे ) शिरोलीकर यांचें चरित्र

## कला व कलावंत

कला ही ' जात ' मानीत नाहीं. कलावंताला जात व धर्म नसतो. कला ही निर्मळ पाण्यासारखी असते. पाण्याला-गंगेला-सर्वजन सारखेच, त्याप्रमाणें कलेलाहि सर्व सारखेच.

माणसानें जात, धर्म, पंथ निर्माण केले; पण कलेनें सर्व जाती, धर्म व पंथ यांना समान लेखलें आहे. म्हणून कलेचा उपासक कलावंत जात ओळखत नाहीं, धर्म ओळखत नाहीं, पंथ ओळखत नाहीं आणि म्हणूनच कलावंत हा श्रेष्ठ मानला जातो.

वर्णाश्रमधर्मानें वर्ण निर्माण केले. त्यांतून असंख्य जाती जन्माला आल्या आणि आपल्या देशांतील समाजरचना जातीय पद्धतीच्या तत्त्वावर आधारली गेली. माणसाची किंमत किंवा श्रेष्ठत्व त्याच्या गुणांवर किंवा कृतींवर आवलबूंन न राहातां ते त्याच्या जन्मावर व जातीवर अवलंबून राहूं लागले. जातीय पद्धतीमुळें कामाच्या विभागणीबरोबर माणसा-माणसांत कायम स्वरूपी विभागणी झाली.

जातीय पद्धतीच्या समाजरचनेमुळें प्रत्येक जातीचा वेगळा धंदा ठरला. जन्मावरून जात ठरूं लागली व जातीवरून धंदा ठरूं लागला. माणसाची जात व धंदा पक्का झाला आणि जातीवरून धदा व धंद्यावरून जात ओळखण्याची रूढी पडली. आपल्या देशांतील जातीय पद्धतीच्या समाजरचनेंत असें दुष्ट चक्र फिरूं लागलें आणि या चक्रव्यूहांत असंख्य जाती-जीव भरडून निघाले. त्याच जाती-चक्रव्यूहांत दगडूबाबा यांचे वाडवडील घावले; परंतु दगडूबाबा साळी शिरोलीकर, एक श्रेष्ठ कलावंत. यांनीं आपल्या शाहिरी कलावंताच्या-तमाशा-कलावंतांच्या बळावर हा जातीयपद्धतीचा चक्रव्यूह फोडला आणि कलेला जात नसते, कला ही जात मानीत नाहीं. कलावंताला जात नसते,

कलावंत हा जात मानीत नाहीं, या श्रेष्ठ तत्त्वाला जन्म दिला आणि कलेच्या प्रांतांत एक आदर्श असा नवीन सिद्धान्त आपल्या गुणांवर व आपल्या कृतींवर प्रस्थापित केला. यांतच शाहीर कलावंत दगडूबाबा साळी यांचा थोरपणा सामावलेला आहे.

कला ही एक ईशानें मानवाला दिलेली देणगी आहे. ती कोणाला जन्मजात मिळते व तिची वाढ करणें पुढें त्या कलावंताच्या हातीं असतें. उलट कांहीं कलावंत ही कला आपल्या तपश्चर्येच्या बळावर हस्तगत करतात आणि श्रेष्ठ कलावंताच्या दर्जालाहि पोहोंचतात. दगडूबाबा साळी हे एक जन्मजात कलावंत होते. ते एक कलावंत म्हणूनच जन्माला आले होते. त्यांच्या अखंड जीवनाचा चित्रपट पाहिल्यास त्यांनीं त्यांत आपल्या तपश्चर्येचीहि अधिक भर घातली. म्हणूनच उपजत कलावंत आणि त्यांत ही तपश्चर्या यामुळें ते एक श्रेष्ठ शाहीर तमाशा कलावंत म्हणून कलेच्या प्रांगणांत मान्य झाले व मराठी प्रदेशांत प्रसिद्धी पावले.

## शाहिरी संप्रदाय : कलगी-तुरा

शाहिरांत दोन संप्रदाय आहेत. एक कलगीवाला संप्रदाय आणि दुसरा तुरेवाला संप्रदाय. तसेच ते व तमाशा-कलावंतांतहि आहेत.

" कलगी " या शब्दाचा अर्थ उर्दू-इंग्रजी कोशांत An ornament worn in the turban, A ringlet आणि तुरा शब्दाचा अर्थ A kind of ornament in turban असा आढळतो. म्हणजे दोन्ही शब्दांचा अर्थ एकच : पागोटें, टोपी इत्यादिकांस लावण्याकरितां मोतीं, फुलें इत्यादिकांचें केलेलें ' भूषण ' असा तो होतो.

'कलगी व तुरा' हीं त्या दोन पक्षांचीं बोधचिन्हें ठरलीं व तीं भूषणें पागोट्यांत किंवा डफाला लावण्याचा प्रघात पडला. कलगीवाल्यांना ' नागेश ' असेंही म्हणतात व त्यांचें निशाण भगवें असतें. तसेंच तुरेवाल्यांना ' हरदास ' असें म्हणतात व त्यांचें निशाण हिरवें किंवा पांढरें असतें. याशिवाय कलगी-प्रश्न व तुरा-प्रश्न यांत आत्यंतिक भेद असण्याचें कारण नाहीं; पण पुढें हा वाद अतिरेकास गेला.

कलगीवाले हे शक्तीचे उपासक व तुरेवाले हे शिवाचे उपासक असा भेदाभेद त्यांच्यांत निर्माण झाला. कलगीवाले मुख्यत: शक्तीचे उपासक असले तरी ते अद्वैत मानतात; परंतु तुरेवाले फक्त शिवालाच प्राधान्य देतात आणि शक्तीला मात्र गौण मानतात. ( लोकनाट्याची परंपरा, पान ९९—१००, लेखक वि. कृ. जोशी )

कलगीवाले व तुरेवाले यांच्या शाहिरी भेदिक गाण्यांत एकमेकांना सवाल केला जातो व गाण्यानेंच एकमेकांना जबाब दिला जातो. यांत हारजित असते; पण एकमेकाला या चढाओढींत प्रेमानेंच जिरवलें जातें. एका जत्रेच्या फडांत एका पक्षानें दुसऱ्या पक्षाला सवाल टाकून, त्याला योग्य तो जबाब न मिळाल्यानें जिरवलें, तर दुसरा पक्ष पुन्हा दुसऱ्या एखाद्या जत्रेंतील फडांत सवालाला जबाब देण्याचें आव्हान स्वीकारतो व त्याच्याहि पुढें प्रतिपक्षाला सवाल विचारण्याची ग्रंथाच्या आधारानें तयारी करतो. याप्रमाणें, एकमेकांना आपल्या ग्रंथ-वाङ्मयाच्या आधारानें सवाल टाकण्याचें व जबाब देण्याचें काम मोठ्या ईर्षेनें चालतें. त्या ईर्षेंत प्रेम असतें. हा वाद उच्च अध्यात्माच्या पातळीवरून चालतो. त्याची उच्च पातळी संभाळली जाते आणि कलगी-तुऱ्याच्या वादांतील हारजीतमध्यें प्रेमाचा धागा सांभाळला जातो. त्यांतच त्यांची अधिक प्रगति होते.

या दोन्हीही कलगी-तुऱ्यांच्या संप्रदायांत एकमेकांबद्दल प्रेम व मोठा आदर असे. ते एकमेकांचे मानपान सांभाळीत असत आणि प्रत्यक्ष फडांत डफतुणतुणें घेऊन उतरल्यावर एकमेकांना सवाल-जबाब करीत व रूपकाच्या भाषेंत एकमेकांस प्रश्न-उत्तरें करीत. कलगी-तुरेवाल्यांच्या वाद हा फडांतच असे. तो कधीं घरीं आला नाहीं. या दोन्हीहि पंथांत-पक्षांत गुरु असत. त्यांचे भरपूर शिष्यगण असत. दगडोबाबा साळी हे कलगीवाले घराण्यांतील एक अत्यंत अभ्यासू शाहीर-तमासगीर-कलावंत होते. दगडोबाबांचें एकूण घराणेंच शाहिरी व भेदिक गाण्यांत सुप्रसिद्ध होतें. पिढ्यान् पिढ्या शाहीरी व भेदिक गाणें दगडोबाबांच्या घराण्यांत सुपीकपणानें नांदत राहिलें आणि यांत दगडूबाबांनीं चालविलेली सातवी पिढी असून, आज त्यांचेच चिरंजीव दत्तोबा तांबे ( शिरोलीकर ) यांची आठवी पिढी चालू आहे.

कलेला जात नसते आणि म्हणूनच कीं काय, शाहिरी भेदिक गाण्याची कला पिढ्यान् पिढ्या दगडोबाबांच्या घराण्यांत चालत आलेली आहे. सधन शेतकऱ्याच्या वाड्यांत ज्याप्रमाणें पिढ्यान्‌पिढ्या धान्याचीं 'पेवं' भरलेलीं असतात, त्याप्रमाणें दगडोबाबांचें घराणें शाहिरी व भेदिक गाण्यांत सधन असेंच राहिले सुताच्या धाग्यांचे मागावर कापड तयार करण्याची कला वेगळी आणि विचाराच्या धाग्यांनीं अध्यात्माचा-तत्त्वज्ञानाचा सिद्धांत विणणें वेगळें; पण या दोन्हींहि कलेंत या घराण्याचा नांवलौकिक पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला आहे, यांतच या घराण्यांतील पुरुषांच्या अंगीं असलेल्या थोर गुणांचा प्रत्यय येतो. खरें म्हणजे दगडोबाबांचें घराणें जरी रूढीबद्ध जातीनें 'साळी' होतें, तरी तें गुणांनीं अध्यात्मिक विचारवंत अशा थोर प्रकृति-जातीचे होते. एकाद्या घराण्यांत पिढ्यान्-पिढ्या (सात पिढ्या) अशा श्रेष्ठ शाहिरांची-कलावंतांची परंपरा निर्माण व्हावी हा एक ईश्वरदत्त योगायोगच आहे. शाहिरी-कवनांत व भेदिक गाण्यांत दगडोबाबांच्या वाड-वडिलांनीं मोठा नांव-लौकिक संपादन केला होता.पोटापाण्यासाठीं घरा-दारांत दिवसा 'विणकामाचा' माग चालू ठेवावयाचा आणि रात्रीच्या रात्री पलित्याच्या उजेडांत कलिगी-तुऱ्याच्या वादांत शाहिरी गाण्याची पान ना पानें चाळीत बसावयाचें व त्यांतच उभी रात्र जागून काढावयाची ! केवढी ही या घराण्यांत शाहिरी कलेची आवड ! शाहिरी संप्रदायाची आवड ! कलगीवाल्या पक्षाची ईर्षा व आवड दगडोबाबांच्या घराण्याला होती; पण त्या ईर्षेंतहि तुरेवाल्या प्रतिपक्षाबद्दल प्रेम असे; एक प्रकारचा आदर असे. कलगी-तुऱ्याचा फडांतील प्रेमाचा वाद हा प्रेमाचाच राहिला आणि दगडोबाबांच्या घराण्यानें कलगी-तुऱ्याच्या संप्रदायांतील-पंथांतील-सवाल-जबाबाच्या वादाला प्रेमाचा पाया दिला. एकमेकांचा मान-पान सांभाळला. एकमेकांचा आदर-सत्कारहि केला. त्यामुळेंच दगडोबाबांच्या शाहीर-घराण्याचा अधिक नांव-लौकिक झाला आणि तोच वाडवडिलांचा नांवलौकिक —तीच घराण्याची श्रेष्ठ परंपरा दगडोबाबा साळी यांनीं पुढें चालविली. एवढेंच नाहीं, तर त्यांनीं स्वतः आपल्या अंगच्या गुणाने श्रेष्ठ काव्य व शाहिरीकला-गुणानें तीवर कळस चढविला आणि आपल्या घराण्याचा व आपल्या स्वतःच्या कीर्तीचा डंका चोहोंकडे वाजविला. यांतच दगडोबाबा यांचा शाहिरी व तमाशा-कलावंत म्हणून थोरपणा सामावलेला आहे.

## जन्म व बाळपण

दगडूबाबा यांचा जन्म सन १८८० सालीं शिरोली येथें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव कोंडाजी व आईचें नांव सईबाई होतें.

आजच्या जुन्नर तालुक्यांतील शिरोली या गांवीं कायमपणें स्थायिक होण्यापूर्वी दगडोबाबांच्या वाडवडिलांचें मूळ गांव पैठण (एकनाथांचें) होतें. त्यानंतर कुकडीनदीपलीकडील सुलतानपूर गांवीं दगडोबाबांच्या वाडवडिलांचें घर होतें. पुढें तें त्यांच्या वडिलांनीं कायमचें शिरोलींत केलें. त्याच शिरोलीला पुढें दगडोबाबांनी शाहिरी तमाशाकलावंतांच्या क्षेत्रांत 'शिरोलीकर' या नांवानें कायमचें स्थान दिलें. आजहि त्यांचे चिरंजीव तमाशा-कलावंत दत्तोबा तांबे 'शिरोलीकर' या नांवानेंच सुप्रसिद्ध आहेत. स्थानमहात्म्यामुळें—गांवामुळेंच-कांहीं माणसाना मोठें-पण येतें तर उलट कांहीं व्यक्तींच्या थोरपणामुळें त्या गांवालाच थोरपणा येतो. या दुसऱ्या सदरांत दगडोबाबांचें मोठेंपण येतें आणि त्यांच्या थोरपणामुळेंच शिरोलीलाही कायमचें मोठेंपण प्राप्त झालें.

शिरोली हें गांव हल्लीं जुन्नर तालुक्यांत आहे. पुण्याहून नाशिक क्षेत्राला जाणाऱ्या मोटारीच्या हमरस्त्याच्या थोड्या जवळ अंतरावरच सुप्रसिद्ध भाऊ-बापू-खुडे, नारायणगांवकर यांचें नारायणगांव लागतें. या नारायणगांवच्या उगवतीला चारपांच कोसांवरच शिरोली हें गांव वसलें आहे. शिरोलीगांवाला कुकडी नदीचा कायमचा सहवास लाभला असून कुकडी नदी चंद्राकारानें शिरोली गांवाला वळसा घालून पुढें शिरूरच्या दुष्काळी भागांत पाणीपुरवठा करीत निघते. शिरोली गांव तसें लहान आहे. खेडेगांवच तें. गांवाला सुमारें चारशें घरांचा उंबरा आहे आणि लोकसंख्याहि हजार-बाराशेंच्या आसपास आहे. याच शिरोली गांवांतील आपले पिताजी कोंडाजी यांच्या पांच खणी घरांत दगडोबाबांचा जन्म झाला. आणि त्यांचें बाळपणहि याच घरीं गेलें.

दगडूबाबांचें बाळपण हूडपणांत गेलें. ते बाळपणीं स्वभावानें हूडच होते. ते लहान होते तरी त्यांना आपल्या मनाविरुद्ध घडणारी—होणारी—कोणतीच गोष्ट पसंत होत नसे आणि ती रुचत नसे व खपतहि नसे. विशेष म्हणजे तेवढ्याहि लहान वयांत आपल्या मनाच्या विरुद्ध त्यांनी कुणाच्याहि विचाराचें—मग तो घरांतील असो, बाहेरील असो, नातेवाईक असो वा नातेवाईक नसो—दडपण मान्य

केलें नाही व तें खपवूनहि घेतलें नाहीं अशा आगळ्याच स्वभावाच्या मुलाची काळजी कुणाहि बापाला असणारच. याप्रमाणें कोंडाजीला दगडोबाबांच्या भावी जीवनाच्या भवितव्याची कायम काळजी असे. त्यांतच दगडोबाबांचें वयाच्या नवव्या वर्षीं त्यानी त्यांचे लग्न केलें.

दगडोबाबांसारख्या स्वतंत्र वृत्तीच्या मनाच्या मुलाचें मन शाळेंतील चार भिंतींच्या आत कसें काय रमणार ? आणि तेथें तें अपेक्षेप्रमाणें रमलें नाहींच. ते प्राथमिक शाळेंत होते. पहिलींतून दुसरीच्या वर्गातहि गेले. पण ते शाळेच्या वर्गांत देहानें बसत होते, मनानें मात्र कोठें तरी बाहेर हिंडत होते. त्यांचें मन पक्ष्यासारखें अंतराळांत तरंगत असे, फडाडत गगनांत उडत असे. त्यांचें चित्तच शाळेंत नसे. पाटीवरच्या सव्वीस अक्षरांपेक्षां त्यांना दुसरें अधिक असें दिसत होतें म्हणूनच त्यांच्या शालेय जीवनाचा शेवट मराठी दुसरींतच झाला आणि त्यांची व शालेय शिक्षणाची कायमची ताटातूट झाली.

दगडोबाबा मराठी दुसरींत शिकत असतांना त्यांनीं भलताच धाडशी उपद्व्याप केला होता. अर्थात् या विलक्षण उपद्व्यापांत त्यांचें स्वतंत्र मन व स्वतंत्र वृत्तीच अधिक प्रकर्षानें दिसते. त्यांच्या मनाचा विश्वाचा-आकार शिरोलींतील, त्या शाळेंत मावत नव्हता. म्हणूनच त्यांच्या मनाची धाव शिरोलीच्या वेशीबाहेर-शिरोली गांवच्या शिवेबाहेर-धावत होती आणि म्हणूनच दगडोबाबांनीं बालपणीं शाळेंत असतांना दूर देशीं केलेल्या पलायन केलें !

पहिलेंच शिरोली गांव लहान खेडें. दगडोबाबांना वाटे, नको ती चार भिंतींची शाळा. त्यांत कांहीं आपल्या सर्व इच्छा-आकांक्षा सफल होत नाहींत. आपल्या मनाच्या भरारीला ती चार भिंतींची शाळा पुरत नाहीं. म्हणूनच ते शाळेंत जातांना कोठें तरी दडून बसत असत. त्यांतच त्यांनीं वयाच्या १० व्या वर्षीं भलताच धाडसी उपद्व्याप केला. तो खराच विलक्षण होता. दगडोबाबा शाळेंत जावयाचे म्हणून निघाले. पाटी–दप्तर त्यांनीं कोठें ठेवलें हें त्यांनाच माहीत ! त्यानंतर ते गांवांतील एका ओळखीच्या बाईकडे गेले व तिला निरोप म्हणून त्यांनीं असें सांगितलें कीं,

"भाऊनें सांगड मागितली आहे !"

त्या बिचाऱ्या बाईनें आपल्या घरांतील 'सांगड' काढून त्याच्याजवळ सरळ दिली. दगडोबाबांनीं ती नदींतून तरवून नेणारी सांगड घेतली आणि तडक

‘ कुकडा ’ गांव-नदी गांठली. त्यांनीं ती सांगड नदींत घातली आणि सांगडी-वरून ते भरलेली नदी तरून पैलतीराला सुखरूप पोहोंचले. नदीच्या पलीकडेच बहिणीचें गांव—सासुरवाडी—होती. त्यांनीं बहिणीचा धांवा केला आणि बहिणीचें घर गांठलें. भावनेच्या आवेगांत त्यांनीं बहिणीचे पाय धरले आणि ‘ ताई, मला वांचव ! ’ असे कळकळीचे उद्‌गार काढले.त्या वेळीं दगडोबाबा बहिणीजवळ गद्‌गदून रडले. ओक्साबोक्सीं रडले. त्यांचा दाटलेला ऊर मोकळा झाला व ते आपल्या बहिणीला पुन्हा म्हणाले,

“वडील व भाऊच्या मताप्रमाणें मला शाळेच्या चार भिंतींच्या आंत कोंडून घ्यावयाचें नाहीं. त्यामुळेंच ते मला घरीं नीट वागवीत नाहींत. त्यांची इच्छा मला पुरी करतां येईना व माझी इच्छा—मन—त्यांना समजेना ! ”

अशा स्वरूपाचें आपलें मन बहिणीजवळ मोकळें करून त्यांनीं सांगितलें.

नदीच्या पुराचें संकट तरून आलेल्या आपल्यां लहान भावाला बहिणीनें गोड-धोड जेवण केलें. पोटभर जेवावयाला घातलें. त्याला अंगावर पैरण दिली. त्याची समजूत घातली आणि तू “ आता माझ्याजवळच राहा ! मी तुला सांभाळीन !” असा बहिणीनें त्याला आपल्या वचनाचा आधार दिला. बहिणीच्या बोलीनें त्याच्या बाळमनाला एकदम आधार वाटला; पण तो आधार त्यांना क्षणिकच वाटला.

दगडोबाबांनीं एवढ्या बाळपणीं ( १० व्या वर्षीं ) गांवांतून पळ काढला !

“ आपण कुणालाच न विचारतां घरांतून पसार झालों ! आतां आपले वडील, भाऊ काय म्हणतील ? आपल्याला ते कसे वागवतील ? आतां तपासासाठीं बहिणीच्या गांवीं ते येणारच आणि आपल्याला ओढतच घरीं नेणार ! पुन्हा घरीं ? मागें तसें पुढें ! ” असा रात्रींच विचार त्यांच्या डोक्यांत शिरला. त्यामुळें दगडोबाबांचें मन चलबिचल झालें व त्याच विचाराच्या झपाट्यांत त्यांच्या मनांतहि उलटा-पालट झाली. बहिणीच्याहि गांवांतून रात्रीच कोठेंहि पसार व्हावें असा त्यांच्या मनाचा बेत झाला.

रात्र झाली. बहीण व तिच्या घरांतील सर्व मंडळी झोंपी गेली. दगडूबाबांनींहि झोंपी जाण्याचें सोंग केलें आणि रात्रींच उठून, भाकरीच्या टोपल्यांतल्या भाकरी घेतल्या. त्या एका फडक्यांत बांधल्या आणि रात्रीच बहिणीच्या घरांतून ते पसार झाले ! धारगांवची नदी त्यांनीं ओलांडली. त्यांनीं

तसाच चालण्याचा झपाटा मारला. संगमनेर जवळ केलें; पण संगमनेरमध्यें प्रवेश करावयाचा म्हणजे प्रथम प्रवरा नदी ओलांडून जावें लागतें. प्रवरा नदी भरून चालली होती. संगमनेरला जावयाचें म्हणजे नावेंतूनच जाणें भाग पडतें. त्यासाठीं नावाड्याला पैसे द्यावे लागतात.

दगडोबाबा तसेच नावेंत बसले. नाव निम्मी नदी ओलांडून संगमनेरच्या बाजूला आली. नावाडी पैसे गोळा करूं लागला. त्यांच्याजवळ द्यावयास पैसे नव्हते. त्यांच्यापुढें कठीण प्रसंग आला. संगमनेर जवळ दिसूं लागलें. दगडोबाबांजवळ तर पैसा नाही. नावाडी पैसा मागूं लागला तेव्हा त्यांनीं नदीच्या पाण्यांत सरळ उडी टाकली आणि किनारा गांठला व संगमनेर जवळ केलें.

दगडोबाबांनीं संगमनेरपासून नाशिकचा रस्ता धरला. रस्ता लांबचा. तरी ते मनाचा धडा करून चाललेच होते. रस्त्यांत त्यांच्या दोन नातेवाइकांचीं गांवें लागलीं. त्या त्या गांवांत त्यांनीं दोन मुक्काम केले आणि त्या त्या घरांतील कोणाहि माणसाला न विचारतां मुकाट्यानेंच त्या पाहुण्यांच्या घरांतून पळ काढला. वाटेंतील पाहुण्यांचीं गांवें सोडून ते नाशिकला आले. लांबची वाटचाल केली. चालतांना कांहीं वाटलें नाहीं; पण नाशिकांत आल्यावर मात्र दगडोबाबांना भूक लागली. त्यांत लांबची वाटचाल केल्यानें कडाडून भूक लागली होती. आतां भाकरीचें काय करावें ? आपल्याला येथें कोण भाकरी देईल ? याच चिंतेनें दगडोबाबा पंचवटीजवळ रामाच्या दारांत बसले होते. नाशिकांत आपल्याला कोणाचा आधार नाहीं, म्हणून ते रडूं लागले. त्याच सुमारास समोरून एक गृहस्थ चालला होता. दहा-अकराचा पोरगा रामाच्या दारांत एकटाच, आणि तो रडतोय हा काय प्रकार आहे, म्हणून त्या गृहस्थानें त्याची पुढें येऊन सहज चौकशी केली व वरचेवर प्रश्न विचारले.

“ बाळ, तूं कोणत्या गांवचा ?
नाशिकला का आलास ?
तुझें येथें कोण आहे का ?
तूं येथें कां रडत बसलास ? ”

या अशा विचारलेल्या सर्व प्रश्नांचीं दगडोबाबांनीं व्यवस्थित उत्तरें दिलीं आणि त्या उत्तरांनीं त्या गृहस्थाचें एकदम समाधान झालें. त्या माणसाच्या

तोंडावर हा लहान पोरगा पाहून नवें तेज आलें आणि त्याला वाटलें, "आपल्या ओळखीच्या माणसाचाच हा पोरगा आहे !"

त्या गृहस्थाची पूर्ण खात्री पटली. दगडोबाबांच्या नशिबानें हा भेटीचा योगायोग आला. त्या गृहस्थानें त्याला आपल्या घरीं नेलें. त्याला पोटभर जेवण दिले. त्याला नीट कपडे दिले आणि कोंडाजीला तांतडीनें नाशिकला मुलगा आल्याचें व तो आपल्याजवळ असल्याची खबर दिली आणि दगडूबाबाला सुखरूपपणें शिरोलीला पाठविण्याची तो व्यवस्था करणार, इतक्यांत स्वतः त्याचे वडीलच त्याला नेण्यास नाशिकास आले. दगडोबाबाला शिरोलीला परत नेल्यावर कोंडाजीनें दगडोबाबांची शाळा बंद केली व त्या दिवसापासून त्यांनीं त्याला शाळेचा आग्रह कधींच केला नाहीं.

अशा रीतीनें दगडोबाबांचा शालेय जीवनाशीं संबंध तुटला तो कायमचा तुटला !

## घरप्रपंच

दगडोबाबांची शाळा कायमची सुटली त्यामुळें तें अकराबार वर्षांचें पोर आपल्या घरच्या हातमागावर लक्ष घालूं लागलें; पण त्यांत त्यांचें जमेना. त्यांत म्हणावें असें त्यांचें लक्ष लागेना; परंतु योग असा कीं, पिढीजात असलेल्या घरांतल्या शाहिरी-भेदिक गाण्यांत दगडोबाबांचें चित्त रमूं लागलें. त्यांच्या जिभेवर शाहिरी खेळूं लागली. त्यांच्या आवाजांतून भेदिक गाण्याचे सूर बाहेर पडूं लागले. शाहिरी व भेदिक गाण्याचा त्यांना पुरा नाद लागला.

दिवसामागें दिवस चालले होते. महिन्यांमागें महिने चालले. हळूहळू वर्षामागून वर्षें निघून चाललीं. दगडोबाबा आपल्या थकलेल्या वडिलांना घरच्या हातमागावरील कामास मदत करीत होता आणि त्यांतच तो शाहिरी व भेदिक गाण्यांत तरबेजहि होऊं लागला होता. विशेष म्हणजे घरच्या मागावरील कामापेक्षां दगडोबाबा भेदिक गाण्यांतच हुशार होत चालला होता.

त्यांतच कोंडाजी थकलेले होते ते अधिकच थकत चालले होते. ते पिकलेलें पान झाले होते. त्यांतच दैवगति फिरली आणि कोंडाजीचा अंत झाला. त्या वेळीं दगडोबाबा तारुण्याच्या उंबरठ्यावर आला. त्या वेळीं त्याचें वय अठरा वर्षांचें होतें.

वडिलांच्या माघारीं दगडोबाबावर घरप्रपंचाची मोठी जबाबदारी पडली. मेदिक-गाण्याचा त्याला मोठा छंद होता; पण तो पोट भरण्याचें साधन कसें होणार ? म्हणूनच दगडोबाबांनीं आपलें गांव-शिरोली-सोडलें.

आपल्याच वडिलांचे शाहिरींतील एक शिष्य रा. दौला नाईक यांच्याकडे उदापूर गांवीं ते आले. त्यांच्या मदतीनें व मार्गदर्शनाखालीं हातमाग सुरू करण्याचा व त्यावरच आपला संसार चालविण्याचा त्यांनीं बेत केला व त्याप्रमाणें हात-मागाच्या कामास सुरुवातहि केली. स्वतः सर्व पाहून मागहि लावला. ते कामाला लागले; परंतु जातीच्या कलावंताचें हातमागावरील कामांत खरें चित्त लागेना आणि पुन्हा पुन्हा प्रयत्न करूनहि त्या कामांत त्यांचा जम बसेना.

उदापूरला दौला नाइकाकडे दगडोबाबांनीं दोन वर्षें तरी काढलीं असतील. या दान वर्षांच्या काळांत ते गांवोगांवच्या जत्रेंत उरुसावर जाऊं लागले आणि शाहीरी-मेदिक गाणें फडांत गाऊं लागले. अशा शाहिरांच्या फडांतून वाढ होऊन दगडोबाबा प्रसिद्धीला आले आणि त्यानंतर '**कलगीवाला**' थोर शाहीर म्हणून त्यांचा त्या भागांत फारच बोलबाला झाला. ते आजूबाजूच्या सर्व उरूस-जत्रेंत जात. शाहिरांच्या फडांत हौसेनें भाग घेत आणि गाण्याच्या अर्थ-नादावर डफ-तुणतुण्याच्या गुंगींत रात्रीच्या रात्री आपल्या श्रोत्यांपुढें जागून काढीत आणि अशा फडांत शेवटीं तज्ज्ञ श्रोत्यांकडून मानाचा मंदिल मिळवीत. तोंपर्यंत दगडोबाबा तमाशांत म्हणून उभे राहिले नव्हते. ते कलगीवाले मेदिक गाण्याचे शाहीर म्हणूनच प्रसिद्धि पावलेले होते.

उदापूरगांवीं पोटापाण्याचा धंद्याचा कांहीं चांगला जम बसेना. त्यांतच त्यांचे हातमागहि व्यवस्थित फायद्यांत चालेनासे झाले आणि त्यामुळेंच त्यांना उदे-पुरांतील हातमाग मोडून शेवटीं उदापूरचा रामराम घेणें भाग पडलें.त्यांनीं संगमनेरची वाट धरली !

संगमनेरला आल्यावर इतर उद्योगांबरोबर त्यांना तंत्र-मंत्र-विद्येचा भलताच नाद लागला. त्यांनीं स्वतः या विद्येचा चांगला पाठपुरावा केला नी तंत्रमंत्राची विद्या चांगली हस्तगत केली. या विद्येचे प्रयोग चांगल्यासाठीं दगडोबाबा नेहमींच करीत असत. त्यांना या विद्येनें चांगलें भारलें होतें. तिचें त्यांना पुरें वेड लागलें होतें. त्यांच्या या मंत्र-तंत्र-विद्येच्या महतीमुळें त्यांच्या दारांत नेहमींच या नादावर माणूस येत असे. दगडोबाही या विद्येनें डाव-प्रति-

डावाचे खेळ खेळूं लागले. या विद्येचा फायदा घेण्यासाठीं त्यांच्या दारीं चांगल माणूस येऊं लागला तसा वाईटहि माणूस येऊं लागला. या विद्येचा फायदा चांगल्या माणसाला होऊं लागला तसा वाइटालाहिं होऊं लागला. अर्थात् आपल्या दारांत या मंत्र-तंत्राचा फायदा घेण्यासाठीं आलेला माणूस चांगला का वाईट हें दगडो-बाबांना कसें कळणार ? आपल्या दारांत आलेल्या माणसाचें गाऱ्हाणें ऐकून त्यावर ते योग्य तो उतारा देत असत. त्याचा योग्य तो परिणामहि होई. त्यामुळेंच या मंत्र-तंत्र-विद्येचा फायदा घेण्यासाठीं दारांत कोणीहि येऊं लागले आणि दगडोबाबाहि आपल्या स्वभावानुसार आलेल्या माणसाची गरज भागविण्यासाठीं त्याचें दुखणें नष्ट करण्यासाठीं आपल्या तंत्र-मंत्र-विद्येचे भारी भारी यशस्वी प्रयोग करीत आणि याच विद्येवर आपल्या प्रतिपक्षाला पायबंद घालीत. असा हा एक दगडोबाबांना मोठा छंद लागलेला होता व तो ते मनापासून करीत होते.

दगडोबाबा संगमनेरला आल्यावर त्यांनीं हातमागाचा धंदा सुरू केला. त्यांचीं शाहिरी-भेदिक गाणींहि सुरू होतींच. दगडोबाबांच्या भोंवतीं भेदिकी-गाण्याचा चहाता वर्ग जमूं लागला. अधून-मधून त्यांच्या बैठकी होऊं लागल्या व हळूहळू दगडोबाबांचा शाहीर म्हणून गाजावाजा होऊं लागला. असेच कांहीं दिवस गेले.

त्या काळीं संगमनेरला हमीदखान नांवाचे गृहस्थ होते. ते बेलीफ होते. ते कलावंतांचे चाहाते म्हणून प्रसिद्ध होते. कलावंतांच्या बैठकी घ्याव्यात, मैफली कराव्यात असा त्यांना मोठा नादच होता. अशा चांगल्या माणसाच्या कानीं संगमनेरला दगडोबाबा नांवाचा चांगला शाहीर आल्याचें आलें. दगडोबाबा व हमीदखान यांच्या ओळखीच्या बैठकी झाल्या आणि हमीदखानानें दगडोबाबांना एका मैफलीचें ( गाण्याच्या बैठकीचें ) निमंत्रण दिलें. ती मैफल दगडूबाबांनीं भलतीच गाजविली. साक्षात् त्यांच्या मुखांतून सरस्वतीच ओसंडत होती. त्यांतच त्यांचा सुरेल आवाज, तालबद्ध, ठेकेदार शाहिरी गाणें, यानें प्रेक्षक मुग्ध झाले. शाहीरींतील त्यांचे ज्ञान, गाण्यांतील कला ऐकून, प्रत्यक्ष पाहून व अनुभवून गाण्याच्या शोकीन मंडळींना त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. दगडोबाबांच्या जीवनाला त्या पहिल्याच मैफली ( बैठकी ) पासून नवी कलाटणी मिळाली आणि संगमनेरला एक आगळेंच रत्न आलें आहे असा त्यांचा लगो-लग डंका झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ............ .. वि: .... ............

त्यापुढें संगमनेर गांवातील गाण्याची जाणकार प्रतिष्ठित मंडळी व हमीद-खान दगडोबाचे नेहमींच कार्यक्रम करूं लागली. त्यांतील महत्त्वाचे कार्यक्रम सुप्रसिद्ध मशिदीजवळच्या भव्य पटागणांत होत असत.कलावंताचा गुणग्राहक म्हणून प्रसिद्ध असलेला हमीदखानालाहि दगडोबाबांबद्दल एक प्रकारचा अभिमान वाटूं लागला आणि त्या वेळेपासून दगडोबाबा,हमिदखान व कोंडाजी राऊळ यांच्या वारंवार बैठकी होऊं लागल्या. त्यांतच हमीदखान यांनीं दगडोबाबांना असें आश्वासन दिलें कीं, " तुमच्या अंगीं एवढे कलागुण आहेत कीं, तुम्ही या शाहिरी व भेदिकच्या कलागुणाच्यां सामर्थ्यावर स्वतःचा फड उभा करणार असाल, तर मी योग्य ती सर्व मदत-करायला तयार आहे." हमीदखान दगडोबाबांच्या मनांतलीच गोष्ट बोलला. त्यामुळें त्यांना बरें वाटलें. आतां आपले कलागुण दाखविण्याची ही वेळ आलेली आहे. तिचा फायदा घेतला पाहिजे असें दगडोबाबांच्या मनानें पक्कें घेतलें आणि त्यांनीं आपला स्वतःचा फड उभारणार असें हमीदखानाला बोलून दाखविलें. हमीदखानाच्या मदतीच्या आश्वासनावर दगडोबाबांनीं साथी-दार कलावंत म्हणून चंदूशहा फकीर, सावळा निरगुडकर रंगनाथ जातेगांवकर, आणि गुरव भराडीकर आदि कलावंतांना जवळ केलें आणि स्वतःचा फड उभा केला. दगडोबाबांच्या जीवनाला आतां वेगळी कलाटणी मिळाली व त्यांनीं तमाशाकलावंताच्या क्षेत्रांत पाऊल टाकलें.

दगडोबाबांचा शाहीर-भेदिक गाण्याचा नांवलौकिक संस्थानी दरबारांत पसरला होता. त्यांतच त्यांच्या तमाशा-फडानें, त्यांच्या या कीर्तींत अधिकच भर पडली आणि त्यांना चोहोंकडून निमंत्रणें येऊं लागलीं. संस्थानी राज्यकर्ते हे कलेचे शोकीन असत. त्यांचा कलावंतांना नेहमींच आश्रय असे. त्यांत कोल्हापूर, बडोदा, इंदोर, देवास, ग्वाल्हेर येथील संस्थानिक विशेष प्रसिद्ध होते.

१९१९–२० च्या सुमारास आलेल्या तापसरीच्या अगोदरच दगडो-बाबांचा फड इंदोर येथील राजदरबारांत गाजला. विशेषतः दगडोबाबा हे मूळचे कलावंत, त्यांत अभिनयपटू, आणि त्यांतच त्यांनीं इंदोर सरकारच्या दरबारांत गरोदर बाईची भूमिका केली. गरोदर बाईचें बोलणें, चालणें, उठणें, बसणें याची त्यांनीं हुबेहुब भूमिका केली. गरोदर बाईची भूमिका उत्तम रीतीनें केल्याबद्दल महाराणी सरकारांनीं दगडोबाबांना खास भरजरी कपड्याचें बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला व त्यांच्या कलागुणामुळें पुढें अनेक वर्षें त्यांना इंदोर सर-

कारकडून तनखा मिळत होता. संस्थानी दरबारनें त्यांच्या कलागुणाचा केवढा हा मान-सन्मान केला !

पुढें दगडोबाबांचा तमाशा-फड बडोदा येथें गेला. बडोदेसरकारच्या दरबारचें त्यांना निमंत्रण मिळालें. त्यांचा दरबारांत सन्मान करण्यांत आला. त्या वेळीं सयाजीमहाराज गायकवाड व त्यांचे छोटे युवराज हजर होते.

दगडोबाबांचा संस्थानी राजदरबारीं असा सन्मान होत होता. त्यांच्या कला-गुणाचा गौरव होऊं लागला, त्यांची कीर्ति वाढतच होती. बडोद्याच्या नंतर दगडोबाबांच्या फडाला धार संस्थान, उज्जैनी येथील दरबारांचीं निमंत्रणें आलीं. तेथेंहि त्यांचा दरबारांत मानसन्मान झाला. त्यांना मानाचें शेला-पागोटें मिळालें. याप्रमाणें दगडोबाबा व त्यांच्या तमाशाफडाची कीर्ति दुमदुमत होती. कलावंत दगडोबाबांचा यथायोग्य सत्कार व सन्मान झाला आणि याच कीर्तीची विजयी पताका हातीं घेऊन ते पुढें तमाशाव्यवसायाच्या क्षेत्रांत उतरले आणि मुंबई, पुणें येथील तमाशा थेटरांत दाखल झाले. त्या वेळीं बाळकराम पंधारे यांच्या फडांत ते 'नाचा' म्हणून असत. मुंबई व पुणें येथील थेटरांत त्यांचा फड गाजत होता. त्यांच्या नांवाची कीर्ति चोहोंकडे पसरत होती.

दगडोबाबांना मंत्र-तंत्र-विद्येचा नाद होता. या विद्येमुळें त्यांना संसारी जीवनांत सुख मिळालें नाहीं व वैवाहिक जीवनहि सुखी होऊं शकलें नाहीं. त्यांचीं एकूण चार लग्नें झाली परंतु दैवयोग असा कीं, एकाहि पत्नीचें मूल जगूं शकलें नाहीं. त्याचा मोठा परिणाम दगडोबाबांच्या मनावर होत असे. म्हणून ते मनानें निराश असत.

दगडोबाबांचा संसार स्थिरावला नाहीं. आपल्या पोटीं मूल-बाळ नाहीं याचीच त्यांना चिंता लागे व त्यामुळें ते खिन्न होत. शेवटीं ते आळंदीला देवदर्शनासाठीं आले होते. देवाच्या आवारांत आल्यावर त्यांच्या मनांत एकाएकीं असा विचार आला कीं आपण पाबळजवळच्या पीर-वडगांवला जावें. त्यांत त्यांच्या सहकाऱ्या-चाहि त्यांना तोच सल्ला होता. वडगांव येथील पीराला जावें असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें. वडगांवला येऊन त्यांनीं पीराचें मनोभावानें दर्शन घेतलें आणि त्याच क्षणीं त्यांच्या मनांत बदल झाला. त्यांनी पीराला 'नवस' केले. पुढें नवसाला देव पावला आणि दगडोबाबांचे पोटीं पुणें येथें मुलगा जन्माला आला. त्याचा जन्म सुमारें ४१ वर्षांपूर्वीं फाल्गुन वद्य नवमीला झाला. तो मुलगा 'दत्तोबा' म्हणजेच

आजचे सुप्रसिद्ध तमाशा-कलावंत व फडमालक दत्तोबा तांबे (साळी) शिरोलीकर-आजहि नियमितपणें दत्तोबा तांबे फाल्गुन वद्य नवमीला पीर-वडगांवला जातात व उरसाला आपली कनात (फड) तेथें उभी करून हजेरी देतात आणि नवसाला देव पावल्याचा दिवस मोठ्या भक्तिभावानें साजरा करतात.

मुलाच्या जन्म दिवसापासून दगडोबाबांनी तंत्र-मंत्राची विद्या सोडली. या विद्येसंबंधींची घरांतील सर्व साधन-सामुग्री त्यांनीं गंगेंत सोडली आणि त्यांनीं जंतर-मंतर-विद्येला कायमचा रामराम ठोकला. त्या वेळेपासून पुढें त्यांना संसारी सुख लाभूं लागलें. वैवाहिक सुख मिळूं लागलें. घरांत मुला-बाळांना सुखाचा वारा खेळवूं लागला. त्याचें दगडोबाबांना सुख-समाधान मिळूं लागलें.

## तमाशा–कलावंत–सोंगाड्यांचा सम्राट्

दगडोबाबा हे एक श्रेष्ठ शाहीर–भेदिक कलावंत. त्यांतच त्यांचा फड चालू झाल्यावर ते एक श्रेष्ठ कलावंत म्हणून चमकूं लागले. ते तमाशाक्षेत्रांतील एक शीघ्र कवि, शाहीर होते. त्यांनीं रचलेल्या त्यांच्या वगांत त्यांची कल्पकता, नाट्यगुण भरपूर दिसतात. त्यांच्या लावणींत काव्यगुण आहेत, प्रसाद आहे.

दगडोबाबांचे गाजलेले वग बरेच आहेत. त्यांपैकीं फार प्रसिद्धि पावलेले

**वगः**—गोरा कुंभार, राजा हरिचंद्र, राजा श्रीयाळ आदि होत. जेव्हां थिएटरात, कनातींत ह्या वगाचा बोर्ड लागे तेव्हां त्यांच्या थेटरांत व कनातींत प्रचंड गर्दी उसळे. आणि देवादिकांच्या कीर्तनाला मंदिर-देवळांत जाणारा भाविक वर्गहि अशा वगाला मोठ्या आवडीनें प्रेक्षक म्हणून हजर राही. त्यांच्या वगांत व लावणी-काव्यांत, नवा बोध असे व त्याचबरोबर उपदेशपर मार्गदर्शनहि असे.

दगडोबाबा हे त्यांच्या फडाचे मुख्य मालक व प्रमुख कलावंत असत. ते कवि, वग-रचनाकार होतेच. पण तमाशांतील सोंगाड्याचें मुख्य कामहि ते अतिशय उत्तम रीतीनें वठवीत असत. त्यांचा सोंगाड्या म्हणून कला-अभिनय श्रेष्ठ प्रतीचा असे. म्हणूनच त्यांना 'सोंगाड्यांचा सम्राट्' असें म्हणत. यांतच त्यांच्या अभिनयाचा गुण-गौरव आहे. कोणाचेंहि कसलेंहि सोंग सजविण्याचें त्यांच्यात मोठे कौशल्य होते. ते कोणाचीहि नक्कल हुबेहुब करण्यांत पटाईत असत. वगाचे काम कनातींत चालू असतां थोड्या वेळांत झटपट सोंग रंगविण्यांत व तें हुबेहुब वठविण्यांत त्यांचा मोठा हातखंडा होता.

सोंगाड्याचें काम पहावें तर तें दगडोबाबांचेंच पहावे, असाच त्या काळीं बोलबाला होता. त्यांच्या सोंगाडीपणाच्या कामांत अश्लीलता नव्हती. त्यांचा सोंगाडेपणाचा विनोद उच्च दर्जाचा, पण सामान्य-जनांना सहज कळणारा होता. त्यांच्या अंगीं उपजत असे विनोदीपणाचे गुण होते. त्यांनीं तमाशांतील सोंगाड्याच्या विनोदाला चांगला दर्जा मिळवून दिला.

आपल्या फडांत सोंगाड्याचें काम करतांना दगडोबाबांनीं सहज-विनोद-निर्मितीचे अनेक यशस्वी प्रयोग बोर्डावर ( कनातींत-थिएटरांत ) केले आहेत. त्यांतील शाब्दिक कोट्यांवर केलेले विनोद चांगल्या बुद्धिमान्-रसिक प्रेक्षकांनाहि थक्क करून सोडीत आणि त्यामुळें गंभीर झालेल्या चेहऱ्यावर हास्य उठत राही.

कुणाचें सोंग आणणें, कुणाची नक्कल करणें या प्रकारच्या दृश्य विनोद-निर्मितींत दगडोबाबांचा कोणीहि हात धरत नव्हते. दृश्य विनोद निर्माण करण्यांत ते अगदींच पटाईत होते. म्हणूनच त्यांना इंदोर दरबारीं गरोदर बाईचें सोंग वठवल्याबद्दल मोठें बक्षीस मिळालें. अशा विनोदांत त्यांनीं प्रेक्षकांना पोटधरून सारखें हासविलें आहे आणि अजूनहि त्याचे ते विनोद लोकांपुढे उभे राहातात. शब्दार्थाचा विपर्यास करून विनोद निर्माण करणें हेंहि त्यांचें एक मोठें अंग होतें. एका शब्दांतून अनेक अर्थ काढावयाचे आणि प्रेक्षकांना खदाखदा हसवायचें हाहि त्यांचा गुण होता.

दगडोबाबा स्टेजवर ( बोर्डावर ) आल्या-आल्या प्रेक्षकांची प्रथमच टाळी पडे आणि त्यांतच ते विनोदी फार्स आपल्या अंगच्या गुणानें रंगवून चढवीत असत. त्या वेळीं तर त्यांच्यांतील विनोदी कलात्मक गुण पराकोटीला चढत असे आणि प्रेक्षकांना वाटे, “ किती हा श्रेष्ठ विनोदी कलावंत आहे ! ”

दगडोबाबा विनोदी काम करीत असतांना त्यांच्यांत मोठा प्रासंगिक हजर-जबाबीपणा असे व त्यांतच उपरोधही भरलेला असे. हरजबाबीपणांत त्या काळीं त्यांचा कोणी हात धरूं शकत नव्हतें. त्याचें कारण त्यांचा शाहिरी वाङ्मयाचा मोठा अभ्यास, बहुश्रुतपणा व मोठा स्वानुभव हेंच होय.

तमाशाच्या कनातींत वा थिएटरांत दगडोबाबा उभे राहिल्यावर विनोद-निर्मितीचे सर्व प्रकार ते सहजपणें प्रसंगा-प्रसंगामागें करीत असत आणि थिएटरांत-

कनातींत सारखा हास्याचा धो धो पाऊस पडत असे. एवढें प्रचंड सामर्थ्य दगडोबाबांच्या विनोदी कामांत असे.

## तमाशांतील सामने

दगडोबाबांचें कलगीवाल्याचें घराणें. त्यामुळें कलगी-तुऱ्याच्या सामन्याचा दगडोबाबांना मोठा अनुभव होता. पुण्यांतहि त्यांनीं मोठमोठ्या तमाशा-फडां-बरोबर मोठ्या जिद्दीनें, ईर्षेनें पण प्रेमभावानें सामने दिलेले आहेत. पुण्यांतील विजयानंद थिएटरांत विठू पाटील सुरलीकर व दगडोबाबा यांचा दीड महिना सवाल-जबाब-स्वरूपांत सामना चालू होता. त्याचप्रमाणें दगडोबाबांनीं सुप्रसिद्ध तमाशा-कलावंत व फडवाले पट्ठे बापूराव, शिवा संभा कौलापूरकर, शिवा तासगांवकर यांच्याशीहि थिएटरांत अनेक वेळां सामने दिले होते. तोडीला तोड, सवालाला जबाब, प्रश्नाला उत्तर, उत्तराला प्रत्युत्तर देऊन आपल्या समोरच्या सामने-वाल्याला चकित केलें आहे. आपल्या सर्वांगपूर्ण गुणांनीं इतर कलावंतांना थक्क करून सोडलें आहे.

थिएटरांत सुप्रसिद्ध तमाशाकलावंतांबरोबर त्यांनीं सामने रंगविले आहेत आणि सामना संपल्यावर बंधु-भावानें, प्रेमानें, आपुलकीच्या भावनेनें एकमेकांना प्रेमानें कडकडून भेटले आहेत. एकमेकांचा त्यांनीं मान-सन्मान ठेवला. एकमेकांचा आदरहि राखला. अशा सामन्यांत मोठ्या कलावंतांना एकमेकाबद्दल केवढा आदर होता हेंच स्पष्ट दिसतें व त्यांच्या थोर मनाची व थोर गुणांची प्रचीति येते. याच काळांत दगडोबाबांचें मंडईला एक दुकान होतें. रात्रीं थिएटरांत व दिवसा आपल्या दुकानीं असा त्यांचा रोजचा कार्यक्रम असे.

दगडोबाबांचे शिष्यमंडळाची संख्याही मोठी होती व आजहि आहे. त्यांच्या शिष्यमंडळीपैकीं आजचे सुप्रसिद्ध तमाशा-कलावंत तमासगीर श्री. उमा बापू चांडोलीकर, बाबू कवठेकर, सावळा औरंगाबादकर, दगडू मिरीकर, शंकर मगणीकर, अहमद बाबू नागापूरकर आणि दुसरे सुमारें तीनशें तमासगीर आहेत.

## घराण्याची परंपरा

आपल्या घराण्याची व आपल्या वडिलांची श्रेष्ठ परंपरा दगडोबाबांचे चिरंजीव सुप्रसिद्ध तमाशा-कलावंत व फड मालक श्री. दत्तोबा तांबे, शिरोलीकर पुढें चालवीत आहेतच.

दत्तोबा व त्यांचे साथीदार दगडोबाबांचे वग अतिशय अभिनयपटुतेनें करतात. दत्तोबाहि आज एक श्रेष्ठ प्रतीचे सोंगाडे आहेत. त्यांचे बंधु डिगांबर हे एक श्रेष्ठ कलावंत आहेत.

दत्तोबाच्या फडांत दगडोबाबांच्या लावण्या मुख्यत्वें गाइल्या जातात व त्यांचेच फार्सहि मोठ्या कुशलतेनें व आकर्षक पद्धतीनें केले जातात.

वडिलांची परंपरा जीवंत ठेवणारे मुलगे अपवादात्मक असतात. त्यांतच आपल्या घराण्याची परंपरा जिवापाड जपणें ही गोष्ट तर दुर्मिळच असते. अशांतच दत्तोबांनीं आपल्या वडिलांची श्रेष्ठ परंपरा चालविलीच; पण आपल्या घराण्याचीहि परंपरा चालविली, हेंच या घराण्याचें वैशिष्ट्य आहे.

दगडोबाबांच्या अंगचें मूळ शाहीर-भेदिक गाण्याचें ज्ञान, त्यांचा जुन्या ग्रंथ-वाङ्मयाचा अभ्यास यामुळें त्यांचा खरा लौकिक वाढलाच; पण पुढेंपुढें त्यांच्या तमाशा-फडामुळें तर त्यांच्या नांवलौकिकाचा डंका चोहोंकडे झाला. आपल्याच अंगच्या लावणी-काव्यगुणामुळें व कलात्मक पद्धतीनें वगरचनेच्या गुणामुळें आणि विनोदी-सोंगाडीपणाच्या आपल्या फडांतील कामामुळें तर त्यांनीं आपल्या लौकिक व कीर्ति-मंदिरावर सोन्याचा कळस चढविला. यांतच त्यांचा कलावंत म्हणून थोरपणा आपोआप सिद्ध होतो.

दगडोबाबांनीं शाहिरी-भेदिक गाणीं म्हटलीं. उत्तम तमाशा-फड केला व त्याचबरोबर घर-संसारही केला. त्यांनीं आपल्या शिरोलीगांवीं घर बांधलें. शेत-वाडी केली आणि आपल्या मुलांचें भावी संसारी जीवन व्यवस्थित जावें एवढें करून ठेवलें.

अशांतच दत्तोबा आपल्या वयाच्या लहानपणापासून तमाशांत कलावंत म्हणून काम करूं लागले. तेहि तमाशाकलेंत प्रविण झाले. स्वतः फड व्यवस्थित-पणें, उत्तम रीतीनें चालविण्याची त्यांच्यांत शक्ति आली. आपल्या डोळ्यांदेखत तमाशा-कलेचा संसार आपल्या मुलानेंच खांद्यावर घेतल्याचें पाहून दगडोबाबांना ‘ याची देहीं याची डोळा ’ मोठें सुख व समाधान लाभलें. मोठा नांवलौकिक, चांगला घर-प्रपंच, डोळ्यांपुढील चांगलीं कर्तीं थोरलीं मुलें पाहिल्यावर कोणालाहि समाधान होणारच. तेंच दगडोबाबांना शेवटीं मोठें समाधान लाभलें.

**शेवटः—**

दगडोबाबांचें वय वाढत होतें. नांवलौकिक मिळत होता. त्याचबरोबर आयुष्यांतील एक एक दिवसहि कमी कमी होत चालला होता. दगडोबाबांच्या कीर्ति-मंदिरावर सोन्याचा कळस लागला, तेव्हां तर ते उतारवयांत होते.

दिवसानुदिवस दगडोबाबांची प्रकृति उतरत चालली. ती पुढेंपुढें अधिकच खालांवत गेली. त्यांना बरें वाटेनासें झालें. दगडूबाबांवर कुणी तरी करणी केली असें लोक बोलूं लागले आणि त्यांची प्रचीति म्हणजे त्यांच्या घरापुढें एका मातीच्या ढिगाऱ्यावर मंतरलेलीं लिंबें सांपडलीं. पुढें मांत्रिकाच्या सल्ल्यानें तीं नदीला सोडून दिलीं. तेव्हां त्यांना उतार पडला; पण पहिलेंच तें पिकलेलें पान. अंगांत शक्ति कमी होती. दम कमी झाला होता.

दगडोबाबांचा शेवटचा क्षण आला. घरांतील सर्व लहानथोर मुलांबाळांवर सुखासमाधानाची त्यांनीं नजर टाकली; आणि श्रेष्ठ कलावंत दगडोबाबा सोमवार ता. २८-१२-१९५३ रोजीं आपल्या राहात्या घरीं कालवश झाले.

दगडोबाबा गेले ! त्यांचा जड पार्थिव देह गेला; पण ते त्यांच्या अंगच्या कलागुणानें, काव्यगुणानें, अमर झाले !

त्याच दगडोबाबांच्या लावण्या, वग वगैरे आम्ही संपादित करून या पुस्तकाच्या स्वरूपांत मराठी जनतेपुढें ठेवीत आहोंत. त्याचा मराठी वाचकांनीं विशेषतः तमाशा-शाहिरी कलावंतांनीं मान-सन्मान करावा.

—संपादक

# दगडुबाबा साळी

## लावण्या व [illegible]

### गण

नमुं वक्रतुंड गणराज । गणराज । गणराज रे राख आमची लाज । मूषकावरती यावें बैसोनी । शारदामाते संगे घेऊनी । प्रेमे भुके लोचन पावा मसी पावा । अहो आज । अहो आज राख आमची लाज ।। नमुनी दास तुझा मी उभा गाया । आपण कृपेची करावी छाया । ठेवितों चरणीं मस्तक आज । अहो आज । अहो आज रे । राख आमची लाज ।। नमु तूं मूळ-कर्ता विघ्नहर्ता । तुझीच सर्वो सत्ता रे ।। तुजविणे भ्राता । नसे मला तूंच सद्गुरुराज । अहो राज । अहो राज रे । राख आमची लाज ।। नमु० ।। कवी दगडु म्हणे मीपण तोडू रे । चला चला सज्जन जोडू रे ।। गोविंद गुरव म्हणे वैरी दिसला त्याचा मोडूं आम्ही माज । अहो माज रे । राख आमची लाज । नमु० ।।

### गण

जय अनंत कल्याणमूर्ती । प्रार्थितों, श्रीगणेशा कारितो तुमची स्तुती । मी बाल बाल कारितो तुमची स्तुति ।। ध्रु०।। या कृपा करूनी आतां । तुम्हीच माझे वरदाता । त्रिभुवनीं तुमची कृती । मी पामर वर्णू किती । आरक्तवर्ण रूप कांती । आससी लाल लाल ।। १ ।। सुवर्णकंकण हातीं । त्यावरी हिरे झळकती । ते वरदहस्त जगजेठी । टेवावी कृपादृष्टी । जरी आरंभ्यास विघ्न कोटी । मयूरारूढ सरस्वती । घेऊन यावे संगती । पुरवावी दिनाची आस । साळी दगडू विनवी दास । कवि काशिनाथ हमेशा । जडी ख्याल ।।

## गौळण

जातो मथुरेला ग सकुबाई, जातो मथुरेला हरी । राही सई पाराबाई विचार आम्ही केला ग हेरी । हाका मारा सीताला ग सकुबाई हाका मारा सीताला । हेरी ।। रमी, चिमी, टमी, घमी चालल्या बाजाराला ग सकुबाई । चालल्या बाजाराला हेरी ।। झाला घोटाळा वाटला ग सकुबाई झाला घोटाळा वाटला हेरी ।। परटाची बी एक सुताराची ग बी हाका मारा गंगीला ग सकुबाई हाका मारा गंगीला हेरी ।। साऱ्या गवळणींनीं विचार केला, चालल्या बाजारला ग सकुबाई चालल्या बाजाराला हेरी । मेळा वेशीच्या तोंडीं आला ग सकुबाई । वेशीच्या तोंडी हेरी । कृष्ण अवतारी नर ब्रह्मचारी आडवा आला वाटला ग सकुबाई आडवा आला हेरी ।। म्हणे लक्षुमण बाबुला ग सकूबाई लक्षुमण बाबूला हेरी । भक्तीसाठीं देव उभा राहिला । चला की । दर्शनाला सकुबाई चला की दर्शनाला हेरी ।।

## गौळण

देवदेवकी बंदीखानी । सात बाळ कंसाची दोनी । जन्म घेतला कृष्णानी । किल्ल्या-कुलपं पडली गळोनी । वसुदेव गेले घेऊनशानी । गेले यमुना पासी लागले । देवचरणास जी यमुना । उतरून गोकुळांत गेला पुत्र । यश्वदेपुढें ठेवीला । यश्वदा होती भर झोपीला । मधानीच्या अंमलांत निघाला । कन्या घेऊन परत आला । येऊन पोचला बंदीशाळेला । झाला आनंद देवकीशीं । कळेना करनी कोणासी जी । जेव्हां बाळ रडूं लागलें । दूतांनी जाऊन सांगितले । तेव्हां कंसाला माहीत झाले । धांवत पळत तेथें आले । हातचे बाळ हिसकावून घेतले । गरगरा फिरवू लागले । गेला आपटायासी । उडाली गेली गगनासी जी । आकाशांतूनीं बोलती झाली । तेव्हां कंसाला तुझा बा काळ गोकूळाला जी । गवळ्या घरीं तो श्रीहरी । हरी प्रगट झाला । धाक पहा पडला कंसाला जी ।

## गौळण

ब्राह्मणाची अका एक । मराठ्याची सका । दोघी जनीनं एक विचार केला । गोकुळच्या पोरी । माठ शिरावरी । राधा म्हणे ग बाई उशीर झाला ।।

सोनाराची तारी । एक शिंप्याची सरी । गुजराच्या फुलीने थाट ग केला । लिंगाड्याची गुळी । एक कामाठ्याची येली । दोघींजनीने सीनगार केला । सुताराची रथी । एक परटाची गवी । साळ्याच्या गंगीने माठ भरिला । कोष्ट्याची सीता । एक कोळ्याची गीता । न्हाव्याच्या रंगीने वेळ केला । माळ्याची यमनी एक तेल्याची जमनी । वाण्याच्या हुलासीने झोक केला । कुंभाराची सई । एक ल्हाराची ताई । गुरवाची जाई म्हणे चला चला । तेलंग्याची जनी । एक परदेशाची आनी । तांबटाच्या राहीला बोलवूं चला । गोंधळ्याची धोंडी । एक मराड्याची कोंडी । वंजाऱ्याची चंदी म्हणे वाट चाला । तांबुळ्याची शारी एक मोमीनाची प्यारी । मनेराची फाती ध्या ध्या संगतीला । पठाणाची मरमीना । एक रोहील्याची जरीना । आरबाची नुरी म्हणे जल्दी चला । पिंजाऱ्याची हमदी । एक कसयाची म्हमदी । रामुश्याची भिमी गेली आघाडीला । जोशाची हिरी । एक गोपाळाची गवरी । दारूड्याच्या रखमीला राग आला । धनगराची गोदी एक सनगराची बदी । भोयाची पिरती म्हणे गो चला । घिसाड्याची गया । एका वडाऱ्याची जया । खाटकाची रेणू म्हणे आली आली चला । लोहाराची चंद्री । एक मंगुड्याची सुंदरी । बागड्याची चिकनी आली वाटला । कातवट्याची घुंगरी । पारध्याची हेंदरी । गोसाव्याची दगडी म्हणे वेळ झाला । महाराची भिवरी । मांगाची चवरी । चांभाराच्या मैनीनें घोटाळा केला । बुरूडाची ठकी । एक कैकाड्याची मुकी । कोल्हाट्याचीला । राग आला । नवी सावळाची कवीं लागे गुरूच्या पाई सर्वां आधी तुम्ही भजा श्रीगुरूला दगडू बाबाची गादी नीट करतो कवी । शरण जावा त्या श्रीहरीला ॥

## गवळण ( बापूपठे या चालीवर )

कृष्ण घरीं आला काय दही दूध उंचस्थळीं । पाडियले छिद्र तळीं । गोप मंडळी केली धुमफळी । लावून वंजळी पेला किंग कान्हा पाहे । कृष्ण ॥ १ ॥ घरीं आळा काय । गाई वासरे सगळी । केली सोडुनी मोकळी । पिटोनी आले आळी । माझा गवळी, मसी वेळोवेळीं मारितो की पाहे । कृष्ण ॥ २ ॥ काल रात्रीं संध्याकाळीं । नेत्र झाकूनी कळवळी । लाडे कवळी आला जवळी स्तन माझे पिळी पळाली की पाहे कृष्ण ॥ ३ ॥ गातो सवाई

दगडू साळी काशिनाथ कवि आगळी जडी वेळोवेळी मोत्याची वळी रत्नवेगळी माधव म्हणे पाहे कृष्ण ॥४॥

## गौळण

नको ग बाई राहाणे या गोकुळीं । खरच आली मला बाई चंडाळी ।ध्रु०। माझी भिवरी काल दुपारीं घागर घेऊन यमुनातिरी । भरून परत येता घरीं । खेळत होता कुठे मुरारी । धावत आला उभी ग नारी ।चेंडू दे म्हणे धरली मिरी । ते हात गुंतले दोन्ही घागरी । खाली केली कीं ग भोंगळी । मुळीच नको ग बाई राहाणे या गोकुळी । न्हात होते बाई मी परसादारीं । फेडून लुगडे खुंटीवरी । केस मोकळे पाणी शिरी । न कळत आला बसे समोरी खुप बांधा ग तुझा म्हणे वळली नारी । राधेपेक्षा म्हणे तुजवरीं प्रित सारी । रागे धरावे, नाहीं तेथें जसी झाले मी बावळी ॥२॥ नको ग बाई । धरावं मारावं लेकरूं समर्थाचं । आईला सांगावं तिनं म्हणावं । साऱ्याला दुःख माझ्याच पोराचं । आपण आपल्याच मनी लाजावं, साकडे आपल्याच अब्रुचं । काय सांगु केली त्याने आपलीच रांडोळी ॥३॥ नको ग बाई राहाणे या गोकुळीं । एके दिवशीं सहज जरी तो आला घरीं । मी त्यासी म्हणे उभा कारे खाली बैस तरी । मोठ्या गोष्टी सांगुं लागला आग आंगीं चतुराई खरी । दाही अवतार म्याच घेतले । तोच मी गोकुळीं आठवा हरि । आतां बंदीशाळा फोडिल, कंस । मारील मथुरापुरी, मुलाचे डोक्यावर दिला पाय । म्हणे असा बळी घातला पाताळीं । भातो भातिचा । प्रकार चवीचा । स्वयंपाक ताजा नवा । दगडूबाबाचे शब्द जसे तिखट मिरची खावा । सज्जन जाणे चव याची बाण लागे वैऱ्याचे जिवा । प्रेमे आनंदे गुण गातो हरीचे । सवाई साळी । सेवा तुझी घडो वनमाळी ॥

## ( गवळणी ढोलकीच्या व पेटीच्या )

चला गवळणी हो येताका तुम्ही चला जाऊ मथुरे हाटा । करून नऊ-वारी निघा लवकरी नका करू बोभाटा । गंगे रंगे बोलव राधेला चला निघा पटापटा । ब्राह्मणाची आका एक मराठ्याची सका यांच्या संगतीनें नाहीं वटा । जईना आतारीन मैना वतारी लई बायका बालटा । कासाराची सुन जनी

लिंगाड्याची वर्णी ह्या दोघींचा उल मोठा । वाण्याची मूल कुली गुजराची वणी या बाईकांचा तोराच मोठा । गुरवाचीं रमी एक परटाची गबी यांचे संगातिनं लागला बटा । बाहिना सनगरीन गिरज वंजारीण डोहरीण चांगटा महाराची माळी एक चांभाराची साळी । भंगणीचा विटाळ मोठा । गवळणीचा गजघाट झाला सारा एकथाट राधा चाले झटाझटा । सवाई साळी म्हणे दगडुबा कृष्ण नाटकी मोठा ॥ ध्रु ॥

## गौळण

काय कृष्णा हा हट्ट सोडी जाऊ दे माझी वाट ॥ ध्रु ॥ गुरे वळीतो माझ्या गाई पिळोनी कान हाती देई नको बोलु मसी दाट । का ॥ १ ॥ गावची पोर जमवूनी दाट । दही दुध राहिना कुठ । चोरी करुनी भरसी पोट आला तुझा वीट ॥ २ ॥ कुळगोत्र तुजला नाहीं । यशोदेसी म्हणशी आई । गवळ्याच्या वाळितो गाई । लज्जा सोडुनी सारी चट ॥ ३ ॥ कवी दगडू शरण तरी । जळीं स्थळीं भरला हो तो विटेवरी भक्ता देई भेट भेट ॥ ४ ॥

## गौळण

मी नांवाची गवळण राही । दान मागतो मिळायाचे नाहीं । सोड कृष्णा जाऊदे मला । सगळा बाजार पुढें गेला । का छळसी उशीर झाला । तुझ्या खोडीला करू मी काय । कसे कोणाचे ऐकत नाहीं ॥

## गौळण

उखळासी बांधिती आई । खोड्या लई करतो गोपाळ । सारे जमवितो दहीदुध खातो आता हुशार झाला तु लई । चालता होई । दान मागतो मिळायाचे नाहीं ॥ १ ॥ येक म्हणती वसुदेवाचा । एक म्हणती नंदाचा । ठाव मुळींच नाहीं बापाचा । मथुरेंत जन्म गोपाळा, तुला आणून घातले गोकुळा । म्हणती यशोदेचा बाळ श्रीरंगाला । तुला खेळताना पाहिले नंगा । करितोस दंगा । आता हुशार झाला तू लई चालता होय । दान सांगते मिळायाचे नाहीं ॥ २ ॥ कंसाची तुला भिती तुला म्हणून नंदगृहीं आला । आम्ही गवळणनीने संभाळ केला. आम्ही मिळून गवळीबाला । कंसा सांगू कृष्ण गोकुळा । मग राहिल सर्व चाळा मस्करी करता । चल हो बाजूला

जाऊं दे दुरस्ता । मी लीन आहे तुझे पाई । दगडू साळी कवी दान मागतो मिळायाचे नाहीं ॥

## गौळण

तारक्रसाग हारि तुझा ग बाई । रात्रीं मंदिरी सामसुमारी । घरधनी शेजारीं माझा ग बाई । दाढी वेणी धरी माझी ग बाई । गाठ घिली आहे ब्रह्मादिकां न सुटे । करणी करून पळे हरि तुझा ग बाई । मी म्हणे सोडा बाई । तो म्हणे सोडी । वढावढी सारी ग सारी बाई । चढेना जळता जळेना मरण खरोखरीच ग बाई दगडूजी साळी । सांगू तरी माई त्रास होतो आम्हा भारी ग बाई ।

## गौळण

मथुरापुरचा बाजार दुरचा । विक्री करू चला नटून थटून ॥ ध्रु ॥ गंगुरंगु वरल्या आळीची सर्वात भिमा भारी बडीची त्वकर आवरा नखरा सारा । जाऊ चला आज नटून नटून ॥ १ ॥ गेल्या बाजारी मंदा पडला । घरचा सारा प्रपंच नडला । बाजार खुटला । घरचा खटला बोलु लागे सर्व तुटून तुटून ॥ २ ॥ आजचा बाजार आहे सणाचा । विक्री करू चला कैसे गुणाचा हरि भाऊ साळी । का हिंमत चाळी । शब्द दावा कुठे तुटून तुटून ॥ ४ ॥

## गौळण

चल सोड जाऊ दे तूं वाट घेतलीस पाठ । बोलु नको दाट सांगते मी तुजला । नंदाघरच्या गुराख्या चोरा छळशी का मजला ॥१॥ मुळ ठिकाण माहित मजसी सांगता बहु चिडसी करीत चोरी फिरसी । गोपसंगतीला आईबाप वंदामंदी शरम नाहीं तुजला ॥ २ ॥ शेषशयनीं सागरी असती । बारा घरे फिरसी । माया पुढें करसी । आपण मागे दडला, करणी करुन अकरावा भाव तुझा कळला । गाई वळसी, पोरे पिटसी, मागे कांहीं करसी । सिंदोऱ्या खासी । मजपुढें नाहीं चालणार सांगते तुला । धन्य धन्य त्या गवळणी नारी । नगरी सारी नंदाच्या घरी । हरि तूं रमला । यशोदेने करून पालन तुसी वाढविला । वासुदेव पिता देवकी जननी । पुण्य केले त्यांनीं । पोटी चक्रपाणी त्या अवतार धरला । दगडू म्हणे सारे तुरेवाले सांगा मजला ।

## गौळण

विनविते कृष्णा रे छळशी तूं मला ॥ ध्रु ॥ नका मला सतवूं फार । जिवाचा जिवलग मुरलीधर । पूर्ण ब्रह्म अवतार । शिरी ठेवी कर रे ॥ १ ॥ निर्मळ आम्ही व्रजनारी । बाहेर मलीन दिसे पुतनारी । तूच आमचा हरि कैवारी । शांत काम कर रे ॥ २ ॥ गवळ्या घरीं अवतार, पांडवांचा झाला नोकर । घोडे हाकी धरी वागदोर । तसी तू दया कर रे ॥ ३ ॥ कवि दगडू तुझे गुण गाया माधव शरण पंढरी राया वैरी एक ठोकितो वाह्या त्याचा भंग कर रे ॥ ४ ॥

## गौळण

आल्या गवळणी जमुनी साऱ्या जणी । चालल्या मथुराभुवनीं । पहा हरि दिसतो वृंदावनी हा । चला जाऊ त्यासी चुकवूनी । पहातां पहातां चक्रपाणी हा । आला गोपाळास घेऊनी । माझ्या गोपाळास चुकवुनीया । चालल्या जबरदस्तीनी हा । राधा गवळण फार शाहाणी । हा । तिसीच धरावे जाऊनी हा । गातो दगडु साळी गुणी हा । लीन हरि पदीं राहुनी ॥

## गवळण ( किती आवळू कवळू चाल )

चक्रपाणी सोड पाणी । भरूं दे पाणी । जाईल पाणी । जगीं माझें पाणी बाई । माझ्या अब्रूची हानी । बाई ग जी माझ्या अब्रूची हानी वाईट घरधनी । मूर्ति लहान मोठी करणी । ब्रह्मांड भुवनीं गुप्त हेरनी घरी माझे बाई ।

## गौळण

( नेसूनया खुपला पेठणी )

चला आज मथुरे बाजारीं, गवळणी गेल्या बाई पुढें । म्हणून तुम्हा कडे धावत आलें. उशीर आता नको लाऊ गडे ! दह्या-दुधाचे माठ भरोनी । सोडुनी आले बाई तुम्हाकडे । करील एखादी करणी । मागे कृष्णच फोडील मारुनी खडे । याच्या त्रासाने त्रासून गेले । कांहीं सुचेना मसी भूल पडे । मागेपुढे गांजी सासुबाई अब्रूचे जसे माझ्या फाकडे । ३॥ पहा भावाचा कृष्ण भुकेला । नाहीं लक्ष साधनाकडे । दगडू साळी लीन हरिपाई । म्हणे राहावे त्वा दृष्टीपुढे ॥ ४ ॥

# गवळण दाही अवताराची

मी पूर्ण ब्रह्ममूर्ति ग ज्ञानजोती राधे मसी ईश्वररूप म्हणती ॥ ध्रु० ॥ ( चाल कटाव ) मूळ आरंभी ऐक सुंदरी । मच्छ अवतार धरून सत्वरी । शकार मातेच्या उदरीं धरून गेलों अवतार गेलों सागरीं । घेऊन आलों वेदांतरीं । अग शंकासुर वधिला । सांगतो मूळ कथा तुजला । १ । पुढें पहा कूर्म अवतारी मंदिराचळ परवत भारी । त्यास तारुनी पाठीवरी । मग वऱ्हाह तिसऱ्या अवतारी । दैत्य हिरणाक्ष होता भारी । मारुनी त्याला नरहारी अवतार मीच धरिला अग अग राधे । २ ॥ नरसिंह चौथ्या अवतारी । स्तंभामंदी गुरगुर करी । हिरणाक्ष मांडीवरी । चिरून टाकिला त्यासी उदरीं । नवता दिवस नवती रात्र । दिला मोक्ष त्याला । रक्षिले मी प्रल्हादाला । मग वामन अवतारीं । माता अदितीच्या उदरीं । भाद्रपद मासीं । पद ठेवूनी बळीचे शिरीं । दडपूनी पाताळा भीतरीं । रक्षुनी त्याला गुंतलों त्याच्या वचनाला । पुढें मीच सहाव्या अवतारीं । रेणुकामातेच्या उदरीं । परशराम होऊनी सत्वरी । वधिले क्षत्रीय पृथ्वीवरी । केला पुरुषार्थ जिंकून वैरी । पुढें आयोध्येला राम अवतार मीच धरिला ॥ ५ ॥ श्रीराम सातवे अवतारीं कौशल्येमातेच्या उदरीं । जन्म घेतला दोन प्रहरीं । रावण कुंभकर्ण वैरी । त्यासी लढलों परोपरी । वधिले दोघांस मिळविली ज्योत ज्योतिला ॥ ६ ॥ आठवा अवतार सुंदरी । प्रगट झालों मथुरापुरी । गुप्त आलो गोकुळाभीतरी । दह्यादुधाची करून चोरी । भोगीत अवघ्या गवळणी नारी । हा निश्चय ठरला असा । मी अंगिकार केला ॥ ७ ॥ असे झाली मागे परी येथून पुढें जी गोष्ट होणारी तीही सांगतो तुजला सारी । कंस मारुती मथुरापुरीं । उग्रसेन तो राज्यावरीं । बैसवुनी जाई पुढे मी द्वारकेला ॥ ८ ॥ परणावया रुखमिणी सुंदरी । जाईन मी कोंढणपुरीं । शिशुपालाची बडबड सारी । आईकून घेईल परोपरी । रुक्मी त्याचा कैवारी । येईल विघ्नाला यावर बांधीन मी त्याला ॥ ९ ॥ रुक्मी याची का फुगे, कई येखादा सुदगाहिरी । तीन लावण्या मंदी । त्यानें निंदा दुसऱ्याची केली । जसी हत्तीवर भुकती कुत्री । नाहीं अक्कल त्याला । जसा कांहीं चळवा भरला । काया विखिन त्याची सारी । घेऊनिया रुखमीणी नवरी । करील राज्य द्वारका नगरीं । तेथे एकदा मांडीवरी । घेईल राधे तुजला । जाईल मग

बुद्ध अवतराला ॥११॥ बौद्ध अवताराचे अखेरी । मीच कलंकी पृथ्वीवरीं । होईन तैसा मी नट धारी । साळी दगडुबा पुढे अखेरी गुरुकृपेनें आम्ही केशरी नाहीं धावणार कोल्यावरी । दत्तुदिगांबर खुप रंगला । रोजबा रंगणाला टोणपे देती निगुऱ्याला ।

## गौळण

गवळणी आल्या आटोकाट । शिरी घेऊन गोरस माठ । कृष्णाने धरली वाट । काय मातमातमात । ध्रु०॥ गोपाळ याचे संगतीसी । साहीजण वेडे होती । आठराची खुंटली गती । चौघेजण तटस्थ होती । पापाची लागेना गणती मग त्यात त्यात । आठरा जणी झाल्या कष्टी । त्या आकरा जणी हिरमुष्टी । त्या बाराजणी देखण्या । सोळाजणी चतुर शहाण्या । त्या चौघी डोळे मागण्या जोडी हातहात । चौसष्ट जणी त्या शिणल्या । चौदा जणी म्होर आल्या । पंचवीसा झाली माव । त्या चरणीं मागती ठाव । श्री हरिचे गुण वैभवगीत । गात गात गात ॥ ३ ॥ साठउन लज्जा पोटीं । श्रीहारीचे चरणी मिठी । सोडी वाट श्रीरंगा का बळेंच करिसी दंगा । दगडुसाळी प्रसंगा आहे यात यांत यांत.

## गौळण ( हरिसाळी )

हाट करिता माठ भरिता मडकी वेळ सरला । बेत ठरला । माल भरला मडकी । पैशाची अकरी । करून विकरी हे सोडची खरं बोलते, पुढे चालते । वझे माझे भलते जड । करिता गमजा । मनीं समजा । आले उमजा कडकी । चालून थकले जिवासी विटले । जन्माची मडकी । शब्द खुटला, घाम फुटला, धीर तुटला चडकी ॥ २ ॥ नंद बालका, जग चालका हासे हालका, ताडकी । हरि साळी कवीचा आंबरस घ्या गोड की । चाल पहिली-तऱ्हा गाईली । नव्हे वायली मोडकी ॥ ३ ॥

## गौळण

राधा उठुनी करी गडबड बाजाराची नड । चला मथुरेला जाऊ बाई । माल देऊं रोकडा ॥ १ ॥ चढा बेतानी लागला चढा भारी अवघड । माल घेता डोकिला आलाय भारी कड । यशोदेचा कृष्ण अल्ड । वघ चहुकड । गुणी हरि साळी कविची आकड ॥ ३ ॥

## गौळण

मी नंदाचा बाळ ग । कृष्ण मुरारी मजला म्हणती कंसाचा काळ ॥१॥ मारून करील त्याचा जाल । त्रिलोकाचे सूत्र हातीं नाचवीन तिन्ही ताल ॥ २ ॥ असा मी आचीत चाळ । मथूरेमाजी पराक्रमाने करील सखा ॥ ३ ॥ फोडील दुष्टाचे भाळ ग । संत सज्जन असतील चाकरीला संभाळ ॥ ४ ॥ रुखमिणी घालील मसी माया । रुखमी यासी रथास बांधून मारील शिशुपाल । स्यमंतक मण्याचा आळ । जांबीवंतास खेळेल झोंबी असा मी भूपाळ ॥ ६ ॥ राधे नको करू टाळाटाळ । घे मतलब साधून । काय पहासी वेळ काळ । दत्तोबा साळी आहे बाळ । कवीचा दस्त जसा सुरतीचा मोती वेढाळ ॥ ७ ॥

## गौळण

माठ भरा जाऊ मथुरेच्या बाजारीं । वेळ झाला किती ग तरी । दिवस फार आला माथ्यावरीं । निघाल्या गवळणीच्या नारी । कृष्णी गंगी पारी पारी । मेळा आला वेसीबाहेरी । मागे राहीली चंद्री भिवरी । बाई कृष्णाची भिती भारी । येईल तो निघा लवकरी । करूनी थाट परोपरी । आघाडीला राधा सुंदरी । शिरावरी माठ आरोळ्या भारी । आली तेथें कृष्णाची स्वारी । साळी दगडूजी कवि करी डफावर कलगी लहीर मारी जी ॥

## गौळण

सोडी तरी का धरिसी पदरीं । मज झाला उशीर हरी । ध्रु०। असा हट्ट नाहीं कामाचा । जाच मला जावानंदाचा । आम्ही गरीब नारी । का करितो जबरी । निती नाहीं तुझी बरी ॥ १ ॥ प्राण व्याकूळ झाला । कहार पहा उन्हाचा आहे किती । आहे माठ शिरीं । जड झाले भारी । किती विनवूं मी परोपरी । आहेस वैरी दुर्जनाचा । करी सांभाळ तुज भक्ताचा । असा चक्रधारी तूं खरोखरी । साळी दगडूजी कवी करी ॥

## गरीबीचा पाहुणचार ( फार्स )

काय देवाने जन्म घातला गरीबीने पिडलो भारी । वस्ती काढावी कुठवरी । हातापायाचा झाला गळाठा बसून गेली कंबर सारी । दुष्काळावर

दुष्काळ दादा कांहीं पिकेना शेतावरी नाहीं आधार कांहीं पदरी। ही मुले लेकरे कशी पोसावी धाक बसून गेला भारी। गांव मामाचा नाहीं कामाचा कोणी आपल्या वेळीं। सोईरे-धाईरे घरोघरीं। नाहीं दमडीचा आधार कोणाचा किती कंठावे जिवावरी। (भाषण) काय करूं। गरिबीने फारच वेढलो। मुले-लेकरे खाण्यावाचून मरायास लागली। गांवांत कोणी मूठभर धान्य देण्यास तयार नाहीं। पैसा पदरी नाहीं धंदा चालेना मरावे तर मागे मुलाचे कसे होईल म्हणून गुंगुन बसतों। (चाल बायकोची) का हो घरधनी बसले गुंगुनी अशानें धकेल कसे तरी? करा कांहीं मोलमजुरी। आणा पैसा मिळेल कांहीं करून खाऊ घाटा घुगरी। चटनी मिरची कांहीं तरी खाऊ वेळेवरी लक्ष असु द्या शेतावरी। मोलकऱ्याने शाळू पेरला करून पहा तिकडे फेरी। (भाषण नवऱ्याचे) मला म्हणते तिकडे फेरी करा. तुला तिकडे जाता येत का नाहीं? खायाचे व तंगड्या पसरून बसायाचे. संसार एकाचा का दोघांचा? स्त्रीः—मग मला डोंगरच्या शिळा आणण्यास सांगता का। आग डोंगरच्या शिळा नाहीं पण बायकाचे काम काय। लेकरू बाळ सुपटोपलं मडक गाडग। खातीस न बसतीस। कारभारी मग का मी तुम्हास करावयास सांगते। तुम्हास कोठे मोल मजुरी पहाणे असल्यास तुम्ही पहा। दिवस काळाचे मोलमजुरी तरी कोण देणार। आतां एक करा. शेती जाऊन पाहून या शाळू कसा आहे। मी कालच गेले होते। शाळू अजून लहानच आहे। नवराः— आतां मोठी पंचाईत झाली. शाळू पिकणार कधीं व आपण खाणार कधीं अग हो मला येक युक्ती सुचली. घरांत दोन पायली बाजरी आहे. त्यावर तू आठपंधरा दिवस काढून घे. तोवर मी जातो सोबत्यांचे कडे. स्त्री-अहो जा-नवरा— “ पण देक कर घराला जीव लाव ” स्त्री- माझा— मला मणजी कसा. नवरा-तुझा तुला म्हणजे असा दुष्काळाचा येखाद्या पासून शेरभर बाजरी घेशील, वर तंगड्या करशील असे कांहीं करू नको स्त्री-कारभारी असे होईल का? “ अग असे होते म्हणून तुला सांगतो ” बरे मी जर कांहीं केले तर तुम्ही पहाण्यास आले का? पुरुष- “ मला स्वप्न पडत असत. ” मित्राकडे जातो व रामराम करतो. बोलण्या-बसण्यांत वेळ लागतो. जीव भुकेने व्याकुळ होतो. मित्रास म्हणतो, “ याची पान सुपारी, मला तर भुक लागली. आतां सांगितल्या वाचून खाण्यास मिळणार

नाहीं. ( चाल पहिली ) आटपा दादा आग्रह तुमचा पुरा झाला हा सत्कार । झालो भुकेने बेजार आमच्या गावी दुष्काळ पडला । म्हणून आलो इथवर । लवकर लावा तजवीज माझ्या पोटामदीं शिरला कहार । डोळे फिरती गरगर । तुमच्या भरवशावरतीच आलो । नका देऊ आंतर ।

घरधनी पानसुपारी खातो. चहापाणी तयार आहे. दादा मुले बाळे किती आहे आता विचारता म्हणून सांगणे भाग आहे. पाटील । वर्षाला पोरे काढीत होतां खंडीभर पुढे पडला दुष्काळ आम्ही पोरे केली बंद तो म्हणतो. हे तुझ्या हातातच सार. बाबा जाई तर होईल नाहीं तर होत कुठून? मग एक तळघर खणून त्यांत पोरे कोंडून ठेऊन त्याच्या तोंडावर जात्याची तळी ठेविली. बाईकुला त्यावर बसवूनी इकडे आलो. आटपा हे पुरे करा. भुक लागली आधी जेऊ घाला.

मग जेऊं घालतात. आठ-पंधरा दिवस राहून त्यास विचारून जावयास निघतो. घरधन्यास म्हणतो ( चाल पहिली ) पाऊस पाणी पडला दादा झाली आमदानी देशावर घरीं आहेत पोरसोरं । त्यांच्या दुःखाचा आठव होतो मला लागला लई घोर । घरधनी घोर कशाचा, चार-सहा पायली धान्य घेऊन जा । ( हा म्हणतो ) दादा मी जसा आठ-पंधरा दिवस राहिलों, तसें तुम्हास माझे हात जोडून सांगणें आहे. ( चाल पहिली ) तुमचे इथे राहून वडेजाव टेवला फार । आतां माझी विनती जराभर । माझ्या इथे यावा सांगतो पदर पसरून ( चाल खानदेशी ) उघड रांडं दार डोकीला भार माझ्या लई झाला भार माझ्या लई झाला भार । दया नाहीं तुला ग जी र जी । स्त्रीः—काय आले कमाई करून आले उरी भरून घरामदी चला । पाहू दे मला रे जी । घरी टाकून लेकरे काळे केलें तोंड काळे शरम तुला । आलात कशाला रे जी । बरे असो कारभारी तुम्ही तिकडे गेले तुमचे कसे काय झालें । मग तो आणलेली बाजरी दाखवतो व नवरा-बायकोचे भापण होते. नवराः—आपला शाळू कसा काय आहे? तीः—( चाल ) आला शाळु हुरड्यावर । घाला जाऊन माळा लवकर । करा राखण स्वतः घ्या गोफन । हुसका पाखरं । ( चाल पहिली ) लांगालुंगा कांडून कुटून आणिन तुम्हाला भाकर । जा उठा नका लाऊ करकर । भाऊबंदाचे लई हासू झाले । पाडा तोंडावर खेटर । ( भाषण ) मित्र भेटीस येतात. त्याचे घरीं विचारतात. बायको " रानांत गेले आहेत मग मित्र रानांत जातात. मग

तो शिव्या देतो. मग तो त्यांना घरीं घेऊन येतो व वस्तीवर बसून बायकोस सांगण्याकरितां जातो व स्वयंपाक कर असें सांगतो. ती म्हणते—उसने-पासने कोणी देईना । हिंडोन पाहिले घरोघरीं कोणीच चढूं देईना पाहिरी । मग तो- "कुठे कोणा खालीं पालथी पडून आण व पाव्हण्यास जेऊ घाल । ती- "तुम्हीच जा कोणाला खाली पालथे पाडा व मला आणून द्या"। असे भाषण करताच तो तिला मारतो व पाव्हणे त्यास सोडविण्यास जातात. विचारतात, दादा काय भानगड आहे? तोः—भानगड कांहीं नाहीं मी तिला सांगितले की आधी शिळ्यापाक्या न्याहाऱ्या पाव्हण्यास घाल. ती म्हणते पाव्हणे फार दिवसांनी आले आहेत त्यांना शिळे कसे वाढावे? मी चपात्या करते. पाव्हणे म्हणतात— चपात्या का असेनात. भूक लागली आहे। तो-चपात्या खाता? मग बसा माझ्या बाबांनो— पुन्हा बायकोला मारतो. पुन्हा तसाच बहाणा करतो. (चाल—कोणी एक फिरस्ता गोसावी आला) अहो आई का आई का पती मी पडते पाया। मारू नका मसी । एक युक्ती मला आठवली। जरा बसा खाली सांगते तुम्हासी। अरे हा। पाहुण्यासी झोकून थाप । गप लावा स्नानासी। जी। जें राहिल त्यांचे घरीं। नेऊन बाजारीं। ठेवा गहाणासी। या घेऊन त्याचा सिधा। स्वयपाक सुद्धा करण्यास लागते जी। पाहुण्यासी जेऊ द्या। पाव्हणे जेवण झाल्यावर जाण्यास निघतात व जोडे मागतात. (चाल अभंगाची) तुमच्या पायाचा प्रसाद दादा । जोडे ठेविले म्या गहाण। हें जेवण मी केले तुम्हाला ठेवला तुमचा बहुमान। वेळ येईल तसे वागावे असे सांगितले वडिलांनी। गरिबीला शरम कशाची विलटाचे पदरीं वान । कवी काशिनाथ म्हणे। घालवले या अब्रुला गरिबीन । म्हणे दगडूजी उपाय नसल्यावर जतन तिसी करील कोणी ।

## लावणी

(चाल—गणाची)

काय सांगु मित्रा सखया। हुरहुर वाटे जीवाया। रात्रीं मज स्वप्न पडलें। स्त्रीसंगे कर्म घडले। रतीरंग मन हें जडलें। जागे होताच गेले लया ॥१॥
वांध्यांत पातळ सडक। बोलण्यांत शब्द कडक। जीवाला बसली धडक।

भुकेलो मी तिज शिवाय ॥२॥ पाहून तिचे रूप कांती । झालो मी तन्मय चित्ती । होईल सुखभेटी अंती । दाखव ती आणुनिया ॥३॥ स्वप्नाचि हे काय सुख । जन्मातरी ते विन्मुख । दगडू साळी म्हणे हा मूर्ख काय गेला भुलोनी या ॥४॥

## मित्रासी बोलणें-लावणी

( अगा सुंदरी हे माजली )

तंग चोळीला रंग कुसुंबी । अग दिसतसे केतकीपरी । केतकी परी ग । दंग झालो पाहून नेत्रीं । कोमल चेहेरा मारितो लहरीं । लाली चमकती गालावरी गालावरी हो । रसरसले जोबन उरी । पाईपोल्हारे खुप झणकरी । भडभडीत पातळ जरी । हो येत असे बारवा तिरीं । चाल ।।

लाखांत भोगाई पाहून एक रतन । पाहिजे चंद्राची ज्योत हिऱ्याची खाण । ओ चतुराईने करी अमृत प्राशन । नाहीं तर व्यर्थ नरदेह कर्म । जन्मुन जी । पुढें झगडा, सांग सखे सासरीं का माहेरीं । करमेल तुला येवढी जरुरी । गुंतला हेतु तुजवर भारी । आई मेल्या खाशील आता पैजारी । नारी आम्ही फंदी मुशाफर लहरी । अरे मेल्या दिसतोस फार गईरी । चाल : चुंबन तरी एकदा तरी घ्यावें वाटते । कांहीं मेल्या पाजी, मला चघळ दिसतो । झाडी पाहून पाडी शुक चोच मारीतो । सहज येईल पारधी घेईल प्राण तो । घेऊ दे रुची रुची शरम कशाची थोडी तरी आशा करी भीती आमुची । जा रे मेल्या नीघं जाईल साल पाठीची । आईकरी तुजवरी भारी प्रीत, कशी ग लटपट होऊ दे सारी । साजना चोरली सीता मारीले दशवदनासी जी । अरे मेल्या मी पराई नार । तुझा कीर्ति सोसु कहार । हे दुःख मला साहेना जी । आरे भडव्या तुझी काढील वरात । खाया नव्हत घरांत । गहाण ठेवली परात । माहित जन लोकासी । जी । चाल : चांगुलपण माझे मला काय होईल तुझ्या बापाला । आला पतंग दीव्यावर झटनाऱ्याला संधी साधेल कुठून रे जी । ( चाल-उडू रंग झालो आम्ही दंग ) नको जाऊ जाऊ सरून दूर सखे ग सर वेग सरून दूर । नको जाऊ दूरदूर सरून । पाही जरा फिरून । हेतू तुजवरती वरती वरती । आम्ही पंची मुशाफर सुरतीग हे जी जी । छबदार सुरत गुलजार । अंगावर जवहर

शिंदेशाही धरती धरती। जी जी जी। जशी बिजली चमचम करिती ग हे जी जी जी। आलों धुंडीत लाखो देश अशी नजरेस कुठे गरती गरती गरती। पहाताच तहान भूक हरती ग जी जी जी सुकुमार कांती गुलजार, सखे सुकुमार कांती गुलजार। जवानीचा बहर। मुसमुस करीती करीती करीती। जशी आली नाहीं लाजरती ग ह जी जी जी। ( भाषण सुरु ) आशा वेळीं लाटावर सखे ग आशा वेळी लाटावरग करावा संग इच्छा अशी फिरती फिरती फिरती। धर हात प्रीत कर पुरती ग हं जी जी जी। अरे हा कोण कुठील चंडाळ अरे हा कोण कुठील चंडाळ अरे हा कोण कुठील चंडाळ। असा का चळ तुला भरला भरला भरला। अशा पापने कोण तरला हो जी जी जी। परकांता भोगावी म्हणता। वाटते चिंता। नादामर्दी शिरलासी शिरलासी शिरलासी। घडा तुझा भरला रे हा जी जी जी। दुसऱ्याचे चांगुलपण दृष्टी न्याहाळून देश किती तरी फिरला फिरला फिरला। बरा इथे येऊन पाझरला रे जी जी जी। कीचक द्रौपदीपाई, अरे तो कीचक द्रौपदी पाई। येकांतीं पाही भिमानें चिरला चिरला चिरला। हें ठाऊक असून विसरलो जी जी जी। अरे आला भस्मासुर मस्तींत। नाहीं किंचीत देह उरला त्याचा उरला। माज तसा जिरला रे जी जी जी। दगडूजी म्हणे पापानी अहो दगडूजी म्हणे पापानी केवढा मनीं पस्तावा ठरला ठरला! मग रस्ता घरचा धरला रे जी जी जी।

## पूर्वसदनी लावणी

( चाल–जुन्नर देशीं गांव आमुचे )

आजवर केली ख्यालखुशाली चैनबाजी फार हो। मनमानी मजा केली उडवली बहार जी। तरुणपणाचा भर नवतीचा अंगामदीं जोर तो। एक एक रात्रीचे उडवले रुपये शंभर जी। आतां जरासी उमेद खचली झाली पोरंसोरं हो। वडील थकले म्हणून अंगावर पडला संसार। गावामंदी कांहीं नाहीं कमाई जाऊ देशावर हो। दूर देशावर जाऊन करूं कांहीं धंदा-व्यापार। ( चाल रत्नाकर सागराही ) उभयता करुनी विचार। द्रव्य अपार घेऊनी संगतिसी जी जी। सजवुनी वारू निघाले देश फिरण्यासी जी। पलंगाविण येत नव्हती निद्रा त्यासी जी। अचाट करूनी थाट क्रमती वाट मुकामासी जी जी जी। दोघे जण उतरले एकवस्तीसी जी जी। त्या ठाई एक सुंदरा।

सुरत अनीवार आली नजरेसी जी जी। लुब्धले तिसी पाहून झाले उदास जी। (चाल–किती सुखया संन्यासी ही) भ्रतार फार माझा मजसी गांजीतो गृहीं। म्हणुनी मसी आला राग। करूनी प्रपंच्याचा त्याग चालले मी क्रमीत मार्ग बिन आश्रयीं। भ्रतार फार माझा मजसी। (चाल–अहो माझ्या पतीनेहि–चाल) अहो मी वनवासी वाटते फार उदासी। अहो मी वनवासी। मी अबला स्त्री जाती एकटी पहा कसी। वाटते फार उदासी। कोणीकडे जावे आता कांहीं सुचेना मजसी। यांत कोण धनी हे सांगावे खरोखरी। मी येईन हौसेने त्यांच्या-बरोबरी। दोघासी कशी करावी प्रीत ही तरी। निभवेल कैसे खरोखर निभवेल कैसे। कोण धनी कोण चाकर। कांहीं समजेना मजसी। (चाल–का का प्रिये होईनास राजी) का करीसी दगलबाजी। जाई मेल्या लुच्या। दिसतोस पाजी। का का करीसी दगलबाजी। तुजवर बसली फारच मर्जी। शरम कुणीकडे गली मेल्या तुझी। तुझ्यावर बसली फारच मरजी। पर नारीस करतो राजी। (सांगून मी दमलें चाल) झाली तुझी चाटपुरी। सुधर वाट जा घरीं। (चाल–कोणे एके दिवशीं राघुमैना बसली माडीवरतीं) टकाटकाची गाठ पडता काय अब्रुची उरली उरी। दगडूसाळी म्हणे कशाला नादी लागला तुम्ही तरी। कवी काशिनाथ कवन करितो अनुभव सोडून परोपरी। घ्या समजुनी सर्वाला सांगतो विचार करा आपल्या अंतरी।

## लावणी वामन गंगूची

त्या दक्षिणदेशामंदी एकशहरी। एक इष्कबाज लहरीची गोष्ट हुदोरी ॥ ध्रु. ॥ एक धनवंत सावकार अकलापुरी। त्यासी एकच मुलगी होती लाडकी भारी। स्वरूपांत देखणी जसी इंद्राची परी। जडीताचा शोभे जोहार अंगावरी। ढबदार नेसणे पातळ पिवळे जरी। अंगात जरीची चोळी चम-चम करी। चाल। बारा वरषांत आली उंमर शोभते नांव तिचे सुंदर। पित्याने नाहीं केलें सयंवरजी। घातली शाळेंत अभ्यास करी। नाहीं परपुरषाचें नांव तिच्या अंतरीं ॥ १ ॥ एक रात भट भिक्षुक त्या गावांत पोटी एकच मुलगा जसा हीरा चमकत स्वरूपांत देखणा जसा भासतो। त्रिंबक लहरी नांव त्याला शोभत। थाट माट करून हिंडे गावांत। केवळ शुद्ध भोपळा असे लिहिण्यांत। म्हणुनी बापाने घातले शाळेंत। भिक लहरीने काय उडवली मात। चाल।

पंतोजीने घातला धडा । त्रिबक वाचित घडघडा । मनामधीं विचार थोडा थोडा जी । ध्रु । सुंदरचें पाहून रूप झुरे आंतरीं । कोणत्या युक्तींनें म्हणे घालोवे भरी । सुंदरीच्या नाहीं मनीं ध्यानीं गोष्ट कांहीं । त्रिंबक अक्षय तिचे मुख न्याहळीत राही । घे माझा लाडू जरा मासला पाही । असे खुषमस्करी मधे आले दोघेहि । नकळत चुंबन घेत असे लवलाही । सुंदर म्हंणे उठ तुपल्या तू वर्गांत लिही । ही माझी तडक चोळी फाटली बाई । ( चाल झंपा )सांगेन मीं पंतोजींसी । बसवीन मार तुजसी । या माझ्या अंगासी का रे झोंबसी। जेथे मी तेथे तूं का रे बससी । रागाऊन का पहासी वाचणी ही ग कैसी । व्यर्थ होत लिहिण्यासी का राबसी । याहूनी ईवरसुका खुप शोभसी। ह्या लिहिण्यापेक्षां इतर सुख काय असे । पाहू दे तें कैसे । सांग मजसी उगीच काय गोड गोड बोलुनी फसविसी फसविणार नाहीं कधी घे पुस्तक वाच आधी । काय या मधी । येती ही कसी । कर पाहु याचा अर्थ कळेल तुजसी ( चाल—गेला एकवीस कोसावर ) सुंदरीं ब्रह्मदेवाने पिंड निर्माण केला संगीन । पण यासी वदन देण्यासी काय कारण ? ध्या त्रिबकराव ऐकून लिहीण्यावाचून खाणपिण कराव वदताना वदनान । यासाठी वदन असें हें धिलें देवान । शरिरासी हें नेत्रं दोन असे संगीन । याचे कारण द्यावे सांगून । याचा अर्थ एवढा सांगला उमजून । सृष्टींतील सर्वखुन याच नेत्राने ध्यावे ओळखून यान करावे। वाचन करावे वाचन। ह्यासाठी नेत्र हे धिले असे संगीन । हे उरस्थळीं जोबन दोन संगीन याचे कारण द्यावे सांगून द्यावे सांगून कर शोध मनाला सांग मला निवडून । (चाल—दुःख आले दैवा असे वाटते मला ) त्रिबक हे काय असे समजेना मला । दिसती जोबन दोन्ही । असती ही का म्हणुनी कांहींच अजून याचा विचार मनी नाहीं बिंवला त्रिंबक काय असे समजेना मला । (चाल पति माझे अगदीच नरम) धरू हे जोबन दोन्ही । येईल तुसी समजुनी हससील मनीं । धरूदे हे जोबन दोन्ही । जाऊन एकांत स्थानीं रमवीन ही तुझी मदनी । चला जाऊ सदनी । धरू दे हे जोबन दोन्ही । ( चाल-पहिली ) सुंदरीसी रुचली विषयसुखाची गोडी । झाली खुष मनामधें आली तीस हुडहुडी । दोघांचा झाला मिलाफ जमली जोडी । मोडिलें तिनें दागिने तेव्हां त्या घडीं । केली खर्चीं निघून गेली देशोधडी । गावांत झाला बोभाट आरडा आरडी । ( चाल ) दगडोबा साळी कडोविकडी । सभेमंदी गात असे चढाओढीं ।

ढुसणी वैऱ्याला थोडी थोर्डी । कवी काशिनाथ अनुभवी सारी । म्हणे सदु सखाराम शोध करा संसारी ।

## लावणी

गाव पुणें शहर गुलजार दक्षीण प्रांत । सांगतो थोडा ऐकावा वृत्तांत । ॥ ध्रु ॥ ब्राह्मणाची रंगु वय बारा-तेरांत । शाळेमधी लिहिता वर्षे झाली सात । अक्षर वळण करी वाची गीता भागवत । बोलणे गुह्य करी संस्कृत भाषेंत । स्वरूपाच्या तुटती तारा हिऱ्याची ज्योत । इंद्राची पात्रा असी प्रतिमा शोभत । ( चाल ) रंगु धुंद मदना मधी मंडळी । उरी जोबन दोन्ही सळसळी । मुखावर लाली तीच्या झळझळी । मदनाची कुपी जणु केवळ भरली रसी । नाहीं झाले स्वयंवर न्हान आले रंगुसी ॥ १ ॥ इंग्रजी शाळेमध्यें पुरुष देखणा थाट । गंगाधर शास्त्री नांव त्याचे प्रगट । चालला झुकत । रस्त्यानीं सदा लखलोट पहाता शहराच्या स्त्रिया होती लंपट । रंगुच्या शाळेवरून येण्या-जाण्याची बाट । एके दिवसी आड गल्लींत पडली गाठ । पहाता चित्त चंचल; मन केले धीट । हाळूच त्याने रंगुशी विचारली गोष्ट । ( चाल ) आम्ही तुझ्याकरिता केल साधन । कधी होशील नारी प्रसन्न । कधी होशील नारी प्रसन्न । फार दिवसांनी झाले दर्शन । मी धिली देवपुजा सोडून । नित्यनेमासी । गंगाधर शास्त्री लुब्ध झाला स्वरुपासी ॥ २ ॥ गंगाधरशास्त्री विचार करी मनाला । रविवार दिवस सुट्टीचा वेळ साधिला । येताच रंगुनें दृष्टीन पाहिला । दिली खुर्ची बसाया टेबलपुढें ठेविला । रंगु करी विनंती सांगे माय-बापाला । घरी आला मास्तर देते परीक्षा त्याला । बसा बसा म्हणुनी सन्मान त्याचा केला । रंगुच्या हाती दिले बुक वाचायला । ( चाल ) लक्ष लावून करी मंडन । होते पर-पुरुषासी भाषण । विषयप्रेम आला दाटून । तगमग झाली तिच्या शरिरासी विस्मरीत झाली सुंदरा त्या समयासी ॥ ३ ॥ गंगाधर म्हणे तुला घडविले भगवंतानें दोन दिवस खावे प्यावे घ्यावें बोलून । रंगु म्हणे याचे कांहीं मला समजेना । स्त्री-पुरुष रमती सांगा याचे संधान । गंगाधर म्हणे हा उघड अर्थ जाण । पहाती सृष्टी ऐक तीं कथा कानान । महालामधीं नाहीं उजेड दिपकावीण । ही कुडी कशी चालेल आत्म्यावाचून । ( चाल ) तुला सांगतो खुण ऐका जरा क्षणभर कळ सोसाही । आसन चौऱ्यांशीं

खेळ खेळावी । मुक्ताजी करितो कवन घ्या शक्तीसी । कुशापरशा बाळा त्रिंबका धरणी गाण्यासी ।

## लावणी

लेका पर नारीचा संग हानीचा । नाही कामाचा । उपयोगास जाण । खर्चून पदरचा दाम जगीं भनभन ॥ ध्रु ॥ खर्चून पदरचा दाम । सोडुनी काम । तिच्याशीं रम । सदोदीत घोरी । नाहीं दिल चोराचा धीट धाक अंतरीं । हिच्याशी करता भाषण । लागेल दूषण । होईल शासन । राजदरबारीं । नाहीं संग सुखाचा नित्य उरावर सुरी ॥ ( चाल ) आपले की सारे चित्तप्राण तिजवर । ती सिंदळ तिचे लक्ष दहावर । दहाचे घेऊन द्रव्य बुडवील ठार । कैकाला बुडवून उलट मारी पैजार । कैकाला बुडवून खरी उलट माधारी । उणे आब मारी । तसे खोचून । परनारी पाई होती अब्रुला हान ॥ १ ॥ परनार परायाची हिला भोगण्याची इच्छा होऊ नये कदा । झाला द्रौपदीपाई दुर्योधनाचा चेंदा । पहा राव रावणानी सीता आणुनी लंके नेऊनी ठेविली बंदा । आला हनुमंताचा रगडा फिरविली गदा । ( चाल ) त्या पारवतीपायीं मेला भस्मासुर । झाली नारदाची नार तर्क हा धर । त्या इंद्रा–चंद्राला कलंक भंगले वीर । बहुतासी दिधला त्रास असी परनार । बहुतासी दिधला त्रास केला हिनें नाश । जीवाला ध्यास लाविला जाण । परनारीपाई कईकाचे गेले प्राण ॥ २ ॥ द्रौपदी सती सुज्ञान । कीचक अज्ञान । म्हणे भोगीन हिसी एक वेळ । प्रालब्ध टळेना । मरण आले तत्काळ । ही ऐकून ध्यावी गती । होईल माहिती । धरावे चित्ती पूर्वीचा खेळ चतुर जाणे मूर्खास कळेना केवळ । ( चाल ) हा विचार मनाला करून धरावी सोय । पस्तावा घडता नाहीं होणार उपाय । दुःखाची आठवण रडून होणार कांय । गाऱ्हाणे सांगता हसतीऊ व्याही–भाई । आपले सज्जन साईरे बोलती उणी उत्तरें बरे । उणी उत्तरे बळे खोचून । ते शब्द लागती जसे जिव्हारी बाण ॥ ३ ॥ जरी असेल शेट सावकार, थोर सरदार। राजकुमार लागले हिचे पाठी । हिची संगत धरता हाती नरोटी वाटी । हिच्याशीं उभ्या रस्त्यानें । कदा भाषण करू नये कोणी । सांगु नये गोष्टी । चतुर जाणे मूर्ख नित्य लाळ घोटी । ( चाल ) असा परनारीचा संग

आहे वाईट । साव असता परनारींचा संग आहे वाईट । साव असता धरू नय बळ लक्षण चोरटें । नाथ वृधाईक धोंडीसाळी मार्ग दावितो नीट । कवी काशीनाथाचे कवन टिपसाळ यार । दगडुजी हरिबा म्हणे हिच्या संगतीने नांवाला कोण चढले जाण । घ्यावे सांगून अम्हुला खोटी झाली कैक ।

## पोवाडा वेल्ह्याचा

गादीमधीं गादी वेल्ह्याची । आदलबादशाही नबाबसाहेबांची । पहा चैत्र शुद्धद्वितीयेची यात्रा भरपूर । नेमाशावलीच नांव आहे दूरवर । पुरातन याची आहे ही अजुनी । सालेवाद चालु कधींच नाहीं सुनी । गावकरी मोठ्या हावसेनी करिती जोर । आटोकाट गढीमदी बसूनी करिती विचार । बाळू-पाटील मुख्य अधिकारी । मुनीरखा मामा थाट सरदारी । खंडू पाटील त्यावर कारभारी । विचारीक फार । करीम भाई बोलता कोणी जाईना रावबा सेटे आणीक बाबाजी । काशीराम पाटील आणीक सदूजी । त्यामदी सुतारबाबाजी नाना कुंभकर । लक्ष्मणराव गुंजाळ हे एकंदर । भिकुबा शेटे त्यामदी हावशी । सिताराम पाटील म्हणे सर्वांसी । बोलवा लहान थोरासी । आज आहे पाडवा करा संदल तयार । ( चाल–प्राणनाथ टाकून जाता ) गढीपासून संदल निघाला । आटोकाट लहानथोर हो । आटेकाट वाजंत्र्याचा पुढें गजघाट । ताशा चौघडे आणिक शिंगाडे त्यांत भिकोबा अच्याट अच्याट अच्याट हो । पुणे जिल्ह्यामधी नाहीं कुठ । पुढे पवाराचा वाडा लागला । घरावरून त्याच्या वाट, त्याच्या वाट हो । निघा बोळातून झटपट रामूशी आळीत उभे राहिले वाजंत्र्याची लटपट । लटपट हो ॥ माळवाड्याचें पुढें चाट । पुढे अडचणींत गर्दी दाटली । मुलाबाळाची खटखट, खटखट हो । टेंभ्याशीं टेंभा दाट । मुनीरखामामा पुढें येऊनी म्हणे धरा धोपट वाट । धोपट वाट हो । पाटलाचा दरवाजा नीट । घडीभर तेथें उभे राहुनी वाजंत्र्याचा उडतो थाट । थाट तो तळ हालाया आचाट । गमतीनें रमतीनें चालले पुढें आली बाजारपेठ । बाजारपेठ होती तेथून मंडळी कडेकोट । ( चाल–जबर धाक सहकारी ) पुढें विराचे दार लागले बहार तेये थोडी थोडी । गांवमांवची आली मंडळी, सर्वाला रुचली थोडी । करते वागते,

मागेपुढें तपास करिती घडोघडी । वेशीपाशीं वाजंत्र्याची लई उडाली धडाडी। वळ्यामंदी जाऊन बसले झाले निमं निमं दोही थडी । नळहवायाची बहार उडाली । दारूगोळ्याची धडाडी । चाल । महाराज तेथून उठती जी, तेथून उठती । पुढे देवाच्या मग येती हो दरशना घेती जी । घेती आनंदानी गलाफ देती चढवूनी । नमाज पढती जी । पढती धरूनी भक्ती । तमाशे आले अर्ध्या रात्रीं हो मांडल्या गमती । चाल । कटाव । गमती पहाता रात्र आटली हाजिरीला मग मंडळी फुटली । दुकानदाराची गर्दी उठली । गाडी-घोडे येऊन दाटली, मेवा-मिठाई विक्री लुटली । मग शास्त्री-गाण्याला बहार सुटली । पानविडे बक्षिसी वाटली । मेळवुनी । शिधापाण्याची झाली व्यवस्था । चला हागामा पहावयासी । मंदील शेले जरी उपरणे घेऊ बक्षिसी देयासी । ( चाल बाजीरावाची ) देवापाशी भरला हगामा आले पाहिलवान कुस्तीशी । कुस्तीसीहो एकाहुन एक चढ हौशी हो । पुष्कळ आम्ही यात्रा पाहिल्या, आसी येईना दिसण्यांत जी । हो दिसण्यांत जी । फार हिंडलो चौदेशीं । जुनेपुरातन नांव चालले नाहीं न्युन्यता कीर्तीसी हो । अजून आहे जशीच्या तशी । होडाचे जागी डोह पडती नाहीं न्युन्यता पाण्यासी सी । हो पुरी खातरी सर्वांसी । नबाबसाहेबाची पुण्याई येती सर्वांच्या कामासी । कामासी हो गावामर्दी सारे सुखवासी । ( चाल–फुकटचे बंड नाहीं )

अशा कीर्तिच्या ध्वजा आज वर्णाव्या किती । कवी काशिनाथ सभेला गाती । यांत हमीदबाबु रंग लुटती । सुरमुरली विष्णू पहा ललकाऱ्या देती । सर्जेराव म्हणे गजाबा, चला जाऊ बेल्हे पहायासी । नेमासेवलीयाचे दर्शन घ्यावया ।।

## लावणी

खरे बोलणाऱ्या भोळ्याचा परिणाम । भलत्या हाती उपदेश झाला तरी चित्ती धरून राव्हा । कितीक फायदा कितीक नुकसान हा अनुभव घ्यावा । रामा रे ।। मन मोठें चंचल मनाला स्वाधीन ठेवा । वढळ वासना पुढें धांवती तीस आकळून घ्यावा । रामा रे ।। पंचप्रान विषयावर लुब्ध न होऊ द्यावा ।

सद्‌गुरूच्या बिजमंत्रावरती पूर्णभाव ठेवा । ॥ रामा रे ॥ म्हणती सावाला चोर, चोरसाव म्हणून घ्यावा। भली भलाई करून कांहीं कीर्ति मिळवावा । रामा रे ॥ ( श्लोक ).

## लावणी।

द्वीतीयेन कीतीयेन असुभेन कर्य । युथपंचम सामर्थ्यहोम । आनीक सत्यम् न नवम् सुभत्वम् एकादशत्वम् । सफलासे सफलं ॥ १ ॥ ( चाल हासत मुख याची चालीवर । ) अहो राव काय असे गुंगला परगावची जडून प्रितीचा येऊ घेऊन त्याला । पहा पहा मोळक्या दिसतो एक बाजारी । भोळी ठरवून त्याला आनु राव आपुल्या घरी । अहो घरीं जी । विचार असा ठरला अहो जी विचार असा ठरला । परगावीचा जडून प्रीतिचा । येऊ घेऊन त्याला । ( साकी ) भ्रतार माझे घेऊन मुळी गेला असे परगांवी । झाले तयासी दिवस तीन । आजून येईना बाई । यासी करावे काई । आता मज लागून गेली चिंता । चाल । शरम कसी नाहीं नाहीं । केले तिकडे तुम्ही काई । शरम कसी नाहीं नाहीं । (चाल गोसाव्याची ) संगमनेर शहरांत तिघेजण मिळून गेले मैतार री । गुरु करण्याचा विचार ठरला । लईच उडाली बहार । गुरुपुजनाला जाऊन बसले होम करून तैयारी । गुरुमंत्रावर भाव ठेवावा सांगितला विचार । आरे हा । देवासारखा गुरु माझा होता भोळा शंकर री । ठेवून मस्तकीं हात गुरुने मंत्र दिला सत्वर । अरे हा ॥

( " चाल धुमाळी " आपली बुद्धि आपले हीत परबुद्धी परांगत )

कारभारी सांगावे किती । लवाडी वाचून नाहीं गती । संसार चालेल कोण्या रीती । असा कांहीं विचार करावा चित्ती, सोडा भ्रांती हो जी ॥

आपली बुद्धी आपले हित परबुद्धी परांगत । स्त्रीबुद्धी घेऊन घात होईल सत्वरी । गुरु बुद्धी सर्व हित करील सुंदरी ॥ चळली तुझी बुद्धी कीती । घेशील भीक या जगती । लबाडविाचून गती । नाहीं तीळभरी । हा मूर्खा उमज शोध पक्का अंतरी । ( चाल ) लबाडीकेली देवादिकांनीं । धर्मराजांनी । पंडीतांनीं, योगीं, संन्यासी-साधुसंतांनी । आपल्या दिली पदरी बांधुन मुळीच वडिलांनी ॥ बांधुन दोन भाकरी कांदा त्यावरती

अनुक्रम .... ......... वि: ..................
क्रमांक .... ........ नों: दि: ..............

पहाटच्या भरी निघे जायासी ॥ निघे जायासी ॥ बायकु म्हणे करावी चोरी जपून जीवासी जी ॥ गेला एक दिवस । कोसावर । निघुन सत्वर । पुढें एक शहर आले ध्यानासी । आले ध्यानासी । घेतला मुक्काम तया ठायासी जी ॥ ( चाल ) गांवामंदी शिरून बैसला देवळांत । जाऊ तरी । कोण कुठील राहिवासी । त्यासी जन पुसते येऊन अरे हा । लबाड भाषण कधी करू नये सांगितलं गुरूतरी । चोरी कराया आलो सांगतो हासती सारे जन । आरे हा । राजापासी जाऊन सांगती । हासु हासू मौज तरी । तव्हा राजाला नवल वाटले । असा असावा कोण ? अरे हा । वेडा–शहाणा पाहून जाव खुद्द आपल्या दृष्टीन तरी । प्रधान संगे घेऊन राजा तिथे गेला चालून । आरे हा । ( साकी ) वेडा शहाणा कांहीं कळेना । यासी करावें कांहीं । वेस पालटुनी फिरुन येवुनी पूर्ण कसुटी घ्यावी । वाटते मनीं ऐसे पुढें कळेल कैसे ॥ १ ॥ ( चाल ) कुठीलचे कोण । काय सांगाव नांव ठिकाण । कुठीलचे कोण । ( चाल ) नको करूनी घेऊ वाटणी । आज नको जाऊ गोष्ट मी सांगतो तुजला !

उद्या फिरून दोघे जन इथे येऊन जाऊ एक चोरी करायाला हो जी ॥ मग होईल पुष्कळ धन, घेवू वाटून । बोळवून लावीन घराला । नको मनांत संशय घेऊ विश्वास ठेवू, भय कांहीं नाहीं दोघाला । हो जी ॥ चाल ॥ आरध्या रात्रीं झाली चोरी पहाटच्या भरीं चिमण्या चिव चिव करीती । उडाली झोपेची सुस्ती सावकारीण तव्हा जागी झाली होती ग ॥ तोंडावरचा काढीला पदर टाकीली नजर उघडी चारी दारं दिस्ती । हाका नवऱ्याला मारती, तुम्हाला कशी झोप येती ग ॥ सावकारीण उठे झटपट घेई उरपोट चोरी झाली झाली म्हणती । सेजारीन तेव्हा जागी होती, कसे काय झाले विचारती ग ॥ आरडाओरड करा बंद धरा कांहीं सुद कचेरीला चला चला म्हणती॥ करू राजाला माहिती तपास तो करील हातहाती ग ॥ दादरा ॥ हाय हाय करु मी काय कर्म फुटले; येवूनी चोर फोडूनी घर धन लुटल । कोनत्याहो तस्काराने घाला घातला । ठेवुनी कापुनी मान प्राण घेतला । पहा पहा आज असे तळें आटले । हाय हाय करु मी काय । कर्म फुटलें । ( साकी ) धनसंग्राहाची चोरी करणाऱ्या चोराहूनी तू चोर । गरीब ताडुनी द्रव्य जोडुनी होऊन बसला थोर । असेच मज दिसते । किती बोलसी असलें ।

दादरा । जाय जाय निघून दृष्टिवेगळा । कितीका या हो तस्कारासी लाविला ळळा । जाय जाय निघुनी आता दृष्टिवेगळा । ( साकी ) तोडा याची बंधन सोडा, भोजन घाला यासी । वस्त्र-अलंकार देऊनशानी घेऊन या सभेसी । जोडीन प्रीय मित्र । ( चाल ) गेलो होतो एके शहरीं । ऐक सुंदरी राजदरबारीं बक्षिसी दिली । अहो दिली हो । मिळाले की पुष्कळ धन । गुरुमंत्रान खावे बैसून आनंदा खाली । आरे खाली । हो जी जी जी । गुरुमंत्राचा अनुभव ठेवीला भावआले वैभव भोग खुशाली ॥ खुशाली हा ॥ चल तुझ्या माझ्या बरोबर, पाहे तू घर, पलंगावर, रंगमहाली ॥ अहो महाली हो जी जी ॥ दासीच्या हाती भोजन, असी राजान धन मला धीली ॥ चाल ॥ क्षमा असावी मला आहे मी अपराधी मी तुमची । कीती स्त्रीयांची म ी झाली नाहीं कृपा सद्गुरुची । सद्गुरुकृपा होता फिटेल भ्रांत मनाची । द्यावा मसी दाखवून होईल दासी चरणाची ॥ ॥ चाल ॥ सर्व जनाला हीच विनंती वडिलाची सोडा संगती । ह्या लोकी दुःख भोगोनी यमसदनी आधोगती ॥ नात्य वृद्ध दाई कवि धोंडीबा साळी ज्ञानसिंधूची आगस्ती । त्यांच्या कृपेनें कवी काशीनाथ । जोडीत असे तर्क मती ॥ दगडू साळी म्हणे ईशारत चतुराशी हो सहज गती लीन होऊनी म्हणे सखाराम मूर्खाची फेडू भ्रांती ॥ १ ॥

## वाल्मीकाचें उत्तर

रामविजय वाल्मीकानें लोक कवी म्हणती । रामजन्माचे पूर्वी ऋषीनें करून ठेविली कीर्ति । वाल्मीक ब्राह्मण होता कोळी असे आडनांव म्हणती । दुर्दैवाने त्याला घडल्या चांडाळसंगती । वाट पाडूनी भलतेकडून गिरी-कंदरी वस्ती । द्रव्यहरणासाठी बाहीर नित्य प्राण वधती । पोशी कुटुंबाला हमेशा ऐका नेम मनाचा । सात रांजनाचे खडे बेरीज दाखला शास्त्राचा । प्राणि मारावा खडा उचलावा अपुल्यां हातान । रांजणामध्यें टाकावा नेऊन मनी प्रेम धरून । असे करता करता साती रांजण भरले खड्यान । त्याची बेरीज सांगतों सातकोटी भरले जाण । नाहीं अधिक याहून खरी आहे शास्त्राची खोटे वाटल तर पहा शाहिरा रामायण वाचून । झाले तुझे उत्तर थोडासा प्रश्न आहे आमचा । सात रांजणाचे खडे बेरीज दाखला शास्त्राचा ॥ २ ॥ कवि सावळा म्हणे उकल करा आमच्या प्रश्ना ।

## पद—शक्ति

कोण्या देवाचा तुरा उतरला सांग चतुरा ।। पांच शिवाच्या शिरी कलगी हिचा शोध करा । शिवास म्हणता तुरा आहे तर अक्षर जडेना । शिवशक्ति सर्वांघटी कुणाला सुटेना । भगली तुरा ऐक चतुरा नाहीं ठिकाणा । बावन ब्रिदामध्ये ब्रिद कलगी सजाही जाणा । तेहेतीस कोटी देव देव आनले प्रती । आधांत्री चतुरा कशाला गातों ग वरा ।। २ ।। जटामधी गंगा तरती ठाउक अवघ्याला । शिव म्हणजे कलगी त्याचे डोईला । आणिक तुला सांगतों शाहिरा मोराचा दाखला ।। त्याच्या माथी कलगी शहाणा उमग भेदाला । सर्वांची एकच वाट तुझा पतंग सोन्यारा । सहा दर्शनी मानभाव हिंडे गरगरा ।। २ ।। कलगी लावूनशानी कैक भरत्यांत पोट । कलगीला ग निशाण मारीन विद्या बळकट । मानभाव जात कुणाची सांगा सभेंत नीट । सांगितल्याविण गाणें गाशिल बसत्याल सोट । फडप्रसंगीं उत्तर करावें सभेंत शाहीरा । नागेशवळी गाणार पाहुन हरदास कांपे थरथरा । ।।३।। कलगीचा मानपान कोणी तुन्याला पुसेना । विद्याशिवाय उगच भलता कलगी लाविना । राजहंस चैतन्य झाले प्रसन्न गावांना । गरीब सावळाची कवि शाहिरा ऐकून का घेना । बाबुनामुची जोडी शोभती शिरवली ठिकाणा । डफावरती मेखमोगरी सवाई भडके बाना ।। ४ ।।

## पद—निरंकार

निरंकार निरसून नव्हता धरतरीला थारा । त्या वेळची खून सांगा बसला शाहीर । जवळच पाणी सारा अवघा अंधार । करणीचा करविता ईश्वर होता कशावर । कोण्या ठिकाणीं महादेव बसले कशाचा आधार । नव्हते हातपाय लोध होता कशावर । पुस्तकामधी बघा दाखला अनुभव फिरून । मनुष्याचा पुतळा घडविला धन्य तो भगवान ।। १ ।। पंडित गोड करा निवाडे बसला दिगांबर । जांबवंताचा मायबाप सांगा लवकर । धरतीच्या आधि जन्मला किती दिवसाचा थोर जांबुवंताचा आजा सांगावा बसला शाहीर । चंद्र सूर्य प्रकाश दोन्ही पृथ्वीवर । कसा त्यांचा जन्म झाला कोण अवतार । पुस्तकामधी बघा दाखला अनुभाव फिरून । मनुष्याचा पुतळा घडविला धन्य तो भगवान ।। २ ।। चौशुन्यामध्यें अवतार घेतला होता महादेवान । पुढे शक्तीच्या बळें शिवग्र बसला उठून । अर्ध्या अंगाला शक्ती होती आपन भगवान ।

ते तर लटके म्हणशिल गुरुला येजा पुसून। ईश्वरपारवती दोघे उभयता म्हणता गावान। नाहीं आणिला भट यांचे कुठ झाले लग्न। पुस्तकामध्ये बघा दाखला अनुभव फिरून। मनुष्याचा पुतळा घडविला धन्य तो भगवान ॥ ३ ॥ जळामध्यें मसवा राजा होता कवि थोर। वेसन टोचुन स्वार झाले ईश्वर। कोण्या युक्तिने मसवा धरीला कोण वरोबर। दगडू साळी गुरु आमचे जिनानिचे घर। सावळा बाबू कवी करतो कविता। लिहिणार महादू रामभाऊ हमेशा गातो कलगी डफावर। पुस्तकामध्यें वघा दाखला अनुभव फिरून। मनुष्याचा पुतळा घडविला धन्य तो भगवान ॥ ४ ॥

## पद–अंब्याचें उत्तर

जमीन सोडुन पृथ्वी वेढुन आगाशी अंबा उगवला। " त्या अंब्याला आधार जाउन पुस आपल्या गुरुला। निगुर याला कांहीं कळेना उगीच पुसावें दुसऱ्याला। उलटी नाथाची खुण अंबा तसे प्रश्न आण ध्यानाला। गुरु पुसता उत्तर सांग हे ते कैसे समजलें तुला? ज्ञानी ओळखील मनांत विरला काय कळेल ह्या समाज्याला। दिड पद येत नाहीं गायाला नुसता लागला झुकायला। पडली गाठ हरीपाची, एखादा तीन म्हणतो माझा घसा बसला। जमीन सोडून पृथ्वी एढून आगाशी अंबा उगवला। ह्या अंब्याला आधार जावुन पुस जा आपल्या गुरुला ॥ १ ॥

अगाशी अंबा तुला सांगतों नाव आहे त्या सूर्याला। " निर्गुणातुन कुणब्याला आउट हाताच्या शेताला। शीवशीव हे बैल बैल जुंपले सताखी टिपण गळ्याला। ब्रह्मा-विष्णु महेश तिन्ही तीन आहे टिपणीला। उलटी सौचि जमीन भेरली शाळू आणला भराला। कामक्रोध हे कर्म भासती निवेद केला राशीला। उलटी सावची घडामोड होती शोध कर चौखाणीला ॥ २ ॥ जमीन सोडुन ॥

आत टखल बाहेर काय हा प्रश्न सांगिन तुजला। प्रातःकाळीं सूर्य उगवला तीच काय आण ध्यानाला। आणिक दुसरा प्रश्न सांगतों आपतत्त्व आंबा पाहिला। त्या आंब्यांतून पांच आंब पंचतत्त्व म्हणती त्याला ॥ ३ ॥

## शून्याचे उत्तर

पंचकरण समस्त दाखले ऐका प्रचीतीचे। निव्वळ ज्ञान, आत्मज्ञान बोलणे खचींताचे। शरीर मार्ग त्री सून्य तीही ओठा ओकाराचा। चवथे ते ठाव

पुसे भावपदाचा प्राण आणि आपण मावळे। त्रि सून्याचा । चौथे प्रधान ठिकाना मुळचा । आदाशून्य मदशून्य ऊर्ध्व आर्थ आहे याचा । निरसुन्य ते जाण चैतन्य सुन्य वाचा । प्रकारण चौ सुन्याचे सर्व सिधाचे । निवळ ॥ १ ॥ मकार ऊर्ध्व सुन्य चवथे चैचन ओकार चवसुन्याच्या परी सोहे ब्रह्म जाणीजे निरधार। ते ते सुन्य हे शंभंनव आणिक त्याचा मकार। चार सुन्य ब्रह्मांडी चार पींडी परी साहासार। मत मारोत जीव आत्माब्रह्म एकूण खरी चार। ऐक दाखला तुला सांगतों शास्त्राचा आधार ऐकून ध्या खरे खोटें नव्हे भरतीचे।

## बापुपठ्ठ्याची तोड

रंभापुतळी। नार दार्लींबी कळी। हिची नवती झळाळी। आली रसरसुनी। हिच्या जातीचा झोक। मारी नैनाचा नोक। हिच्या संगतीने लोक। फार गेले फसून। जाती ब्राह्मणाचे आली। खाती तुपासंगे पोळी। त्याला करून चाळाचाळी। येती रूसून रूसून। झाली सरामाला खुशी। धिली सोन्याची ठुसी। माळ पुतळ्याची खासी। त्यासी बोले हासून। वाणी गाठितो बोळांत। खारका घालिती घोळांत। जाती माळ्याच्या मळ्यांत। केळ खाती बसून। त्याची लगमग झाली। हिने हुलथाप धिली। म्हणे येईल महाली। मी उद्यापासून। लागला हलवाई नादी। वेडेचारी तो फंदी। हिशी बोलण्याची संधी। नाहीं येत दिसून। सरला दुकानाचा माल। त्याचा लिलाव झाला काल। केले रडुरडु लाल। डोळे काढी पुसून। घेती पैठणी साडी। टार केला मारवाडी। काढी चोळीला खडी। रंगाऱ्यापासून। देतो पिंजारी गादी। लागला सोनार नादी। घेतले दागिने आदी। हिने त्याच्यापासून। करी बागवान ताल। देतो डाळींब लाल। त्यासी जाती झाळ झाळ नाहीं पहात पुसून। नादी लागला कातारी। त्याचे संगे वतारी। झाले दोघे भिकारी। हिच्या नादापासून। धरला दारूचा पिटा। तिथे हिसकती नोटा। लागला कैकाला बटा। ह्या रांडेपासून। पहा कलालाचें दारीं। रोज होती मारामारी। इतकी लावली सारी। नीळ गेली नासून। दिसून। बोले दगडूबा गोड। म्हणे सोडा ही खोड। यांत होईल बिघाड। नाहीं येणार नाहीं फायदा यांत। म्हणे कवी काशिनाथ। कांहीं शोधा मनांत। ध्या आंतरी ठसून।

## बापुपट्ठे यांची तोड

कृष्ण घरी आला काय । दहिदुध उंच स्थळीं । पाडिलें छिद्र तळीं गापमंडळी । करून धुमाळी लावून ओंझळी पेले सारे पय । गाई वासरे वासरे सगळी । केली सोडुनी मोकळीं । पिटोनी आळोआळी । माझा गवळी। मसी वेळोवेळी मारितो की पाये।। २ ।। काल रात्रीं संध्याकाळीं । नेत्र झाकूनी कळवळी । लाडे कवळी आला जवळी । स्थन माझे पिळी । पळाला की पाहे ।। ३ ।। गातो सवाई दगडू साळी । काशिनाथ कवी आगळी । जडी वेळोवेळी । मोत्याच्या सरी व रत्नें वेगळी । माधव म्हणे पाहे । कृष्ण घरीं ।। ४ ।।

## साकी

सखे ग सखे सुख संसारी कोणतें । चतुर ज्ञानी पंडित बसले खरें खोटें जाणते । टेक । ललना तुझी हे तुलना करितीं हट करी मन तें । दुधपाणी एकच दोन्ही रुप वनतें । सांग । सभासारखी जमली पारखी । राजहंस म्हणते । सेवन दुधाचे जीवन वेगळे । तसे हे जाणते । सांग ।। २ ।। गुणी हरि साळीचे घ्यावें म्हणणे गुण ते । सांग । कृपा करोनी पाय धरोनी गुरुघरचें धन तें ।

× × × ×

परोपरीचे वृक्ष कोमल । राघुमोर राजहंस कोकिळ परोपरी तस्बिरी कुशल । दशअवतारीं देवाचे खेळ । राधाकृष्ण जसे गोकुळी, गंगासिंधु नभमंडळी । (मिळवणी) तुम्ही जणू त्या ठायासी सूर्य उगवला ।। ३ ।। चला लावा आज सोने कसोटी । कवळकांती आवळा पोटी । गुप्तचोळीच्या सोडा गाठी । साळी दगडोबा ज्ञानदृष्टि । तुरेवाले करिती चावटी । अरे मूर्ख होतील कष्टी । होऊन बसतील हिरमुष्टी । राजहंसाची सर कराया कावळा आला । थाटमाट ।। ४ ।।

## ( पद )

( चाल—जिवाच्या मित्रा राजीव नेत्रा )

प्राणविसावा फक्त असावा व्युत्पन्न असावा महालामदीं ।। १ ।।

प्रेमाची भाषा आणि सर्व आशा समोर खाशा आणिल कधी । मनाचा हेतू आड राहु केतू । नष्ट करी नत हीच संधी ।। २ ।।

सुदिन आज उरकावे काज । भोगावे आज विनवी पदीं । आलें मी गाजी माझी ही मर्जी प्रेमाची अर्जी घ्यावी आधी ॥ ३ ॥

कवि चंदूलाल असे रंगलाल सुनिती चाल नित्य वदी । स्वाधीन मन करुनी पण चाल तरुन भरली नदी ॥ ४ ॥

## छक्कड

( चाल ऐका रंगलाल )

अजून हो लहान, न्हाई आले न्हान मजला करता ओढाताण, तुमचा कोठे गेला भान ॥ १ ॥ तनु माझी कवळी काया, ये ना कांहीं जवळी राया, फसवुनी लावता माया खावा म्हणता पान ॥ २ ॥ असे केल्यानें नावासी वट्टा, सुचेल लहानथोरासी थट्टा । हशा पिकेल आणि बोभाटा होईल की हान ॥३॥ व्यर्थ लपविता पतपेढी किती समज तेढी, माझी तुम्हा आन ॥ ४ ॥ थांबा जरा व्हा तुम्ही दूर करिता हैराण ॥ ५ ॥ माझे प्रियकर मन रमेना घ्यावे आपण चुंबन । नका धरू दुसरी आमना मारील का बाण ॥ ६ ॥ पंथ ज्यानें सोडिला । भकला जसा दारू पिणार चुकला । चंदू म्हणे जाण ॥ ७ ॥

# वग-हरिश्चंद्राचा

अयोध्याप्रांतीं अयोध्यापुरी । तेथे हरिश्चंद्र राजा राज्य करी । धर्मनिती न्यायें निरधारी । दया क्षमा ठेवून अंतरी प्रजेला पाळी । केवळ सत्त्वाचा सिंधू शांती आगळी । सत्त्वशील सती तारामती । रोहिदास बाळक याचे रिती । नाहीं तिघांच्या सत्त्वाला मिती । नारदानें पाहिली सती ती असी एक वेळी । म्हणे धन्य जगीं हे प्राणी भूमंडळी जी । इंद्रभुवनीं सभेच्या स्थानीं कुबेर यम अग्नी । कुबेर यम अग्नी देव तेहेतीस कोटी । बृहस्पती आदी करुनी । देवरुषी ब्रह्मऋषी । बहुत सभेसी आले हावसेनी । आले हावसेनी । त्यात विश्वामित्र वसिष्ठ । नारदमुनी पाहून ऋषी । तीर्थ उदकेसी । पुजून सर्वांसी । बसविले आसनी । बसविले आसनी । पुसे मग इंद्रराजा नारदमुनीला ।

**इंद्रः**—नारदमुनी हा इंद्र वंदन करितो. ह्या आसनावर बसा.

**नारदः**—इंद्रदेवा, तुम्हीही बसा.

( चाल–आईबाप तुज )

आज कुणीकडून स्वामी आगमन झाले वरी। तुम्ही हिंडत असता त्रिलोका माझारी। कांहीं अपूर्व वार्ता सांगावी लौकरी नारदऋषी बोले इंद्रासी। मृत लोकासी। आयोध्याभुवनी आयोध्याभुवनीं। तेथें राजा असे हरिश्चंद्र सत्वाची खाणी।

**नारदः**—देवेंद्रा मी ‘ नारायण ’ नामाचें चिंतन करीत भूलोकीं सहज गेलों. तेथें अयोध्यानगरींत महापुण्यशील हरिश्चंद्रनामक राजा सत्त्वशील आहे. त्याचे समान भूमंडळांत धर्मनिष्ठ नरपति नाहीं! व्हावारे हरिश्चंद्र वहावा!

**वसिष्ठः**—नारदा, हरिश्चंद्र हा माझा शिष्य मोठा ज्ञानसंपन्न तसाच सकल गुणांनी मंडित आहे. वहावा हरिश्चंद्र वहावा!

( रागावून ) **विश्वामित्रः**—का वसिष्ठमुनी, आपल्या शिष्याचें वर्णन किती करावें? जोंपर्यंत विश्वामित्रार्शी गाठ नाहीं तोंपर्यंत त्याच्या सत्त्वाच्या गोष्टी! एकदा ह्या विश्वामित्राची गाठ पडल्यास त्याचें सत्त्वहरण केलेंच बघा!

**वसिष्ठाचें भाषणः**—माझा हरिश्चंद्र तसाच आहे. त्याचेकडे पाहील कोण? तो दुसरा प्रतिसूर्यच आहे! वाहवा रे हरिश्चंद्र वाहवा!

**विश्वामित्रः**—( चाल ) जर करिता गाधिजसुता गाठही पडे। पाही पाही आता छळूं जातां पदोपदी आडे। कांहींसा तो हरिश्चंद्र ठसेल बापुडा। सत्त्वहरण करीलं त्याचें हेच रोकडें।

( भाषण )

**वसिष्ठः**—हरिश्चंद्राचें सत्त्व कधींच हरण होणार नाहीं हें मी प्रतिज्ञेनें सांगतों!

**विश्वामित्रः**—कांहीं प्रतिज्ञा करा! मी त्याचें सत्त्वहरण करतों!

**वसिष्ठः**—माझा हरिश्चंद्र जर सत्त्वास टळला तर मी बालविधवेचे उदरीं जन्म घेईन! आता आपली प्रतिज्ञा काय?

**विश्वामित्रः**—माझ्या हातून हरिश्चंद्राचें सत्त्वहरण न झालें तर मी साठ हजार वर्षें जें तप केलें त्याचें उदक हरिश्चंद्राचें हातावर सोडीन! आणखी तें काय असावयाचें?

**वसिष्ठः**— ठीक आहे ! ( दोघेहि उठतात. )

**विश्वामित्रः**—मी उद्योगास लागतों.

**वसिष्ठः**—माझ्या शिष्यास यश प्राप्त व्हावें म्हणून मी गंगानदीवर जाऊन अनुष्ठान करावयास बसतों. विश्वामित्र मनांत म्हणतो, " आतां प्रथम मायेचे पुष्कळ व्याघ्र उत्पन्न करून त्याच्या राज्यांत त्रास देण्यास सोडतों. व्याघ्रानें त्रास दिला म्हणून प्रजाजन राजाजवळ गाऱ्हाणे घेऊन येतात.

**राजा म्हणतोः**—कांहीं काळजी करूं नका. मी व्याघ्रांचें निवारण करतों. ( असें म्हणून हातांत धनुष्यबाण घेऊन तारामतीचे महालांत तीस विचारण्यास जातो.)

**तारामतीः**—महाराज, मी तुम्हाबरोबर येतें. ( चाल ) जात मृगयेसी महाराज जात । मृगयेसी । यावें बरोबर तुमच्या स्वामी इच्छा आहे मजसी । हे प्रकट कुणी केले चंडाळ । पहा पहा प्रजेचा कोलाहल, कोलाहल करा वध तयाचा निरसावें मूळ । करावी सुखवासी, प्रजाही करावी सुखवासी । तुमच्याबरोबर जावें स्वामी इच्छा आहे मजसी ।

( जंगल )

**हरिश्चंद्रः**—तारामती, तूं या वटवृक्षाखालीं बस ! मी जाऊन आतां त्या व्याघ्रांचा नाश करून येतों.

**तारामतीः**—ठीक आहे महाराज !

**हरिश्चंद्र.**—( येऊन ) तारामती, सर्व व्याघ्रांचा नाश केला !

**तारामतीः**—महाराज, आपणाला फार श्रम झाले असतील ! या समोरच्या शिवमंदिरांत विश्रांति घेण्यासाठीं जाऊं.

**हरिश्चंद्रः**—प्रिये, तुझ्या म्हणण्याप्रमाणें कां होईना. चला जाऊं ( शिवमंदिरांत जातात ).

**विश्वामित्रः**—माझ्या व्याघ्रांचा यानें नाश जर केला तर हा एक अन्याय झाला. तर आतां मायेनें दोन मातंगिनी उत्पन्न करून त्याचें सत्त्व हरण करण्यास पाठवितों. ( मातंगिनी राजाकडे येतात. )

**मातंगिनीः**—महाराज, तारामतीचा परित्याग करून आमचा अंगीकार करावा हें मागणें आहे.

...४

**हरिश्चंद्रः**—चांडाळणी हो (चाल दिंडी) दुष्ट अधमे कोठून आलिया गे ॥ बेशरमी हे शब्द बोलता गे ॥ नाहीं वरणार तुम्हांला गे ॥ दृष्टीवेगळ्या जाइं वेगें ॥

चांडाळणी हो, तुम्ही माझ्या समोरून चालत्या व्हा! नाहीं तर तुमचा या समशेरीनें घात करीन! (त्या पळतात.)

**हरिश्चंद्रः**—हें एक मोठें विघ्न आलें होतें; परंतु परमेश्वरानेंच त्याचें निवारण केलें हें फार उत्तम झालें. आतां मला व्याघ्र मारून फार श्रम झाले आहेत; तर तुझ्या अंकावर थोडा वेळ झोप घ्यावी अशी इच्छा आहे.

**विश्वामित्रः**—यानें तर माझ्या मातंगिनींचा नाश केला. हा एक दुसरा अपराध घडला. आतां राजाच्या स्वप्नांत जाऊन त्याचें स्वराज्य दान मागतों. (हरिश्चंद्र स्वप्नांतून जागा होतो.)

**हरिश्चंद्रः**—तारामती, मी स्वप्नांत ब्राह्मणास राज्य दान केलें. सांगतों ऐक.

(चालः—आज मी ब्रह्म पाहिलें)

प्रिये मज स्वप्न पडले । प्रिये मज स्वप्न पडले ॥ ऋषीमुनी ओळखूनी बसवूनी आसनी, आपले भुवन दानासी आरपून ॥ उदकची सोडिले ॥ ध्रु० ॥ गाधीपुत्र विश्वामित्र । विप्रकुळी टेकी तो सत्पात्र । आरपून त्यासी हें क्षेत्र भाग्य जोडलें ॥ ध्रु० ॥

**तारामतीः**—महाराज, स्वप्नांतल्या गोष्टी का खऱ्या असतात?

**हरिश्चंद्रः**—तारामती, स्वप्नांत असो, अगर जागृतींत असो, जे शब्द मुखावाटे निघतील ते कदापि खोटे होणार नाहींत! कारण—

(चाल दिंडी)

मी नाहीं टळणार वचनात ॥ दान केलें विप्रास याच हातं । असो स्वप्नीं अगर जागृतींत । मनीं मानलें पाहिजे तें सत्य ॥ आतां त्या ब्राह्मणाची केव्हां गाठ पडेल कोण जाणे. (असें म्हणतांच विश्वामित्र पुढें येतो.)

**विश्वामित्रः**—(साकी) खराच शुर विर उदार असती कीर्तिमान भूपती । राज्य दिलें पण दक्षिणेवाचुन सफल नाहीं गती । सांगतो हें तुजसी । सांग कधीं मज देशी । इच्छा काय आहे अंतीं?

अनुक्रम ..................... दि: ..................
क्रमांक ..................... नों: दि: ..................

**हरिश्चंद्रः**—महाराज, आपली काय इच्छा आहे ?

**विश्वामित्रः**—राजा, मला तूं सर्व राज्य दिलेस पण दक्षिणेविण पूर्तता नाहीं.

**हरिश्चंद्रः**—महाराज, कांहीं हरकत नाहीं !

( चाल : धुमाळी )

दक्षिणा देतो घरीं ॥ चला चला अयोध्यापुरी ॥ दक्षिणा देतों घरी ॥

**हरिश्चंद्रः**—महाराज, आपली दक्षणा अयोध्येंत देतों, तरी आपण तिकडे चलावें. ( असें म्हणून ' अयोध्येस जातात व विश्वामित्राला आसनावर बसवितात. )

**हरिश्चंद्रः**—मुनिमहाराज, आपणाला किती दक्षणा पाहिजे ?

**विश्वामित्रः**—हरिश्चंद्रा, मला आऊटभार सुवर्ण दे म्हणजे झालें ! ( असें म्हणतांच राजा सेवकाला आज्ञा करतो. सेवक दक्षिणा घेऊन येतो. )

**विश्वामित्रः**—राजा, माझेंच द्रव्य मला देतोस काय ?

( चाल : झंपा )

कोणाचे द्रव्य दान देतोसी आता । विचार मनीं करूनी पाही पुरता ।
काय तुझी यावरी राहिली सत्ता । सर्व अधिकार माझा राज्यावर आतां ।

**विश्वामित्रः**—( कोपून ) सर्व पृथ्वीचें उदक माझ्या हातावर सोडून माझ्याच भांडारांतून मला द्रव्य देतोस काय ? विचार पुरता केलास का ? चल ऊठ या सिंहासनावरून !

( राजाला खालीं ओढतो.)

**तारामतीः**—महाराज, असें करूं नका !

( चाल : जोगन )

स्वामी कोपूं नका आता । रत्नजडित हें अलंकार आहेत की आतां ।
घेऊन सर्व न छळावें या नृपनाथा ॥ ध्रु० ॥

महाराज, माझ्या अंगावर जे रत्नजडित दागिने आहेत, ते आपण घ्या व माझ्या प्रियकराना आपण दक्षिणेंतून मुक्त करा !

( चाल : जोगन )

तुम्हीच आमचे तारक ब्रह्म, तुम्हीच सुखदाता ।। तुम्हीच आमचे भव-भयहर्ता सुख तारी कृपावंता ।। ध्रु० ।। कोपूं नका आतां ।।

**विश्वामित्रः**—हो समजलें, हें सर्व दागिने माझेच आहेत. ठेव खालीं ! त्याच्यावर तुझी सत्ता नाही ! समजलीस ?

**रोहिदासः**—महाराज, माझ्या आईला आणि बाबांना मारूं नका ! माझ्या देहावरील सर्व अलंकार देतों. मग तर तुमची दक्षणा पावली ना ?

**विश्वा०ः**—( रागानें ) माझी दक्षणा पाताळांत घालावी म्हणून हें कार्टे आलें आहे ! चालता हो !

**प्रजाः**—महाराज, आम्ही राजाचें भारंभार सुवर्ण देतों; पण राजाची मुक्तता करावी !

**विश्वा०ः**—सर्व सुवर्ण माझें आहे, सर्व दानांत तें दिले आहे. सर्वांचा मी यजमान आहें ! ( राजाला ) तुम्ही तिघे माझ्या राज्यांतून चालते व्हा ! हो, पण राजा, दक्षणा केव्हां देशील ?

**हरिश्चंद्रः**—महाराज, रागावू नका ! हें सर्व तुमच्याच राज्यांतले आहे, आतां क्षमा करा. मी आपली दक्षणा देतों ती अशी की,

( चालः—स्वामी धरून गेले चाकरी )

मुनीराज करावी कृपा दीन दासासी ।। नऊ खंडा विरहित खंड दहावा काशी ।। या तारामतीसहित रोहिदासासी ।। मजसहित तीघें मांडीन विक्रयासी ।। देईन सुवर्ण आऊटभार तुम्हासी ।। घेऊन करावें मुक्त अनाथासी ।।

**हरिश्चंद्रः**—आज मला परमेश्वरानें या राज्य-भारांतून मुक्त केलें. येणें-करून फारच उत्तम झालें. आतां वाराणसीस जाऊन त्या ब्राह्मणाची दक्षणा दिली म्हणजे गंगेत घोडे न्हाले. महाराज, आपली दक्षणा सात दिवसांनीं देतों !

( पंचआरती घेऊन सुंदरी या )

सोडून अयोध्यापुरी । राजा सत्वरी निघे जायासी । संगें घेऊन तारामती आणि रोहिदासासी । तेव्हा गजबजली ही नगरी । खेद अंतरीं ।

दुःख सर्वांसी । जाऊं म्हणती रायासंगेच वाराणसीसी ।। जशी घार आकाशीं फिरे, पंचप्राण सारे तिचे पिलापाशीं । झाली दुःखित नगरी सारी । झाली उदासीन हो । पशुपक्षी हळहळती । आंसवे ढाळिती । पहा नेत्रासी

( प्रजाजन जावयास निघतात. )

विश्वामित्रः—राजा, हें सगळे ओसाड राज्य मला देतोस काय ?

( राजा प्रजाजनांस जाण्यास सांगतो. )

आपण वाराणशीस निघतो.

## साकी

विश्वामित्रः—आज मम आज्ञा या सूर्यासी तपवीत द्वादशकला ।। हरिश्चंद्राची घेईल कसोटी करिल याची अवकळा ।। हरविन सत्वासी । धिंड खासी ।। ध्रु० ।।

( चाल : जा जा निघुनी आतां दृष्टिवेगळा )

वेष धरून घेईन हिरून पादरक्षणें ।। निरसुनी जळ करुनी विकल यास तृषेने ।। करिन चुकामुक नच घडती दर्शन ।। पाडीन शोष घर्मे उदक करील प्राशन ।। धर्मअन्न त्याजकडून लावीन भक्षिणें ।।

विश्वामित्रः—आतां प्रथम सूर्याला बारा कळ्या संपूर्ण तपण्यास सांगतों. नंतर वेष पालटून गरीब ब्राह्मणाचें रूप घेऊन त्याचें पादरक्षण हिरावून घेतों. त्याच्या तोंडाला कोरड पडल्यावर धर्म-पाणपोई घालून अन्नछत्र घालतों. म्हणजे त्यांच्याकडून पाणी व अन्न प्राशन करावयाला लावतों. म्हणजे सत्त्व हरण झालेंच समजा.

( तिघे येतात. )

तारामतीः—प्राणनाथ, रोजच्याहिपेक्षा उन्हाचा संभव जास्त दिसतो.

हरि०:–(साकी) सर्व सुखांतिल उपभोगांतिल शरिर तुझें प्रियकरणी। कोमल काया तुझी ही असता आलें चालणें चरणीं। पाषाणकण असती । कंटक आहे पहा किती ।। ध्रु० ।।

हरि०:–तारामती, तूं पालखींत, मेण्यांत अगर अंबारींत बसून गमन करणारी असें असून तुला पायीं चालण्याचा प्रसंग या दगडधोंड्यांत कांट्याकुट्यात यावा ! काय असे कर्मगती !

**विश्वा० ब्रा०:**–राजा, माझे उन्हाने फार पाय पोळतात. आम्ही तीर्थवासी आहोंत; तर तुझ्या पायांतला चरमी जोडा देशील तर पुण्य घडेल.

**हरि०:**–महाराज, आपणाला फार त्रास होत असेल तर माझा हा चरमी जोडा पायांत घाला.

**विश्वा० ब्रा०:**–राजा ! माझें काम झालें; पण माझी बायको व मुलगा समोरच्या झाडाखालीं आहेत, त्यांनाही पायांत घालण्यास कांहीं नाहीं. ( राजा, तारामती व रोहिदासांच्या पायांतील जोडे काढून देतो. )

**रोहिदासः**—आई, माझ्या पायांची फार दशा उडाली. या उष्ण तेजानें मला फार तहान लागली. माझा कंठ अगदीं सुकून गेला, तर तातांना सांगून कोठून तरी पाणी आणण्यास लाव !

**तारा०:**—( महाराज कांहीं तरी बोलावें या चालीवर ) किती तरी कठीण हे रान । अपार सुंदर तरुवर असुनी न दिसे एकहि पान ॥ ध्रु. ॥ जळाविण अवघे व्याकुळ झाले पक्षीहि दिसे हैराण । या बाळाचे वदन बापुडें । कंठीच आटला प्राण ॥ १ ॥ धुंडुनी सत्वर शोधूनी सरोवर ॥ आणा तरी जीवन ॥ या बाळाचे अधरही सुकले ॥ करा यासी जलपान ॥ २ ॥

**तारा०:**—महाराज, या बालकाची काय अवस्था आहे पहा ! ओठ तर अगदीं सुकून गेले, कंठ कोरडा पडला ! वदन हीनतेज झालें. तरी उदकाचा कोठें तरी शोध लावून घेऊन यावें आणि बालकास जलपान करावे !

**हरि०:**—हो, तारामती, तुम्ही या ठिकाणीं थांबा. मी उदकाचा तपास करून घेऊन येतों.

**तारा०:**—बाळा, महाराज केव्हाच गेले, अजून येतांना दिसत नाहींत. तरी तूं या झाडाखालीं बस, मी त्यांचा शोध करून येतें.

**रोहिदास:**—बाबा केव्हांच गेले. तें कांहीं येताना दिसत नाहींत आणि आई त्यांच्या शोधाकरिता गेली, तीसुद्धां अजून येत नाहीं; तर आपणच त्यांच्या शोधाकरितां निघावे.

( विश्वामित्र पाणपोई घालून बसतो. )

**हरि०**:—काय करावें? या अरण्यांत मी पाण्याकरिता किती तरी हिंडलों. परंतु शोध लागत नाहीं. हे देवा, अशा हालांत ठेवण्यापेक्षां मरण जरी आलें तरी बरें; परंतु जेवढें दुःख भोगणें प्रारब्धीं असेल तेवढें भोगले पाहिजे!

( इतक्यांत विश्वामित्र पाण्याने भरलेली झारी आणतो. )

( श्लोक )

प्रेम भाग्याचा उदय समावला म्हणून भेट आज नामी। सुरवीर नर थोर उदार अससी ऐकुनी असे तव निजमनी। सुंदर नीर थंडगार सुगंधिक फार आणिले हे तुज नामी। क्षुधा तृषा करी हरण पक्वान्न उरले बहुसहज नामी ॥ राजा, हे पाणी घे !

**हरि०**:—महाराज, मी पाणपोईचे पाणी व अन्न ह्या ठिकाणी ग्रहण करणार नाहीं !

( चालः— येई प्रियप्राण सखये हृदयीं धरुन भेट देई )

कोण भक्षील धर्मअन्न, कोण भक्षील धर्मपान। सूर्यवंशाची रीत अशी। योगे नाहीं राजवळसी। कोण घेतो हीनपण ? कोण करील सत्त्वहरण?

**हरि०**:—आजपर्यंत सूर्यवंशीं राजे होऊन गेले. त्यांनीं पाणपोईचें पाणी व अन्नछत्रांतील अन्न सेवन केलें नाहीं. त्याप्रमाणें मी उदक-प्राशन करणार नाहीं अन्न भक्षण करणार नाहीं! प्राण गेला तरी हरकत नाहीं! हा आमचा धर्म आहे.

( तारामती येते. ) प्राणनाथ. केव्हाचे पाणी आणण्यास गेले. ते येतांना दिसत नाहींत. आतां त्यांच्या शोधास जावें. तितक्यांत विश्वामित्र पाणी घेऊन येतो. बाईसाहेब, " उदक निर्मळ आहे. प्राशन करा. हे पहा हरिश्चंद्रराजे उदक प्राशन करून जेवताहेत.

**तारा०**:—मी पाणपोईचें अन्न व पाणी सेवन करणार नाहीं.

**विश्वा०**:—तारामती, हे पहा राजे जेवतात.

**तारा०**:—सूर्यवंशातील राजे कधीच जेवणार नाहींत. ( असे म्हणून निघून जाते. तितक्यांत रोहिदास येतो. )

" काय करूं तृषेने प्राण व्याकूळ झाला ! बाबा व आई गेले. तेही येतात दिसत नाहीं. व माझा तर प्राण व्याकूळ झाला आहे. ( तितक्यांत विश्वामित्र पाण्याने भरलेली झारी घेऊन येतात. )

बालका, हे घे सुगंधशील उदक मी आणल आहे.

**रोहिदासः**—महाराज, येवढी माफी असावी. माझा प्राण जरी गेला तरी मी हें ग्रहण करणार नाहीं. ( पुढें तिघेहि एकत्र येतात. )

**विश्वा०ः**—काय करावे ? याचें सत्त्वहरण करण्यासाठीं पाणपोई व अन्नछत्र घालून बसलों. परंतु या तिघांतून कोणीहि अन्न अथवा पाणी सेवन केलें नाहीं. असो. विश्वामित्राशीं गाठ आहे. आतां ह्या अरण्यांला अग्नि लावतों. व ह्या तिघांची चुकामूक करतो. मग कसे सत्त्वहरण होत नाहीं तें मी पाहतों. ( असें म्हणून अग्नि लावतो. )

**हरि०ः**—तारामती, विश्वामित्राची करणी अगाध आहे ! या अरण्यांत कोणी मनुष्य नसतां एकाएकी अग्नि प्रज्वालित झाला. आतां आपले प्राण रक्षण कसे होणार ? परमेश्वरा या संकटांतून तारणारा-मारणारा तूं आहेस !

( चालः-मी अर्ज करिते स्वामी राजसा तुला )

किती कठीण समय आला आज दैवाला । मार्गीं वणवा लागून गेला । अरे देवा हा जी. जी. भडाभडा उठती लोळ । जाळ चालला । धूर अवघा कोंदाटला । तडतड जळोनी वृक्ष पडे धरणीला । लागती झळ्या अंगाला । आतां बाळ कुणीकडे चुकलें पाहू कुठे याला । प्राणवल्लभ कुणीकडे गेला । कांहीं मार्ग सुचेना जीव हा घाबरा झाला । किती ईश्वर कोपुनी गेला । अहो सूर्यनारायणा ।

**तारामतीः**—महाराज, या तारामतीचा त्याग करून कुणीकडे गेलांत ? आतां या वणव्यांत आपले रक्षण करणारे कोणी नाहीं. ( चुकामूक होतांच विश्वामित्र हरिश्चंद्रांचें प्रेत मायेने करून अग्नींत टाकतो. ते प्रेत पाहून. )

**तारामतीः**— परमेश्वरा, काय ही प्राणनाथाची अवस्था ! ह्या वणव्यांत अशी स्थिति काय म्हणून झाली ?

( चाल—शोकाचे पद-प्राणसखयाची ग सई मला होती )

हरहर देवा काय झाली कर्ममती । अहो प्राणनाथा हो कसे सोडुनि, गेले प्रिती । आलें दुःख माझ्या संचितीं । बाळ रोहिदासा रे कुठे पाहू तुजप्रति

लाही ह्या शरिराची होती जी । वनीं ही हरणी धाया माया मोकती । कोण रक्षील हिजप्रती ।

( चाल—गेले सोडून माझे जीवप्राण )

कसें भवलें हें अरण्य । ईश्वरा कसें केलें हें जाण । अवचीत कापलीस मान । ( ती शोक करताच मायेचा व्याघ्र येऊन प्रेत घेऊन जातो. )

**ब्राह्मण**:—बाईसाहेब, शोक करून कांहीं उपयोग नाहीं. मरण कोणाच्या स्वाधीन नाहीं. आता सर्व दुःख एकीकडे ठेवून पतीसहगमन करावें, असा शास्त्रआधार आहे ! तर त्यासाठी सामुग्री करूं.

**तारामती**:—महाराज मी या दुःखानें व्याकूळ झालें ! तुम्हीहि कठोर भाषण करून कां बरें ताडन करतां ? आपण आपल्या मार्गानें जा ! परमेश्वर आमचें जसें करील तसें करो. कारण मी असें समजतें कीं ही गोष्ट मला मान्य नाहीं ! मी खात्रीनें सांगतें की, प्राणनाथ मला एकटीला टाकून जावयाचे नाहींत ! ( आता पुष्कळ छळ झाला म्हणून विश्वामित्र वणवा शांत करतो. )

( चाल—शोकहरण करुनी पुढें चाले तारामती तारामती । रोहिदास पुढें )

हरिश्चंद्र दृष्टीस पडे । आनंदची मनीं जाहला किती । हृदयांतच नच तो मावे । हृदयी धरूनी देती भेटी । आनंदाश्रु वाटे दृष्टी । पडता नमस्कार करीं पुढें ।

**विश्वा**:—हरिश्चंद्रास तारामतीस आणून सोडलें. आता आपली दक्षणा घेण्यास ही वेळ बरी आहे.

( चालः—कशी न्हाव आत्म्याच्या आधी राव )

त्या काशीक्षेत्रांत जाऊन पोहोचले । पुढे भागीरथीचें स्नान तिघांनी केले । मोठ्या आनंदानी शिवदर्शन घेतलें । तेव्हां विश्वामित्र मुनी तेथे आले । पुढें दृष्टीस पडतांच चरण त्यांचे वंदिले.

**विश्वामित्र**:—काय हरिश्चंद्रा तूं या काशीक्षेत्रात आलास. आता माझी दक्षिणा केव्हां देणार ?

**हरिश्चंद्र**:—महाराज, ह्या तनूचा विक्रय करून आपली दक्षिणा देतो. असें म्हणतांच विश्वामित्र गड्यास दवंडी देण्यास सांगतो. तो मनुष्य दवंडी देतो. )

## ( साकी )

देऊनि दवंडी विदित करावें ह्या शहराचे ठायीं । विकून आम्हास दक्षिणा खाशी वसूल करून घ्यावी । सत्ता आहे तुमची, विनंती परिसावी आमची । ( दवंडी दोन कसबीणी ऐकतात व दवंडीची चौकशी करतात. )

( चाल : लग्नाला जातों मी द्वारकापुरीं )

झाली सखे दवंडी आज आपुल्या आळीं । विक्रयासी तीन माणसे आली या स्थळीं । त्यांत एक स्त्री म्हणती रूपवेल्हाळी । राजबीज असे रत्न पाहून ढळढळी । तिसी घेऊ विकत ठेवूं आपुल्याजवळी ।

( कसबिणी येऊन त्या ब्राह्मणास म्हणतात. )

महाराज, या स्त्रीचे किती द्रव्य देऊं ? ब्राह्मण म्हणतो, दोन भार सुवर्ण घेऊं. कसबीण म्हणते आणून देतें. तितक्यांत तारामती हरिश्चंद्राची विनंती करीते.

( चाल : आंजनी गीत )

तारामतीची एक विनंती परसा तात । वंशालागीं कैसे विकता । घडेल दोष बहु जीविता । धरतील तुच्छ पिता कुलता । जावें लागेल यमपंथा । कहो असे करीतां ।

**तारामती:**—' माझा विक्रय ह्या जारणीस करूं नये ' कसबीणी म्हणतात—ही रडू रडू करूं लागली तर चार व्यसनी आपल्या घरीं कसे येतील ? हें रडके आपल्या कामास नको म्हणून निघून जातात.

**विश्वामित्र:**—मी जिकडे लावीन तिकडे गेलें पाहिजे !

( तितक्यांत ब्राह्मण येतात )

काय तिची किंमत सांगा सत्वरी । देइन तुशी द्रव्यराशी घेऊन सुंदरी । धर्मकन्या म्हणुनी हिला ठेवूं मंदिरीं । सांगा हो लवकरी । घ्या मोजून फटकरी ।

( तिचें द्रव्य देऊन तिला व मुलाला घेऊन जातात. मुलाचे अर्धाभार द्रव्य देतो. )

**हरिश्चंद्र:**—आमची अशी दशा व्हावी काय ही देवाची मर्जी.

**विश्वामित्रः**—आपल्याला अडीच भार सुवर्ण मिळालें. आता एक भार राहिलें, तें राजाला विकून घेतां येईल. (महार येतो.)

**महारः**—महाराज, आपल्याला पण एक चाकर पाहिजे. म्हणूनशानी त्या ब्राह्मणकडे जावें म्हनतुं या.

( चाल : जाता मृगयेसी )

आला तिथे त्वरितगती डोमा । हरिश्चंद्रासी पाहून म्हणतो बरा होईल कामा । आता माझ्या स्त्रीला होईल चाकर । घरी करील धंदा राखील माझे घर । असे नीटनेटका दिसतो हुशार ।

**विश्वा०ः**—तुला चाकर पाहिजे तर एक भार सुवर्ण दे म्हणजे झालें ।

**डोम०ः**—" लई बेस हाये ! "

**विश्वा०ः**—हरिश्चंद्रा, तुझा विक्रय मी या चांडाळाला केला. तर जा त्याचें दास्यत्व कर !

**हरि०ः**—ठीक आहे महाराज ! (डोम चाकरास नेतो व बायकोस म्हणतो) " कारभारणी इकडे ये. हा चाकर आज आपल्यासाठी आणला आहे. ह्यास कामकाज सांगून ठेवावें. " कांहीं काम केलें म्हणजे गंगेंत घोडें न्हाले ! " महारीण " त्यो चाकर घेऊनशानी आलात, या नवऱ्याला म्हणावे तरी काय ? ( राजाला पाणी आणण्यास लावते. ) हरिश्चंद्र पाणी आणीत असतांना विश्वामित्र वाटेंत घागर फोडून टाकतो.

**( साकी )**

वाहुनी पाणी गेला भिजुनी हरिश्चंद्र त्या ठाई । विश्वामित्रानें छळ मांडिला यास करावें काई । कोणासी कळता लागून गेली चिंता । ( हरिश्चंद्र पाणी वाहून भिजला, डोमाची बायको त्यास दळावयास लावती.)

**( साकी )**

केव्हांचा दळसी दळसी । दळतानी कसा पीठ खासी । केव्हांचा दळसी दळसी । लाज कशी नाहीं तुजशी येऊ दे घरी मालकासी केव्हांचा दळसी दळसी ।

डोमाची बायको " फार भारी ग असला रडका चाकर । त्याला पाण्यासी लावते तर हे बघा रांजणांत थेंबभर सुद्धा पाणी नाहीं. मात्र

घागरी फोडण्यांत हुशार आहे। असला चाकर माझ्या कांहीं कामाचा नव्हे। तुम्ही आपले तिकडे कांहींही काम करावयास लावावें! माझे घरांत याचा पायसुद्धा नको!", "हो, नको तर नको मी आता यास भागिरथीच्या तिरीं ठेवतों! मग बरें होईल कीं नाहीं?"

**महारीणः**—जा, कोठेहि ठेवा.

( चाल—संगमनेर शहरांत )

स्मशान रक्षावया ठेविले भागिरथाच्या ठाईं। कर घेतल्यावाचून प्रेत जाळू देयाचे नाहीं। हरिश्चंद्राने स्वैंपाकपाणी केला असे लवलाही। विश्वामित्र वेश पालटून येतसे घाई घाई। अन्नावाचून गेले गळून भोजन मजसी देई। दया करावी कांहीं आम्हावर घडेल तुला पुण्याई। बारामहिने विश्वामित्र नेम धरुनी येई। एकही दिवशी हरिश्चंद्रासी तीळभर अन्न नाहीं। अरे हा।

## ( साकी )

कौशिक मुनीची धर्मकन्या मानुनी तुजसी : मी विकत घेतलें बाई : निर्मळ अंतःकरण करोनी। निर्भय आता राही। सांगतो हेची आता। नको बाळगू चिंता : सांगतो हेची आता। पुरी।

**तारामतीः**—आहे मी आपली दासी जीव लावा या बाळासी। आहे झाले वनवासी। वासी। ईश्वरा ग तिघेहि कैसे झाले वनवासी। ( भाषण भटाचे व रोहिदासाचे ) फुले आणण्यास जातो. तेव्हां रोहीदासास सर्पदंश होऊन रोहीदास मरण पावतो.

( चाल शोकयुक्त जोगनची )

अरे बाळा दैव कसे नडले दृढ ममतेने पालन करूनी सर्व फुकट गेले। या दुःखाने जन्मभरी मी बहु घायाळ झाले। अरे बाळा, दैव कसे नडले वनवासाच्या दुःखाने मन तुझें कंटाळलें। म्हणुनी आम्हा सोडुनी एकटें गमन कसें केलें। अरे बाळा.

( चाल दुसरी—काय असे पाप मसी घडलें राघवा )

हे चिमण्या मज सोडून गेला पाडसा। तुजवाचुनी काळ आतां मी कंठू कसा। हे चिमण्या। अघटीत ह्या कर्माने घाला घातला। फारच हा

कठीण समय आला। माझ्या शरिरीं हा वणवा चेतला। हें देवा, तूं मजवरीं कोपला असा। हे चिमण्या मज सोडून गेला पाडसा।

**विश्वा:**—तारामती शोक करते वेळीं विश्वामित्र तेथे येऊन तीस प्रेत जाळण्यासाठी भागिरथीचे काठीं पाठवितो : ती प्रेताची सर्व सिद्धता करते। व विश्वामित्र हरिश्चंद्राला सूचना देण्याकरता जातो- विश्वामित्राचे भाषण ऐकून हरिश्चंद्र तेथे येतो व प्रेतास लाथ मारून व तारामतीला मारून तिचे केस धरून तीस विचारतो, " कोण आहेस आणि मला न विचारता प्रेत दहन करतेस काय, कर दिल्याशिवाय ? हें प्रेत जाळूं देणार नाहीं. समजलीस ! असें म्हणून प्रेत ओढून काढतो व तिच्या अंगावर फेकून देतो या वेळीं त्या प्रेताचा सुंदर चेहेरा दिसल्याने हे कोणाचे असावे अशी हळहळ करीत तो " हा कोणाचा वंशदीप मावळला " असें म्हणतांच तारामती त्यास सर्व प्रकार सांगते. तें ऐकून तो घायाळ होऊन पडतो. तारामती म्हणते, तुम्हांस दुःखी होण्याचे कारण ? राजा तिला ओळख देतो. मग दोघेहि शोक करतात. कराचे पैसे नसल्याने राजा डोमाची आज्ञा घेण्यासाठी घरीं जातो. घरीं गेल्यावर विश्वामित्र तारामतीस येऊन सांगतो, तू या स्मशानांत रडत बसलीस तर या प्रेताच्या देहांत भूतसंचार होईल. तर या जवळच्या देवीच्या देवळांत प्रेत घेऊन बैस जा ! त्या ठिकाणी गेल्यावर तारामतीस झोप लागते. झोपेंतच विश्वामित्र प्रेताचें आतडे काढून तारामतीच्या गळ्यांत घालतो व मोठमोठ्याने ओरडत राजास सूचना देण्यास येतो.

## साकी

धावाधावा धावा, बाबा गरबड माझी झाली। जगदंबेचे मंदिरांत लाव भयंकर आली। खात असे ती पोरा। हाणा पिटा तीस मारा। खात असे ती पोरा !

( हरि:-दु:ख आले दैवी असे वाटते मला या चालीवर )

हरहर हे कोणाचे बाळ असे ! काळाला याची दया का आली नसे ? सुंदर सुकुमार किती गोजिरवाणी कांती। राजबीजचिन्ह दिसती। सर्व शरिरीं दिसती। असून विपरीत गती।

डोमास राग येऊन सेवकासच लाथा मारण्यास धावतो. मग हरिश्चंद्र तीस स्मशानांत प्रेतें जाळण्याच्या ठिकाणीं आणून तिचा शिरच्छेद करण्यास लागतो. मग तारामती देवाचें स्मरण करते.

काय हो दिसे। कोणाचे बाळ असे। (चाल दिंडी) सूर्यकुळीं आज अंधःकार झाला। गेलें रत्न हा दीप मालवला। होता एकची बाळ वंशाला। तोहि देवासी सहन नाहीं झाला।

(चाल—आज मी ब्रह्म पाहिले)

**तारा:**—नमो आज भुवनसुंदरा। नमो। किती तरी आता हरी अंत पहासी। देऊनी दर्शन कसी मजसी पावन धाव यदुविरा। नमो आज तुची ताता विश्व रक्षिता। करुणसागरा। नमो आज भुवनसुंदरा.

(सर्वजनाना हीच विनंती सवाडीची सोडा संगती चाल)

पूर्वपुण्याई फळास आली झाली असे ईश्वरप्राप्तीः रोहिदास बाळ उठविले, सुखी केली तारामती : हरिश्चंद्रासी देऊनी आशींवाद गुरु झाले वैकुंठपती : विश्वामित्राने पुण्य अर्पिले त्रिजगीं झाली किर्ति : दगडोबा साळी गुरुप्रासादिक म्हणे करा ईश्वरप्राप्ती। कवी काशिनाथ साळी हरीप्रती ठेवा प्रीती। दत्तोबा साळी चित्त देऊनी प्रीत ठेवी ह्या हरीगीती। बाळदिगंबर शरण संताला असो आशीर्वाद त्याप्रती।

---

# "श्रीयाळराजाचा वग"

कैलासपुरी सिंवासनावरी, शिव आणि गौरी उभता आस्ता तेथे आले नारदमुनी फिरता फिरता। सन्मानुनीं नारदमुनी आसनी बैसूनीं पुसे क्षेम वार्ता। सांगे नारदमुनी मग मृतलोकीची कथा। "उमावरा, कांतीनगरा भक्त एक खरा असा नाही पाहिला। एक राजा श्रीयाळ सती चांगुणा कांता।

शांतिदया अंगी वसे। दानशूर उदार बहु दिसे। थोरपणा अंगी मिरवित नसे। दानशूर उदार बहु दिसे।

त्यात एक तऱ्हा, याचक आला घरा, सन्मानपूर्वक इच्छा जसी आस्ता ( असते ) तसे भोजन देऊन करी त्याची तृप्तता। (ओव्या) आईका आईका उमा कांता दहा हजार वरशाची गणना अन्नछत्र चालू असतां इच्छलेले देता न टळे जी। तशीच सती कांता महान पतिव्रता। तशीच सती कांता (ओव्या) सावित्री अनुसया आणि गौरी। चांगुणेचे नखाची नये सरी; तसाच बाळ चिलया उदरी। पुत्र त्याचा जाणीजे। भक्त असे भारी जन्मभर बापुनत्यरी भक्त असे भारी। चाल दुसरी पारवती म्हणे स्वपती दावां मजप्रती। दुसरी कोणती सजवा नंदी, करा तयारी जाऊ तिथवरी कांती नगरा जी। स्वारी करून नंदीवरी कांतीनगरीं आली मग स्वारी। धर्मशाळेत बैस म्हणे गौरी। नंदी बाहेरी। आर्तीत वेष धरी। अंगास भंगीद्र सारीं। वर माश्या भन भन करी। नंदी आणि पारवती शिवाने ठेविली धर्मशाळेंत। घेऊन आतिताचा वेश चालला राजवाड्यांत। दृष्टि देखता अतीत पाऱ्हणा राजा सामुरा येत। धरती मस्तक ठेवून राजा दंडवत घालीत। करून आदर उपचार स्वामिला वर नेऊन वैसवीत। पूजन अर्चन झालेनंतर राजा वीनवीत। इच्छा असली तर मागा स्वामिचा पुरविन मनोरथ। कर जोडून आपला दास कळवा मनोरथ। चाल। ऐक राजा, सांगतो तुला बहु दिवसाचा उपवास मला। क्षुधेने माझा प्राण चालला। नरमांसाचे भोजन दे मला। अतिताला। चोर आणिक चांडाळ, पातकी, खल, दुष्ट, अमगंल अशांचे मांस नको मला। नाहीं विकत पटनार तेहि सांगतों तुला। अरे राजा, कीर्ति ऐकुनी। आलो धावुनी घाल म्हणुनी आशा बहुत मजला। जर देशील वचन राजा सांगतों तुजला। लहान बाळ तुझा कापून चिलया भोजन द्यावें मला। भुकेनें माझा प्राण चालला। असे शब्द ऐकताच राजा मनामंदीं खोचला। मौन तो पुढे उभा राहिला। "बाळाविरहित भोजन देतों देह आपला। महाराज, पावन करावें मला"। (साकी) निष्ठुरा, अरे बेईमाना वचन दिधलें मजला। नाहीं म्हणोनी आता सांगसी, जातों मी आपला। संभाळ सुत तुझा तूं आपला। कोपू नका स्वामी करा क्षमा, जावूं नका तुम्ही कोपूं नका स्वामी। काहो घातली घान वरकरा मान। महाराज गुंगुन कां बसला। पुत्र गेला तरी जीवा। मागे नका पाहूं। हानी होईल सत्वाला। होऊं नये सत्वहानि।

हरीश्चंद्रानं नाही का पुत्राचा विक्रय केला । डोमाघरी वाहिले पानी । स्मशान रक्षोनी । फेडलें ऋण । नाही टळला सत्वाला ।

( चाल : ऋषीशी )

ऋषीशी आला राग महाराज करा सांत्वन पुत्र गेला तरी जावो परंतु करू नये सत्व हान शाबास बाई चांगोणा तु ग पुरें करी वचन । यामदी जर कांहीं अंतर पडला जाईल शाप देऊन ।

( चाल—चीलया चीलया )

चिलया चिलया म्हणुनी तेव्हां हाक मारिली बाळाला, । ये चिलया लवकर तुझ्यासाठीं अतित खोळंबला । कानी उत्तर पडता बाळ दुडदुड धावत आला । मांडीवर घेता पोटामधीं डोम पाजळला ।

**( साकी )**

बाळा सगुणा चिलया निघाला मुनींनी आग्रह धरला । धिली मी त्यासी भाक । म्हणून मारिली म्या हाक । चाल । मग मातेसी काय बोले बाल चिमणं । पुढे राहून या जन्माचे काय होईल । रूषीप्रसादे कैलासीं ठाव मिळेल ।

**( साकी )**

आईबापाच्या सत्त्वाकरिता देहाचा उपयोग व्हावा, यापेक्षा धन्यता कोणती सुख वाटेल सदाशिवा । रूषीशी आई भोजन द्यावा । भीति मरणाची । चाल । चिलया मांडिवरूनी खाली उतरूनी । धरणीवर निज जाऊनी । कठोर करी आई तुझें ग मन । सुरी घेऊनी पाक तू करी माझा कापून । चाल । आईने शस्त्र आणून धार पुसून छाती वज्राची करून बाळाची कापली मान । पाक दंडाचा केला । शीर शिंक्याला आईनें ठेविलें नेऊन । स्वामी, उठा करा भोजन । वेळ फार झाला मजपून । चाल । कपट भाव आला दिसून तुमचा आम्ही नाहीं जेवत मुख्य शीर टेवलें शिंक्याला । तुम्हांला माया आहे बहुत । आम्हा देखता जर सगळे हे घालशील उखळात । गाऊन पाच अवयवांचे करावे मिश्रण । असे आईकता बाईंन शीर घालून उखळांत हाणी दणादण स्वता पुढे मऊज पहात । ओव्या । आईका पहिली ओवी । इन्नहराच्या पाई सत्व राख माझे हे ठाई । आईक दुसरी ओवी जगदंबेला गाई । त्रिभुवनी तूच आई । आईक तिसरी ओवी । शंकर

गिरजामाई । चरनाते ठाव देई । आईका चौथी ओवी । मुनी लागते पाई । मम व्रत हे कठीण । आईका पाचवी ओवी । चिल्या म्हणे अग आई । थोडासा पान्हा देई । फुटला पान्हा स्तनाठाई । धार उखळामधीं जाई । बोबडे बोल होती सई । गाऊनी पाच ओव्या बाईने पाक सिराचा केला । उठाव महाराज । भोजनाला वेळ मज पुन्हा झाला । चाल । बाई त्वा ग पुरवला देव नाही जेवत उन येथ येक दिस । निपुत्रिकाचे घरांत । अन्न नाहीं सेवत । असें शब्द आईकता राजा दुचीत । चांगुना जोडिती हात । महाराज । नाहीं दुसरा सुत इलाज खुटला आता इथ । मग बोले दिलगीरवानी । कर जोडुनी रुषीपुढे उभा राहात । महाराज एक होता सुत । तोही आर्पण तुम्हास । तुजसारखे सत्य पतिव्रता कोणी दिसेना मजला । काय अपेक्षा असेल आज माग मी शंभु उभा दिसला । चाल । आता मागनं एक मी मागतें । माझ्या भोळ्या शंकरा । त्रिभुवनीं एक कृती राहील असें करा । हरिहार । निपुत्रिकेचा डाग माझा जाळा । गवरीहरा । चाल पहिली । बाई तुझा शोक पाहून द्रवलें मन पाणी नेत्राला । मारी मारी बाळासी हाका । प्रसन्न मी तुजला । चाल । जशी कुठे दूर जशी कुठे दूर । तूरुतूरु येई । भुरुभुरु येई घुमवीत पदीं घुंगर । चाल । बाळासी मारीता हाका । चिल्या म्हणे । का घेतला मुका । ह्रदयीं मग धरला फुटे स्तनाचा बाई पान्हा बाळा भुकेला । देव बैसूनी पाहती वरूनी कृतीच्या ध्वनी वरशाव बहु केला । फुलाचा केला की भवनी आनंद सर्वांस जयघोष झाला । भोळा राजा माझा पशुपती बाळा धरी हातीं । सिंहासनावरती बाळ बसवीला । त्याच्या वरती । धरले छत्र अभिषेक केला । माझें मन शिवशंकरा । भजा हारीहरा । भाव धरा पुरता । मग पावेल माझा सखा । कईलासीचा दाता कईचेघर । देशी महासूर । धोंडी साळी असा दगडुजी करीतो कवन । नाथ-पदी माथा । ज्यामधी हरी उभी गाया । करा इच्छाया बईरी जीरजीरल पाया । माधव म्हणे उठा आता गाया । मनी तुझी पाहू राया ।

## वग पतिव्रतेचा

पतिव्रता खूण करून पतीला गुंफून धिला तुरा ।

बारा वर्षे तुम्ही प्रवासांत जाऊन राहिला जरी । नाहीं तुरा सुकनार । चतुरा हीच प्रतिज्ञा खरी । इतके शब्द ऐकुन शिपाई हर्षला अंतरीं । आम्ही

जातों प्रवासाकामी खुषाल रहावा घरीं । चार कामें तुसी सांगून जातों लक्षून हृदयीं धरी । बिन पैशाहुन महाल बांध एक बंगला वरसभरी । परपुरुषासून पुत्र पैदा करून ठेव उदरीं । बिन पैशाहुन रचाया परतुन आणावी एक गुणपरी । असें साकडें घालुन गेला फंदी फाकडा सुरा । रात्रंदिवस घोर नारीला चैन पडेना जरा ॥ १ ॥ नऊ गेंदाचा तुरा । मस्तकीं फुलासी फुल दाटलें । राजापासीं धरून चाकरी कांहीं दिवस लोटले । नीत नवा बहादार सुकेना आगनी लोळ तुटलें कुठून । लाविता तुरा ना कळे सहा महिने लोटले ।

तरी किमया असे राजासी वाटलें । वर्म पुसाया त्यास राजानें एकत्र गाठीले । म्हणे आमची कामना ती घरी सुवर्ण मुसी आटले । तिचें ब्रीद ते घेऊन च्यारी मुलुख आम्ही खेटले । इतके शब्द आईकून झाला बाण जिव्हारी पुरा ऱ्हास । सुकल तर नक्षा राहील यावर आपला कुरा ॥ २ ॥ पलंगाची चाकरी सिपाई हुजरा जवळ ठेविला । पातिव्रतेचें व्रत भंगाया प्रधान पाठविला । शहराबाहेर मुकाम हो ठरवून कागद हो भेटाविला । तिशी लावितां गोष्ट हुकूम आठविला । दासीहातीं संदेश मनसुबा थोड्यांत आठविला । बागमहाल जर बांधून द्याल तर जीव बाटाविला । बागमहाल त्यानें सहा महिन्यामध्यें तयार करून दिला । आपल्यासारखी दासी ठरवुन तिसी प्रधान ठकविला । पतिआज्ञेत आसत्य कधि वाधेना जरा । खुण ठेवून गासी जसा मस्तकी हिरा ॥ ३ ॥ गौळणीचें रुप घेऊन कोणासी न कळता । खंजिराशी लग्न लाविलें केला दुसरा कावा । नऊ महिने घरीं पुत्र प्रवसली आनंद बहु जीवा । पत्र लिहुनी तिने पतिसी धाडिलें लिहून मुळची वार्ता । पत्र वाचुनी हर्ष झाला वाटितो साकरा । हात जोडुन मी आज्ञा मागतो आम्ही जातो घरा ॥ ४ ॥ दासी भोगुन प्रधान ठकविला राजा विनोद करी । नाहीं सुकला तुरा जराभर नार सती ही खरी । तलब चुकावून पोषाक धिला खूप उंच-भरा जा घरीं । यशाचा शिरीं तुरा लावून जय घेऊन आला घरी । घेई बायका आणि पुत्र प्रीतिने बसून पलंगावरी । लक्षामंदी कोणी इरला आसा नाहीं घरोघरी । नामे विठ्ठल परशराम गुण येसु गातो सिरा । रामकृष्ण रामाचे बोल हे नवसीक आईकुन झुरा ।

## वग सहा गोसाव्यांचा

त्या शहराचा सावकार, बाईकोबरोबर घेऊन देवळांत गेला। देवीची केली पूजा जवळ बैसला। सुंदर स्त्री येत होती रस्त्यानं बायकुला म्हणे कोणांची कोण? सांगई मला। सावकारीण म्हणे "फसविले इने नवऱ्याला। सावकारणीनं विचार केला। स्त्रीचरित्र दाखविते याला। हातच्या कंकणाला आरसा नको मला। करून मनाचा धडा बोले नवऱ्याला। दोन प्रहर भरली भुक लागली मला। सावकार म्हणतो या नारीला। जातो आणतो फराळाचे तुला। इथे बैस पुजारी सोबतीला।

(चाल) राजा देवळांत गेला पाहिलें तिला। मुखदरशन झालें. आसी सुंदर असावी महालीं। इच्छा मासी झाली। मग धरून उठवी कर। मग धरून उठवी कर भ्रष्ट तिसी केली। हे राज्य आणिक संपत्ती उणे हो भासती। ढगांतील बीजली। आशी सुंदर असावी महालीं। गोष्ट तिसी केली हो जी जी। चाल। प्रधानानी काढिली गोष्ट त्या हो नारीला। नारीला जी। तुम्ही कोण कुटिल राहाणार। का हो इथें आला। कोण्या कार्यास्तव एकटे असे झुकला। चाल। सावकारीन बोलती प्रधानाला। आई बाप गेले माझे स्वर्गाला। रागं संतापे नवरा कुणीकडे गेला। दुःखाचे काढिते दिवस वैताग आला। म्हणून झाले उदास दुःख आंतरीं। असेल मनामधीं तीर्थें करावीं सारीं। चाल। तुम्ही थोर कुळीचे कुलदीपक मसी दिसता। आसी अनुचित बुद्धि मनामधीं का आणिता। परस्त्रियासक्ति नसावी तुमच्या चित्ता। वळजबरीने धरला हात। उचलून ठेवली घोड्यावरती। घेऊन तीसी गेला मागे नवरा तिचा फराळ घेऊन आला। पुजाऱ्यासी पुसु लागला। बायकू कुणीकडे गेली सांग वा मला। तूं होतास म्हणून मी सोडून गेलों तिला। पुजारी म्हणे राजा प्रधान आला। बळजबरीने उचलून नेले तिला। मग जिवाचा संताप केला। नको संसार मला। वाई कुणी दगा मज दिला। अंगावरचे जाळले कपडे गोसावी झाला। सुज्ञ स्त्री माझी मज बहु शिकविलें. हाय हाय करूं मी काय दैवी लिहिलें। घरीं जाऊं पाहूं काय काळें लागलें। धनद्रव्य माझे की हो सारे हारले। म्हणे दगडू सांगतानी नाहीं ऐकले। त्याचें प्रायश्चित्त तुज हेची फळलें।

# स्त्रीपुरुषाचा विनोद

प्रभापुर शहर । तेथे एक थोर सावकार । सदाशिवपंत । सदाशिवपंत । लक्ष्मुमी हो याची कांता चतुर गुणीवंत । गुणीवंत लक्ष्मुमीबाई । रुपाच्या ठाई न्युन्यता नाहीं कांहीं दिसण्यांत । कांहीं दिसण्यांत । जशी ढगांत बिजली जाते चमकत । त्यापरी स्वरुप सुंदर । दिसे मनोहार । चंद्राची कोर । प्रभा फाकत । प्रभा फाकत । पाहून तिच्या स्वरुपाला रंभा लज्जीत । बाळपणीं होती अज्ञान । नवते तिसी ज्ञान । झाली सज्ञान । आली उमजीत । आली उमजीत । गजहंसगतीने चालत असे ठुमकत । चाल । ह्या दमयंतीहुन दिसे रूप आगळे । पहाता रवीकांताचे आसन उमळे । पाहून सदाशिवपंत मनीं तळमळे । चाल । सारखा जोडा । दिसे फाकडा । कर्माचा घडा । होते लिखीत होते लिखीत । चुकेनाते ब्रह्मादिक पूर्वसंचित । ( ओवी ) का हो असे प्राणनाथा । क्रोध दृष्टी न्याहाळीता । काय मनीं झाली चिंता । सांगा आतां लवकरी । चाल । वाईट रूपवंत नारी । कुकर्मी फार व्यभिचारी । ( ओवी ) आईका स्वामी या जगा भीतरीं । रूपवंत आहेत घरोघरीं । म्हणुन का साऱ्याच व्यभिचारी । होतील कैशा जाणाऱ्या । चाल । नाहीं तिळमात्र कांहीं । कांहीं विश्वास स्त्रीच्या ठाई । पार्वती म्हणे पशुपती । दावा मजप्रती । आईका आईका तुम्ही प्राणनाथा । आहे मी सत्त्वशील पतिव्रता । देव जाणेल माझ्या चित्ता । पाप तत्वता नाहीं घडनार । प्रियकरा हो राहा राहा तुम्ही निठुर जी । आहे मी कन्या कुळीवंताची । वाटती भीति मला आज्ञुची । दुसऱ्याचे उपलक्षण बळेच देऊन लावता घोर जी । खरोखर हो नाही नाही पाप होणार । साकी । पांडवपत्नी आईक द्रौपती सत्त्वशील पतिव्रता । कर्णावरती मनही गेले दुषण घडले माथा । तुझा हा पाड कितीक मला भोंदीती । तुझा हा पाड किती । चाल । गरीब मी तुमची कांता । दुसऱ्याचे दाखले देता । गरीब मीं तुमची कांता । बळेंच का छळिता छळितां । आर्धांगी मी आपली असतां । बळेच का छळतां ? हें असं वचन ऐकुनी पण हा केला दमयंतीने जी । नळराजाला माळ घालील निश्चय पक्का मनीं । इंद्रियगण अग्नी आले सभेच्या स्थानीं । कपटवेश धरुनी नळाचे बसले सिंहासनीं । नळाने पहाता मनीं चिंता गेली लागोनी जी । पहा दिनाचा देव दयाळू संकट हरले त्यांनी अरे हा । ( झंपा ) नवरा— पुरे तुझी शास्त्रनिती । चंद्र

सेविता महिकावती । काय तिची झाली गती । सांगतों तुला । रामसदनीं आणीन म्हणुनी भ्रतार मारिला । स्त्री :– कर्मसंचिताची ठेव । मायालाघवी तो देव । रावणाचा कपटभाव त्याने निरसीला । म्हणून काय राम तिसी प्राप्त झाला । (साकी) कोणे जन्मीं देवादारीं केली असेल म्यां चोरी । म्हणून मजसी पातक घडलें आलें भोगणें पदरीं । फासा हा कसा पडला ।

(चाल—काय मला भूल पडली)

काय असें पाप मसी घडलें राघवा । म्हणुनी बंदिवान करूनी ठेवलें जीवा । काय कोणत्या हो दुर्बलाचे सदन मोडले । चरणहीन चालताना धरून ओढले । कपट करून पक्ष धरून चरन तोडले । पंक्तिभेद धरून मनी अन्न वाटलें । बुद्धिहीन बालकासी कपट जोडले । आतीत साधु जेवताना पात्र ओढले । म्हणून देवा माझे असे कर्म फोडलें ? । कोणत्या हो बळे कंठू मी सदाशिवा । काय स्त्री—कांहीं पातक न घडतांना । लावीन नाकाला चुना जाईल याचा तोडून फासा । करील मग तनाना । हासवील जनसारे फोडील कर्म पुरे । हासवील जन सारे । नवरा–स्त्रीविण हे सदन शून्य दिसते किती ? व्यर्थ मी छळून बळें दवडली सती । काय तिचे गुण आतां आठवूं किती । तरुणपणीं स्त्री नसता पूर्ण फजिती । स्त्रीविन या संसाराची चालेना गति । दुःख मनी होतें । बहु खंत वाटती । बालपणीं जरि नसे माता । तरुणपणी स्त्री नसता । वृद्धपणीं पुत्र मरता । दुःख वृधतीं तत्वता । स्त्रीः—या प्राणपतिवीण विशेष दुःख वाटतें । मी स्वप्नामध्यें दचकचकुनी उठते । एक एक दिवस मी वैऱ्याचा लोटते । हें अन्नपाणी जहर जसें घोटिते । हें स्वरूप पाहुनी अंतःकरण पेटते । मार्गीं चालता तणकण पिपलीका चरण लागून ध्यावा । धर्मसदनीं झोळी फिरवुनी आग्नी ग्रास ठेवावा । मध्यानी येता रवी । आत्मची निद्रा घ्यावी । हुताशन अक्षय टेवी । पळघडी वाया जाऊ न द्यावी । नाम-मनीं । १ । परधन जैसे मानावें वमन । परस्त्री मातेसमान जाण । मन ठेवून समाधान । तीर्थपर्यटने धुंडावा । २ । धर्मबहीण म्या मुखें मानली । तिळभर आंतर नाहीं । मातेहुन मी विशेष प्रीति तुजवर ठेवीन बाई । शोक तूं का करिती । काय आहे सांग चित्तीं ।

स्त्रीः—वाटते घ्यावा जोग । जावे पतीच्या मागं । असेल जो कर्म भोग । चुकेना कर्मप्रसंग । जोडावे तीर्थ असा आहे मनाचा मांग ।

११९८६

(कोणी एक फिरस्ता गोसावी येतो) बारा वर्षे झाली घेतला संन्यास संन्यासाचे वर्म कठीण बळे लाविला फास अरे हा। भिक्षा जीणे लाजिरवाणे वाटते जीवास। आहारनिद्रा नाहीं पुरती नित्य अरण्यवास अरे हा। संगत सोबत तीळभर नाहीं जीव झाला उदास। काष्ठाप्रमाणे शरीर दिसते किती जीवाचा नाश अरे हा। **स्त्रीः**-किती सुख या सन्याशासी वाटते मला। रामनाम अक्षयीं वदनीं। चिंता क्लेश होते सदनी। खरीच खरीच झाले सदनी। देव पावला हो। किती भिक्षा अन्न हे परब्रह्म। देह उद्धाराचे वर्म। तीर्थस्नान हे स्वकर्म। योग साधला। (भाषण) आज पूर्ण कृपा देवाने मजवर केली। ही तीन लक्ष रुपयाची वस्तू पावली। आज तीन लक्ष रुपयाची चेकी मजला झाली। हातपाय थकुका राहू चिंता उडाली। जरी म्हातारपणी नाहीं म्या झोळी फिरविली। मोडील रुपाया खाईल आनंदाखाली। (भाषण) कोण देश कुठून वास करीत आले हो। कोठे कोठे काय काय तीर्थ केले हो। कृश झाले शरीर फार कष्ट दिले हो। कितीक दिवस योगसाधनांत गेले हो। **उत्तरः**-आरंभी जाऊन त्रिंबकेश्वरी पाहिला दृष्टीं ब्रह्मगिरी। कुशावरत गोदावरीं करून स्नान। त्रिंबकेश्वराचे घेतले दर्शन। काशीक्षेत्र गया प्रयाग। सादिला गोकर्णचा वग। तैसे शिवाचे आत्मलिंग। व्यंकटस्थान। ओंकारेश्वर केला बद्रीनारायण। केदारेश्वर महाकवीश्वर। पुढे सूर्यतीर्थ आनिवार। गिरी बालाजी भयंकर। नेपाळ भूवन। गंडकी व शाळिग्राम आलो घेऊन। कृष्णा यमुना सरस्वती। तापी, नरमदा, गोदा भोगावती। चंद्रभागेचा महिमा किती सांगावा जाण। या शिवाप्रती सारखे थोर महिमान शेवटीं करून रामेश्वर। उतरून गेलो समुद्रपार। पाहिले द्वारकापुर। कृष्ण भगवान गोकुळ मथुरा आलो देश धुंडून। (भाषण) महाराज, किती थोर भाग्य तुमचे। म्हणून तुम्हास किती तीर्थ घडलं बरे। **साधू**--धुंडून कांहीं उपयोग नाहीं। अहो जेवढे केले तेवढे फुकट गेले। **दुसरा साधूः**-तुम्ही एवढे शहाणे असून फुकट कसे जाऊ दिले। (दोहीरा) धुंडत चले आनंद न। वदनी सदोदित राम रहे। ईस दिलकू आराम है सुन मन बडा (शरम है)। (श्लोक) केला हा संसार तळमळ तळमळ करूनी चिंता। घेऊनी या संन्यास ब्रह्मब्रह्म लोक निजसा चित्ता। वाटे आता हे स्पष्ट जमऊनी काष्ठ रचोनिया चिता। देह त्याग करावा निरभय व्हावा आले असे चित्ता। पुरा। **स्त्रीः**-कोणी असा

जोग दिला । कोणी शिकविले तुला । आत्महत्या करून तरी पाप किती होईल शिरी । विचार नाहीं केला कोणी शिकविले तुला ? । **भाषणः**–अहो तुम्ही सांगता ही गोष्ट खरी आहे । देवा असे मी काय पाप केले । माझे कर्म फुकट जावून माझा जीव जसा अडकित्यांत पडला (साधू रडतो.) दुसरा **साधू**–महाराज रडून काय होणार? कांहीं विचार करा तुमच्या पदरीं पूर्वीचें कांहीं पाप असेल । त्याचा हा गुण दिसतो. मी चहाडी कीं लवाडी कांहींच केलेली नाहीं । पाप तरी काय झाले लेकरें होती का कांहीं । मुलें बाळें झालें नाहीं स्त्री कायकू होती का नाहीं । स्त्री रंभेहून उजवी पाही । मग तिचे केले कसे कांहीं । सोडून झालों गोसावी । स्त्रीमुळें इथेच फसलो पाही । विचार न करता । गेले व्यर्थ सारें आतां कशाला रडता । पुत्रवंत असावी कांता । **साधू**–सांगा सांगा पुढें कांहीं वार्ता । त्याचे लग्न करून तत्वता । दुसरा हा विचार माहित नव्हता ।

**स्त्रीः**—शाहाणा होईल प्रपंच करितां । दुसरा । पुढें करावी वार्ता । मग त्या स्त्रीला त्यागी म्हणावे आई । प्रथम तिच्या दाराशींच भीक मागावी । (भाषण) असे जेव्हां करावें तेव्हां संन्यास असे तुमच्या गुरुनें सांगितलें का ।

चाल—खरे खरे हेंच मी चुकलो ।

न विचार करतां भकलो । ह्या हिता-अनहिताला मुकलो । करावें कांहीं करावें कांहीं । जोडितो तुम्हांला हात सांगा उपाय । चला चला घरीं हो । नको नको घालु भरी ग । **स्त्रीः**—करतां असे काय तरी । **साधू**—पाप किती माझ्या शिरी । तोंड काय दाऊ तरी । हासतील जन सारी ग । चला जाऊ घरी । नको नको घालू भरी । (श्लोक) सत्कर्मे.

**अर्थः**—अहो सत् कर्म केलें म्हणजे पुण्य जोडतें. पुण्याहातीं ऐश्वर्य वाढतें. हे सर्व असले तर कोणी नमस्कार करतें. पुण्यवंताला नमस्कार केला कीं आपल्या पापाचा नाश होतो. चाल । जगाला हीच विनंती ज्ञानाची जोडा प्रीती । वारंवार नरदेह मिळेना विचार करा कांहीं चित्ती । नाथ प्रसन्न धोंडीबा साळी पूर्ण प्रासादिक ही मूर्ती । कवी काशीनाथ कवन करितो ग्रंथाविक्त अनुभव नीती । दगडु साळी ब्रीद वागवी प्रसन्न आहे शक्ती । म्हणे सखाराम पाहून मला तुरेवाले कांहीं स्फुरती ।

## वग मनोहर गिरधराचा

बंगाल देशांत नगरांत एक शांतापूर । त्या शहरी एक नरसिंग राजपुत शूर । त्याच्या पोटीं मुलगा नांव मनोहर । गिरिधर मित्र त्याला जिवलग संगती । रस्त्यानें चालता मदन-मूर्ती भासती जी । वय सोळा सारखे असती । जवाहिर दागिने घालून अंगावरती । धरि वरिःशांत सुस्वभाव मोहक मूर्ति । एका जन्मी वाटेले की काय शोभा या रती । जिच्या पोटीं जन्म धन्य माऊली सती जी ।

( आईबाप दोघांना शिकण्याकरीतां दूर देशीं पाठवितात )

( चाल : दोघांनी विचार केला निघा )

दूर देशी ( कॉलेज ) शाळा दोघे तिथे असती । स्वतंत्र दोघांच्या खोल्या त्यामंदी रहाती । नित्य नेमाने दोघांचे लक्ष अभ्यासावरती । दुर्व्यसने वाईट भाषणे नाहीं त्याची प्रिती । असे पुतळे बत्तीस लक्ष ती कर्माच्या गति । दैवि लिहिले कदा न टळले भोग भोगिती । ( भाषण ) कालिजात शाळेत जाऊन मास्तरानीं जो पाठ दिला तो पाठ करती व दुसरा विषय मास्तरनी धिला तो घरीं जाऊन पाठ करून आणण्यास सांगतात. सुटी झाली म्हणून गळ्यांत हात घालून रस्त्याने चालले असतां चाल । सावकाराची कन्या दासीसहित । झुरक्यांत राहिली उभी रूप न्याहाळीत । जी । विद्यार्थी येता. रस्त्यानी सहाचा बेत । चालले माडीखालून गळ्यामधें हात जी । त्याच्यावर गेली तिची नजर चंचळ चित्त । दासीसी बोले लाजून हळूच मर्जीत जी । बाई कोण कुठिल हे तरुण भर उमतीत । मासुक चेहरा फुल गुलाबागत जी । कमलाबाई लाजून हळूच दासीला काय म्हणते ?

( चाल : कवळी आता हासूनी )

पतिविन दिन जाया काया असून जन्म वाया । देवा घरी काय चुकले पतिदर्शनासी मुकले । रतिसुखावीण सुकले । झाली फोल अमोल काया । मैत्रिणीसी सौख्य सखे । कन्या पुत्र घेऊन मिरवे । टोचुनिया बोले गर्वे । करावे काय देवराया पति ॥ २ ॥ काय असुनी वाडेहुडे ? काय भरुनी विश्व एवढे ? कोण माझे मागेपुढे । गुण गोडे चरित्र गाया ? ( भाषण ) कमळा दासीसी म्हणे माझा बाप माझे लग्न करीत नाही व माझे मन इच्छित वर

वरावा । तर दासी जो पुरुष ह्या रस्त्यानें गेला त्याच्यावर माझी मर्जी फिरली तर ते कोठे राहतात पाहून ये । दासी ओढेवेढे घेते. पुढे कमळा काय म्हणते । चाल। दासीसी बोले कमळाबाई । धर्माची तूं आई । गोष्ट आईक सांगते तुला सांगते तुला । जा पाहून ये ठिकाण सांग मला । दासी उतरून माडीखाली। मागोमाग गेली । राहाण्याची खोली पाहून आली । सांगे बाईला सांगे बाईला । बिनधकट जा नांवाची पाटी दाराला । दोघांच्या खोल्या शेजारी । तीनशे साठ नंबर दारीं । नांव मनोहर ध्यान तूं धरी । सामसुम सारी । जा जा बाई उशीर न करी । ( धीट मनाने जाते व दारावर तीनशेसाठ पाहुनी बिनधकट मनोहरापुढे उभी राहाते.)

**मनोहरः**—तूं कोण आहेस ?

**कमळाः**—हात जोडून शरण तुम्हाला दासी पायाची। इच्छावर महाराज तुम्ही आज्ञाधारक तुमची । आंगीकरावे मज । सुदिन वेळ बहु आज । आंगी-करावे मज । गिरिधर रागावून तीस म्हणतो, कोण जारीणी चालती हो । मग ती त्यास काय उत्तर देती । किती तुझी दुष्ट बुद्धि जा येथुनी । काय म्हणून छळसी आम्हा येउन कामिनी । वाईट व्यसनी नव्हे आम्ही आईक पापिनी । तू जारणी आहेस । महाराज, मी जारिणी नाहीं । माझे लग्न झाले नाहीं । फिरून काय म्हणतें । मी शरण शरण तुजसी महाराज मी शरण तुजसी । का लोटून लाविता पायाची मी आपुल्या दासी । तुम्ही माझे पति आयका जाया मी वरा तुम्ही मजसी । महाराज वरा तुम्ही मजसी, नका मसी । धिःकारू गांठ ही ब्रह्मदेवाची । तू निरलज्ज मला वरण्या एकटी आलीस । आईबाप तुजसी नाहीं असे वाटते । म्हणून एवढ्या रात्रीं आलीस कुलटे । तू शब्द बोलती मज वाटावे खरे । का ग शिर फिरविसी जारिणे का ग शीर फिरविसी । शूर शिपाई रणशूर मी हा पहा समशेर कमरेसी । मनोहर म्हणतो—तू इतक्या रात्रीं माझ्या समोर उभी राहू नको हो चालती ।

**कमळाः**—माझा आंगिकार न केला तर मी प्राण तुमच्या पायावर ठेवीन समजले ? मग मनोहर घाबरून मित्राकडे जातो. मित्र त्यास सुविचार सांगतो. मग मनोहर येऊन सुंदरीस सांगतो “ मी तुज वरलें ” ( गिरिधर बाहेर पहारा करतो.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ ....... कि: .. .. ... ......

( चाल भूपाळी )

येई येई सुंदरी आलिंगन देतो मी तुजला । इच्छा असेल ती पूर्ण कर आज अभयवर दिधला । ( समशेर उपसून मनोहर उशास ठेवतो व सुंदरीस म्हणतो ) चाल । " हस्तकी धरुन मंचकीं प्रेमाने बसविले तिला । विषयसुखामधे दोघे निमग्न रतीरंग लुटला । असे प्रेमानें निजले असता उशासी समशेर उपसून ठेविली नकळत । मानेंत शिरली सुंदरी प्राणास मुकत । मग मित्र घाबरतो व शोक करीत बसतो । चाल । समशेर उपसून ठेविली मनोहराने ठेविली उशाला । सुंदरीची पडता मान । नाहीं तीस ध्यान । मुकली प्राणाला ।

येकाएकी झाला अपघात । घाबरा पहात । ईश्वरा काय हा घाला । परदेशीं झाली ही गती । सांगु कोणाला । ( चाल साकी ) जगन्नायका थोर। पाप हें अवाचित माझ्या हाते घडले असता काय करु मी धिक् या देहाते । न कळे काय पुढें दैवि लिहिले उघडे नकळे काळ पुढें । आता मी काय करुं ? संकट कैसे निवारुं ? प्रेयसी सोडून मित्राकडे जातो व गळ्यांत मिठी मारून रडतो. मित्र त्यास काय झालें म्हणून विचारतो । चाल । जोगनची । मित्रा विपरीत घडले असे की होऊ नये तेची झाले । मजवर ऐसे संकट आले। मित्रा विपरीतची घडले । झालेली हकीकत मित्रापाशी सांगतो । मित्र त्याची समजूत करून दोघे संगे येतात व मुर्दा पेटींत घालून कुलूप लावून पेटी घेऊन गावाबाहेर जाण्यास निघतात । वाटेंत पोलीस भेटतात। त्यांच्याशी लबाडी करून पेटी गावाबाहेर ठेवून येतात । पेटी दुसऱ्यास सापडते । तो ती पेटी कचेरींत घेऊन जातो. पंच न्याय करून पेटी फोडतात व तितला मुडदा पाहून गांवात दवंडी देतात. सावकार मुलीचा मुर्दा ओळखतो. न्यायाअंतीं खटला सुटतो व मुलीचे दफन करण्यास सांगतात. मग गिरिधर म्हणतो, " मुर्दा माझे स्वाधीन करा मी त्याची जाळपोळ करतो." असें सांगून मुर्दा घरीं आणतात व पेटींत घालून काशीस जाण्यास निघतात. चाल । मनोहर आणिक गिरीधर। प्रेतबरोबर घेऊन सत्वर । निघे काशीला जी जी । ( भाषण ) गिरिधराची सासुरवाडी आली म्हणून मित्रास सांगतो व सासऱ्याच्या घरीं उतरण्यास जातात. चाल । सासुसासऱ्यासी आनंद झाला । जावई आला । थाट त्याने केला मेजवानीचा । एक पाट सात ठिकाणीं केला मेव्हण्यानी प्रकार परोपरीचा । चाल ।

मनोहराची सुंदरी चंचल बावरी । पति आला घरी । पहाता कपाळी ठसा दुःखाचा । घरांत आपट धोपट वागेना नीट त्रास पतीचा । ( भाषण ) लेकीस आई सांगती 'बिछाना कर म्हणून जा नवऱ्याच्या सेवेला' । चाल । सासु सांगाती दासीला । चवथा दिवस पोरीला । सांगा जावयाला । बिछाना हो केला । मित्र तुमचे ओसरीवरी । तुम्ही मधघरी बेत आज ठरला । चाल ( बारा वर्षे घेतला संन्यास ) नवरा नव्हे मेला हा काळ आला चंडाळ । मारुन घेई कपाळी हात जी । माझा जिवलग बुरुड मला का अंतरलास । न झाली रात अरे हा । मग घालून कपाळी आठी निघून तांतडी । गेली महालात जी । मनोहरासी लागली झोप । जवळ उभी गप । आरती हातात अरे हा । झोप लागली दिसे नारीला । विचार तिने केला । बहु शिणला जागा नाहीं होत जी । तोपर्यंत येऊ जाऊन मित्रा भेटून आशा पुरवून, नक्की हा बेत अरे हा । (झोप लागली म्हणून मित्राकडे जाती. त्याच वेळेस एक चोर चोरीस निघतो. झालेले सर्व पहातो) चाल । पंचआरती घेऊन सुंदरी मित्राचे हो घरीं निघे जाण्याला । चोर होता आडगल्लींत त्यानें पाहिले तिला हा रं जी जी । (भाषण) बुरुड दारीं येऊन तीस विचारतो " एवढी रात्र करण्याचें कारण काय ? " " मित्रा वेळ झाली खरी । नवरा आला घरीं । त्यासी निजवून पलंगावरी । आपल्याकडे आलें, आपल्याकडे आलें । चाल । आटपा चला घ्या उरका कार्य आपुले । तो । तुझ्या बापाचा नाहीं नोकर । झोपेचा भर । नाहींतुझ खरं । बोलून गोड मज पटले नाहीं मज पटले नाहीं । तुझी नाहीं मजवर मर्जी । खरेच आज दिसतें । तो—"तुझा नवरा आला होता म्हणे. तुझी माझ्यावर प्रीती होती तर माझ्याकरता तुझ्या नवऱ्यास का मारून आली नाहींस ?" असे म्हणता ती त्याच्या हातातला सुरा घेऊन जाते.

चाल—असे शब्द बुरुड बोलताच घेऊन कोयता घराकडे आली जी । पति निजला पलंगावर करुनी त्यासी ठार मित्राकडे गेली । आ रे हा । कोईता भरला रक्तानें । आली परतोनी । तिच्यावर नजर मित्राची गेली जी । पाहाता अंगाचा काप । म्हणे अरे बाप । म्हणे रांड अशी कशी कसी अरे हा । तीः—मित्रा मी माझ्या नवऱ्याला तुझ्याकरिता मारून आले आता आपले राज्य । असें म्हणता बुरुड काय म्हणतो—

( चाल—झंपा )

जा येथूनी खुनी गाढी दुष्ट पापिनी । जाराकरिता वरा आपल्या आली मारूनी । राम राम काय कृत्य केलं रांडनी । माझाही तसा घात करिसी जारिनी । जा जा निघुनी खुनी दुष्ट पापीनी ।

मग तीस बुरुड जाण्यास सांगतो; पण ती म्हणते मी जाणार नाहीं. मग तो तिच्या ढुंगणावर तीन बांबू मारतो. त्याचें कृत्य चोर आडून सर्व पाहतो.

चाल—रांडची जात

कवटालीन घरी येऊन माडीवर गेली । मुर्दा घेऊन माडीवर आरोळी दिली जी । धावा धावा घात म्हणे झाला । दावा साधिला । कोणता वैरी निजला खाली । हातात घेऊन समशेर मान कापली जी । कोण आहे त्यासी आधी धरा । तकट बंद करा । मेल्याची संगत बरी ही भवली । निर्दया केला त्वा घात दया नच्च आली जी ।

( बोंब मारताच लोक धावतात व त्यास मुसक्या बांधून कचेरींत नेतात व न्यायाअंती त्यास शिक्षा देतात. चोराचा पोषाक उतरून चोर कचेरीत येतो. ) " त्याचा कांहीं अपराध नाहीं. त्याला काय म्हणून नेता ? " " काय तुम्हाला माहिती आहे का ? आपण कोण आहा ? "

चोर—" मी नाहीं सरदार शिपाई अमीर उमराव थोर । या गांवीचा असे मी चोर । तुम्हा सांगतो खरं । आज्ञा असेल तुमची जर । तुम्हां सांगतो खरं । वर्षांत एकदा चोरी । मी करीत असे या शहरीं । एकदा चोरी । ( मग चोर झालेली हकीगत सांगतो. बुरुडास बोलावताच तोहि तेंच सांगतो ) तिच्या ढुंगणावरले वळ पहातात मग तीस शिक्षा देण्याकरितां सोडतात. गिरिधरास माफी देऊन सोडतात. गिरिधर प्रेत मागतो । ते प्रेत पेटींत घालून कावड करून खांद्यावर घालून काशीयात्रेस जावयास निघतो.

( चाल ) मित्राचे घेऊन प्रेत एका पेटीमंदी घालीत । कावड घेऊन खांद्यावरत । जावे काशीला मनाचा हेत । काय हा वनवास माझे शिरी । देवादारी केली काय चोरी । म्हणून असे पातक माझ्या पदरी । आले हे विघ्न माथ्यावरी । माझ्या भारी जी । धाव धाव देव तूच कैवारी । तुजविण

कोण निवारी । आईबाप तारक सुत्रधारी । जगी तूच एक कैवारी । मज तारिसी जी । वाट चालता चिंता बहु करी । सासुरवाडी गोलेगाव नगरी । पुढें पहा दिसती वाटेवरी । म्हणोन जावे सासऱ्या घरीं । विघ्न भारी जी ।

( गिरिधर विचार करीत बसतो )

**भाषण शांताचें**:—नवऱ्याची भेट नाही म्हणून देवीला नवस करते. " माझ्या नवऱ्याचें मुख नजरेला पडेल तर शिरकमल तुज वाहीन.

गिरिधराची सुंदरी लग्न झाले तसी होती माहेरीं । नाहीं पतीची भेट झुरे आंतरीं । जी । नवस केला तिनें देवाच्या दरबारीं । पतीचे मुख दृष्टीस पडल्यावर जी । शिरकमल माझें मी वाहीन पायावरी । मसी पाव आंबे माते जगदीश्वरी जी । ( शांता पुजेहून येत असता तीस उत्तम शकून होतो.) चाल । शुभ चिन्हें होती आज काय म्हणूनी । वाम अंगीं पहाता जाती नकूळ येऊनी । लवत असे नेत्र डावा हंसकाय क्षणोक्षणीं सफल इच्छा व्हावी असे वाटत असे मम मनीं । आईस शांता सांगते–" आई, आज मला उत्तम शकून होतात कोणी तरी भेटेल असें वाटतें. ( इकडे गिरिधर वाटेवरी उभा राहून करी विचार । पुढे दिसे सासुरवाडी आंदेशा फार जी । गांवांत जाऊन करावा मुक्काम म्होर ।

पुढें दिसे म्हेवणा उभाच वाटेवर जी । दाजी म्हणे रामराम धरला त्याचा कर । म्हणे बरे झाले केली कृपा मजवर जी । ( भाषण ) म्हेवण्याने हात धरताच घरी जाणे भाग पडले । घरीं जाताच सासुसासऱ्यास व शांतास फारच आनंद होतो । चाल । शांताबाईस आनंद झाला थाट तिने केला परोपरीचा । पलंगावर गादी मखमली । गिरद्या त्यावरी । पडदा जाळीचा अरे हा । पुष्प जाई जुई । शेज चमेली त्यावरी । समया चारी हांड्या बिल्वरी जी । विलास करता उल्हास अंतरी । पावली खरी प्रसाद अंबेचा अरे हा । ( भाषण ) सर्व थाट करून दिवाणखान्यांत जाते. तो गिरिधर तोंडावर पांघरूण घेऊन निजतो, मग तोंड उघडे टाकतो. मग शांता आपल्या नवऱ्याचे तोंड नजरेस पडले म्हणून जो नवस केला तो फेडण्यास जाते व जाऊन देवीची स्तुती करते. । चाल । जय जय जगतजननी देवी सुरनर रमूनी आसूर सेवी । भक्त मुक्तीदाईनी भवहरण कालिका । कालिका ॥ध्रु०॥

जय जय जननी देवि मंगलमूर्ते सिद्ध सदनी पर्व सर्व रिख वदनी । तापती मीर तरुण तरुणी । किरणमालिका जय जय पुतना पिशाच्च प्रेतडा किणी शाकिणी नमस्ते भूतग्रहवेताळ खलमुगाल जालिका जय जय । जयजय महेशभामिनी आनिक रूप नामिनी । समस्तदेव स्वामिनी । हिमशैल बालिका । जयजय रघुपतीपदीं परमप्रेम तुळशीचे हे असेचि नाम देवी हो प्रसन्न पाही प्रणत बालिका । ( भाषण--स्तुती करून समशेर उपसून हातांत धरते तोच देवी प्रगट होऊन हात धरते ) चाल । जगदंबेची करून स्तुती समशेर हाती करावा वार जी जी । झाली प्रगट माता भगवती । धरला हात माग म्हणे वर अरे हा अरे हा ।

( भाषण )

शांतास देवी वर देते. तिच्या करंगळीत अमृतकुपी घालते. तितक्यांत शांताचा नवरा आड्न पहातो. ते कृत्य पाहून मागे परततो व माडीवर जाऊन पुन्हां तिचे गुण आठवून । चाल । प्रकार झालेला पाहिला आडुनी । आला परतुनी । माडीवर गेला । म्हणे बायकू माझी सद्गुणी । धन्य मी जनी आनंदच झाला । ( भाषण ) शांतादेवी जवळून घरीं येते त्या वेळी चाल । जय जय महिषा सूरमर्दिनी । करू नमन चरणी । हर्ष बहु मनी । मार्ग तिने धरला । वारंवार घडो तुझी सेवा इच्छा हीच मजला ।

( नवऱ्याकडे जाते ) चाल । अंगी ऐश्वर्याचा बाणा । घालून गहीना नेसून मईना शाल्र जरतारी । अंगकांती दिसे सुकुमार विजेच्या परी । सुवासिक जिनसा घेऊन सारे । आणी हार तुरे । पति निजला पलंगावरी । जाऊन सुंदरी नमस्कार करी । ( भाषण ) शांताबाईने खरे सांगितले व गिरिधराने खरे पहाण्याकरिता पेटीतून प्रेत काढून व्यवस्थेवार लाऊन त्यावर शांताचे करंगळीतील अमृत काढून त्या प्रेतावर सिंचताच ते जागे झाले. मग घरची माणसे धावत येऊन त्यांनी तें कृत्य पाहिले । त्यांस आनंद होऊन त्याची चांगल्या रीतीने बोळवण केली आई म्हणते "बाई जा आपल्या आईबापाचा व सासुसासऱ्याचा तू लौकिक वाढविला. तुम्हां उभयतांचे देव कल्याण करो. चाल । सर्वगुणसंपन्न जगामधीं लौकिक ठसा । वस्ताद आमचे म्हणे धोंडीबाबा विधि घरचा टाक असा । कवी दगडूचा सूत साळी दत्तू सांगे आपल्या कार्यावर असा । हात जोडितो नमस्कार निरंतर असा ।

## वग मित्राचा

तुम्ही बसले सर्वजण । माझे भाषण घ्यावा ऐकून । सांगतो मित्राचा दाखला । सुखदुःखाचा मित्र बोला । निदानी मित्र कामा आला । जी जी । सोमनाथाचे नगर कोट चौफेर वेशी होत्या चार । त्यांत जीवलग मैतर दोन । स्नेह दोघांची एकसीन । एकची एकच इमान । दोघांची सारकी उमर ज्वानीचा भर तेज मुखावर फार देखणे दोघेजण । मदन त्यांसी जाये लाजून । काय वर्णावे त्यांचे गुण । निळकंठ नांव एकाचे नळ दुसऱ्याचे पुत्र वाण्याचे संपत्तीमान । इतमामान वागती मोठ्या आनंदानं । कोणत्या गोष्टीचं नाहीं उण । चाल । असे नाहीं मित्र होणार जी । माहीत नाहीं ये कुबेराचे घर । जरा नाहीं तीळ भर अंतर । ही कसी झाली परी । आईक चातुरी । सांगतो खरी । चित्त द्या माझ्या शद्बाला । दोघांनीं एक विचार केला । चला म्हणे नगर पहायाला । १ । वारु सजविले दोघांनीं गहिना घालुनी । सडक लावूनी । कलाबुतजीन । झुबकेदार गळ्यांमध्यें मोत्याचा हार । वारुवर दोघे सवार । संगे घेऊन हुजरे दोन चालती मार्गांत । उभ्या रस्त्यांत । घोडे गेले वेशीच्या म्होर । त्यांनीं पाहिली सुंदर नार । पुढें मग झाला विचार । चाल । सुखादुःखाचा मित्र म्हणसी । म्हणून मी बोलतो तुजपासीं । मान्य कर माझ्या वचनासी । ती निळकंठाची नार । नळासम चतुर । माहीत नाहीं खर । निळकंठानीं वचन दिधले । ती नार भेटवीन तुजला । मित्रा धरी धीर मनाला । नीळकंठ गेला गेला नारीकड । होऊन निरभीड । बोले तीसी गोड । म्हणे ग तूं पतिव्रता असती । गोष्ट एक सांगतो तुजपासी । मान्य कर माझ्या वचनासी । नार ढंगची होती हुशार । तुम्ही चतुर । माझे भ्रतार मान्य र केले वचनासी । जिवलगा आणा मंदिरासी । सुखी करून वाट लावीन त्यासी । कांतेचे ऐकून वचन । निघाला तेथून । पुढें जाऊन । वर्तमान सांगे मित्रापासी । चाल । नव घोड्यावर स्वार झाला । हर्षवंतीच्या महालीं गेला । डावा डोळा लवू लागला जी । पाहिला हर्षवंतीचा वाडा मनीं हुडहुडा । छाती धडधडा । की मोठा अपशकुन झाला । कावळा डावाच गेला । सर्पपुढें आडवा झाला । ती हर्षवंती सुंदरी करून नखरा लेवून अलंकार । नेसली चंद्रकला । काळी । अंगामध्यें बुटेदार चोळी । लहान वय उमरच कवळी । नाकांत चमके हिरकणी ।

जशी चांदणी फार देखणी । भूल त्याला पडली । पाहून त्याची सुदबुद हार झाली । नारिने धरून नेला महाली । विडे करून नक्षेदार । आणिकहि बहार । फुलाचे हार । तयारी फराळाची केली । संत्रा डाळिंबें केळी पिकली । पिकल्या पानांचे विडे नकली । चाल । फराळ करून पलंगी बसला । मुखी पानाचा विडा रंगला । रंग पाहून दंग झाला । दृष्टी ती गेली भिंतीवर । लावून नजर । पाहिला खंजीर । खंजीर दादाचा वळखिला । मनामध्यें चिंतातुर झाला । कस दैवा । खास दादाचे घर । त्याची ही नार । मला मजकुर त्यांनीं नाहीं दिला समजून । बुद्धीबळ आले कोठून । मान राखला माझा म्हणून । कैसे दाऊं तोंड दादाला । येवून जन्माला । विचार त्याने केला । नारीसी गोड बोले वचनी । तहान लागली आण पाणी । नार गेली आणावया पाणी । मग उठून झडकरी । मित्र अंतरी । नमस्कार करी । हातामंदीं घेऊन खंजीर । मारला उरस्थळीं ठेवून । प्राण सोडला राम म्हणून । चाल । तिने मग केला विचार जी । जावा मित्राचे बरोबर । जी । हातामंदीं घेऊन खंजीर । मारला उरस्थळीं ठेवून । प्राण सोडला राम म्हणून । येका पलंगावरीं दोघे प्राणी । पाहिले सासुनी । चिंता तिचे मनीं । आली धावून त्या समयाला । लेक म्हणेल आईने घात केला । यास्तव तिने प्राण दिधला । निळकंठ आला घरीं । उंबरठ्यावरी पाही भिरभिरी । हाका मारितो आईला । आई आई म्हणून प्राण सुकला । कोणी नाहीं साथ द्यायला । तसा गेला रंगमहालांत । कष्टी मनांत । तोंडावरी हात देऊनी तिथें उभा राहीला । अश्रु ढाळीतो धरणीला । एवढा निष्ठूर का झाला । तूं बाळपणाचा गडी । तुझी माझी जोडी । सदा हारघडी । कधी बा इसर नाहीं पडला ।

काय अन्याय मजपून झाला ? एकदा हासून बोल मजला । ( चाल ) त्याने मग केला विचार जी । जावा मित्राचे बरोबर जी । हातामंदी घेऊन खंजीर । तीन प्रेता लावी सरळी । आपण उभा जवळी । त्याच्याकडे न्याहाळीत मित्राशेजारी जाऊन निजला । छातिसी खंजीर भिडविला । रामराम म्हणून प्राण दिधला । चार प्रेत पडली भुमिवरी । नळाचे घरी हकीकत सारी । कळविली हुजऱ्यानें । नळाची नार आनंदानें । सतीची पूजा हाती घेऊन । तिने करून तयारी । गावाबाहेरी । कापूर हातावरी । ज्योतिचा डोम पाजळला चौघेंजण रचले सरणाला । चौघाशी आगीन डाग दिधला । शिवभक्ति

होती दोघाला । की त्या समयाला । रावसंभूला संकट पडले त्या वक्ती । प्रत्यक्ष मूर्तिमंत येती । सरणावर टाकी विभुती । विभुती पडता सरणावरजी । सजीव प्रेतें झाली चार । आनंद झाला मित्राला फार । वरदायक परमेश्वर उभयांवर । तोचि ईश्वर पावन झाला मित्राला । रामचंद्र साकुरीवाला । दत्तात्रय त्याने आधार दिधला ।

## वग आकलीचा

कऱ्हाड देशांत कांचनपूर । तेथें एक लक्षाधीश सावकार । नांव त्याचे ब्रिदीचंद गुजर । घरीं अकलेचा व्यापार, गिऱ्हाईक येती । शब्दाची किंमत अक्कल विकत घेती ।।१।। ब्रिदीचंदाची अक्कल मोठी । आले विघ्न बुद्धिनें लोटी । शब्दाशब्दी धन लुटी । असे साधून गेली हटवटी । पसरली कीर्ति ।। घरबसल्या गिऱ्हाईक रात्रंदिवस येती ।। २ ।।

( चाल–दूरदेशी कालीज शाळा )

सुखसंपन्न अशी ती मूर्ति । उभयता स्त्रीपुरुष घरामंदीं असती ।। नाहीं कन्यापुत्र कांहीं पोटी संतती ।। उभयता स्त्री-पुरुषाची नव्हती प्रीति ।। दुरबुद्धिची कांता त्याची चंचळ होती ।। कपट भावानें करी देवीची भक्ती ।। ३ ।। ( भाषण ) स्त्रियांच्या चतुराई पुढें हद्द झाली. पहा आमच्या घरीं आकलेचे दुकान हजारो लोक येऊन अक्कल विकत घेतात व उपयोग करतात. असे असून आमची बायको आम्हाला अक्कल शिकाविण्यास पहाते असे लक्षांत येते. परंतु स्वतः लक्ष घातल्याशिवाय मूळ तत्त्व काय आहे हें लक्षांत येणार नाहीं.

( चाल–सावकाराची कन्या दाशी सहीत )

तो सावकार नारीजवळ घेऊनी । प्रेमाने करी भाषण मंजुळवाणी जी । तुझी प्रीत पाहुन आनंद होतो मनीं । नाहीं तुझ्या सारखी अशी जगीं त्रिभुवनी । सुस्वरूप सद्गुण अंगी मधूरवानी । सद्बुद्धि करी वर्तन दिवस रजनी । सत् संगतीनें वागणें मधुर वचनीं । आसी नाहीं मला दिसण्यांत सुलक्षणी जी ।। ४ ।।

( भाषण )

मी दुकानांत बसतो खरा परंतु सगळे लक्ष तुझ्याकडे. आता हें लक्ष लागण्याचे कारण की, तूं बायकू इतर बायकासारखी नाहींस. कारण

....६

तुझ्या अंगांत शांति, चतुराई, दया आणि क्षमा हे गुण असल्यामुळें व खरे-पणानें वागणें असल्यामुळें माझें सर्व लक्ष तुझ्यावर आहे.

**स्त्रीः**–तुम्ही म्हणतां पण मला सुद्धा गोड लागत नाहीं. खरेंपणाने वागणे हा स्त्रियांचा धर्म आहे. आपल्या नवऱ्याशीं जर खोटें बोलायचें तर किती पाप आहे बरं !

**सावकारः**––हो भयंकर, त्यास अंत आहे का ? पण तें असो. तूं नित्य रोज नेमानें देवीच्या पूजेला जात असतीस याचें कारण काय ? काय मागणे आहे हें विचारण्याकारिता तुला हाक मारली.

**स्त्रीः**––महाराज, मुलाबाळाशिवाय हें आपल घर कस दिसत बर ?

**सावकारः**––शून्य दिसतं. माझं हेंच सांगणं होतं. जा घरांत कांहीं उद्योग पाहा.

( चाल पतीविन हीन )

पती माझे जपुन मजसी काय युक्ति करूं मी यासी जगीं नारी व्यभिचारी परोपरी । किती तरी, मज चोरी आहे सारी । पती घरीं दिवस निसी ॥ १ ॥ परपुरुशीं रत व्हावे रतीरंग सुख द्यावे तुसी मनीं इच्छा धावे कधीं पावे देवी मजसी ॥ २ ॥ मदनजोती रसरसती । मनशांती होईल कैसी ॥ ३ ॥ ( भाषण ) ह्या बायकोनें मुलालेकराचे निमित्त सांगितलें खरें; परंतु हे चिन्ह कांहीं निराळेच दिसते. पण आपण स्वतः देवीच्या पाठीसी लपल्याशिवाय नक्की समजून येणार नाहीं.

**स्त्रीः**––माझा नवरा माझे मत घ्यायला पहातो; परंतु माझे मत मी कधीं समजूं द्यायची नाहीं. तर आतां वेळ झाली. नेमाप्रमाणें देवीला गेले पाहिजे.

( चाल कोणी एक गोसावी )

सावकार हुशार लपला देवीच्या पाठीसी । घेऊन पंचआरती सुंदरा आली तेव्हां पुजेसी । परोपरी प्रार्थून सांगती मनोरथ देवीसी । परपुरुष भोगिता कांहीं विघ्न येऊ नये त्यासी । चतुराईने करून भाषण पती सांगतो तिसी । तुपसाकर चारीता पतिला आन्ध्र येईल नेत्रासी । ( भाषण ) देवीच्या पाठीमागून नवऱ्यानें असे सांगतां तिला फार आनंद झाला व त्या स्त्रीस वाटले कीं देवी प्रसन्न होऊन मला वर दिला म्हणून आनंदानें घरीं आली.

**नवरा**:—काय धोरण आहे तें समजलें. आम्हांला सांगितलें की मुलालेकराकरिता देवीची पूजा करिते. परंतु ही भानगडच कांहीं निराळी. आताशी ही उघडी पडली." "माझ्या नवऱ्याचे डोळे जावे व मी यजमान घेऊन जावे हे नक्की ठरले। पण याला अक्कल भिडविली पाहिजे.

( चाल गरमीच्या लावनीची )

रांडेचे कपट पाहुन सावकाराने युक्ती योजिली। आस्सल नागीन जहरी। एक लहरी। पैदा केली। नळीचे करून यंत्र। जवळ स्वतंत्र। त्यानें ठेविली। उभयता करून विचार देवीचा वर पत सुरू केली वेळच्या वेळेवर। तुपसाकर भोजन घाली। म्हणे सावकार नारीसी। माझ्या नेत्रासी अंधारी आली। आईकून त्याचे भाषण सावकारीण आनंदमय झाली। पती निजवून ओसरीवर प्रीयकर मित्र नेई रंगमहालीं। ( भाषण ) आपल्याला देवीने जो वर दिला तो आपल्या पतीला सांगून चालू केला पाहिजे.

**नवरा**:— का, आज मर्जी फार खुष दिसती.

**ती**:—महाराज, मी तुम्हांला सांगणारच होते. आज देवीने असा वर दिला की "तुझ्या नवऱ्याला शेरभर तूप आणि शेरभर साकर रोज चारीत जा. म्हणजे एक महिन्याने तुला गर्भ राहील. हे बरे झाले. सावकार:— फार उत्तम. यास म्हणतात चाल केली. असे करतां एक महिना झाला. नंतर सावकार आंधळा झाला.

**स्त्री**:—ऐकले का पाटील, तुम्ही माझ्या महालांत आलें पाहिजे !

**पाटील**:—( पाटलाचा मुलगा ) कोण ? मी ? आणि माझ्याशी काय काम लागले ?

**स्त्री**:—अहो, महालांत काय काम असतें तुम्हांला बिलकूल समजत नाहीं काय ?

**पाटील**:—हो समजलें; पण आपली कांहीं हिंमत होणार नाहीं. कारण तुझा नवरा फार वाईट आहे. ( साकी ) बहुत प्रयत्न करुनी पतीसी मीच फसविले पाही। दासी तुमची व्हावी म्हणुनी शरण आले या ठाई। मंदिरीं आज चला। खुशि करावे मला। मंदिरी आज चला। आंतरी वाटती ग भीती भारी। तुझा भ्रतार वाईट भारी।

**पाटील**:—पहा वहीनी, ह्या नादानी कईकांचा घात झाला ! हो, ही भीड माझ्या कामाची नाहीं !

( चालः—मी शरण शरण )

ध्या दासीं पदरीं महाराज ध्या दासीं पदरीं। का हिंमत सोडिता प्रसन्न आहे जगदीश्वरी।

**स्त्रीः**—पाटील, तुमच्या जिवाकरतां आज पांच वर्षे देवीची सेवा करते.

**पाटीलः**—हे पाप आपण करणार तिथें देवी काय करणार। चाल। तारील तीच परोपरी हो। तारील तीच परोपरी। अभयवर घेऊन पुढें मग झाले मी सत्वरी। पाटील हें कांहीं कामाचे नाहीं। अहो मी पक्का पाया रचला। चाल। का बळेच आग्रह करुनी घालिसी भरी। फेटले दिसतीस कवटाळीन परोपरी। करसील घात माझ्या अंतरीं।, झाली जरी सोन्याची सुरी, का ती ध्यावी आपल्या उरी। ध्या दासी पदरी महाराज, ध्या दासी पदरीं। कां हिम्मत सोडिता प्रसन्न आहे जगदीश्वरी॥

**स्त्रीः**—तुम्हीं कांहीं एक मनांत आणुं नका. तुमच्या केसाला धक्का तर माझ्या जिवाला धक्का! माझा नवरा मी अंधळा करून ठेविला. तो आता आपले काय करणार?

**पाटीलः**—असे आहे का? फार उत्तम. जा तूं आपल्या उद्योगाला मी आज रात्रीं नक्की येणार! हे घे वचन! पण सावध रहा म्हणजे झालें (असें म्हणून तो तिच्या घरीं जातो. व ती त्यास दार उघडून आंत घेते.)

**तीः**—(साकी) जाई, जुई, गुलाब, चमेली सेज फुलाची केली हारतुऱ्यादिक अत्तरदाणी गुलाबदाणी आणीली। संधी खूप आली। संधी आज खूप आली।

( ओवी )

ध्या, ध्या पानाची गंजेरी, मसालेदार सुपारी। चुना लावा केसरी। जरदा कस्तुरी ध्या हाती।

( आंधळा इतक्यांत तीस हाक मारून पुष्कळ उद्योग सांगतो.)

**स्त्रीः**—पाटील, आज माझ्या मनाचे समाधान झाले. आता काय रात्र आपली; आपण रात्रीचे मनास वाटेल इतकी मजा करूं.

**पाटीलः**—हे तर खरच; पण मला त्या आंधळ्याची भीति वाटते.

**स्त्रीः**—अहो, हे त्याला काय समजणार? आणि समजून तो आपले काय करणार? (इतक्यांत आंधळा तीस हाका मारून माडीवर उद्योगास लावतो आणि त्या पाटलास नागीन डसवून आपल्या बिछान्यावर येऊन बसतो.)

**स्त्रीः**—हाय हाय, कर्म माझे! हें काय? काय झालें एकाएकीं हा घात झाला कसा? असे म्हणून त्यास हाक मारून व हालवून पहाते.

(चाल : या वेळीं दैव)

एकाएकी प्राण कसा हारला। नाहीं मनाचा मनोरथ पुरला। प्राण-सखा अंतरला। काळ कसा फिरला। कळेना कांहीं कळेना कांहीं। कर्माने घेतली धाव झाला अपाई।

(असे म्हणून त्यास बाहेर ओढून टाकते.)

**स्त्रीः**—ऐकलं, आपल्या दारीं काय पडलें आहे?

(चाल : चला जाऊ घरीं हो)

उठा उठा कारभारी हो। चला चला पहा द्वारीं हो। विपरीत काय दिसे भीती मज वाटतसे। करावे यास काय तरी हो। चला पहा द्वारीं हो।

**आंधळाः**—आग, मी तिथ येऊन काय पहाणार? काय असेल तें तुला नाहीं सांगतां येणार?

**स्त्रीः**—अहो कोणी मनुष्य मारला आणि आपल्या दारासी आणून टाकला!

**आंधळा**—अग, तो कोणी मारला असावा?

**स्त्रीः**—मला काय ठाऊक आहे? मी काय त्याला पहायाला गेले का?

**आंधळाः**—बरें तें असो. त्याला अगोदर उचल आणि शेजारी कसबिणीच्या दारी उभा करून दे. पटकन निघून ये। (चाल) घेऊन प्रेतासी। लावून पाठीसी घे सावकारीण। घराशेजारी कसबीण घरीं। तिचा जिना यंधुन। प्रेत दारासी टेकून। त्यासी आली घरीं निघून। उठली कळवंतीण सहाजीक दार उघडले तिन। प्रेत आदळले, गरबडून गेली, घाबरली कसबीण जी। अहो, काय हे पडले, अनुचीत घडले, कोन होता यजमान अरे हा।

मराठी ग्रंथ सं..., ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम .................. वि:

( कळवंतीण शेटजीस हाका मारीत येते )

“ अहो दादा, कांहीं मला अक्कल सांगा. माझ्या हातून जिन्याचे दार उघडतांना पाटलाचा मुलगा धक्का लागून पडला आणि त्याचा प्राण एकाएकी गेला !

**आंधळा**:—“ बाई, रुपये पाचशे पाहिजेत ! ”

**कसबीण**:—“ हे घ्या ५०० शें रुपये पण हें विघ्न माझ्या दारांतून काढा ! माझा धंदा तुम्हाला ठाऊकच आहे. हें लोकास समजलें तर माझ्या येथे कोणी येणार नाहीं ! ”

**आंधळा**:—बाई, गांवाशेजारीं जांबाचा बाग आहे. प्रेत एका झाडासी उभे करून द्या आणि घरीं येऊन खुशाल निजून रहा !

( चाल—चतुरानी दाऊन घर )

मध्यान्ह रात्र अंधारी—बाग जांबाचा गावाशेजारी—प्रेत झाडासी नेऊन उभे करी । आली निसटून । आली निसटून । मग उठला राखणदार पाहे न्याहाळून । जी । बागवान तिकडे पाहून म्हणतो—अरे हा कोणी तरी चोरटा दिसतो. याला एका रट्टयांत पालथा पाडला पाहिजे. असें म्हणून त्यास मारतो. अरे, हा तर ठार मेला ! आता हे विघ्न आपल्यावरचे कसे जाईल ? चला त्या आकलीच्या दुकानांत गेले पाहिजे. जाऊन हाक मारतो. “ अहो शेटजी, माझ्या हातून पाटलाचा मुलगा ठार मेला. घे विघ्न निवारण होण्याला आक्कल द्या ! ”

**आंधळा**:—बाबा, रुपये ५०० शे पाहिजेत तर मी सांगतों. प्रेत पाठीसी घालून जा आणि त्याचा बाप पहाटे जोर काढीत असतो. त्याच्या चवड्यांत त्याचे हत्ती आहेत, त्यावर पसरून दे आणि तुपला तू निघून ये म्हणजे झालें.

( चाल—चतुराने दाऊन घर )

पाठीसी प्रेत लावून गेला त्या वाडग्यांत घेऊन । ठेविला हत्त्यावर पसरून । काढीला पळ । काढिला पळ । मग आला तिथें पाटील पाहे टुलटुल ।।१।।

**पाटील (मुलाचा बाप)**:—“अरे तिच्या मायला ! माझ्या वाड्यांत येऊन हात्यावर येऊन हा कोण जोर काढीतो. याला एका लाथेंत उताणा पाडला पाहिजे. असें म्हणून धावून येतो, लाथ मारतो व आपलाच मुलगा मेला म्हणून पश्चात्ताप करतो.

( साकी )

शिव शिव काय हा ठेवा संचित लिहिला आहे, बालकहत्या ही मजहस्ते घडली कैसी आता केवढें पाप पदरीं दिलेस बांधून— दिलेस बांधून पदरीं— केवढें पाप तरी.

( अंतरा )

काय जगीं दाऊ तोंड--ठेवतील नांव उदंड–काय जगीं दाऊ तोंड। फुटेल कर्माचें भांडें। होईल टिका अखंड फुटेल कर्माचे भांडें.

( चाल–मित्रा विपरीत )

अरे बाळा तरकर मी ठरलों। माया लावून जतन केलें। किती चांडाळ बनलों ॥ पुत्रसुखाला अंतर पडोनी जगीं वाईट झालों ॥

" आता इथे गांगरून उपयोग नाहीं. कांहीं तरी अक्कल लढविली पाहिजे. "

( आकलीवाल्याकडे जातो.)

" अहो शेटजी, दार उघडा.

**आंधळा:**--" का हो पाटील, इतक्या रात्रीं कां आले ? "

**पाटील**--( रडून सांगतो ) माझ्या हातून फार वाईट कर्म घडलें। माझा मुलगा बीन अपराधी मी त्यास ठार मारलें। हें जगास समजलें तर लोक माझ्या तोंडावर थुंकतील !

**आंधळा:**--तुम्ही त्यास कोणत्या ठिकाणीं मारला ?

**पाटील:**--पाठींत लाथ मारली !

**आंधळा:**--अहो, पाठींत लाथ मारली तर एक तासानें नाकांतून रक्ताचा मुसंडा आल्याशिवाय प्राण जाणार नाहीं. तर तुम्ही असें करा त्याच्या रोजच्या निजण्याच्या जागेवर बिछाना टाकून त्यास निजवा आणि नाकांतून रक्त निघाल्यावर सर्प डसल्याचा पुकार करा म्हणजे तुमचें अपयश सहज जाईल; पण रुपये ५०० लवकर घेऊन या ( पाटील तसें करून प्रेत दहन करतो. )

( लोक येतात वैद्य येतात. खराच सर्प डसून व झेंडू फुटून त्याचा प्राण गेलेला असतो. ) सकाळीं उगवतां दिनमान। पाटील उठला घाबरुन। स्त्रीला

हांक मारी आरडून । म्हणे पुत्राचा गेला प्राण । झालें पतन जी जी ।। आतां जें झालें तें परत येत नाहीं असें म्हणून तें प्रेत नदीकिनारीं दहन करतात.

( चाल : सावकाराची कन्या दासी सहीत )

अहो त्या पाटलाच्या मुलाचे जळालें प्रेत । असी भीड भिकेची बहीण गोते खात । पाही स्त्रीबुद्धिने होऊन त्याचा घात । तिळमात्र नाहीं माहीत कोठे गावांत । ज्याचें विघ्न त्याचे घरीं गेले आपसांत । आसी आकलेची आक्कल ध्यावी विकत । ( भाषण ) अशी स्त्री आपून संभाळावी. परंतु अब्रु फार कठीण आहे. याकरता कोणास समजू न देता विचार केला पाहिजे. तो असा की आपूनच इचा निकाल लाविला पाहिजे. असें म्हणून तो त्या बायकोस घेऊन तिच्या माहेरीं जातो व सासुसासऱ्यास डोळे गेले व पुढे कसें होईल चिंता पडली तर आमचा संभाळ करणार तुमच्यावाचून कोणी नाहीं. असें म्हणतो. हें ऐकून सासूसासरे हळहळतात व दोघांस ठेवून घेतात. हा स्त्रीच्या समाचारासाठीं जातो. तिच्याशी प्रेमाने बोलतो व भेटतो.

( चाल : पतिविहीन हीन )

येई प्रिये प्राणसखये । धरून हृदयीं भेट देई । चिंता अग्नी प्राप्त झाला । डोम शरीरीं पाजळला । दुःख कोणास सांगूं काय । धरून हृदयीं भेट देई तूच माझे ।

**शांतवन:**—तूच माझे प्राणजीवन । तूच माझी मायबहीण । तुजवीण कोण आहे, धरून हृदयीं भेट देई । ( असें म्हणून तो तीस भेटतोच ) व पाठीसी नाग डसवतो. तोच तिचा प्राण जातो. पुढे तो सासाऱ्यास सांगतो की तुम्हाला माझें दुःख पडलें. तुम्हाला असें वाटलें की आंधळा जावई व लेक कुटवर पोसायची ? याकरिता माझ्या बायकुचा तुम्ही प्राण घेतला. तुम्हांस वाटलें की लेक मारली म्हणजे जावई आपोआप जाईल. आता मी फिर्याद करीन घरभंग केला म्हणून.

मग सासुसासरे घाबरतात व जावयास सांगतात कीं "तुम्ही हजार दोन हजार रुपये घ्या व दुसरी बायको करून तुम्ही आपला संसार करा !" मग रुपये देऊन त्याचें शांतवन करितात व लेकीस अग्नी देतात व हा आनंदांत घरीं येतो.

( चाल : सर्व जणाला हीच विनंती )

परोपरीचे मत सदोदीत शोधशोधून काढीत असे । नीगुतीचा सैपाक अमोलीक ख़वनपात्री वाढतिसे चतुर जाणे चवी अनुभवी मनी तृप्तता जोडीत असे । दगडू साळी तेंव्हा वेगळी परोपरी रंग गुड वितसे कवि काशीनाथ कवन करितो टीप छाप खूप जोडीतसे सवाई माधव उभारंग निर खोड वैऱ्याची तोडितसे.

## वग

( अक्कल व लक्षुमी )

मनुष्य देशोदेशीं व्हावी थोडीशी आकलेची शक्ती । अक्कल नसेल तो प्राणी फसेल । काय करील हरिभक्ती ॥ १ ॥ आकलीअंती ज्ञानसंपत्ती । कैलासभुवनी मुक्ती । अक्कल जडेल । तर सभेंत लेढल । काय पंडितास युक्ती मति । अक्कल हिंमत करील किंमत रक्ताची चुकती । अकलेपासून प्रपंच असून जडेल विरक्ती ॥ ३ ॥ कवि काशिनाथ म्हणे आकलेची कीर्ति त्रिजगती ॥ सद्‌गुरू कृपा करून साठबा घ्या युक्ती युक्ती ॥ ४ ॥

### अक्कल आणि लक्ष्मी यांची भेट

**ओवी**:—एके दिवशीं । अरण्यावाशी । अक्कल भेटली लक्ष्मीशी । भाषण करिता उभयतासी । गर्व विनोद वाढला ।

**लक्ष्मी**:—का बाई कुठे गेली होतीस ?

**अक्कल**:—मी माझ्या प्रिय भक्तास सूचना देण्यास गेले होतें; पण तूं कोठे गेली होतीस ?

**लक्ष्मी**:—अग, माझं काय विचारतेस ? मी या जगांत अनेक जीवास सुखाची प्राप्ती व्हावी म्हणून रात्रन् दिवस कृपादृष्टि ठेवून फिरत असतें.

**अक्कल**:—बाई, तूं सुखाची प्राप्ती म्हणतेस खरी; परंतु तू ज्या ज्या ठिकाणी हिंडतेस त्या त्या ठिकाणी दिसतांना सुख दिसत; परंतु तो प्राणी फार विवंचनेंत पडतो. जसें माझ्यापासून जगास सुख मिळतें तसें तुझ्यापासून मिळेलच असे वाटत नाहीं.

**लक्ष्मी**:—तुझ्यापासून जगाला काय सुख भेटणार ?

अक्कलः—अग, तुझ्यापासून तरी काय भेटणार तें सांग.

लक्ष्मीः—( साकी ) मम कृपेने रंक असेल तर करील त्याचा राव। तेहेतीस कोटी देवाला आहे का नाहीं, वैभव ॥ हें लक्ष पुरवून पाही. आहे का नाही ? ॥

अक्कल-( साकी ):—नको मागले कौतुक सांगूं। नविन समक्षा दावी। कला कुशलता काय आहे ती दृष्टी पडु दे बाई। सिफारस काय आहे पाहू दे मजलाई।

लक्ष्मीः—अग, माझी शिफारस काय पहाती ? तुझी काय आहे तें सांग.

अक्कलः—अग, माझी मी दाखवीनच दाखवीन. पण तुझी तर पाहू दे !

लक्ष्मीः—बरं, दाखवतें. ध्यानांत घे. ( झंपा ) दारिद्र्याने जो पीडिला हा दाखवून देई मजला। भाग्यवान मी त्याला करून ठेविते। सर्व सुख भोगण्यास त्वरित लाविते। या जगांत कोणी दरिद्री असेल तर दाखीव मी त्याला राजा करून ठेवते.

अक्कलः—ही राजा करणार ! पण जरी राजा केला तरी पण आकलेशिवाय त्याला काय सुख भेटणार ? मी अक्कल आहे। आणि आता असे करते (झंपा) बिन आकली जो प्राणी असेल असेल जरी कोणी। बुद्धिहीन मी त्यास करून ठेविते। द्रव्य मिळोनी दुःख भोगण्यास लाविते।

अक्कलः—बाई, समोरच्या गावांत एक धनगर दारिद्र्याने फार दुःख भोगतो त्याला लवकर सुखी कर पाहूं !

लक्ष्मीः—टीक आहे करते बरं। कऱ्हाडदेशी एक कौंडनापूर। तेथे एक राहात होता रामा धनगर। पदरी त्याला गरीबी फार। दारिद्र्याने झाला जरजर। फार बेजार आईबाप उपाशी मरती पोरंसोरं। चिंता फार होती धनगराला। लक्ष्मी प्रसन्न झाली त्याला। म्हणून बुद्धिचा पालट झाला। धनगर भेटून सावकाराला सांगे मजकूर। म्हणे महाराज मी आहे फार लाचार। गरिबीला त्रासलो फार। पोटाला अन्न नाहीं तिळभर। उपाशी मरती पोरसोर। करा कांहीं दया मजवर। घडेल उपकार। मी तुमचे उपकार नाहीं विसरणार।

धनगर (स्वतःशीं):—काय करावं ? माझ्या संसाराची किती दुर्दशा उडाली आहे. पोटाला तिळभर अन्नसुद्धां नाहीं. कालपासून घरांतील माणसें उपाशी आहेत. आता आपल्या गांवात परशरामशेट आहेत. त्यांना जाऊन भेटावें,

म्हणजे ते कांहीं तरी आपणावर दया करतील. (असे म्हणून धनगर सावकाराला विनंति करतो. )

**सावकारः**—अरे रामा, रडतोस कशाला? असे जर होते तर मागेच यावयाचे होते. पायली-दोन पायली धान्य घातले असते. उगा. डोळे पूस. चाल आली दया सावकारासी। घे ज्वारी तुसी दोन पायली खायाला एक शेत लहानशे देतो वावरायला। जा उद्या सकाळीं जा उठूनीया औताला **धनगर** हात जोडूनी रडूं लागला। नाही बैल ढोरें काय करूं शेताला?।

**धनगर**—महाराज तुम्ही पोटाला धान्य देता व वावरायला शेत देता पण त्या शेताला काय करूं? माझ्या जवळ बैलढोरे कांहींच नाहींत. औताला काय आईबाप जुंपू?

**सावकारः**—बरं बरं नसू दे. तुला मी सांगतों असे कर. ( चाल ) सावकार धनगराशी बोले वचन। माझे बैल तांग्याचे दोन जावे घेऊन। आहे जमीन तैयार पाळी घालून। बी घेऊन जावे काढ आता येऊन। केली कबूल गोष्ट त्या हो धनगरानं। गेला बैल घेऊन आला चोप घेऊन। ( साकी ) पाऊस पाणी फार अमदानीं। आधीच झाली होती। धन-गरांचे दैव खुलले। शाळुपेरला शेती। बहारदार पीक आले। राखण-सुरू हें झाले। पीक हें आले वहारदार। आनंद त्यासी झाला फार। आला शाळू हिरवागार। बायको पोरेसोरे। गेला घेऊन बरोबर।

**धनगरः**—सावकारानें माझ्यावर किती उपकार केले! शेतबैल पदरचे देऊन हें वावर पेरण्यास लावले! पण माझ्या नाशिबानें शाळू तरी किती हिरवा गार दिसतो. आता पंधरा दिवसांनीं मला पोटभर अन्न खावयास मिळेल! ( असे म्हणून बायकामुलें घेऊन शेतांत जातो व शेताची राखण सुरू करतो. )

( कांहीं दिवसांनंतर )

पडली पोटऱ्या बाहेर कणसें। पाहून भयभित झाला। म्हणे हें माझे दैव फुटले। कपाळ झोडूं लागला। लक्ष्मीची होती पसंती मोती आले कणसाला जी। धनगराला अक्कल नव्हती। शिव्या देतो देवाला। अक्कल नव्हती म्हणून परीक्षा कांहीं कळेना त्याला जी। मोती पाहाता म्हणे देवाला काय घात हा केला जी।

**धनगरः**—अरेरे, माझे कर्म फुटले. जोपर्यंत कणसं आलीं नव्हतीं तो-पर्यंत मला फार उभारी होती; पण कणसे पाहिल्यावर माझी कंबर बसली. देवानें माझा घात केला ! लोकांच्या वावरांत हिरवेगार जोंधळे आले व माझे पहा देवाने कसे वाटोळे केलें ! सगळे वावर फार ढवळे फटक झाले. धड दाणे नाहींत. व कडबाही जनावरें खाणार नाहींत. ( चाल सत्यवान )

राहू राहू कर्मावर हाणी धनगर रडतो फार । माझे वावर दिसे पांढर । अवघा शिवार हिरवागार । मोत्याचे सारे वावर फार मजेदार । पाहुन धनगर झुरे वारंवार ।

**धनगरः**—काय वावराला आग लावावी ? आणि राखण करून तरी काय फायदा होणार? लोक मला हसत असतील. गावांत कोणाला तोंड दाखवा-यला जागा राहिली नाहीं. वावर सोडून जावा तर सावकार रागे भरेल. दाणे नव्हते पण कडबा तरी झाला असता असे सावकार म्हणेल. तेव्हां इथ बसण भाग आहे.

( चाल ) एके दिवशीं दूर देशीचे सराफ दोन आले धंदा करता करता त्या रस्त्यानें । त्यानें पहाता वावर फार गेले थिजून । राहिले घडीभर उभे गुंग होऊन । केला व्यापाऱ्यानें विचार मनामध्यें । शहाणा नाहीं शेतकरी हा दिसत आकर्लावान ।

**नारायणरावः**—का हो केशवराव आल्या जन्मांत असें नवल कधी पाहिले नाहीं. या जोंधळ्याला सर्व मोतीच दिसतात. तेंहि असे की एक एक मोती पाचपाचशें रुपये किंमतीचा दिसतो आहे. याशिवाय हें शेत वाटेवर आहे. योला कोणी राखणदार आहे की नाहीं ? ( पाहून ) अरे हो, पण तो पहा कोण एक माणूस शेताकडे पाठ व रस्त्याकडे तोंड करून बसला आहे. मला वाटतें याला अक्कल नसली पाहिजे. म्हणून तो मूर्ख शेताकडे पाठ करून बसला असला पाहिजे. त्याला जर मोत्यांची परीक्षा असती तर तो असा गाफिल राहिला असता का ?

**केशवरावः**—बरोबर आहे; पण अहो त्याला अक्कल आहे की नाही ही आपण चौकशी करूं या. शेताची आपण खोती मागून पाहू. म्हणजे आपोआप समजेल की याला अक्कल आहे की नाहीं.

**नारायणरावः**—बरोबर आहे. चला त्याच्याकडे. ( त्याच्याजवळ जातात आणि विचारतात. )

( धनगर साकी ) काय पहाता बाबा माझे फुटून गेले कर्म । तोंड कोणाशीं दाखवण्याशीं झाली जगामध्यें शरम । झालों हिरमुष्टि होऊन बसलो कष्टि झालों हिरमुष्टि । बाबांनो काय पहाता माझे कर्म फुटलें । लोकांच्या शेतांत कसा कणसाचा गोंडा आला आहे । आणि माझ्या शेतात साऱ्या गारगोट्या झाल्या आहेत म्हणून तुमच हसू झाल आहे. याच्यात जर धान्य पिकल असत तर तुम्ही कशाला हसला असता ?

**केशवराव:**—का रे, हें वावर असं कां दिसतं ?

**धनगर:**—हीं माझ्या कर्मांचीं फळ आहेत. ह्या वावरांने मला जगांत खाली पहाण्याची वेळ आणली आहे. बाबांनो शेत पिकेपर्यंत सावकारानें धान्य व पैसे आडके पुरविले; पण आतां कुठून हें कर्ज फेडावे ? एका सावकारानें हें शेत मला वहावयाला दिले. बैलही त्यानेच दिले, पेरल्यापासून तो आजपर्यंत त्यानें धान्या पुरविले आतां ह्या शेतात कडबाच नुसता होईल, त्याच रीण कसं फेडाव काय कराव ? का कुणीकडे तोंड काळं करावं ? पण कसं तरी त्याच रक्षण करावं म्हणून बसलों आहें.

**नारायणराव:**—केशवराव, याला खरोखरीच अक्कल नाहीं. ह्या शेताची आपण खोती मागून पाहू या. म्हणजे समजेल हा किती शहाणा आहे तो ( चाल ) झाले सराफ मग हुशार भोळा धनगर लावला नादी हो जी जी । टराव खोती दे रक्कम मोजून आधी जी जी ॥ हा ऐका आमचा विचार फायदा फार होईल यामध्यें जी जी जी । गिऱ्हाइक असें तुला नाहीं मिळणार कधीं जी जी ॥

**केशवराव:**—काय रे, तुझें नांव काय ?

**धनगर:**—माझ नांव रामा.

**नारायणराव:**—हे पहा रामा, तूं आता असं कर ही खोती आम्हांला देऊन टाक आणि तुझी तुला रक्कम घे. आणि तू आमच्याबरोबर चल म्हणजे तुला एखाद्या राजाची मुलगी बायको करून देतों. मग तुला सर्व सुख मिळेल. सांग किती पैसे द्यायचे या खोतीचे.

**धनगर:**—काय द्यायचे तें द्या पांचपन्नास रुपये !

**केशवराव:**—तुला आम्ही पाऊणशे रुपये देतो, तें तुझ्या बायको जवळ ठेव आणि तिला बजावून ठेव, की हें राखण सोडून कुठे जाऊ नकोस. आत

अस कर, या शेतातील कांहीं कणस मोडून घे. म्हणजे आपण पुढच्या गांवाला निघून जाऊं. (धनगराला बरोबर घेऊन जातात.) ( चाल ) लालूच धनगरास देवून, लगेच त्याला संगतीला घेऊन । दूर गावामध्यें जाऊन मथवून सांगती त्याला बैसया ठाई । येतो वस्त्र घेऊन तुला ॥

**नारायणराव:**—हा आमचा विचार ऐक, म्हणजे तुझे कल्याण होईल. हें पहा तुला आम्ही सांगतो अस कर. आम्ही जर सांगितलें तर तू ऐकशील ना ?

**धनगर:**—हो हो. तुम्ही सांगाल तें मी ऐकेन.

**केशवराव:**—हे पहा तूं अस करायचें. तुला कुणी कांही विचारलं तर तू कांहीं उत्तर न देता नुसत हूं म्हणायचं. याच्याशिवाय कांहीं बोलायचं नाहीं. हें मात्र पक्कें लक्षांत ठेव. आतां तूं त्या ठिकाणी बसून रहा ! आम्ही गांवांत जाऊन तुला उत्तम राजाचा पोषाख घेऊन येतो. तुला राजा करून, ह्या राजाजवळ नेऊन ह्या राजाची मुलगी तुला बायको करून देऊं. म्हणजे मग तुझें चांगलें होईल.

( असें म्हणून धनगरास तसेंच बसवून, भाड्याचा पोषाक घेऊन येतात. )

( चाल ) जरी अंगरखा फार मजेदार, शेला दुपट्टा मनोहर । मोत्याचा तुरा फार मजेदार वर खोविला जी ॥ देवून समशेर सरदार जसा बनविला जी ॥

**नारायणराव:**—आता हा पोषाख घातलास ना ! इथें बसून राहा ! या शहराच्या महाराजांची आम्ही भेट घेऊन येतों. ( चाल ) तिथे बसवून धनगराला । गेले कणसं घेऊन संगतीला चला जी जी । राजासी नजराणा केला । त्यांचा फारच वडेजाव केला । जी जी ॥ दाविती कणसं राजाला हो । राजा मनांत चकित झाला । जी जी ॥

**राजा:**—का हो आपण कोण आहांत ? व आलांत कुठून आणि ही अमोल वस्तू पैदा केली कुठ !

**केशवराव:**—महाराज, आम्ही अक्कलकोटच्या राजाचे प्रधान आहोंत. आणि त्यांचे चिरंजीव आम्हांस बरोबर घेऊन देशपर्यटन करण्यास निघाले आहेत व त्याचा हेतु आहे कीं आपल्या घरच्या शेतांत जो नमुना पिकतो त्यातून थोडा नजराणा दाखवून, जो आपली स्वतःची मुलगी देण्यास कबूल

होईल तीच बायको करावयाची, नाहीं तर बाकीचे भूषणाचे शब्द बोलून किंवा तसबिरी दाखवून, असें अनेक प्रकारच्या भूलथापा दाखवून बायको करावयाची नाहीं ! अशा हेतूने आम्ही बऱ्याच ठिकाणीं गेलो, त्याचप्रमाणे तुम्हास मुलगी आहे असें ऐकून आपल्याकडे हा नजराणा आणला आहे. इच्छा असेल तर वेळकाळ न पहाता दोन दिवसांत लग्न करून द्यावयास पाहिजे. इच्छा नसेल तर आम्ही आपल्या मार्गास लागतों.

**राजाः**—प्रधानजी, हें कस काय आहे ? यांत तुमचा तर्क कसा चालतो ? हें ओलें झाड जोंधळ्याचें आहे. आणि याला मोती आले आहेत. हा प्रकार जन्मांत ऐकण्यांत, पहाण्यांत कधींच आला नाहीं हें खरं ना पण ?

**प्रधानः**—महाराज, आपण हें समक्ष डोळयांनीं पाहिलें. यांत संशय काहींच दिसत नाहीं. यावरून माझ्या लक्षांत असें येतें कीं मुलीचें सर्व दृष्टिनें कल्याण करावें हा पितरांचा धर्म आहे. तर मग याच्यापेक्षा कुणाच्या इथं मुलीला जास्त सुख मिळणार आहे आणि असला जबरदस्त सोयरा घडून घेतला तर कांहीं काळ वेळा अंती आपल्यालासुद्धा उपयोगी पडण्यासारखा दिसतो, असं माझ्या लक्षांत येतं. याउपर आपली मर्जी !

**राजाः**—कांहीं हरकत नाहीं ठीक आहे. ( झंपा ) कुठून तुम्ही वस्तू आणली तरी । कोण भाग्यवान् असे तुम्ही जगांतरी । त्वरीत जाऊन यावें घेऊन माझ्या घरीं । कन्या देऊनी गौरवीन त्यास सत्वरी ॥

**राजाः**—प्रधानजी, मुलगी देण्याचा विचार तर ठरलाच आहे, मग आतां याल ना तो राजपुत्र घेऊन ? राजपुत्र घेऊन येण्याची हयगय करूं नका !

**प्रधानजीः**—ठीक आहे. ( असे म्हणून त्या राजपुत्रास घेण्यास येण्यास सांगतो. )

( चालः—मित्राचे घेऊन प्रेत )

सराफाने केली हुन्नर । थोडेसें जमविलें लष्कर । वाजंत्र्याचा थाट मोहोर । घोड्यावर बसविला सरदार तो धनगर ॥१॥ गजबजून गेले तें शहर । म्हणे कोण आला राजहंबीर । राजकन्येसी नेमिला वर । म्हणूनी पहातात भीरभीर । न्याहाळून फार जी जी । नांव त्याचे समशेरबहादुर । ठेविले होते अगोदर । राजदरबारीं गेला सत्वर । बसविला नेऊन सिंहासनावर ॥ पूजा-उपचार हो जी जी ॥

( लग्नसोहोळा उरकून घेतला. )

( चालः—सासू सांगावी दासीला )

परोपरी उडविला थाट । करूनी गजघाट फार आचाट । सोहोळा । फार आनंद परोपरी त्या घटकेसी झाला प्रजेसी आणखी राजाला । सराफानें सितार्फी केली युक्ति योजिली वर्दी लाविली तेव्हां राजाला । दिलखुष पाहिजे सेज महालामधी आज जावयाला ।

( सराफानें महालाची तयारी करण्यास राजाला सांगितले व राजाने तें मान्य केले )

**नारायणरावः**—फार उत्तम झालं, आतां एकदा त्या नवरा-बायकोचा जीव मिळाला म्हणजे तो वेडपट मग आपल्याबरोबर कशाला येतो ! मग मात्र आपण इथून निघण्याची चपळाई केली पाहिजे आणि धोपट शेतांत जाऊन सगळा माल गोळा करून आपल्या गांवाला नेला पाहिजे.

**केशवरावः**— दमा, दमा ! आपण आताच बोलू नका ! एक वेळ त्या बायकोचें आणि त्याचें मन तर मिळूं द्या. मग आपण निघून जाऊ व त्याचे बायकोला पहिले शेतांतून हुसकून लावू व सगळे मोती आपल्या घरीं घेऊन जाऊं ।

( चाल अर्ध्या रात्रीं चोरी झाली. )

राजकन्येच्या मंदिरी आरास परोपरी । प्रभावळी मध्यें चंद्रजोती । हंड्या झुंबर लखलखीत सुगंधीक उदबत्त्या जळती हो ।

( राजकन्येने दासीकडून पतीस महालांत बोलावले )

**दासीः**—महाराज, तुम्हाला आमच्या बाईसाहेबांनी वर महालांत बोलावणें केले आहे. तरी आपण त्यांच्या भेटीस जावे. ( चाल )

दासीचे वचन ऐकूनी जिना चढूनी धनगर गेला महालांत । म्हणे हें पतिचें दैवत साष्टांग नमस्कार करीत हो ॥ नाहीं महाल कधी पाहिला भयभीत झाला, पलंगाला जोडितो हात ! राजकन्येसी क्रोध येतो, मनामध्यें झाली संतप्त ॥

( राजकन्या रागानें बापाकडे जाते. )

**राजाः**—फार उत्तम झालं. माझ्या मुलीचा लग्नसोहळा उत्तम तऱ्हेनें पार पडला. तिला वरहि उत्तम मिळाला हें पाहून माझ्या मनांत अत्यंत आनंद वाटतो.

**राजकन्याः**—बाबा, तुम्ही बोलता हें खरं आहे; पण प्रथम दिवशीं माझा अंगीकार करतांना माझ्या पलंगाला हात जोडून वेड्यासारखे परत धावत गेले. असा माझ्याकडून कांहीं अपराध झाला का ? म्हणून त्यांनी माझा अंगिकार केला नाहीं याबद्दल त्यांना विचारून चौकशी करा.

**राजा.**—ठीक आहे. मी आतां तपास करतों. तूं जा. ( राजा सराफास हाक मारून विचारतो) सराफ म्हणतो– त्याला महाल पसंत पडला नसेल म्हणून तुमच्या मुलीचा अंगिकार केला नाहीं. जो त्यांच्या घरीं थाट आहे, त्या रीतीनें तुम्ही थाट करावयाला पाहिजे. तर त्यांना पसंत पडेल ! अहो, त्यांच्या घरीं तुमच्या बाईसाहेबांनीं सजविलेला महाल तर त्यांच्या दासीच्या महालासारखा आहे. तरी याहिपेक्षा उत्तम तऱ्हेचा महाल सजवा व देशोदेशींच्या राजांचे फोटो व चित्रें तेथे लावा तरच त्यांना तो महाल पसंत पडेल !

**राजाः**—ठीक आहे. माझ्या मुलीकडून गुन्हा जरी घडला असला तरी माफ करा. मी माझ्या मुलीस याहिपेक्षा उत्तम रंगमहाल सजविण्यास सांगतो.

**राजकन्याः**—( येऊन ) का बाबा ! विचारलेत का त्यांना ?

**राजाः**—होय मुली, सर्व गुन्हा आपल्याच पदरांत घेणे भाग आहे. कारण तू जो रंगमहाल सजविला आहेस तो रंगमहाल त्यांच्या दासीला शोभण्यासारखा आहे. तरी याहिपेक्षा उत्तम तऱ्हेची सेज करून, त्यांना बोलवणें पाठव !

**राजकन्याः**—ठीक आहे. मी याहिपेक्षा उत्तम साज तयार करतें. ( दासी पुन्हा निरोप सांगते. )

( सोमनाथाचे नगर ही चाल )

दुसरे दिवशीं राजानें **नौखंडानी दूत** लावूनी । ताकीद दिली शिपायाला । चित्रपट संगीन चांगला काढून आणा तसबिरीला । जसें काय चित्र रेखेत, दुसरें कारण चित्र काढून द्वारका दाखविला तिला ॥ हिशोब तसा राजानें केला तसबिरी लावी मंदिराला । जसे अमरावती भुवन तेथे उभारून सुशोभित छान सूर्यकांताचा प्रकाश पडला । जसा रंग मयासुरसभेला त्याच तऱ्हेचा रंग आला । त्यांत धनगराचा परिवार मुलें, लेकरें, शेळया बकरे, धनगर पहातसे त्याला । मनामधें फार खुष झाला । बायको आली भे ाला ।

...७

**राजकन्याः**——हा मेला जातिचा धनगर असावा ! या तसबिरीकडे पाहून म्हणतो कीं मुलें, लेकरें व बायको भेटण्याकरिता आली. हा खात्रीनें धनगर असावा. त्यामुळेंच याला बाकीच्या तसबिरी पसंत न पडतां हीच पसंत पडली आहे; तर त्यांनी खरोखर माझ्या वडिलांशीं लबाडी करून या लुच्चेगिरीने माझे लग्न केलें. हा मेला धनगर आणि मी राजकन्या असल्याने यांनी माझ्या कुळाला बट्टा लाविला. मग याची दया करून काय उपयोग ? तर मग याचा प्राणघात माझ्या हातानेच करते. आणि माझाहि प्राणघात करून घेते. म्हणजे या जगांत आपणाला तोंड दाखविणें नको !

( खंजीर उपसते व त्याच्या छातीवर धरते. वार करण्यास लागते. )

( झंपा ) क्षुद्र कुळीच्या नष्टा, क्षत्रिय कुळाला दुष्टा । भ्रष्टविलें का खोटा नेम धरूनी प्राण नष्ट करीन तुझा, याजवरूनी ॥

( लक्ष्मी व अक्कल येतात. दोघींचे संभाषण होते. )

**लक्ष्मीः**— बाई, बाई, मी आता तुला शरण आलें आहे. तरी त्या वेड्या धनगराला अक्कल नसल्यानें, पुष्कळ संपत्ती प्राप्त करून दिली; पण त्याला उपभोग घेता आला नाहीं. बाई, तो मरणाच्या दारीं उभा आहे. त्याला अक्कल दे व आलेल्या विघ्नांतून त्याचें निवारण कर ! मी तुला शरण येतें.

( अक्कल त्या वेड्यास प्रसन्न होते. )

**धनगरः**— काय भाक्षितीस विष्टा । तैसा नव्हे मी नष्टा । सिंधू उल्लंघीन मोठा । धैर्य करूनी । मुष्टिप्रहार करीन तर बोल दुरूनी ॥

चल सोड; नाहीं तर बुक्कीसरसा तुझा प्राण घेईन समजलीस. तू माझी काय परीक्षा पाहिलीस ? हा कावळ्यासारखा विष्टा खाऊन बडबड करणारा मनुष्य मी नाहीं ! केवळ राजहंसासारखा सिंधूपर्यटन करणारा आहे. माझ्याशी बरोबरी करण्यास या जगांत कोणाची शिफारस चालणार नाहीं ! मग असे असता तुझे मन पहाण्याकरता वेड्याचें सोंग घेऊन वेड्यासारखा वागलों; परंतु त्याची परीक्षा तुला बिलकूल समजली नाहीं. यावरून मला असें वाटतें कीं तूं अगदीं मूर्ख आहेस. मग तुझा अंगीकार कोणत्या तऱ्हेनें करावयास पाहिजे ?

( राजकन्या शांत होते व त्याचे पाय धरते. )

( चाल:—च्या दासी पदरीं )

महाराज, अपराधी तुमची अपराधी तुमची । कृपा करावी स्वामी आहे दासी मी चरणाची । म्या चांडाळणीनें नाहीं पाहिलें दूर । खरोखर स्त्रीची जात फार तस्कर । ही ओळख तुम्हासी केली जन्मभर । मायेची पाखर घाला माझ्यावर । मी सोबतीण जन्माची झाले, मी सोबतीण जन्माची झाले, कृपा करावी स्वामी मी आहे दासी चरणाची ॥

**राजकन्याः**—महाराज, आपल्या अंगांत इतकी चतुराई, हा पुरुषार्थ आहे, हें खरोखर माझ्या लक्षांत आलें नाहीं. म्हणून मी कांहीं दूर विचार न करतां आपल्याशीं अगदीं कठोर भाषण केलें. शस्त्र धरून धावले. हा माझ्याकडून अतिशय मूर्खपणा झाला आहे. पण मी आपल्या चरणाची दासी आहें व आपण माझ्या प्रेमाचे जिवलग आहांत. मला झालेल्या अपराधाची क्षमा करावी !

**ध. राजाः**—प्रिये चल ऊठ ! मी इतका मूर्ख नाहीं ! शरण आल्यावर त्याचा धिःकार करणें हा शास्त्राचा अधिकार नाहीं. यावरून सांगतों की तू माझी पट्टराणी आहेस तर तुझे मी ममतेने पालन करीन ! तुझा राग बिलकुल धरणार नाहीं. मग तर झालं ?

( चाल:—मूळ आले सासरचे )

नको होऊं तू सुंदरी मनामधें कष्टी । गंगेचा पूर या विशाल सिंधूच्या पोटीं । झिजवीन तनु प्रेमानें सखे तुजसाठी । चल पलंगावर आज करूं आनंदांत गोष्टी । आकलेने सुख दिलें त्यांचे लछाटी । मग लक्ष्मी आणि अक्कल पडल्या गाठीं ।

**अक्कलः**—का बाई, माझ्याकडून बुद्धि उत्पन्न झाली, तेव्हाच याला सुख प्राप्त झालें हें खरें ना ?

**लक्ष्मीः**—हो बाई, हें खरें आहे; पण आपल्या दोघींच्या साह्यानेंच जगाचें संरक्षण करीत जा हें माझें सांगणें आहे.

**अक्कलः**—कांहीं हरकत नाहीं. ठीक आहे. चल आतां.

( राजकन्या झाला वृत्तांत वडिलांना सांगते. )

**राजा जावयास म्हणतो:**——मला पुत्र वगैरे कांहीं एक नाहीं. तरी या राज्याचे व संपत्तीचे आपणच मालक आहांत. ( धनगरास राज्याभिषेक करून राजा देशपर्यटनास जातो. )

**ध. राजा:**——मामासाहेब, हें राज्य आपण माझ्या नांवें बक्षीस केलें आहे तर मी सर्व व्यवस्था चांगल्या रीतीनें चालवीन याविषयीं आपण काळजी करूं नये. आपणास तीर्थयात्रा करण्यास काय द्रव्य लागत असेल तर भंडारघरांतून घ्या व आनंदांत तीर्थयात्रा करण्यास जा.

**राजा:**——ठीक आहे, जावईबुवा, हें राज्य आनंदानें संभाळा ! मी जातों.

**केशवराव:**——अहो नारायणराव, करायला गेलो पर आणि तीवई आली वर ! याला शेतांतून हाकलून देण्याकरिता ही अक्कल आपले अंगास आली ! आता त्याला एवढे ऐश्वर्य मिळाले आणि अक्कलहि पैदा झाली ! आता तो या शेतांतील जोंधळ्याचें पान तरी घेऊन देईल का ? तुम्हांला काय वाटतं ?

**नारायणराव:**——अहो केशवराव, तुम्ही एक गाढवपणा केला, पण मी दुसरा गाढवपणा केला हें तुमच्या लक्षांत आलं नाहीं व माझ्याहि लक्षांत आलें नाहीं. तें मोती घेण्याकरता पदरचे चार हजार खर्चीं पडले, पण एकाहि मोत्याचा दाणा आपल्या पदरांत पडला नाहीं. आतां गाढव होऊं नका, शहाणे व्हा ! आणि त्याला भिकाऱ्यासारखे काय मागायचे तें मागा. ( ते राजाकडे जाऊन त्याला विनंती करतात. राजा त्यांना भरपूर द्रव्य देतो. )

( चाल— सर्वजनांना हीच विनंती )

## शेवटचें नमन

नाथ वृद्ध धोंडीबा साळी, गुरुकृपेची ही वाणी । दगडोबा साळी म्हणे थोडासा विचार करावा मानवानें । कवि काशिनाथ कवन करीतो, म्हणून सांगतो समजूनी लक्ष्मीचे सुख भोगावें कांहीं जरासे आकलेने ! नरदेहासी आलास प्राण्या शुद्ध वासना धर मनी ।

—:०:—

# लावणी, गौळण, छक्कड व गण

## लावणी

चंचल झालें आज मन । दुःखाची वस्ती आंतरी जाण लाभले जिवा संतोष नित्य ही दान । लक्ष तिर्थी ठाई लागून गेले माझें प्राण ॥१॥ माझ्या पित्याचे नांव राखावें । म्हणूनी गुप्त दुःख सोसावें । किती तरी पोसावे झाले हैराण । संसारी नाहीं सुख आश्रम भासे हैराण ॥२॥ नपुसक पती मला दैवान । विधीनें लिहिला कसा लेख शोध करिता या पेंचात, काय राहून । प्राणत्याग करावा कांहीं तरी खाऊन ॥ ३ ॥ आत्मघाताचे पातक भारी, जाणूनबुजून घेऊ शिरी, विचारांत सारी एक रात्र गेली निघून, असा विचार देवऋषी करू पाहून ॥ ४ ॥ पतीसी घेऊन वैद्याचे घरीं उपाय रोगाचा लौकरी मी देऊन खुश करीन दिल्यावर गुण विनंती तुम्हासी माझी हात जोडून ॥५॥ वैद्यानें पाहून । शरीरीं औषध उपचार केले सारे, बरी नाहीं झाली प्रकृती खर्चून धन । कोणाशी विचारू हसतील सारेजण । शेजारणीस सांगून हितगुज । तिनें एक युक्ति दाखविली मज । म्हसोबा भायखळ्याचा यावा पुजून । पावल नवसाला खेटा याच्या घालून ॥ ७ ॥ असा क्रम चालू ठेविला । परंतु गुण नाहीं पतिला । देवधर्म करूनी थकले झुकवूनी मान भोजन । गोरगरीबांसी वस्त्र मानपान ॥ ८ ॥ बहिणीनें माझ्याकीरता तीर्थे केले सर्व जागा नच रिता घेऊन भास परदाता । नाहीं समाधान दिनरात खातापिता । शयनीं स्वप्नीं हें ध्यान ॥ ९ ॥ उदईक होता क्षणीं गोसावी पाहिला गेले जवळ । लवलाही सांगून त्यासी घाई घाई सर्व प्रकरण । सारी क्षेत्र करूनी शेवटीं गेले गोकर्ण ॥ १० ॥ गोसाव्यानें लिंबु भारला, आणि एक गंडा दिला बाईला । बांध पतिच्या कमरेला । गांठ कसून तत्काल । नवऱ्याला येईल तुझ्या यश नाथा ॥ नाना परी केले उपाय शेवटीं निर्फळ गेले व्यर्थ । गेली नजर ज्योतिषावर, घेतला बोलावून बाड खोला काय आऽकुड घ्यावा सांगून ॥ १२ ॥ ज्योतिषानें उघडले बाड । प्रथम तूं सव्वा रुपाया काढ सांगतो तुला परखड । बाडावरून उतारा पतीचा देतो करून ॥ १३ ॥ गल्लोगल्लीनें फिरतात बावा ज्यानें सांगावे त्याचेकडे जावे पैसा करून खर्चून यावा शेवटीं निराश होऊन घरीं

परतले पतीला गुण यावा म्हणून ॥१४॥ गुरु दगडोबा साळी अलबेला त्यानें मज उपदेश केला । का भुलती जन थापेला ? दैव भुलून पारड्यांत माल नाहीं घेत काय तोलून ॥ १५ ॥ जन्मता पती तुझा असा । तिथ वेळ नक्षत्राचा साचा । नादा बिंदा वेळीं हा फासा गेला पडून । व्यर्थ चिंता रोग शरीरीं घेती जडून ॥ १६ ॥

चंदूलाल बोलला काळजी याची तुरेवाल्याला । पुत्र तुमचा आला नपुसक जन्म घेऊन । नच पहाता गुण व्याही फसला मुलगी देऊन ॥ १७ ॥

## लावणी

लालबागेच्या बंगल्यावरतीं । तीन ताळ्याच्या माडीवरतीं । श्रीमंताची कन्या सुकुमार, अजब तिची घरती ॥ध्रु०॥ लाखो बायकामंदी दिसेना अशी कोठे गरती । रत्नजडीत शणगार मोत्याचे हार अंगावरती ॥२॥ नभो-मंडळावरती अशी काय वीज चमकती । राजअंबेरी डौल जसे आहे मोती सुरती ॥ ३ ॥ मुखचंद्र न्याहाळीता खरोखर तहानभूक हरती । आशा लागली फारच फिरली तिजवर मर्जी ॥४॥ म्हणूनी मित्रा तुला सांगतो। हस्तगत कर ती । असे रत्न भोगावे करावी मनाची इच्छा पुरती ॥५॥ कवी काशिनाथ साळी शिरोलींत आहे शर्ती कर त्याच्याशीं दोस्ती । रिकामी का मनांत झुरती ।

## लावणी

[ तूं कोणाची सुंदरी मदनमंजीरी चाल ]

काय सांगु पुतळी देखणी । जशी रंभा इंद्रभुवनीं । जी । जी । जी । तसें स्वरूप दिसे हे मन गेले भुलोनी ॥ध्रु०॥ चाल । चाल तिची पाहूनी । हर्ष बहु मती । जी । जी । जी । एक बार करावीं निद्रा घेऊन सदनीं ॥ २ ॥ मित्रा एक माझी विनवणी । कर जोडुनी । जी : जी : जी । कर खटपट झटपट मित्रा एवढी जाऊनी ॥ ४ ॥ गांव शिरोली ब्रीदाचे धनी । दगडुजी गुणी जी । जी । जी । शंकर बाबाची कवींची धरणी ।

## लावणी

[ करमत नाहीं मसी काय करू मी ]

प्राणनाथ सोडून गेले चैन नसे कांहीं ॥ ध्रु० ॥ अंगी तारुण्य मुसमुसले रतीसुखाविण सुकले । बागेमधीं फुलली जाई । जळाविण थारा नाहीं रात्रीं मंचकीं मी निजलें पती स्वप्नी पाहुनी थिजले दचकुनी पहाते तो दिसत कांहीं नाहीं ॥२॥ मदनाने मज व्यापिले । नेत्र माझे हें दिपलें । पंचप्राण व्याकूळ झाले । रडतांना माझे बाई । ३ । । चाल । झाले मी उदासी । चाल । झाले मी उदासी । अहो करमेना मसी । साळी दगडूजी म्हणे नारी रामनाम जप तूं हृदयीं ॥ ४ ॥ शंकरबुवा कवी हे बोले, ऐकून वैरी मनीं हे खिजले । दत्तु डिगांबर गुण गाई । नाथपदीं लीन होई ॥ ४ ॥

## लावणी

( चाल—केवळ इंद्राची परी )

पिवळ्या चाफ्याची कळी रूपवेल्हाळी । मुखचंद्र तुझा ढळढळी । बाळी बिजवर ढळढळी प्रभा वेगळी । रत्नाच्या बसावल्या वळी मोत्याची जाळी ॥ २ ॥ तुला पाहून प्राण तळमळे, जीव हळहळे, गोड शब्द काढ गुळपोळी, हासून या वेळीं ॥ ३ ॥ ( चाल बदलून ) घे शालू पैठणी जरी । अंगामधीं चोळी घाल अंजेरी ॥ ४ ॥ योजून लाख हुनेरी, पलंगी चल घेऊ निद्रा मंदिरि ॥ ५ ॥ दे अभयवचन झडकरी । आज वेळ आहे ही लाभाची पुरी ॥ ६ ॥ रत्नाची फुलें तुजवरी ओवाळून टाकीन मी प्रियकरी । (चाल पहिली) करमत गंगा गोकूळ प्रेम आंघुली । म्हणे कवी काशिनाथ साळी उमज अंतरीं ।

## लावणी रंगबाजी

( मैदाची चाल )

धन्य ईश्वरी लीला पिंड हा रचला करत्यानी । जणुं काय रंभा इंद्रभुवनी सुंदरकांता फार सुकुमार बर्त्तास लक्षणी राहाणी हिची देश दक्षिणी भार मुरदाटून गेला असे तिच्या वदनीं । रसी आले जोबन दोन्हीं उरीं । वय बारातेरा चौदापंधराची मजेदार जानी भरासी आली लिंबोनी । बुचड्यामधें घालून

केवडा वर वेणी बांधी । मोती लावले भांगी भरूनी। नवरत्नाचा घालून गळहार झुबे शोभे कानी । सरजा असे नाकी नथ ती । दोन्ही करामधीं शोभे कानने गोरख आणि दोन्ही हिरे फार चढले चौकोनी । भरजरीचा फार किमतीचा शालू नेसूनी, कंचुकी कुसुंबी घालूनी, जुन्नरप्रांती गाव शिरोली ब्रिदाचे धनी। साळी दगडुबा असे गुणी । कवी शंकर म्हणे दत्तु डिगांबर गाई प्रेमानें ।

## साकी

एची नमये स्वरूप पाहून सखीचे चित्त सूर्ये उदये उगवे । विषयवासना आवरेना। विश्वामित्रा नागवे। मित्रा काय करू कुठवर धीर धरू। मदन किती आवरू । कुठवर मित्रा सावरू । मदन किती आवरू ॥

## लावणी

फार पाळत ठेवून येता। लालूच मला दाविता । एकांति मंदिरीं नेता । करिता हाल हाल मी लहान काया कवळी कसे बसता माझ्याजवळी । काय शरीर न्याहाळून पहाता । प्रेमानें जवळ घेतां । कसे राहु राहू चुंबिता । गोरे गोरे गाल । १ । मी पडते तुमच्या पाया । कशी नाहीं तुम्हा तिळभर माया । आंगासी दाबून धरिता । शरिराचे हाल हाल करिता । हे कवळे जोबन चुरता झाले लाल लाल ॥ २ ॥ मसी माहित नसता कांहीं । करता असे हातघाई । अंगाचा होतो थरकांप । कसे दाबीता गुपचीप नाहीं घेऊ दिली झोप । मसी काल काल । मसी लागून गेला घोर । तुम्ही धरा जरासा धीर येऊ द्या भर नवतीचा आंबल काल रुतुचा । म्हणे दगडु साळी सत्तेचा होईल माल माल ॥४॥

## लावणी

का हो रुसला येथें बसला सांगा तुम्ही प्रिया मजला । रात्रीं महालीं स्वप्न पडलें। स्वप्नीं पापकर्म घडलें। प्रेम जडलें भान उडालें जागे होता वखीजला ॥ १ ॥ अंगीं फार करी मदन। मदनासी आले आधन। शर्तो करवा हेतु पुरवा तुम्हासाठीं देह झीजला ॥ २ ॥ हात जोडूनी आज करीते, घाला पदरीं चरण धरिते स्वारी सिंगीला । गुणी हरि साळी सजला ॥ ३ ॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ........ .. वि: ......
क्रमांक ... नों दि: ........

## लावणी

धीरे धीरे चमकत चाले तूं चंद्रा बावरी ॥ध्रु०॥ वदन कमळ मन नटली। दंतकलीन किती प्रगटली। नेत्र चटक नटक नवरी तूं ॥ ध्रु. ॥ बुचुड्यावरती शेश फुलमाला। जरीपदर नेसून काळा। चपळ मदन जोबन गोरिती चंद्रबावरी ॥ १ ॥ मनगटांत करति चाळा। जाता जाता मारितीस डोळा। बाजुबंद सोनेरी वेळा ती पदर सावरी। मुद्रा पाहून तनमन खुलती रती सदन कोमला। भुलवी हासत वानी बोलती गवरी ती प्रेम सुंदरी। किती शांतपण तुझ्या अंगीं चमत्कार नटली रंगी। बहुलाल गुणी वरच वरिती नेत्र बावरी।

## लावणी

( कुसुंबी चोळी चाल )

माशुक चेहेरा दिसे गुलजार। झळकती नथ गालावर। गुलती गेंद गोल छाती मधें दार। दाटला नवतीचा बहार। जशी चाफ्याची कळी अनिवार। भवया चंद्राची कोर। चटक चांदणी दिसण्यांत मनोहर। पहाताना धरवेना धीर। ग जी जी। ( चाल कटावाची ) म्हणून तुसी बोलावे वाटले। पंचप्राण हिने दाटले। समज जसे औत घोटले। हासून बोल का शरीर ताठले जी। जी। जी। ( चा. ध्रु. ) दुष्ट चांडाळा अशी नजर पापावर पापावर ठेवितां भंगला तो इंद्र दुष्टबुद्धीनें कळाहीन झाला चंद्र। देव-दानव थोर थोर हो। जी। हरामखोरा मी आहे गरती नार। जिवानें मरशील ठार ( कुटणीचें भाषण ) आईक सखे सहेली ग सांगतो जराभर। याचा मला अनुभव फार। चंद्रशईनाचे ग मन गेले रामावर। तिसी नवता भ्रतार ग। राधा गवळण ग। काय होती पोरं सोरं। गेले मन तान्ह्या बाळावर। आंबे विक्रीला बसतात हारोहार। लज्जेनी पहाती घेणार जगामदी सारा ग कारभार। हा असा आहे कनी पहा घरोघर। स्वभाव माझा बाई भीडसरू फार। सुचेना कांहीं विचार हो जी। जी। (कटाव) भ्रतार माझा फार वाईट। त्यासी बोलता जर ही गोष्ट भलती एखादी करील वाट। अब्रूचा होईल बोभाट। जी। जी कोणास न कळता बाई जाऊ पलंगावर। चला मग आटपा लवकर। हो जी। दगडुसाळी कवी पाहून बहारदार। तुरेवाल्याचा तुटे धीर जी जी।

## लावणी

काय सांगुं मित्रा सखया। हुरहुर वाटे जीवा या ॥ ध्रु० ॥ रात्रीं मज स्वप्न पडलें स्त्रीसंगें कर्म घडलें। रतीरंगी मडलें गढले। जागे होता गेले लया ॥ १ ॥ बांध्यांत पातळ लडक। बोलण्यांत शब्द कडक। जिवाला ग बसली धडक। भुकेलो मी तिसी पहाया। पाहून तिची रूपकांती। मोहित मी तन-मय चित्तीं। होईल सुख भेटीअंतीं। दाखवती आणुनीया स्वप्नींचे कायसुख। जन्मांतरींचे विन्मुख। दगडुसाळी म्हणे हा मूर्ख, काय गेला भुलुनीया ॥ ४ ॥

## लावणी

का हो रुसला इथें बसला। सांगा तुम्ही प्रीय मजला। रात्रीं महालीं स्वप्न पडलें। स्वप्नी पापकर्म घडलें। प्रेम जडलें मान उडालें। जागे होतां जीव खिचला ॥ १ ॥ अंगीं फार करी मदन। मदनासी आले आधन। शांति करवा हेतु पुरवा। तुम्हासाटीं देह झिजला ॥ २ ॥ हात जोडुनी अर्ज करिते। घाला-पदरीं चरण धरीते। स्वार सिंगाला कविरंग गेला। गुणी हरि साळी समजला ॥ ३ ॥

## लावणी

( चाल राधेसंगे बन्सीवाला )

का हो असे प्राणनाथा घाईएवढी अशी काय करिता ओढाओढी। मजसी लावू द्या कडी ॥ १ ॥ पाळण्यांत बाळासी, टाका चौघडी। टेकूं द्या खाली सगडी। काढा कळ पळघडी। वस्त्र सोडूनी का केली तनु उघडी। लज्जा नाहीं कुडीं झाली मान वाकडी ॥ ३ ॥ राहु राहू काय असे वतावडी। उठता का घडोघडी। किती ही विषय आवडी ॥ ४ ॥ साळी दगडोबाच्या तोंडीं कडोविकडी। कलगोनीं ज्ञान भडभडी। पाहून वैरी कुडकुडी।

## लावणी

[ चाल : प्रियकरा हो महाली चला ]

थाटमाट सर्व केला हो मंदिरीं चला। गाद्या गिरद्या आहे मखमलीं। जाईजुई शेवंती चमेली। परोपरीचीं फुलें आणाविलीं। हारतुरे गुंफून ठेविलीं।

चंदनपात्रें आहेत भरलीं उटी केसरी तयार केली, सुंगधीक अत्तर चांगले मिळवणी। प्रियकरा तें मी लावीते या शरिराला ॥ १ ॥ पलंगावरती आरास किती। वर जडलें मोती। त्यास रत्नाचे घोस लोंबती। जरतारी झालर कलती। आहे असें इंद्रभुवन येईल नजरेला ॥ २ ॥ रंगमहाली रंग सुढाळ चित्र काढले फार विशाल। परोपरीचे वृक्ष कोमल, राघुमोर राजहंस, कोकिळ। परोपरी तजबिरी कुशल। दशअवतारी देवाचे खेळ। राधाकृष्ण असे गोकुळ, गंगासिंधू नभमंडळ। तुम्ही जसे जणु या ठायासी सूर्य उगवता। थाटमाट केलाहो मंदिरीं चला ॥ ३ ॥ चला लावा आज सोने कसोटी। कवळा कांती अवळा पोटी। गुप्त चोळीच्या सोडा गाठी। साळी दगडोबा ज्ञानी दृष्टीं। तु खोलें करिती दृष्टीं तु खोले करिती चावरी। अखेर मूर्ख होतील कष्टी। बसतील होऊन ते हिरमुष्टी। राजहावसाची (खर कराया) कावळा आला।

## लावणी

काय सांगूं पुतळी देखणी, जशी रंभा इंद्रभुवनीं। जी जी। असे स्वरूप दिसता मन हें गेले भुलुनी जी ॥ ध्रु ॥ चाल तिची पाहुनी हर्ष बहु मनीं जी। भरजरी शालू नेसुनी चोळी फुटानी जी ॥ २ ॥ वाटे ती न्यावी सदनी आशा बहुमनी जी जी। एक बार करावी निद्रा वाटे शयनीं। मित्रा माझी एक विनंती कर जोडूनी जी जी। कर खटपट झटपट मित्रा एवढी जाऊनी जी ॥४॥ गांव शिरवळी ब्रिदाचे धनी दगडुजी गुणी जी जी। शंकरबुवाजी कवी नवी धरती जी।

## लावणी

रामसुंदरा नंदलाल। झोकु नको रे गुलाल। (झंपा)
जोडिते मी हात। कायमात सदोनीत ही।
झालेत नेम माझे लाल। झोकु नको रे गुलाल।
नेम धरुन मारी दुरून। रंग भरूनी पिचकारी।
भिजली ही चोळी माझी स्याल। झोकु नको रे
गुलाल ॥ १ ॥ सोड कर होय दूर। वाटेवरी
मस्करी, मंदिरीं तरी हरि चाल। झोकु नको रे

गुलाल ॥ २ ॥ पाहून तुसी । फार खुशी । आंत नेसी
भीतरी । दगडुजीसाळी बालुबाल । झोकु नको गुलाल ॥ ३ ॥

## लावणी

बारा वरषाची उमर जवानीचा बहार । सुंदरा उभी घाटावरती । तांब्याची कळसी हाती । नजर फिरवीती भल्याची कांता । सुकुमार दिसती । तुम्ही कुठले मुशाफर । परायी मी नार । बिलाया छाती कसी होती । जर पाहिल माझा पती होईल कोण गती । करील फजीती विचार पहा अंतीं । तुझे स्वरूप दिसे सुंदर धरवेना धीर । झाली चंचल वृत्ती । तुला पाहून वेधली मती । करावी शांती । जडूं दे प्रिती । घडू दे दासी । रावणासी राज्य महामूर असता तेथार लंकेची झाली त्याच्या माती । दिलें राज्य बिभिषणा हाती । ब्रह्मदेवाचे अक्षर नाहीं चुकणार । कशाला व्हावी शास्त्रमती । जें असेल दैवगती । करितो छाती । भोगीन एक राती । लक्ष तुझ्यावरती । गांव आमचे देश जुन्नर असे महासूर, खुद्द शिरवली आमची वस्ती । कवी दगडूजीची मती । कलगी भडकती पाहून वैरी मनी झुरती ॥

## लावणी

बचनाग सरज्या । हा । आरंभी तुरेवाला आधीकार गादीचा त्याला हो र जी र जी ॥ध्रु०॥ राघु धवशा । हा । मानभाव नांदू राल । नाना शास्त्री पाडळीला । हो । गोविंदराव शाहीर । साळी जुन्नर देशाला । म्हासूर माहीत सर्वाला । हो जी र । सभा मानवली रामचंद्र पंडिताला तशीच कुशाबा घोंगड्याला हो जी र जी ॥ १ ॥

(चाल कटावाची) जुने कवी हे फार हुषार । पुराणाहूनी शास्त्र-आधार । गान्याची ही घेती टक्कर । नाहीं फुकर कधी केली जिगर, जो हो जी ॥ (मिळवणी) आता घरोघर । हा । शिकले गाणे म्हणायला । सूर्य काय दिसेना आंधळ्याला हो जी र ॥ भाऊगुंजाळ । हा । गोविंदा थोर राजनीत लावितो सोईऱ्याचे नांवें हो जी र जी । गंगाराम साळी । हा । लक्षुमण जोशी गाण गात । जैनू फकीर अवसरींत हो जी र जी । किसन हलवाई महादू वानी पंढरींत । गेनबा खत्री सिन्नरांत । हो जी र जी । ओंकार गिरी । ही भगवानदास

फोडी तात । बाळाजी खत्री येवल्यांत हो जी र जी र ( चाल कटावाची ) बालाभोई समशु फकीर चिमणा पाटील दिवेकर नवरी मागती फाजित खोर । पडली वहान तोंडावर हो जी । (मिळवणी) गोविंदराव हा रहातो कुरुंदवाडीला । विठूजी पाटील शिरूळाला हो जी र जी । नारायणगांवीं होता लिंबाजी महार शिवा तासगांवकर हो जी ।

## लावणी

बोले हसून बसून तूं ग मैना । ह्या फुकटच्या नव्हे मेल्या चैना । देतो पैसा नारी का ग घेईना । तुझ्या आईबहिणीला का देईना । पैसे सखे चाल चाल चाल । फजीत व्हाल व्हाल व्हाल चाल सखे पलंगावरी । होय रे मेल्या दूरच्या दूरी ॥ १ ॥ चाल सखे पलंगावर । येग माझी सासु भरेल की हो राग । सखे चाल चाल चाल । फजीत व्हाल व्हाल व्हाल । माझी मजा जरासीक पघ । मला आला मुळीच तुझा राग । सखे चाल चाल चाल । फजीत व्हाल व्हाल व्हाल । चल सखे पलंगावरी । होय रे मेल्या दुरच्या दुरी ॥२॥ माशुक मुखडा पाहून मी झालो मोहित । का रे मेल्या पाठी लागला तुजवर नाहीं हेत । तुज नाही हेत । तुजवर नाही हेत । तुजवर आहे आमची सत्ता । चाल तू खोलीत थापड मारीन तोंडांत । जोबन धरीन हातात । मेल्या वपटील मातीत । सख्या सोड मजला । मी रंगमहालीं नेतें तुजला ॥ ३ ॥

## लावणी

रंभा पुतली । नार दालिंबी कळी । ही हिची नवती झळाळी आली रसुन हिच्या जवानीचा झोक मारी नयनाचा झोक हिच्या संगतीने लोक गेले कैक फसून अरे हा ॥१॥ जासी ब्राह्मणाच्या आळी, सारे खाती तुपासंगे पोळी । त्यासी करून टाळटाळी येती रसुन । धिली सराफाने ठुसी माळ पुतळयाची खासी । बोले हासून अरे हा ॥२॥ वाणी गाठिती बोळांत घालिती खारका घोळांत जाती माळयाच्या केळं खाती बसून । त्याची तगमग झाली हिने भुलथाप दिली म्हणे महाली येईल मी उद्यापासून अरे हा ॥ ३ ॥ घेऊन पैठनी साडी । ठार केला मारवाडी । हा । काढी चोळीवर खाडि रंगाऱ्यापासून घेतो पिंजारी गादी । लागला सोनार नादी । घेतले दागिने आधीपासून । अरे हा । ॥४॥

करी बागवान ताल देतो डाळींबी लाल । हा । त्यासी जाती झाल झाल । नाहीं पुसून पहात नादी लागला त्याच्या संगे वतारी दोघे झाले भिकारी ह्या रांडेपासून । अरे हा धरला दारूचा पिठा तिथें हौस किती नोटा हा । लागला कैकाला बटा ह्या रांडेपासून । पहा दलालाच्या दारी, रोज होती मारामारी । सारी कालवली नीळ गेली नासून । अरे हा ॥६॥ सोडावी बोले बोले दगडुजी गोड म्हणे सोडावी खोड । हा । यांत होईल बिघाड नाही येणार दिसून कवि काशिनाथ नाहीं फायदा यांत कांहीं शोधा मनांत ध्या ठसून । हा । ॥ ७ ॥

## लावणी

न्हान नुकतेच आले परवा । चुडा हिरवा हातामध्ये भरवा । मल्हाराची वरधी करवा । हालहाल हाल ॥ १ ॥ मोहिमेचा दिवस ठरवा । दारूगोळा भरून सर्वा । आला वैरी समोर हरवा । करा हाल हाल हाल ॥ २ ॥ गनमशीन चहूकडे फिरवा । सजूनी रस्त्यावरी मिरवा । मोका पाहून गर्दीत शिरवा । धीमे चाल चाल ॥ ३ ॥ बाराखड्या अक्षरी गिरवा । माझे उद्भवले हरवा नांव बुडी लागली कवि तरवा । चंदुलाल लाल लाल ॥ ४ ॥

## लावणी

आम्ही जुन्नरदेशीचे कवी, ठिकाणा राहतो शिरोली गांवीं । ग शब्दाचे मारिता बाण । वैरी हैराण । दरारा फार जी । कलगी सोनेरी गनित झळके डफावर पाही जी ॥ १ ॥ मित्र आमचे हैबतराव । भेटीला वर्षे झाली नऊ ग । हा । त्यावाचून झुरतो जीव । घेत म्हणे धावू । आहे का नाही जी । जीवलग असा कुठेच होणार नाही जी ॥ २ ॥ त्याची आमची बालपणाची दोस्ती । सोडीले एवढे गांव एवढी तसदी ग । हा । तें गेले उपाय आता नाहीं । पस्तावा लई झाला येऊनजी । त्यांच्या ठिकाणी हो तुम्हीच मला म्हणवुनी ठेवा जी ॥ ३ ॥ हें लुगडे पहा जरीकाठी । ह्याच्यावर चोळी आहे बाळपटी गे हा । हे ठेवा अगर तुम्ही नेसा । मागे नेंऊ कसा । लाजता कांहीं जी । हे घ्यावो याचे तुम्हास माहीत नाही जी ॥ ४ ॥ हे लुगडे कशापाई देता । पतीमाझे हौसी नाही । हा धनी असते तर माझे घरी । गोष्ट ही बरी । चिंता

नाही कांहीं जी । भावजी हो मी कांहीच घेणार नाही । जी । वहिनी हा संशय कशाचे पाई । दादा मी दोन धरिता कांहीं गे । हा । भाऊ नांव ठेवतील मला । आला तसा गेला जाईल मग नाव जी। जाऊ का राहु । उदईक वाटेला लावू जी ॥६॥ मग जाऊ का राहू वहिनी आंदेशा लावी जी । कवि दगडु म्हणे अशा ठका मुळीच संबंध ठेवू नका । अशी संगती धरता धोका अब्रुला संशय नाहीं जी ॥ म्हणे सदाशिव गे लुच्चाशी पैज दावी जी ॥ ७ ॥

## लावणी

पुरुषः—तुजवर आमची मर्जी फिरली,
तुझ्या मनांत का येत नाही ॥ १ ॥
स्त्रीः—कोण देशीचा नाही ओळखिचा
काय पत लावतो ग बाई ॥
पुरुषः—माल असल्यावर गिऱ्हाइक यायला
ओळख लागत नाही ॥
स्त्रीः—द्रौपदीपायी कित्येक मेले दुर्योधनाचे झाले कांही ॥
पुरुषः—त्या इंद्रावतीने हरिपण केला.
कृष्णानें भोगिली की नाही ॥
स्त्रीः—देवादिकांचे देता दाखले त्यांची बरोबरी होणार नाही ॥
पुरुषः—देवदेही मधें तुला सांगतो कलियुगांत आहे कुठे आहे कांही ॥
स्त्रीः—दगडुसाळी म्हणे सिरोलीवाला मूर्खाला सांगून होते कांही ॥

## गौळण

उठा बाई करा घाई । बाजार मथुरापुरा । सरली रात्र झोप मात्र डोळयाला धुंदी । सदा कदा तुम्ही आसी लाविता रुंदी लांब पल्ला तो दूरचा । बाजारा मथुरापूरचा । १ । कृष्ण हाटेला उभा वाटेला । येईल आडवा । गुरे राखी पोरे घेऊन करील तिडवा । वेठी सर्वांच्या वरचा बाजार ॥२॥ होईल ते पाहू चल ग जाऊ जिखू या मेंधा । **गुणी हरीभाऊ** साळी कविचा झेंडा दास सदगुरू घरचा बाजार ॥३॥

## गौळण

सारे सांग उघड बोल घडघड घड जरा मुरलीधरा असली ही तऱ्हा तुम्ही मुरलीधरा घेतोसी आम्हावरी भलते आळ ॥ ध्रु० ॥

गेले भासूनी घेते घासूनी दशा सोसून वाकूव, तुला सदा आनंद सासुनंदना दडधरती कुळ । इथ रहावे किंवा जावे मात्र भवली मुकले गोकूळ भवली दोस्ती पक्के भरते अंगी खुळ खरे सांग ॥ १ ॥ नंदा घरचा मी दास असूनी आली धंद्याला बुड येसी आडवा करिसी चिवडा भारी स्वभाव हूड । घडी घटका तडी तांतडी आंतरीचे गूढ । घरभेद्या आमचा साधला सूड । खरे सांग ॥ २ ॥ वाग जपुनी आहे टपुनी तुझा मथुरेंत काळ । नको फेडू पारणे लोभा कारणें तुटेना मायाजाळ । नंदानंदनगोपी वंदन करी गोपाळ गुणी हरिभाऊ गुण गाऊ र जी तिन्ही ताल, खरे सांग उघड बोल ॥ ३ ॥

## गौळण

तुमतनाना मुरली काना भरली अंतरीं गोड गोड ॥ध्रु०॥ सुख सदनजो मूर्तिमदनजो । वदन दावित केव्हां । पाटील जेव्हां होईल तेव्हां । शांती ह्या जिवा । कधी पाहील नयनी होईल शयनी सांगा कशी करू तोड तोड तोड ॥ १ ॥ पावा वाजवुनी थत्रा जमवूनी दवदवा फिरतो । फिराफिरूनी आले दुरूनी नाहीं । नाहीं मुरली धरितो । कुणी धावाग धावा । घेऊन राधीका जोडजोडजोड ॥ २ ॥ दिसतो बालक मोठा चालक जग पालक करता । दुष्ट मारूनी मामा तारूनी अवतारी पुरता गुणी हरी साळी झेला कवी आला वेला ह्या अंगांत राहील नोड नोड नोड ॥ ३ ॥

## गौळण

कृष्ण हटेला, उभा वाटेला । रस्त्यांत येऊन धरितो ॥ हा ॥ दहिदुध लोणी । पिऊनशानी मस्करी आमची हा करितो ॥ ध्रु० ॥

बैसोनी न्हात होते न्हाणींत सामोरा येऊन बसतो ॥ हा ॥ नग्न निघाल्या घरासी आल्या नवरा रागे हा भरतो ॥ ध्रु० ॥
सासु मजला मारी । दुरूनच गंमत पहातो । सांगू लागली मजला बाई खुद-

कनी गालांत हा हासतो ॥ ध्रु० ॥ केस धरूनी निरी फेडूनी वनांत जाऊनी बसतो हा । रूप वेगळे करून आगळे सोडून आम्हाला हा जातो । कवि-दगडूजी मस्तक चरणी सावळा बाबु गुण गातो हा । नवीनच चुटका । आश्रुत घुटका । प्रेमानें मुखांत हा घेतो ।

## गौळण

चाल नेसून या लाल ( हरिगुणी साळी )

नित्य उठुनी असा हा नखरा । वेळ झाली वाजले आकरा । नित्य उठूनी नेहमी प्रमाणे गोठा झाडुनी, गाया म्हशीच्या धारा काढूनी नरमगरम जेवाया वाढू । आले मम प्रियकरा नित्य उठूनी ॥ १ ॥ सासुसासरे यकले दोन्ही, घरांत नाहीं तिसरे कोणी । तुळशिला घालून पाणी । म्हणे एवढे काम आवरा, नित्य उठूनी चला त्रास होईल उन्हाचा । आज आहे बाजार सणाचा । साळी हरि भाऊच्या गुणाचा । रोख भाव करू आज विकरा ॥

## गौळण

[ चाल; देवकाहो विटेवर उभा ]

रीत नाही हारी तुझी बरी, काय ही थट्टा देवकी घट्टा । तुझ्या संगती बटा । मारून पिचकारी कोरवट साडी लाल लाल सारी । रीत नाही वाईट कृष्णा खोड तुझी अशी । विखारी नागीण सासु जसी । कळेल नवऱ्यासी गती मग कशी । करील तो पुरीपुरी । रीत नाही । मंजुळ नाद ऐकूनी कानी । वेड्या केल्या गोकुळच्या गौळणी । तुझ्या ध्यानी मनी । संसारा पाणी पडेल गिरधारी धारी धारी रीत नाही बरी । आंत बाहेर हरि तू बिंबला । सर्व ठिकाणी भरून उरली जागा तुझी श्रीरंगा भक्ताचे घरी रीत नाही. कवि दगडु लीन तुझ्यापाया । दया तूं करी पंढरीराया हे पंचप्राण । हरि तूची जाण । नित नांदे दशवेद्वारी द्वारी ॥ रीत नाही ॥

## गौळण

यदुकुलतिलका विश्वपालका सांगून रूप सुंदरा हरि । येता जाता रस्ता धरिता । जबरीच करिता आम्हावरी ॥ ध्रु० ॥ सासुरवासी आम्ही रुषीकेशी त्रास

....८

घरीं । जे जे तुमच्या भेटीस आले फाजित झाले परोपरी । आम्ही गवळणी चक्रपाणी तुसी पुरवलो बरोबरी ज्यानें धरला निरमळी रस्ता ते आचवले बघवघ हरी जे आडरानीं शिरले कोणी । तेच पुरतील जन्मभरी । म्हणे दगडुजी भेट तुझी ही घात करील खरोखरी । दृष्टीच राहावे दर्शन घ्यावे ते नच होऊ धनवंतरी ।

## गौळण

नंद्राचा काना घाली धिंगाणा, अडवितो राना वाट धरी ॥ ध्रु० ॥ कुठवर याचा सोसावा त्रास भलतीच कारणी करी हरी । वदन चुंबितो गेंदहि चुरितो सांगता येईना घरीं घरीं ॥ १ ॥ सोडुनी गाई आला घाई घाई बळकट येऊनी धरी निरी । वस्त्र आसडले नग्नच केलें दोन प्रहरच्या भरी । ॥ २ ॥ वाटू लागली मला बाई लज्जा कुठवरी यासी घालु सजा । वेळी अवेळी गाठ पडली मानच लचकली सारी सारी ॥३॥ दगडुसाळी म्हणे या वेळी गौळण झाली घाबरी । भारी श्रीहरिपाई ठेवून डोई । कवि काशीनाथ कवन करी ।

## गौळण

असा कसा हरि तुझा ग बाई । रात्री मंदिरी सामसूम सारी । बाई घरधनी शेजारी माझ्या बाई । दाढीवेणी धरी माझी ग बाई । गांठ दिली ब्रह्मादिका न सुट करणी करून पळे हरि तुझा ग बाई ॥२॥ व्याही जावई शेजारी माझे ग बाई हाट मी म्हणे सोडी तो म्हणे सोडी ओढाओढी माझी सारी ग बाई । जळत जळेना तुटत तुटेना मरणच खरोखरी माझे ग बाई ॥४॥ न्हात होते परसदारी अवचित आला कृष्ण मुरारी केली माझी मस्करी ग बाई । जाऊं नाहीं का बाजारी त्याच्या भितीने । दगडु साळी म्हणे सांग कांहीं तरी त्रास होतो आम्हा भारी ।

## छक्कड

रत्नसागरा माझ्या प्रेमवीरा आले शरण मी, धरिले चरण मी, माझे प्रीय-करा । तुम्ही हो प्रेमी माझे म्हणूनी झाले का बेईमान । मी झुरूनी मरते अवरुला भीते । माझे गुणीवरा ॥१॥ स्वप्नी तुमचा भास झाला । हस्तकी

धरूनी महालीं नेला । मी जागी होते दचकुनी उठले प्रेमपाखरा ॥२॥ पुरे हा नाद सोडा ना । दत्तुसाळी कविघरचा बाणा । तुरेवाले डरतीं । फर्जात पडती असेच मनीं झुरा ॥३॥

## छक्कड

( चाल—कांही बोलाना सरळ, )

नका प्रिया बोल्ल तुटून घ्यावां माझी नवती लुटून लुटून ॥ध्रु०॥ सोडा सोडा राग सारा तुम्हाविण नाहीं थारा । अशा वेळीं तारा मारा । मती गती गेली खुंटून ॥ १ ॥ मनमच्छर तो ताप मदांध घडे पाप । विलोकिता थरकाप । किती पाहू उठून ॥२॥ कोणाला हें दुःख दाऊ । सांगा किती कष्टी होऊं । कवि गुणी हरिभाऊ शास्त्र आस्त्र दावा सुटून । नवती लुटून ॥ ३ ॥

## छक्कड

कळ बळे का काढिता पतिव्रतेची ॥ ध्रु ॥ देऊन आशा लाविता नव्हे मी तसली वेश्या । वेश्या पाहून कर जा भाषा । नाहीं माझ्या कामाची ॥ १ ॥ मोहनापायी बटाव मेला भस्मासुर भस्म झाला । भगे पडली त्या इंद्राला ही नजर पापाची ॥ २ ॥ कौरवाने द्रौपदी छळली । दाढी रावणाची जळली । खाक जळून लंकेची सगळी असून सोन्याची ॥ ३ ॥ का हो पापाची भरती । नजर ठेविता परस्त्रीवरती । कवि साळी दगडोबाची भक्ती शक्तीची ॥ ४ ॥

—:०:—

## पद–भेदीक मदनाचे

आईक कवि त्या तुला सांगतो पुरुषाचा मदन । कोने वेळेवर कितीक झूक शास्त्राची खुण ॥ ध्रु० ॥ स्त्री–पुरुषाचा संभोग झाला आनंद चित्तांत । तिच्या पोटीं पुत्र जन्मला बहू गुणीवंत । तीन वरषे गेली खेळतां ऐका पंडित । पांच वर्षामधीं सगुन गुणीवंत होत । पांच, दोन, सात धातुची काया गुणीवंत । आठवे वर्षीं आष्ट पाकुवका पडविली भ्रांत । नवे वर्षीं नवद्वारासीं बसविली जप्त । दहावे वर्षीं अन्नापासून मदन उद्‌भवत । अकरावे वर्षीं वाढल नाशिक द्वारे आला मदन । द्वादश वर्षे भरता हृदयीं बसला येऊन ॥ १ ॥ मुरमाच्या फुटकळ्या संग गेला रती रती । पाहा पोराच्या गरसा चाफून बसला दशग्रंथी । बारान् बारा चोवीस । भरपंचवीसी भर नवती । तो नर पडला पार जिरला चीक अंगाप्रती । कोणे एके दिवशीं भोग घ्यावया गेला अस्तुरीप्रती । तिथ मदनांनी उपट घेतली लाळ्जी उसळती । लालुजीनें मार्ग सकळ पहा शास्त्ररिती । तिथे पुरुषाचा मदन सरला तीन मासे गनती । गुंजा एकशें तीस पाचा हाजाराची गणती । सहाशे सत्तर त्याहि मोजून पाहे प्रचिती । नवसे तोळे तीन शेर उरला । बहात्तर प्रमाण । शंभर वर्षांत साडे सातशेर पाझरला मदन ॥ २ ॥ शंभर वर्षांची तुला सांगितली बेरीज । पुढें मदनाची काय अवस्था सांग कविराज । शेंबुड खाकरा नव्हे गणतीला पुरानी पाहे वग । घाम म्हणजे मीठ पाझरले देहीमंदी उमज । विराखतीं संगे किती मदन गेला पुसले सहज । धातु संगे तीन मासे उतरला आईकावी मऊज । आवस-पुनवेचा कुठे मदन घे मुदत मागून । सांगितल्या वांचून गान गाशील वैश्यावर वाहान ॥ ३ ॥ स्त्री–पुरुषाचा मदन तुला सांगितला कविराया । मुख्य मदन कोणाच्या रेताचा, सांग मूळ पाया । त्रिभुवनामधीं वाटून धीला किती कोन्या ग याचा ठिकाणा लावा । कृष्णा राणू म्हणे । घे मुदत मागून, कळल आज तुझं शहाणपण ॥ ॥ ४ ॥

## वाघाचा उत्तर-पद

नीरगुणांतून आला दरवेसी कावा करी कसा । वजच घातला तुझ्या वाघाला मायेचा फासा ॥ ध्रु० ॥ वाघाची पृच्छा पुसली गान्हार दिसला लोकाला । सुन्या घरी दिले वान फार मानवती झोकला । सारे शिकारे जमला,

नाहीं अक्कल येकाला । नाहीं परीक्षा कोणाला दुधच म्हणता ताकाला । भेद सांगतो आईकं तुझ्या वाघाचा निकाला । तुझ्या प्रश्नाचा करुन दावितो सभेमंदी निकाला । शास्त्र आधारी गान गाव काय तानून घसा । बटव्यामंदी गारा म्हणता पैशाचा कसा ॥१॥ भले भले पंडित बसला येऊन सभेंत । वाघाची बाडिजाव सांगता मोठा पुरुषार्थ । तुमच्या प्रश्नाची फार वाटली लोकाला मात । तुम्ही पुसला वाघ सांगतो ऐक निश्चित । ब्रह्मांडाची रचना सारी तीच पिंडांत । पिंडी तेंच ब्रह्मांडीं, ऐसें शास्त्र बोलत । नका करु गलबला कवि थोर जरा बसा । शास्त्र आधारी उत्तर देतो घे ऐकून खासा ॥ २ ॥ नीरगुनांतून आला दरवेसी वाघ धराया । अनंत रूप अनंत कला त्याची मोहोमाया । मायाच्या फाश्यांत गुंतला नाहीं जागा बोलाया । विषयाचा केला सापळा वाघ कोंडाया । प्रपंच्याचा साकळदंड हा घाला गळ्यांत घालाया । शिकाऱ्याला बसला धसका सनमुख ये असा । तुझा वाघाचा उतार देतो पदरामंदी घे असा ॥३ ॥ शास्त्र आधारी भांडनाचा नका मानु राग । मनव्याघ्र तुला सांगतो हरिविजयामंदी बघ । बाराव्या आध्यायामंधी कथा जाऊन पघ । मन चंचल तुला सांगतों सर्वांच्या माग । धोंडी साळी कवन करी आणि शास्त्राचा वग । दगडू करी गर्जना सीकारे सभेंत खाली पघ । वाळा लक्ष्मण गाती सभेमंदी जोडीन दोघं ॥ ४ ॥

## ( पद–मोर व मोरनीचे )

सोहं, निजबीज मोर पाहिला तुझ्या मोरानीच्या मोर वरता । आणूरेणू आदी करून भरला उरला गुरुग्रही पहा पुरता ॥ ध्रु०॥ सोहं, मोराला पांच देह आणिक देह पांच असती । दशरंगी दश चोची मोराला आकरावी चोच भुईवरती । चहू प्रकार चार वाच्याचा आतुर वाचा, पाचवी वर दिसती । अनंत डोळे किंचित् दृष्टी समसमान नाहीं कमजास्ती । सहस्र करून सोहं मोराला दमनाद भिन भिन प्रकाशती । छत्तीस चरण आष्ट आंग त्रिगूण नरवीगून विकासती । बावन पखाड रंग रगाची सहस्र डोळे वर ठसती । अनंत ब्रह्मांडे ज्याचे रोम आंगी विश्व जिवाचा आहे करता । यवगा यवगाचे ठाई नटला करणी करून आकरता ॥ १ ॥ सोहं मनीज बीज मोर पहाता दृष्टी दिसे सगून । सगून म्हणता गुरुकृपेने पाहु जाता मोर निरगुन ।

आणुरेणु त्या परीस सूक्ष्म ज्ञानदृष्टी घे पघुन। द्वैत सोडून कर गुरुसेवा लीन होई चरणीं लागुन। गुरुकृपेवीण प्राप्ती नाहीं आदी-अंत याचा मागून। गुरुपुत्राला खुनही ठावे निगुऱ्याला काय सांगून। अनंत ब्रह्मांडे रोम अंगी विश्व जीवाचा आहे करता। योगायोगाचे ठाई नटला करनी करून आकरता ॥ २ ॥ सप्त पाताळीं येकवीस स्वर्गावर त्रिकुटचळीं तो बसला। चार देह, स्थूळ, सूक्ष्म कारन, महाकारन तोरही वासला। अति कारण मसुरे-प्रमाण नळबिंदू तीर्थ पूर्ण दिसला। नळबिंदू चैतन्यरूप संतस्वरूपी तो ठसला। कोटी सूर्याचा प्रकाश दिला अंगी त्याच्या प्रकाशला। चवशून्याचे माझा झळकतो प्रकाश त्याचा आहे तसला। अनंत ब्रह्मांडे ज्याचे रोमआंगी विश्व जिवाचा आहे करता। युगायुगाचे ठाई नटला करणी करून आकरता ॥ ३ ॥ मोरमोरानी एक रूप दोहीचा भाग एक वळखावा। त्याला पाहून मग न हसावे, भिन्नभिन्न न लेखावा। जन्मा आल्याचे सार्थक आपला हितार्थ न राखावा। खातू सर्व खोटं याचे मागे न लागावा। नाथ वृधाईक धोंडीबा साळी म्हणे मोर सांग आज गुह्य आथी। कोंडीभाऊ, रूपा गवंढी चढला काळ तुझ्या उरावरती ॥

## पद—गुरुभेदाचे

तुझा गुरु तुझपासी। त्यान तुला दावली कासी। मग का भटकतोस वाद घालतोस लोकासी ॥ ६५० ॥ ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगसी। धरून अभिमान। नाहीं तुला प्रचिती उगाच का हलवितो मान। ज्ञानाची हाटवटी जाणावी बरमावरमान। चाण्डलीनी मुकती करती पोकळ थैमान। दीड लावणी येईना। दोनच बोटं उरलं आसमान। आंधळ्याला काय कळले आला गेला दिनमान। नाहीं ज्ञानप्रचिती वोलती भरमाभरमान। माये भ्रांतीमंदी पडला। त्याच काय मानाव प्रमाण। उपजत जें पांगुळ तें कस चढल आकाशीं। जातीचा मोळक्या कधी भोगी सुकवासी ॥ १ ॥ ज्ञानाच्या कळा काय जातीच्या गवत्याला। खरं किंवा खोटं पुसा तुम्ही श्रेष्ठ करत्याला। इष्टाचा भक्षक काय करील मोत्याला। मुक्ताफळाचा चारा हावसेचा शोभे ज्याचे त्याला। पितांबर लेने कधी ना शोभे भुत्याला। इशारत राहाण्याला टोणपा काय आडगात्याला। केर भरता येईना। सुदा वईरन का घालील जात्याला। ज्ञानाचें घर खोल।

हात बळें घालीता इस्त्याला । मनास वाटेल तसे जानतू सांगसी लोकासी । खरं किंवा खोटं याची कोणी पाहिना चवकशी ।। २ ।।

आत्मज्ञानाची हातवटी वेगळीच आहे आत्मखून । गुरुकृपेनें निज वस्तू तुम्ही घ्यावी पारखून । ज्याला वस्तूची प्राप्ती नाही मगन होती देखून । स्वस्थसमाधान वृत्ती राहे स्वरूपाला निरगून । ब्रह्मरूप तो प्राणी राहे स्थीर मन राखून । समसमान सर्व भूती भेदभावना लेखून । मछमम आंगी गमन करी राहे अमृत चाखून । आउटपीट गोल्हाट ब्रह्मरंध्री नीळ बिंदू खूण । चवशून्याचे माथा वस्तु जशी टिक मानीमानीकाची । चैतन्याचा गाभा पुतळी जनु वतली कनकाची ।। ३ ।। असी खुन जे जानी ते उत्तम गती पावती । सर्वा भूती समसमान लेखी करी राहे आद्वईत भक्ती । शत्रुमित्र त्याला सारखे ततसमान सक्ती । सगुनानिरगुन एक हरि सत्य कारी अद्वईत भक्ती। निरगुण्याला कांहीं येइना मार्ग त्याचा बोले नुक्ती । धोंडी साळी म्हणे शिका रे काय ज्ञानाच्या युक्ती । कोंडाजी पाहून गुणाला । वैरी कीनावनी मुरती । रूपसनी गुण म्हणे ज्ञान काय सांगून भवाळासी । दगडू साळी म्हणे वोकड मुळीच अपेशी ।। ४ ।।

११९६८

## पद—भेदीक

ज्यान यावा त्यान पुसावा भनभन झाली सारी। जातो येतो पुसाया उठतो म्हणे मीच आहे भारी ।।ध्रु०।। थीर बसा कोविदजन थोडीसा प्रश्न आणी ध्यानी । गवईपण हा नाहीं कामाचा नव्हे पोकळ कथनी । येकीरी रतीचे उह घालणार गान्हार भुकती सभारंगनी । ज्यान उठाव त्यान रतीरंग तो लुनगाव जनी । ( चाल ) तुझा प्रश्न ऐकून जरा बुद प्रश्नावर जुनी । जातो येतो पुसतो कुठ कांहीं हो त्या गाई दावनीं । नवते कुठच कोणी असे बोलता वदनी । नवते पवनपाणी वडपत्रीं ही कोणी । नवती छाया माया असें बोलता पुरानी । तेव्हा तुम्ही गान्हार केवढे होता सांगा सभारंगनी । धुमधुमकार बोलता ध्व अक्षरीं माया हेरी । आधी आनाधी वढी रेघ वर अक्षर आकार धरी ।। १ ।। यान पुसाव कुठून सांगावा बोलतो आम्हाला । पोकाळशुन्य म्हणतो निगुन्यानें अर्थ काढीला । भरेवशुन्य असता रिता कसा ग वयान धरला । आत भगवान गाभ आत झाल माया बिंबला । ती स्वहींम दोनी वस्तु होते भरेव सुन्यधर । धुमधुमकार भरे व आसता गीत धरिता सार । निरगुन म्हणा यानी अक्षर

तीनच केल मोहर। मा अक्षर परिमा त्या याला तिच्याच रुपीमुर। येकु नराच्या आंगी रंगी रंगून गेली हर। तुम्ही आम्ही बोलतो देवाची माया आगुचर। तुम्ही म्हणाल इच्छाशक्ती ही आली कडेधर। तिच्याच भेने उडी टाकली बुरबुडे आले वर। जी भगवंताची योगमाया तिला नाहीं वर। तिला शक्ती तुम्ही म्हणविता लबाड कवीश्वर। त्या मायेची आदी सांगतो झुरे तुझी काविश्वरा।

ज्याची त्याला माव ठाव तुम्ही आम्ही लबाड सारी। बोलाया नाहीं ठाव असे सभेंत बोलता। मौन्य राहाते कशास गांव घ्यावें आता ऐकून। ज्याला एक वस्तू लाधली त्यालाच योगी म्हणतात। इतकी समजुत असता मग का आदमुळ काढीता। ( चाल ) ज्याला नावाच–नाहीं–त्याच नांव काय घ्याव। ज्याला रुपच नाहीं आरुप कुठसे पहाव। या शब्दाचा घडला मला आणुभव। वाचा नाहीं मग आर्जुनास दावी माय। वाचा नाहीं तिथें शब्द कैचा। हेत धरी। मग काय गाता गान मुकाट्याने जा आपल्या घरीं ॥ ३ ॥ यान पुसल कुठून सांगाव असा जाब केला। सांगायासी नाहीं ठिकान येऊन पहातो सभेला। येवढ्या सभेमंदी मुका राहे नाहीं ठाव बोलायाला। इतकी समजूत असता मग का उठला गायाला। आता जस बोलाव तस चालाव पुरानिक गाही। माया परमेश्वर तीळप्राय भिन्न भेद नाहीं। तुम्ही आम्ही लबाड म्हणूनी निवड करितो कवी। नाथाचा बृधाईक धोंडी साळी आनभावी। कटीबंद छंदभेद वैऱ्यावर गाई। रूपा मनी राम म्हणे आम्ही शक्तिचे शिपाई। खंडू बापू म्हणे शिका रे धरून कोंडाई। शीब्रात आली शाफ कीर भीडे सभारंगनी बहिरी। फकिराच्या दडप्यान गईरी झाली घाबरी ॥ ४ ॥

## द्रौपदीचा सहा भ्रताराचा

हर हर हर सांब सदाशिव शिवपुत्र बोले। पांच पांडव साहावी द्रौपदी सीवच अवतरले। हे मवती रायाची कन्या पारवती पहाता। काय दृष्टी देखिले चळींत्र मातोळीस जाता। ऐक गवतमी पांच वृषभ पाश्चिमेस येता। गदगदगद हासू लागली दक्षाची दुहिता। जीग जीग तुझे जीने तुला का पाच पती वदले। कोन जन्मी पाप फेडसीऽगिरजीसी निवेदीले। तू शिवाची कांता भवानी दक्षाची लेक। काय निमित्त पाहून हासली मजकडे

आईक । तुजला असे पांच भोगने मानवलोक । कल्पांतीं हें खोटें होइना, घे वचन भाक । सद्गत होउन बोले पारवती कसे देवा केले । मी अती अपराधी अन्याई ह्या दोषी पडले ॥ २ ॥ जन्मोजन्मीचा भ्रतार माझा हा चंद्रमौळी । आरुपते रुपासी आले तैपासून जवळी । आता देवा काय करावे म्हणून तळमळी । पाच भ्रतार आले भोगणें माझ्या कपाळीं । का वेहती जगदंबे आंबे म्हणूनी प्रश्न केले । तुझ्यासाठी धरीन अवतार पूर्वीच भोगले ॥ ३ ॥ पारवतीचा दोष शिवानें दूर करायासी । पाच मंत्रचे उजून ठेवले कश्यपापाशी । देव आसवीनी राजा इंद्र वामेवासी कशेपरुषीनी तेच मंत्र दिले व्यासासी । तेच मंत्र फिराफिरत व्यासापासी आले । व्यासरुषीने ते मंत्र कुंतीला धीले ॥ आश्वीनीचा नकुळ सहदेव यमाचा धर्म । इंद्राचा होइ अर्जुन वायुचा बलभीम । पारवतीची झाली द्रौपती खरा हाच जन्म । मुळीच सहावा भ्रतार शिव तुम्ही ध्यावा ऐकून । काशीखंड ग्रंथ याचे पहावे दाखले । कवि हायबती म्हणे लग्न तुला शिवाचे पुसले ॥ ५ ॥

## शिवनामाचा प्रश्न

निराकार निराकार म्हणता निराकार काई अरे । पंडिता ज्ञानसागरा ऐक चतुराई । नवती जमीन आसमान पाणी पवनाचा ठिकान नाहीं । ब्रह्माविष्णु शंकर हें रूप कुठे सांगाई । अनाम ज्याला नाम नाहीं कसले बोलाई । आरूप तेथें रूपच नाहीं बोलतोस काई । कोणच्या गुरूचा शिष्य कोणी मांडीवर घेत नाई । गुराख्या मुला तुला याची वळख नाहीं । अठरा पुराणें कोणकोणती दे याची गाही । ( चाल ) अनाम ज्याला नामच सिवनाम ते कांहीं । अलक्ष वस्तू लक्ष नाहीं शिवनाम ते काई । आरूप आहे रूप नाहीं शिवनाम तें कांहीं । आचल वस्तु चळत नाहीं शिवनाम ते काई । जिला आहार निद्रा नाहीं, सिवनाम तें काई । काय शिवाचें नाम सांग पाहू तुझी चतुराई । धांतद तिला वळख दाखवा शिव आमचा हाई ।

## पद–भेदीक

भावभक्तीचे भुशान सांगता, नाहीं अंतीं ज्ञान । ज्ञानावाचून व्यर्थ जन्म पशुसमान ॥ ध्रु० ॥ भावभक्तीचे भुशान । सांगसी धरून अभिमान । नाहीं ज्ञानप्रचीती उगाच का हलविसी मान । ज्याला नाहीं ज्ञान तें एक मूर्ख

म्हणावें असान । ज्ञानाची व्हावी प्राप्ति म्हणून केलें शास्त्रपुराण । ( चाल ) भाव म्हणजे ज्ञानापासून । आती पाहे कसून । गुरूला ये पुसून । मार्ग नाहीं ठाव । आंधळ्याला सूर्य काय दिसेल । ज्ञान जर असल । भाव मग बसल । पावल मग देव । पुंडलिकासी नवते ज्ञान । होता अज्ञान । वायकूच म्हणे काशीला न्याव । कुर कुठ ज्ञानी पुरता । उपदेश हेरा । गेला त्याच्या घरा । बसला मग भाव । पुंडलिकासी मग उपदेश केला ऐका कुर कुठाण । झाले जन्माचे सार्थक भेटला विठ्ठलनिदान ॥ १ ॥ अति पातकी वाल्ह्या कोळी म्हणती हो त्याला । सात रांजन खडे भरले, मारी ब्राह्मणाला । त्रिलोकाचे गमन असें कळलें नारदाला । ( चाल ) नारदासी तेव्हा पाहून । आला धावुन । टोनपा घेउन । उभा राहीला । नारद करी भाषण । महा दोषन । बुडल अज्ञान । असा पातकी नाहीं पाहिला । नारद ज्ञान त्यासी करी । जाय तू घरीं । पाप अधिकारी । कोन होईल आशा बाहिला । वाल्मीक घरासी गेला । पुसुनी आला । म्हणे नारदाला । तारा कांहीं मला । वालमिकासी उपदेश केला ऐका नारदान । वाल्ह्या कोळ्याचा वाल्मिकी झाला उलट्या नामान ॥ २ ॥

नामदेवाचा मोठा भाव पहा देवापासी । साक्षात भाषन करी देव त्यासी । पुढें ऐका साधु जमले कोणे एके दिवशीं । आटुकाट भक्त बसले तेव्हां कीर्तनासी । ( चाल ) गोरा कुंभार त्याचें नांव । म्हणे ज्ञानदेव । कच्चंपक्कं पहावं । वसलों सारे । गोरुबा डोकींत मारी । पाहिली सारी । आली मग बारी । नामदेवावर । गोरुबा तेव्हां बोलला । गुरु नाहीं याला । नामदेवाला । कच्चा हा फार । नामदेव खजील झाला । देवाप गेला । पश्चात्ताप केला । बसला मोहर ॥ नामदेवासी देव म्हणे जा खेचरीसी शरण । तो सांगेल ज्ञान तुजला । तुजें चुकवील जन्ममरण । ३ ॥ भावभक्तीच्या गोष्टी सांगता घेता तीनदा नांव । पंचवटीमंदीं जपीं तपीं धरून बसलें भाव । आलं गंगेला पाणी, मग का त्यांनी वाहून जावं । त्याच्यासाठीं कुठं आला सांगा तिथें देव । एकनिष्ठ धरून त्यानं आरजीवला देव । ( चाल ) भाव म्हणजे तुझा वरदाळ पोटांत कळ । गळ्यामंदीं माळ । राहाती मैदाला । ज्ञान म्हणजे तुला काय ठाव । रांजनीत राहाव । गुरू मानभाव । कश्याला केला । ज्ञान माहित नाहीं तुम्हांला । पुसता आम्हांला । सांगतों तुला । होई आज चेला ।

थोडी साळी म्हणे माहित नाहीं तुला ज्ञानाची खुण। बाळा लक्ष्मणा म्हणे पाहे शास्त्र शोधून ॥ ४ ॥

## पद–निशाणाची झडती

आदशक्ती स्वारी झडती किता पुरानाची। लावून डफावर वीर झडती देतो निशाणाची। ध्रु० ॥ निराकार निरगुन आविनास उत्तम पुरुष तो जान। पांच तव ज्याचे अंगीं पंच रंगाचें निशान। चैतन्याचा पिवळा बाना भडके निशान। निळा रंग निशान प्रेम विष्णूचे गावन। भगवा बाना विष्णु बहिरवशा भगवान। क्षीरसागरीं महाविष्णुचें हिरवें निशान। सफेत ढवळा बाणा विष्णु वैकुंठी निधान। चौऱ्याशी बुटाची निशान तोच तुरा नवीन। आरक्त निशान त्या इंद्राचे द्वादश तो चतुरानईन। छत्तीस क्षमनी तेरा कोटी पिवळी निशान। सावध होई शाहीरा, निशान झाली आठरा पुराणांचीं। पुढें राहिली ती सांगतो दाही अवतारांची।१॥ मच्छ अवतार विश्वंभर विष्णु मच्छ अवतार। वऱ्हाव तो शंकर क्षयनी नरसिंह अवतार। वैकुंठी विष्णु वामन सदाशिव तो फरशधर। विष्णु बहिरवतो रघुपति कृष्ण करतार। बौद्ध अवतार तो ब्रह्म ऐका कलंकी अवतार। उत्तम पुरुष प्रेम विष्णूचे तिन्हीं अंकुर। तीन्हीं एक समेस झाली तोच कलंकी अवतार। एकुनीस निशाण सांगितली याचा तर्क धर। तेच निशाण चौथे वगामंदी दाही अवतार। चंद्रसूर्याचे लाल निशाण। याचा शोध धर। काळी निळी सफेत निशान चोवीस मेघांची। पहा गणती पुराणांत झडती साठकोटींची ॥ २ ॥ हिरवें निशान वायळचे नागबंद सोमवंशी। तीस हजार निशान कौरवांची। सहा हजार निशान दलामंदी पांची पांडवांची। कौरवांत आली नशा नाशा हा नवकुळीची। सफेत, लाल, पिवळें, बांडें, काळ्या रंगाची। देवदानवांची झाली आतां राहिली मानवांची। राजपेशवे ऐका त्याला पदवी शंभाची। घे समजून तूं सोड कल्पना अवघी मनाची। शिंदे होळकर घोरपडे निंबाळकर मानकरी त्यांची त्यांची निशाण। पाहिली पुराणांत सांगितली साची। देवदानवांत निशान कर्मभूमीची। चवऱ्याशी क्रोड आली गणतीला बेरीज अवघ्यांची ॥ ३ ॥ अभंग अंबर पाया पक्का गुरुनाथ सवाई। खंडु हयबतीसी वेहत पळे मानभावी। एवयाशीं करोड सव्वा लक्ष निशान अवघी ऐकावी। नेरे नेरे रंग धिले तुला सांगून कवि। आदशक्तिचें देणें बक्षीस ऐकुन घे भाई। जरी-

पटक्याचा झोक पिवळा बाना सवाई । त्याप्रमाणें झडती निशाणाची तुम्हीं पदरीं घ्यावी । धोंडी साळी म्हणे गावना आज सावध होई । सिद्धांत आलीशा म्हणे तुरा गाहान ठेवी । सोड गान ये शरण काळं तोंड तुझे पाही । नव्हे फुकाची कवि वेळ आली अब्रु जायाची । थोडक्यांत चव ओळखावी धरावी वाट घराची ॥ ४ ॥

## श्रीगुरुशिष्यांचें पद

बोट लावूनी दावा स्वामी कोणती निज वस्त । फेडा संशय मनाचा मस्तकीं ठेवा कृपाहस्त ॥ ध्रु० ॥ तनमनधनस्य आनने भावे आलो तुम्हा शरण । करा कृपा मजवरती, चुकवा जन्म माझे मरन । माये भ्रांतीमंदी पडलों नाहीं मी माझे स्मरन । शुद्ध बुद्धी उपजेना वाचेला असत्याचें स्मरन । काम क्रोध मद मच्छर दंभ हंकार साहा पूर्ण । भवसमुद्री बुडतो, तारी तूं वंदितों चरण ।

( चाल )

कोन कुठिल मी राहाणार याचा संशय फेडा । विषयापुन सोडवा जी । याला परमार्थी घडावा जीवाशिवाच्या ओळखी । मन हें स्वरूपांत जडवा । त्रिविध तापापुन मुक्त करी जीवा । पुन्य पंथी चढवा । अनस्या मनस्या दुष्ट वाडीची तापून चीत मनीं जडवा । हीच इच्छा मज असावी ज्ञान दुरुस्त । अपंच जग हें ब्रह्मरूप मज भासो समस्त ।

गुरु म्हणे शिष्याला, शिष्या, आईक सावधान । उघडी स्त्रवनाची स्त्रवनची तापून देई आसी अवधान । आधी कराव प्रसन्न पहिले प्रथम सादन । दुसरी सद्गुरुसेवा भजनी मुखी आवडे प्रधान । विधियुक्त आचरावे रतापले प्रभुविधिने सुदपंथवाला मग तें गेलेसि धान ।

( चाल )

कुकर्मींहि रती नसावी संगती दुर्जनाची । सद्बुद्धि वासना धरी करी सेवा सज्जनाची । परद्रव्य परनारी इस्वी आगळ मनाची । प्रपंच्यांत परमार्थ सोदावा आवडी पूजनाची । बरळू देऊ नये राखावे स्वध्यान नेमस्त । चुकू नये नेमाला चित्त हें राखावे स्वस्त । आसी वृत्ती झाल्यावर त्याला होई साक्षातकार । निज स्वरूपाची प्राप्ती प्रानी तो दिसे तदाकार । मग तोच

सगुन तोच निरगुन तोच निराकार। साहा मधु निघून माया माया पुन्हा झाला विस्तार।

(चाल)

आकाराला नास खर एक ब्रह्म आईनास। जैसा मोत्याचा तुरा अंबरी दिसतो गगनास। आणु रेणु सारका परि तो न दिसे कोणास। त्यापुन इश्वइश्वामंदी तो पाहे गुरुमुखे नयनास। कोटि सूर्याचा प्रकाश तेथे कईचा उदये-अस्त। दसवेद्वारी मुसुरे प्रमान प्रकाशरूप दिसत ॥ ३ ॥ नाहीं रूप ना रेखा आकार विकार स्वरूपासी। कुठ लावावा बोट स्वरूप तुझच तुजपासी। याची व्हावी प्राप्ती म्हणून रुसीमुनी बसले जपासी। एक नग्न एक जोगी डिगांबर राहाती उपवासी। एक दंडिती देह एक आचरीती तपासी। गुरुविन हें दृष्टि दिसेना ज्ञानदीपासी। (चाल) नाथ वृधाईक धोंडीं साळी म्हणे गुरूची हाटवटी। पराग सेवीती भ्रमर बेडकी चिखली वटवटी। आंधळ्याला काये प्रकाश हातामंदी आसून ज्ञानदिवटी। हा विश्वी विश्वंभर भरून उरला नाहीं उच-नीच तळवटी। कवि कोंडाजी कवन करितो कविचा श्रीगुरूचा इस्त। मुकुंदा गातो सभेंत सिका रे मनीं होता स्वस्त ॥ ४ ॥

## पद—चोळीचें

सजनाने सिवली चोळी सप्तधातूची मला सगुण। शिंपी कारागीर निरगुन ॥ ध्रु० ॥ लक्ष चौऱ्यांशी चोळ्या शिवल्या त्या देह चांगली। पूर्व-प्राप्तीने हाती लाधली। बहुत दिवस म्या चोळी ल्याली बुद्धीला वागली। ल्वेवी नजऱ्हर क्रीया मागली। चोळी नव हाव मुक्त घेते हें गुरुपासी मागून ॥ १ ॥ पांचा रंगाचें पांच तुकडे याचा जडाव करून। मधीं बोटें तीनशे साठ धरून। नऊ टिपान व जाळ्या सिवल्या युक्तीनच कातरून। दाहवीला पाहाते मन भरून। कसीदावर काढला कर्माचा रेखून याची गुन ॥ २ ॥ आउट हाताची गणती सवा हात रुंदीला। छप्पन कोटी आवती सिसादीला। स्वर्ग म्हतु पाताळ सर्व आकार सादिला। चारी खाणी हाद हादीला। ब्रह्मांडाची रचना चोळी काय मुखान सांगून। जीव सीव दोन्ही मधे माया लावून या पाठिला। ब्रह्मसूत्र खेळ गाठीला। ईडा पिंगळा

दोन्ही बाह्या जडनी वाहोटीला । मुसु मनामदींच खादोटिला । चित्रगुप्त हे बसले, हे सगुनकी वा अवगुन ॥ ३ ॥ चोळी चांगली परंतु याची होईल नक्कल । चोळी ही गुरुवचनाने टिकल । जाईल गुरुला शरन फेरा चौऱ्यासी चुकल । नाहीं तर व्यर्थ स्वहिता मुकल । दास हारिचा तात्या म्हणे जा शरन संतालागुन ॥ ५ ॥

## लावणी

आला ढवळा सांग च्यातुरा उतार दे या पदाचा । पाहु तुझे कईमत यावाना पडला प्रसंग आज वादाचा । लहान थोर तुम्ही आवघे बसला गलबल मना जरा करावी पुसपुसतो ढवळ्याची कई लायाची धुरत तुम्ही धराई । शांख आंधारी ढवळा सांगावा पाहु कईची चतुराई । ज्ञान मोठे सिधांत पाहूनी पृछा पदरी धरारी । आसल कोनामदी उरमी सांगा यागा धरुन जरा थिराई । नाहीं वलवल कामाची । सभेमदी नको रिकामी फुगराई । चाल । नाहीं रुप ना रेखा या हाता ढवळा सोहं आकार । पाहु जाता रूपरेखांई बासन सवागुन रूप वकार । कोने ठिकानी राहाता, ठेवला कसा आहे त्याचा प्रकार । स्त्रीपुरुष उभयता ढवळी एक दोघाचा आकार । मायेचा सुनदुरता ढेवळा नहो स्वरुप निरविकार । त्या ढवळ्याला धरुन चालतील तरतील प्रानी तदाकार । ढवळा लाधला ज्याला त्याला जन हे करत नमस्कार । असी सृष्ट पदी ढवळ्याची, त्याचा कोने ठाई आहे बस्कार । मानीक ब्राह्मण हा ढवळा खातो पापड उडदाचा । नकारिका म्या छपा गपा धावा जाब या शब्दाचा ॥ १ ॥ अंसोहं चईतं नीजरुप जरी हें ढवळ म्हनजील । निरगुण निरविकार निरंजन ढवळा म्हणता फसील । चार खानीच्या खानी चार, देह यांत कांहीं नाहीं हासील । हा उडोळा हा मदन ढवळा म्हणता गोत खासील । संबुड, खाकरा कैंस ढवळे मेंदू मांदेन हो धरसील । आष्टपाकुळका दसनाद ब्रह्मांडी प्रकास आसंख्या घेसील । चाल । मंत्र, तंत्र, यंत्र आस्त्र धनुष्यबान बहो कई राया । चंद्रसूर्य नवलक्ष तारांगण गगनी लागली फिराया । जीवसीव आत्मा म्हणसील ढवळा मित्य गोष्ट दूर कराया । न हो ढवळे आनंदा न आवतार धरले भुमीभार उतराया । गीता भागवत येंदशाचा पुरान केली जग ताराया । आला ढवळ्याचा भिरका तुम्हावर तुमचा गर्व जहराया । ढवळा आयकून धासत बसला नकाल गुमुइ उकराया । आधीमधीचा ढवळा नाहीं त्याला आधार आहे येदाचा ।

ब्राह्मण वर्ण गाईची मंत्र न हो ढवळाची पदाचा ॥ २ ॥ ढवळी गोरी आक्षर कागद हा नाही आम्हीं घेनार। सत्य समुद्र आहिरावनी मेघमंदळ नाहीं जमनार। एकवीस स्वर्ग सप्तपाताळ सेसशाही नाही पटनार। हिराच ईरागर मनीं कस्तुभ परयस धातु करनार। संक शिंपला मोती स्पटीक दगडखानीमदीं निघनार। भुसेन शेंभुचे भस्मदवूर त्रीसुळ नंदीवर बसणार। चाल। स्वपद्पक्षे सर्पवृक्ष पुष्पहार तो कंठिचा। दुग्ध दधी घृत लोनी तथा हा तो व्यापार राहाटीचा। म्हणसी ढवळा रुपाया कापुस डसतो साकर गाठीचा। मछ बगळा राजहंस कापुर, सोरा पारा चुना भट्टीचा। गोपीचंदन साबन सीव अमृत का आनिक काटाकाटीचा। पाण्यावरील तरंग बुडबुडा तांदुळ जोंधळा आघुटीचा। या आकार प्रपंचात नाहीं ढवळा आहे येगळा आटीचा। नाहीं नास ढवळ्याला पाहाता उतार दे आज झटपटीचा। आकार अवघा नासीवंत ढवळा आहे आक्षिवंत आनंदाचा। आई नास परब्रह्म पिता सदा निमग्न निज छंदाचा ॥ ३ ॥ तुरे करा हो तुम्ही ढवळ्याची पुस सांगा। ईल्चकर। खरे पनान उतार द्यावा कशाला हाई कर कर। तुम्हाभवती आज ढवळ्याच फार मोठ आल चकर। कोण्या युक्तीने उतार द्याल संभाळ ढवळ्याची ढकर। नाहीं ढवळ्याची खुबी समजनार। आर्थ ह्याला आज जिकीर। नका कुजबुज येकु नरामदी पाहे नदर जरा वरकर। चाल। भावभक्तीनें हा ढवळा हें भक्तीचे भुशान। शव्द रुबीच मंत्र वुपदेसी तो ढवळा म्हणावा कशान। ज्याला ढवळा माहित नाहीं प्रतक्ष नर तो पाषाण। ह्या ढवळ्याला खोटं म्हणाल तर ब्रह्म हा त्याचें दुशान। ज्याला ढवळा लाधला त्यासी ईश्वर करतो भाषेन। नाथंब्रधाईक धोंडी साळी म्हणे ढवळा सांगाव गुरुचित्तान ॥ कई कोंडाजी म्हणे खोटं बोलता फजीत व्हाल अशान। रुपा मनी राम म्हणे सांगितल्यावीन नको लाऊ ब्रिदनिशान। शिब्रांत आलीशाप्याकीर म्हणे नका बुकी वादाचा। खरेपनान उतार द्याल नका गोंधळ आज मैदाचा ॥ ४ ॥

(साकी)

वीरान एकई अर्थाचा अनर्थ करून बोल ॥ शेनर महादोसी म्हणती आनाधी सीधी सुद द्यावी मजमती वारंवार प्रार्थना श्रीपती। धोंडी साळी बालक सेवक तुझ्या चरणीं लागो गती। जई जयाजीनी-जमुरती ॥

## श्री लावणी

जयजयाजी प्रभो आचळास्तुती करून नमीला । संकष्टी रक्षावें पावनखिानी दासाला । आदि आदपुरुषा सर्व आदिशा नमितो तुजला । सर्वा आगुचरा इश्वांबरा एक एक बुजला । सृष्टी न्हाई धखी असा हेत धरला । आदमाईचा जल्म तीचा तुजपासून झाला । जय निरंजना निर्विकल्प जल्म आंती उद्‌भवला । चाल । सर्वाबीजा आतीरूप तेजावट पत्रीं भगवान । इछा कल्पना झाली चेतना तीज तो झाला चैतन्य । ईछा सरसी ऐसी आदमाया करी उत्पन्न । आदमाया आदि ब्रह्मांड गोळ रची रचना जाण । कसी पुढं झाली रचना कळना तुम्ही आईका गावन । सृष्टी मांडन तुम्ही गिनलेना आईका-उकाला । पृथ्वीपासून लक्ष येवना सूर्य उंच धरला ॥ १ ॥

पृथ्वीपासून लक्ष यवजन सूर्य उंच धरला । सूर्यापासून उंच चंद्र लक्ष यवजनाला । चंद्रापासून लक्ष यवजन तारांगना गणतीला । नक्षत्रापुन लक्ष यवजना मंगळ वस्तीला । मंगळावर बुध राहातो ऐका उकाला । पुधावता गुरुचा रहिवास का ब्रह्म धरला । चाल । गुरुवता सुक्राचा मग आहे तो रहिवास । सुक्रावर मग त्या शनीचराच आसन आस । एकमेकांचा आंतर लक्षलक्ष यवजनास । सनीपासून राहू आईका । लक्ष यवजनास । राहुपासून केतू आईका लक्षनास । केतुपासून सुनमंडळ लक्ष यवजनास । सुन्य मंडाळावर मार्कंड रुसीवर आसन घाहून वसला । मार्कंडीवर रोम हा वसना त्यावर ताल धरला ॥ २ ॥ रोम हा वसनावर तो आता येद हा वसमिन । तेथुन पुढं वर बघ दालक्षे रुसीची आसन । सत्यंरुषीची आसन एक एकापून आंत्रान । थोडक्यांत आटपतो वर आंदीपुर याची आसन । सप्तपातळी चरना वरता मुगुट संगीन । मुगुट पहाया वर ब्रह्मा गेला झाला गर्व हरण । चाल । दसदेसामधें भागे सूर्याचा रहीवास । चंद्र राहातो ठिकाना त्याचा आहे तो पुरयेस । मंगळ राहातो ठिकान त्याचा आहे दक्षन देशास । बुध उत्तरेस गुरु आईका तो राव पछमेस । नईरित्य कोनी सुक्र राहातो, आईका कविराज सासनीचा रहिवास । आहे त्या आगनीकोनास । राहु राहातो ठिकान त्याचा युदेशाला । ब्रह्मदेवाचा श्राप निजड जातो दृष्टीला ॥ ३ ॥ आरध्या पळांत किती आवतार झाले तीघाजनाचे जान । नाथ निरंजेन म्हणे दाखले तुजला

सांगन । ब्रह्मदेवाची एक आर्व आवताराची जाईन । दहालक्ष विष्णूचे हे अवतार संगीन । सहस्त्र अवतार झाले म्हैराचे घ्या समजून मनी । आरध्या पळांत आपली वर्ष कितीक सांगन । चाल । तीस क्रोड चार आर्व ब्रह्मयाच्या दिवसाची घर । ईसानिधी त्रेताळ आर्व विष्णूच घटकी सार । वीस, खर्व चार पद्म गेली म्हैशाच्या पळांत घेर । किती सत्कीच्या आरध्या पळांत आईकून घे शाहिर । वीसनी वेताळ संक घे वरस बराबर । नाथ गुरुमहाराज धोंडी साळी उतार देतो चट सार । रूपा मनी राम म्हणे नवग्रहाचा केला उकला । सीन्नात आली शाककीर म्हणे तुझा उतार झाला ॥ ४ ॥

## दत्तात्रयकवन

श्रीदत्तात्री महाराज पुसे गुरुला सांगा साधन जुग । कोने वाटे कसे जावा आत्मा भेटल कोन्या मार्गे ॥ ध्रु० ॥ श्रीदत्त पुसे गुरुला साधवक्रण कळा सांगा मजला हो कळा सांगा मजला । आत्माराम नीज वर्मि साधन । सुक सांगा उकल । आतां नाथ सांगते झाले साधन सुख श्रीदत्ताला । प्रथम साधीजे रे जन्म दुसरा पूर्वक हा धरला । कंकू भकहा आनखी साधावा पहाती सन्याला । चवथा ताहाटक जेष्ठ प्रथम जावे हाधाराला ।

( चाल )

ज्ञानशक्ती गनपतीचे दर्शन धेऊन पुढे चला । तेथून पुढें स्वदिष्ठ ब्रहा सावीत्र जाग्याला । सहा सहस्त्र जप सांडून पुढे जाईन नपुराला । लक्षुमी सईत मुहारी मन पुरचक्राला । सहा सहस्त्र जप सांडुन पुढे जाई आष्ट दळाला । आष्ट कळल नो पाही डोळा ज्ञानदृष्टी मन उकला । कोने पाकुळकी आत्मा बसे कांहीं गुन तीथ उद्भवला । श्रीदत्त पुसे गुरुला प्रश्न सांगा । मजला सांगा । पाकूळ खाडकला करून सांगा मजला वग । पूर्वे दळिची पाकुळ काश्वेतवर्ण धर ध्यान । धईर्य दावे पुन्यवासना पूर्वे दळी वसून । आग्न आष्ट दळिची पाकुळ फार रक्त रंगतीचा वर्ण । तेथें मन थिरवता आळस उद्योग होय उत्पन्न । दक्षवदळी आयका कृष्ण वर्ने काळा जाव । ( चाल ) क्रोधा दोस्ता घेगळा दक्षिय दळी मळ येऊन । नैरुत्य कोवी पाकुळ का रंग तिचा निळवर्ण । तेथें मव मयूर करा वेळता । माया पडे मोहन । पार्श्व मदळ कपिल वर्ण मन संचार थिरावून किरडा विनोद सुक वाटे पश्चिम

दळी म...... । काय वकोविची पाकुळ रंगती । शाम वर्ण गावा ॥ ह्या दळी मन थिर राहे वाटात तीथे यावे करून । आसे वाटते करावी कथा घ्यावा साधुदर्शन । उत्तर दळिची पाकूळ ख्या कापिल वर्ण आहे रंग । आष्ट योग्य सुकी रमने करू उपजेला बहुसंग ॥ २ ॥ इशान्य पाकुळ का गौरवर्ण हाय का करार । तेथें मन चिरावता उत्तम पुण्य धर्म कर । शांति उपजे प्रेम सुमवासी ईशान दळीवर । मधी थिरवता निद्रा सप्रावीयक घंटाधर । तेथे मणकरी आणू संधान आष्ट दळी कंबळी ज्ञान खर । तेथून पुढें आणू हात आय जेय तेथें सहस्र पारवती शंकर जाग्यावर गरजे हारहार । पुढे ईश्वधीची उडी आयका शक्ती मोहापर । सांडून तिजला लवकर जा येद्री दळावर । विप्र ठार इथिडई दक्षि पिगळा तिन्ही वग धर । त्रीवेनी

तेथें अमृत संजिवनी दत्तात्रया त्रिकुट सिरवर । तिन्ही वायकड्यावर फारव्या पाहे खंकार । मारुती: वेगे पिंड जिंकावा या नेमानें धर । सतरविच्या समाधाने आमरकाया पूर्न राहे थीर । पिंड झाला तेथून पुढें मग ब्रह्मांडीचा वग । ब्रह्मांडी शडुचक्र साधावा पुढें आयका लाग ॥ ३ ॥ आता यासी कसे सन्निध करावा को-हे मार्गपरी । गुरुराया गुहे गुप्त सांगतो चित्ती तर्क धरी । तोरे सहस्र वदळी जाय सहस्र मळी रिखावकरी । ओटपिटाचा मार्ग पवन वेगे जाल्वकरी तेथून पुढें गेला मुद्रपवणस यशी करी । चाल । वृद्धपथे मगरी गांव आयका सादपुरनगरी । योग्य पुरनार भिरगे झाला पुन्य योग्य सरी । श्रम रगुफा भ्रमर जाळे मन पवन मेळ धरी । रिधीसिधी युक्ती बळे हा मग जीवी धरी । भ्रमर गुफा प्रसाद लिंग सदाशिव भक्त हेरी । दर्सन घ्यावा आनंत तयाचे आसे आदण सुतरी । तेथें प्रकाश प्रकाश परजोती स्वहं ओळखच धरी । कोटीचंद्राचे ते प्रकाश जत्रर शितळ सुकलहरी । तेच गुरु-मुखी खुण ओळखावी का झालीस ........नाथाचा व्रधाविक धोंडी साळी चरणी ठाव माघ रुपामनी राम सिस्या हाव्याला फड प्रसंगीं रंग ॥ ४ ॥

## पद—स्त्रियाचे मदनाचे

कोण्या ठिकाणीं मदन स्त्रियांचा सांगतो तुजला । आईकून घे शाहिरा तीथीपासुनी काला ॥ ध्रु० ॥ सुद्ध प्रतिपदेपासून चढतो आंगी मदन । डावे आंगी उतरतो सुद्धप्रतिपदेपासून सुद्धप्रति पाडव्याच्या रोजी उजवे आंगुष्ठी

जान । विजेला पायाच्या तळास कवि घ्या आईकून । तृतीया व चतुर्थीस पायावर धर ध्यान । पंचमी सष्ठीस जांघाडामदी परिमान । सप्तमीस यवनी-मुखी आसन मदनाला ॥ १ ॥ आष्टमीस नाभीस्तानी राहातो मदन । नवमीच्या दिवशी थानामदीं शास्त्रपरिमान । दसमीला कंठी राहातो डोलवितो मान । येकदसी होटावर स्त्री खाई पिकलें पान । द्वादसीला नेत्र चाळे करी कवि घ्या तुम्ही आईकून । तेरसीला पापनी नेत्री चाळे करी जान । कठी आळ्या घालितो मदन चतुरदसीला । पुनवचे दिवसी मस्तकी ठिकान मदनाला । हे नकानकाचे कई सांगितले तुजला । आतां येथें लवकर सांग सभेला । तुरता उतुर दे शाहिर कामवने बसला । सोला वर्षें काम चेततो नारिला । आठेचाळीस वर्षें मदन समतोल राहिला ॥ २ ॥ वृद्ध काळीं मदन छाळितो कोने ठिकानी । बाळपनीची खुन पुसतो सांगा गुरू ग्यानी । शब्द गुरू गनपतराव म्हणती नव्हे पोकाळ कहानी । बाळ भिमाची जोड हरदासे जळे ती मनी । हरि देवबा झिलकरी बोलती तुरेवाल्याला । काय देईल उत्तर बोडकीचा फड प्रसंगाला ॥

## पद-ढोलकं तुनतुन्याचं

नमस्कार निरगुन निरंजन होता भगवान । त्याला झाली इछा पुनरचले त्रिगुन । केला आकार तीधा निरचाले मदन । तेव्हा पुना विराट रूप नटला भगवान । चाल । विराट रुपाच्या भेद खुणा मी तुम्हाला सांगन । येथून पुढे विस्तार आयका तुमच्या पदाचा । लावून डफावर ब्रीद गाणार आला शक्तीचा ॥ १ ॥ ब्रह्मांडाच कड सव्वा हात फेर केला । मढिवळ कातड्यान उठल खूप आवाजाला । करून रक्ताची खळ कातडं लावील कड्याला । श्रवणाच्या दोन झांजऱ्या उठल्या आवाजाला । पिंड आहे पाकाळ मापट केल संगीन । करून रक्ताची खळ कातड लावल वरून । मधी मेरुची दांडी मनी पाठीसी पहावी खून । लिंगाची केली खुंटी आवाज उठला तुनतुन्याचा । शिराची लावून तार दस्त सेटाचा केली । नाभी स्तनाची जीगरी काढून मापट्यास लावली । विवेकाची काडी दोरी मायाची लाविली । डफ झांजा तुनतुने तीहिची खूप सांग जमली । धुंद धुंद कार आवाज उठला कड्याचा । घुम घुमकार झांजहि गेली सुराला । ३५४ टाक वजन ऐक

कवी मुला । टाकून सुरावर काडी कोन कोन शब्द सुराचा । डफ झांजातून ती हीच भावाच नात । जो वळखील या शब्दला तो गुरु जान । सदूगुरु गोपाळराव हात स्तरावर देत गबु करितो कवन । आखाडा भगतगल्लीत । मनु साहादू सुर धरून बोले हरदासाला गोविंदाला पाहून मान भाव पळाला । घे उत्तर आईकून ईरा काला जुनवला । डफावर बावन ब्रिद बाणा कर मगाचा ॥

## पद अनामाचे

तुम्ही येवकी पुरुष सत् लक्षणी पंडित महाज्ञानी । शास्त्रार्थ फोडून काढावा याचा वेचूनी । आठरा पुराण ग्रंथाचा अनुभव बसला घेऊनी । झाली तुम्हासी गुरुकृपा दावा वाटे लावूनी । चाल । न्हवता जळीं जामार । होता अधी अंधकार । तेथे नाही शब्द ओंकार । अवघा भिनाभिन्न वेदाने कवी फार । बोलता शास्त्रपुराण । पिंड भासतो मिठा झिना तो भिन्न भिन्न । भिन्नी भिन्नी शास्त्र भेद फोडून ॥ १ ॥ सर्व नासविंत अविनाश भासत कळेना । सर्व एक हे गुनास निरगुन ओळखच गवसेना । सर्न्या लक्षामधी अलक्ष्य लक्षांत वासगाना । जिकडे पहावा तिकडे रूप अरूपच दिसेना । चाल । दरडे सन्य बनून एक्या अग्नी मन ठेवून । उमजुन मुद्रा लावून । त्याच्या पलिकडे खून । खुन तुम्ही पहावी दृष्टीन । दावा तुम्ही बोट लावून । मिथ्या गोंधळ गईबी आवाज चावली वर कथनी । उरकी जिनसही कुठे गवसे ना गईबी अकसा-वानी ॥ २ ॥ मला भासते सर्व नाम अनाम ते काई । जिकडे तिकडे सम-समान प्रकाश नामच भरल्याई । नाम असता अनाम करता वया जुल्म काई । दहा दलनाम दिसत असता कसे आळके होताई । आवसव गंग नाम गोलट मंडळी । कविनाम इंद्रपुरी कई नाम । जेथे पहावे तेथे आहे नाम । रोमरोमी भरी नाम । संत समागम । बसून अर्थ करावा ज्ञानी । हे नाम स्वतोहून अनाम गाई लागल चरणी ॥ उरली जिन्नस शिवशक्ती वन्या पुसल्या उक्ती । भेद नाही आभेद तेथे कईची शिवशक्ती । निरगुण निर-विकार निरंजन अलिप्तच होती । अरुप होती रुपास आणली रुपतच शक्ती । चाल । प्रश्न पुसतो मी अज्ञान । निराकार निरगुन । गुरुशिष्य येकच का हो न अज्ञान भिवबा अर्जून । कलम घा तुम्ही सांगून । अदनाम

गाइल्यावर म्हणाव जाणं । शक्ती हारदासावर दिली सोडून । भिमाकाठी गांव चिंचोली काळ्याच ठाणं । गातो कान्हु मल्हारी तेव्हा तो शास्त्र दौडून । शास्त्र सोडून हो अक्षराला अक्षर जोडून । जोडून काळ भडकती कंगन ॥ ४ ॥

## झगडा

नका जाऊ तुम्ही गुणी राया । माझ्या ज्वानिचा भर जातो वाया । तुम्ही जाताल दुसऱ्या देसी । तुमच्या माग मी घेईल फांसी । नार बाजिंदी झाली ग फार । सांगतो मी तुला वारंवार । तुझ्या मनांत आहे ग अढी । तुला मोडून देतो काडी । तुम्ही लागाल हो रांडच्या पाठी । तुमच्या हातांत देईल ती नरोटी । रांडेची आहे ग मला शीक । तिच्यासाठीं मी मागन भीक । तुला उठल गर्मिचे रेंद । त्याच्या आहे मजपासी अवशद । काय सांगु तुम्हाला ग वहिनी । दादा लागले गांडूच्या ध्यानी । नित जात्यात गंगेवरती । आग मलमलचे सदरे हो शिवती । अहो काय सांगु तुम्हाला ग वहिनी । दादा लागले गांडूच्या पाठी । ह्या ग भडव्यान कळ लाविली । अहो याला काय । आमच्या दोहींत याने पाडली तूट । गांडू का झाला बे काम । हा रे सेवटचा रामराम । करते मी आरजी । नाहीं माझी मरजी संपत करायाला गा खावा । तुझी सेपत टिकुन्याला ठाव । देते मी हो तोडा । आन्हीन तुला जोडा । सेपथ कशाला ग खावा । तुम्ही सेपथ ठीक आधी खाल भोंदु भोंदु । निरपोच्या साल्या गांडु । आधी तुझी ।

आदीनाथ चरण स्मराचित्ता । नसे मग भवभयाची वार्ता । दुःख दारिद्र्याची चिंता नसे समुळ । आदिनाथ प्रणव बीज ओंकार प्रपंचाचे मूळ ॥ ध्रु० ॥

आदिनाथ तो ओंकार । तेथूनी वेद झाले चार । साही शास्त्रांचा विस्तार आठरा जाती । तिथून कर्म धर्म स्थापिले बाटिल्या याती । सत्य नांवें सत्य स्थापिलें । निघाली सत्य फळासी आले । प्राणी मोक्षपदासी गेले । म्हटली प्रवृत्ती । सत्संगे करूनी तरले जडमूढ मती । त्यांनी शिकविले शिश्यास वाढविली कीर्ति । अचळपरी अचंबा नाथ, अचळपदीं भक्त स्थापित होईना चळ गेल्या कल्पांत पद अचल ॥

पंढरीनाथ पंढरीसी । जव आगळें तीर्थ कासी । साधु जाती दर्शनासी यात्रा भरती । वेदनाद गोपालकाला तीर्थ करिती । जगन्नाथ जगाचा धनी यात्रा होती । चहुकडूनी एकच ठाई बसती भोजनी दोष हारती । जे करिती तयांची निंदा कष्टी ते होती । कैलासनाथ शिवशंकर । त्याचा नकळे अंतपार । पारवती नाथ उमावर । पशुपती ब्रह्मांड गोल खेळवी, सुत्र धरी हाती वैकुंठनाथ लक्ष्मीवर । अनंत ब्रह्मांडे रमावर । मायाचाळक तो विश्वपती ॥ अंबरनाथ वज्रपाणी, सर्व देवांचा तो धनी । कार्य साधी युक्ति करूनी रक्षी दिक्पाल ॥

दत्तनाथ दिगंबर । हरिहराचा अवतार ऐसे । वदती वेद चार । रक्षी भक्तास कामधेनु चारी वेद राहाती सेवेसी । नाथ आदि झाला । नाथ श्रेष्ठ आहे सर्वाला । दाही दिशा दिपूनी वसला । आजूबाजूसी । तुझे आदिस्थान आहे आज सभेसी । जपीतपी सिद्ध योगी । जंगमजथी आणि बैरागी । द्रवेस कापडी अघोर लिंगी । पंथ संन्यासी । हे झाले नाथापासून बाबाजी वस्ताद आहे रणशूर । कलगी निशाण डफावर । वाफलिंबा छंद गानार बसले सभेसी । शामराव बोले मान जावा आता भावगाशी । कविराज गणपती गावण दत्तनाथ प्रसन्न पूर्ण ॥

## लावणी

सर्वांत शिष्ट हे गुरु जगत्पती अवघ्याची याती । आधीरूप अलक्ष चराचरा पंचभूत जनीता । तेथे कची कलगी तुरा । दूर कर पोकाल ह्या कथा । दाखविले स्वरूप हारपली भवभवाची चिंता । देहपंच भुती याची कशी केली रचना । आप तेज वायु पृथिवी आकाश मुळ जान । रक्त माऊस चर्म हाड रोम आली पाचगुणा । एकरूपी जडली स्तुलदेह सुते उभारना । याला तीनसे साठ हाडे । बांधीले छत्तीस हाजार नाडे । औटकोट रोमावळी जडे । बाहात्तर कोठडे आंतवेढे । दस दरवाजे दृष्टिपुढे । पंचप्राणाचा जीव सोमरुप देह वागविता । इडा पिंगळा शशुमात्रिगुन आंगभुता । कुंभकरेचे-कमाहाटही स्ताणे स्तीरता येतो जातो बाहेर असा स्वभाव गुणीवंता सखात शिरष्ट गुरु जगत्पती अवघ्याची माता । आधी रूप अलक्ष चराचर पंचभूत जाणीता "

एक पिंडाची कथा सांगतो यांत दैवत जडली कैसी ग चचवडा कुर्म देव तेथे रहिवासी । घोटा आणि पोटरी मासुकी नाग त्याच तळाशी । गुडघे हाट स्वरमुळद्वारी गणेश वसतीसी । स्वाधीष्ट ब्रह्म नांदे साहिमी सहीत जाण । मणपुरींधीटाणू तेथे लक्ष्मीचे रमन । आणुहात रुद्रगीरच्या पतीचे भवन । भुच्या आंगणी गणधर्व हास्तांत विंद्राचे स्नान । दाड्यमयमुखी वसतीस सुदर्शन जिव्हा आग्नी सरस्वती करी सतरावीचे जीवन । नाकी आश्निनी देव, नेत्रीं रवी शशीचे मंडान । ललहाटी चंद्रकाट सूर्याचे तेज त्याच्या भवता । आगणीत चंद्राचे तेज नीच सुखाची अवस्था । शरवणी चैतनी पुणेगिरी झाली स्थिरता । तेथे सतरावी प्राशिली अमरपद होवा भोगिता । तू अष्टांग योग सांगतो समजेल किली चतुराला । विडापिंगळा स्वाधीनकरी प्रसंगाला । एकांती बैसून स्वस्त घालते वस्त्र आसनाला । आंगोळी सादीली पुनी बळकट दाबी गुल्ल्याला । उतरे समुख करऊनी । सूर्यचंद्र घेई खेचूनी । कुडलती माझी देई सोडूनी । देहकुंभ कसा हाटकरऊनी । जिव्हाग्री ध्यान देई ठेऊनी । सतरावी जिव्हेने प्रासन करूनी । उरधवचक्राचा मार्ग सोधूनी । कुंडलनीचे मुख जाईल उकलूनी । ब्रह्मगिरीच्या जाई रस्त्यानी । गुरुपद सुखभोगी आनंदानी । आखंड सुख समादी हरपे उपदेह भावाचिंता । प्रेमाचे सुटले पाझर सतरावी पेता । समदृष्टी समान बिंबा बिंब आसता । अद्वैत नाहीं कोठे परात परमक स्वरुप पाहाता ॥ ३ ॥

ब्रह्मरुप कोंदटलें रिता ठाव कोठे नाहीं । सर्वाघटी भरून उरला समभाव सर्वपाही । जगतात पसरली भुली अज्ञान झाले ग ई ठाई । आहमपना मिरवीती म्हणती ही माझी हो देही । सर्वांनी प्रश्न आईकावा । मी म्हणनार पुरुष सांगावा । त्याच्या मात्यापित्याचा ठिकान लावावा । जन्मव्रेतल्याचा दिवस सांगावा । शास्त्र वेदांत सर्व सोधावा । कवि सावळेराम म्हणे त्याची गुरुपदी नाहीं सत्ता । विणाकारणं सिनवी ग गर्भिणी नवमहिने जानिता । राघु कवडे ऐकून मनीं झाला चिंता झाला चिंता । प्रमाने हावीमान उनयन झाली आवरीता ॥ ४ ॥

## लावणी

नारदाशी कथा सांगतो आईका विरंची । कथा सारामदी केले निरुपन टिका चवदायाची ॥धृ०॥ द्वापार यवगी रुशी जवले होता निपूनया । त्यासी झाला पुत्र सुयज्ञ नाम तया । दशवर्शे झाला कमर वर्तबंद करजया । चांडले

रुषी होता विंध्याशी काया । बारा वर्ष केली सेवा गेला स्वमीदा आनाया । कुसमीदा आणाया सुज्ञ गेला रानांते भयानक आरने लागले वृक्ष गेले गगनांत । सप्तशाका पिंपळ पाहिला गगन चुंबीत । सप्तसेकावर सतराक्षेस नेत्रा आरक्त । माझा कुरधाने राक्षस धावले झाला भयभीत । ब्रह्मराक्षेसाने वेडा घातला मती हारपली त्याची । दाहि दिशा झाल्या उदास वाटा मग धरती पछेमची ॥२॥ पछीम देशाशी पळे सुयज्ञे राक्षस आले धावूनी । दक्षीन दिशाशी पळू लागला वड पाहिला नयनी । वडावरती कुसमडपशाची ऐका गुरुज्ञानी । सुयज्ञावर राक्षस धावले धाबरला मुनी । सुयज्ञे जात पळूनी विशानदीशाशी । काटे साईरी पाहिली त्यांनी विस्तार गंगणासी । डाकीत गन होते त्यावर मुकजाणसी मनगटापर मुख येकाचे बक्षेस तळाशी । तेच्या भयाने पळू लागला पच्छी दिशासी । कदम वृक्षावर दोन राक्षस भयंकर रूप त्याची । अग्नी दिशाशी उंबर छाया निघाली दोन पिशाची ॥२॥ आठावीस भुतमिळाली वेडाला ब्राह्मण नंदन । राक्षसासी आनंद झाला आहार पाहून । बहुकोमल शरीर तयाचे आता भक्षू आनंदान । एकमेकासी कळा करिती भांडती कुरुधाण । आसा भुताचा गोंधळ पाहून तरमळी ब्राह्मण । तक्या पासून तरले आईसा उपाय आहे कोण । मगकरी विष्णूचा धावा संकट पडले दारून । आरे कंबळा कांता अनन्य शरण । अनंद कंदा बाळ मुकुंदा धाव वेगीन । आकाश वाणी झाली जप करणार शिव मंत्राची । कवशी कवी वर्ष महापवित्र होईल झडती भुताची ॥ ३ ॥ आईशी झाली आली आकारास कणी सुळेझमणी संतोसला । यथा विधीन स्नान केले उदक शिंपु लागला । दुरबुद्धी टाकून झाले भावी विवेक आठवला । आठावीस भुताचा झाला उदार नमस्कार केला । संतमहंत तुम्ही बसले प्रसन्न आला पाही आठावीस भुताची नाव सांगता कळल चतुराई । काय पापास्न झाले राक्षेस सांगा तुम्ही कवी । सांगितल्या विग गाण गाशील ब्रम्हहत्या पाही ब्रम्हहत्याचे कठीन कर्म भोगाल नर्क कवि । राधुसावळे राम कवन करितो दया नाथाची । बाळा गोविंदा म्हणे हारदासा दाही ब्रिदाची । नारदाची कथा सांगतो आईका विरंची ॥ ४ ॥

## आदिनाथ प्रसन्न

आदिनाथ चरण स्मरचित्ता नसे मग भवभयाची वार्ता । दुःख दरिद्र्याची चिंता । नसे समुळ । आदीनाथ प्रणवनिज ॐकार प्रपंचाचे मुळ ॥ध्रु०॥

आदीनाथ तो ॐकार तेथूनी वेद झाले चार । साही शास्त्राचा विस्तार आठरागाती । तिथून कर्म धर्म स्थापिले वाटीलया याती । सत्य नाथे सत्य स्थापीले निधानी सत्य फळासी आल प्रानी मोक्षपदासी गेले । हटली प्रवृत्ती । सत्संगेकरूनी तरले जडमुढ मती । ब्रह्मसंतोश नाथ ते भले । त्यांनी सिकविले सिस्यास वाढली कीर्ति । अचळपरी अचळपरी अचंवानाथ । अचळपदी भक्त स्थापीत होईना चळ होता कल्पांत पदअचळ । पंढरीनाथ पंढरीसी । जव आगळे तीर्थ कासी । साधु जाती दर्शनाशी । यात्रा भरती । वेणुनाद गोपाल काला तीर्थ करिती । जननाथ जगाचा धनी यात्र-येती चवकडूनी येकच ठाई बसती भोजनी । दोषहस्ती जे करिती तयाची निंदा कष्टी होती । कैलासनाथ शिव शंकर त्याचा नकळे अंतपार । पारबती नाथ शिवशंकर । त्याचा नकळे अंतपार । पारबती नाथ उमावर पशुपती । ब्रह्मांड गोळ खेळवी सुत्रधरी हाती । वैकुंठनाथ लक्ष्मीवर । आनंद ब्रह्मांडे रोमावर मायाचा कळ तो ईश्वर । विश्वपती । अंबरनाथ वज्रानी सर्व देवाचा तो धनी । कार्य साधी उक्ती करूनी रक्षि दिक्पाळ ॥ २ ॥

दत्तनाथ दिगंबर हरिहराचा अवतार । ऐसे वदती वेद चार रक्षी भक्तासी । कामधेनु चारी वेद राहती सेवेसी । नाथपथ आदी झाला । नाथ श्रेष्ठ आहे सर्वाला । दाही दिशा व्यापूनी बसला आजूबाजूसी । तुझे कोन आदी स्थान आहे आण सभेसी । जपी तपी सिद्ध योगी । जंगम जथी आणि बैरागी । द्रवेस कापडी अघोर लिंगी पथ संन्यासी । हे झाले नाथापासून लोक गुणरासी । बाबाजी वस्ताद आहे रनसूर । कलगी निशान डफावर । बाबुलिंबा छंद गान्हार बसले सभेसी । शामराव बोले मानजावा आता काय गासी । कवीराज गणपती गावण । दत्तनाथ प्रसन्न पूर्ण । दिनदयाळ ॥

## लावणी

### ( सुजनबोध )

आईका परनारीचा संग हा तिचा नाही कामाचा उपयोगास जान । खर्चून पदरचा दाम जगी भनभन ॥ ध्रु० ॥ खर्चून पदरचा दाम सोडूनकाम तिच्यासी रम सदोदित चोरी । नाही दिल चोरीचा धीट धन्य अंतरीं ।

इच्याशी करता भाशन, लागल दुशन, होईल शासन राजदरबारीं । नाहीं संग सुखाचा नित उरावर सुरी ।

(चाल)

आपले की सारेची चितप्रान तिजवर । ती सौंदळतीचे लक्ष दहावर । कैकाला बुडवून उलट मारी पैजार । कैकाला बुडवून खरी । उलट माघारी । उने जाव मारी । तसे खोचून परनारी पाई होती अब्रूला हान ॥ १ ॥ परनार परायाची । इला भोगण्याची इच्छा मनाची होऊन एकदां झाला द्रोपदीपाई दुर्योधनाचा चेंदा । पहा रावती रावनानी । सिता आणुनी । लंके नेऊनी ठेवली बंदा । आला हनुमंताचा रगडा । फिरवली गदा ।

( चाल )

त्या पारवतीपाई मेला भस्मासुर झाली नारदाची नारदी तर्क हा धर । त्या विंद्राचंद्राला कलंक भंगले वीर । बहुतासी दिधला त्रास आसी नार । बहु-तासी दिधला त्रास । केला इने नास जीवाला ध्यास, लाविला जान । परनारी पाई गेले कईकाचे प्राण ॥ २ ॥ द्रोपदी सती सुज्ञान, किचक अज्ञान म्हणे भोगीन इसी एक वेळ । प्रारब्ध टळेना मरण आले तत्काळ । हीं ऐकून घ्यावी गती । होईल माहिती । धरावा चित्ती पूर्वीचा खेळ । चतुर जाने मूर्खास कळेना क्याळ । हा विचार मनाला करून धराई सोई । पस्तावा घडता नाहीं होणार उपाई । दुःखाची आठवण रडून होणार कांहीं । गाऱ्हाने सांगता हासतील कांही भाई । आपले सजन सोईरे बोलती बरें । उनें उत्तरें वळें खोचून । ते शब्द लागती जसे जिव्हारी बाण ॥ ३ ॥ जरी असेल सेट साव-कार, थोर सरदार, राजकुमार, लागलं इचे पाठी । इची संगत धरता हाती...

हिच्यासी उभ्या रस्त्यान कदा भाषण कदा भाषण करू नये सांगू नये गोष्टी । चतुर जाने मूर्ख नित लाळ घोटी । ( चाल )

असा परनारीचा संग आहे वाईट । साव असता धरू नये बळ लक्षण चोरट । नाथवृधाईक धोंडीबासाळी मार्ग दावितो नीट । कवि काशिनाथचे कवन टिपसाळ थाट । दगडुजी हरिबा म्हणे इच्या संगतीन । नावाला कोन चढले जान घ्यावे सांगून । आब्रूला खोरी झाले कवि जाण ॥

## झगडा

जवानीच्या भरांत, जवान भरांत, साजन चयनी असावा ग । दिसण्यांत फाकडा राहीनात वाकडा नपुसक हिजडा नसावा । धान्यांत गहू होता प्रकार बहू । पन आचारी चांगला असावा । मालक हलकट, सैपाक तेलकट गोडीला फिक्कट नसावा । जमिनींत बाग वृक्षांत साग कपाशी पण असावा । येरंड पोकळ नव्हे इग येहेकळ येर्डा बावळ नसावा । इमारत राहाया । नामचंपाया मजबूत पाया असावा । झावळ्यांचे झाकान वाऱ्याच्या जोरान भुसकून उडनार नसावा । आग, फडात रंगीरायगुन, आंगी सोंगाड्या जंगी आसावा । आडताली गानार, आबसुरी जानार, बोचाळ नाचणार नसावा । गावात चावडी खळ्यांत वावडी, आढीला दिढवा आसावा । बइलाच फाडाव शेळ्या, मेंढ्या वाढाव पायाला गादव नसावा । प्रथम संपती, नंतर संपती, चांगल्याशी संगती आसावा । भोपाळ त्यानी, मिनारा प्रानी बहिरा कानानी नसावा । आगसपतीसारखा, असा पाठीराखा सद्गुरु दगडूबाबा असावा । दत्तुडिगांबर हरिभाऊ बरोबर असावा ॥

## लावणी रंगबाजी

इंद्रवदती मिर्गनयेन रंगकेसरीचा कोठे पंचानन चुक दाधीनीचा ॥ध्रु०॥ सक्यासजनाला हाडस तरी किती ही । वागबगीचे कांय भारी भारी ग । फुलझाडे हे फुलऊन सारी । आंबराई पिकली लई । आंबराई लई पिकली । नोकझोक इचा ग । कोठ ॥ १ ॥ सक्यासजनाचे आगा जे हाती नाहीं स्वारीला कधीच कोनी नेती । नाही आंबरी चवरी ढाळ देती । दिसेना धनी म्हणून रानी । दिसेना धनी म्हणून रानी । झुरे जिव याचा ग । कोठे ॥ २ ॥ उंच हे बंगले आचार ग । महाल रंगीत काय लेखाला । कसी सजनाने केली ताटातूट । रसरसला भरूनी आला भर नवतीचा ग ॥३॥ कोठें पंचाइत चुकला का धनी चला । सक्याची होती प्रीत फार । गेल्यापासून उतरला नूर । दगडोबा म्हणे धर धीर । होईल भेटी पडेल दृष्टी । होईल भेटी पडेल दृष्टी । झोक कळगीचा ग कोठे पंचप्राण येन चुकला हारनीचा ग ॥४॥

## गण

श्री नमो आधी गौरीच्या सुता, बुद्धि दे आता मला रे भगवंता । तुझे गुण गाया । अनाथ दीन पामर लागतो पाया ॥ १ ॥ प्रथम निराकार निर्गुण

अलक्ष भगवान, की नारायण । पुढे धुमधुमकारांत होऊन गेले मंडण जी ॥२॥ जळीं स्थळीं त्यांचा ठिकाणी. इंद्राप्रमाणें पात्रें आसन निद्रा करी शयनी । पुढे अष्ट गण कवी राया झाले त्यापून जी ॥३॥ शाहीर उठती हुरपान,डाम घेऊन, करती गावण ,मंत्र याचा कोण सांग कविराया । अनाथ दीन दगडुजी लागतो पाया ॥४॥

## गण

प्रार्थितो आज या फर्शधरा रंगणी येऊनी रंग भरा ॥ध्रु०॥ आंगी शेंदुराची उटी रुद्रहार घालूनी कंठी । आंकूश हाती विघ्न कापती थरथरा । प्रार्थितो आज या फर्शधरा ॥१॥ सरस्वती ब्रह्मतनया कृपसनी घेऊनी माया । ब्रह्मवाणी घेऊनी करी ध्वनी झरझरा ॥२॥ प्रार्थितो दगडूसाळी गर्जे रंगणीं काशिनाथ कवी पाहूनी । वैरी जाती उठूनी पळती भरभरा । प्रार्थितो ॥३॥

## गण

धाव पाव श्रीगणराया, शरणशरण तुमच्या पाया॥ध्रु०॥ माझी अनाथाची स्तुती मान्य करा कृपामूर्ति । दीनवरती ठेवूनी प्रीती सर्व विघ्न लावी लयाला ॥ १ ॥ येवूनिया सभेप्रति द्यावी मसी ज्ञानमती । ऐसे गुण कीर्ति यावें रंगभूमि ठाया ॥ २ ॥ हीच मनी आहे आंस तुझे जन्मोजन्मीं तुझा मी दास । म्हणोनीच हा भवफास । टाकी टाकी तोडोनिया । साळी दगडोबाची चित्ती रामनामीं वसे प्रीती । कितीक शिकाऱ्यांची मती, लागले झुराया ॥ ४ ॥

## गण

गौरीसुता विघ्नहरा रे यावे करी त्वरा रे ॥ध्रु०॥ श्रीगणेशा नामाधी काय रे कमवू सभेमध्ये । फर्श घेऊनी विघ्न वधी कृपासागरा ॥ १ ॥ मयुरारूढ सरस्वती यावे घेऊनी गणपती । द्यावी मला ज्ञानमती तुझा आसरा रे ॥२॥ नारद तुंबर रुषीमुनी तुज ध्याती रिद्धीसिद्धी । रिद्धीसिद्धीचा तू धनी कृपा-सागरा रे ॥ २ ॥ राखी रंग उभु गाया प्रसन्न व्हावे चित्तीचे ठाया । दगडूसाळी पडतो पाया तुझा आसरा रे ॥ ४ ॥

## गण

गवरीचा बालक, विद्येचा चालक बुद्धीचा पालक आना आना ॥ धृ ॥ भावे पुजुनीया रंगप्रसंगी । नववीण शक्ती ही नवरंगी । लावूनी मुद्रा बुद्धीस

मुद्रा, स्वरूपी मुद्रा आना-जाना ॥१॥ श्री गणेशा हे मूळमंत्र ॐ नमो मंत्र ॐ नमो मंत्र संभावी पात्रा मंजुळ गात्रा । वळवी माजी काना-कना । सर्वगुण तुम्हा सारखे नटले । गुणी हरी साळी व्याविला पटलें । कविचा खंडा शास्त्रानें दडा । वैऱ्याला दंडानें हाना हाना ॥ २ ॥

## श्रीलावणी

• परपुरुष भोगिला एकांती नसें डाग मजला । अंगसंग म्या केला झाले दंग मनीं रंग भरला ॥ सासुरवास सोसीता प्रपंच्याचा आला मला त्रास । वागविलें मी फार दुःख सांगन कोनास । अहंकार सासरा छळीतो करितो धुसफुसतो । दंभमा रक्षी रभाविगळ्याला अक्षी गळफास मनसा माझी नंद विचार कर रात्रंदिवस । फारधीला वैताग विचा घरा रहिवास ।( तोड ) असदीषाडवी उमासा नाहीं तळभर । जे करती ते कर वीती नासले हें घर । या नंदना सागा कोनाच केल नाही बर । तिची छळना मला सोसाना करकर । सुबुद्धि मग सुचली मनीं विचार केला । सोडला संसार, झाले रत परक्या पुरुषाला ॥ १ ॥ येऊनीया जन्मासी बर म्या घरदार केल । आले या नरदेहाचा फार सार्थक झाला । बोधमदी रिती तीथ येकांतीं पुरुषाला न्याल । चौदेहाचा मंचक तेला वरती बसवीला । सुखसेजसी समता सुख वाढल, जन्ममरण चुकवील । पुरवीच पापसार ग्याल । तोड । नागवेल वास नको फोडली सुपारी । आभीमानाचा चुना भाजला लावरी । वैराग्य जावी फळ भक्ती जायपत्री वरी । अनुभव वेल डोले भावार्थ का पूरभीतरी । बनवला हा विडा पुरुषाचे मुखात घातला । वागपुष्याचा हारतुरा ग मस्तकीं खवला ॥ २ ॥ सत्वाचा नारळ मेरुवरती धैर्याचा । पंचतत्वाची चिलीम अग्नी प्रदिप्त ज्ञानाचा । तमाखु नमाची खडा चीलमीत बोधाचा । पानी सत्रावीचे सोडला धूर सत्रावीचे सोडला धूर प्रपंच्याचा । विवेकाची नळी, वोढिता पेला प्रेमाचा । सुखावले अंतरी उगवला दिवस आनंदाचा । तोड । असे विलास भोगिता रात्र गेली चार प्रहरा । नानापरीचे परपुरुषाला केले उपचार । मला लागले त्याचे ध्यान करिते उपचार । त्याजवाचून मला करमती, निजध्यास फार । विरसले घरदार प्रपंच व्यर्थच वाटला । परपुरुष । एक खरा मिथ्या सारा खटला । कछ काया वाचा मने याचे ठावीं प्रिती जडली । सबळपुन्य माझे, म्हणूनीं

संगती त्याची घडली । अहंभाव हा गेला सारा भ्रांति उडाली । नीजवस्तू अवीनाश अक्षाधि मजला सापडली । अचेळ अमळ अविनाश त्याची दृष्टी प्रभा पडली । ज्ञान अंजेन लेतानेत्री पाप हडबडली । तोड । पंचभ्रतार कोणते पुसता धरून अहंभाव पंचेतत्व हें पंचप्रान गुरुपुत्राला ठाव । पंचविषय पिंडी भवाळाला कषाशी ठाव । ऐनास पर पुरुष त्याला असें अनंत नांव । तोचि एक परपुरुष इतर माईक जाणावा । धोंडो साळी म्हणे ज्ञान काय माहित मत्राळाला मुक्ताजी करितो सिकरे दुश्चीत मनाला ।

## लावणी

नाही देवाला म्हणून कुळान उलटून कस बोलाव । अवलजमी आणून करूं याच्या जिनगीचा लिलाव । हुरत, तुरेकरा नंदी गणुडोहर फार कूळ नादार । काय वाराबरीन ह्याचा कळला आज दिदार । खातो जिवाला आपल्या बहुताचा देणेदार । गांवगांवी आहे तुरेकर लहान मोठे अपदार । तुऱ्याच्या गाण गाती शिकोर धन्माला म्हणे उदार । तोड । यां नचान दिला नाहीं कधी येऊन सभेमंदी पुसात आधी । पुसे दुसऱ्याला म्हणतो खत चांडाळ । अस खढाळ गमवला ढाळ नाही माहित साऱ्याला । बोलतो चटपटा । झाली याची ह्याची घंटा । लावला बटा । साऱ्याशिकाऱ्याला । पश्न गमावली ह्यान । नाही दिल ध्यान । बुडक्याच ध्यान पुरत वैऱ्याला । ज्याला अक्सी गरज त्यानें रितीने चालावा । नकटीच कापल नाक, मोती तीन नाकांत कस घालाव । रडता येईना ज्याला त्यानं गाण कस सांगावं । हुजऱ्या देईना उत्तार करितो वाघाच वडगांव । खरेदिण्याला नाहीं म्हंतो कोनाच सांगाव । उल्टी ह्या गोष्टी सांगतो कुभांड्या या पकाव मागाव । वाखाडी करावी पुरती फजेती होईल याची गावोगांव । तोड । ती गा लावण्याचा गान्हार । कवि करणार योचा म्हणणार । दिसतो लोकाला उधरेरी गातो गाणे । उगच नादान मांडली घाण । चुना नाकाला, यान कुठ मिळावलं नांव । आम्हाला नाहीं ठाव । चोर का साव । अशा घटकाला उयाच फिटा नारिन । रिकामा शीन । धीग याचा जीन । काजळ ठिपका लाऊ देणाराना मागून यानं नाक का उगच सोलाव । कसुटीला घासाव, सोनं घासाव मग तें तोलाव ॥२॥ याडवाकड गाणं म्हणावं नाहीं । उभयाताची आबरू जाती । नाहीं थोरपणा मोठेपण शब्दाची

लागती खोच मनाला । लागती वा कल्पना । दोघं एकाच परंतु घालवितो मीपणा । कोण पाहत पुखडा फुटका घेऊनि या दर्पना पाक होईना सुद्धा जाळीता अनुनुकत्या सर्पना । तोंड हाच काय गाणार मोठा अगदीच खोटा नरवल्देच[1] गोटा । यानं हें याला । वरकड कवि गाणारं ।। लावण्या करणार । उत्तर देणार । आल्या समयाला । दोनचार लावण्या थाप । झोकतो कप । घेऊनीया डफ उठतो गायाला । गाण्याच कठीण गायाला कठीण कर्म, फोडला मर्म । धरावी कांहीं शर्म । सांगतो याला । नव्हावाते होत कली मदी वाटतो नवलाव । बाजार भरला म्हणजे गाठोड उचल्यान उचलाव ।। ३ ।। कुल जाऊन करतात अफेली रांगा नकोडता । हुकूम नामें शेवटी पदरीं सावकाराच्या पडतात । वकिलाला मिळतो पैसा । कुलमदीच बुडतात । होतो जिनगीचा लिलाव, तेव्हां सांदीमदी दडाव । सावकार आणि कूळ दोघेजण, वीरश्रीनें लढतात । पकड समान येतां कुळाला ओढीतात । तोड । होऊ लागला अपाई, नाहीं उपाई, खळखळा रडतो । माझी कोणी करा कीव । घेता काय जीव । आलं जणू हीच । थडथडा उडतो, तुम्ही आम्ही एकच आहो । परखे नव्हो, करितो विनंति । क्रोध फार चढतो । तुम्ही पाहणे चातूर उणे उत्तर । बोला अंतर दोघामदी पडतो । धोंडी साळी म्हणे पाहिजे जीवनाचा वोलावा । थेंबथेंबी तळ सारात पुढें होतो ओलावा ।। ४ ।।

REFBK-0011968

REFBK-0011968

... संग्रहालय ठाणे
११९६८

।। श्री ।।

अन्नापासून न्याय घ्या, न मुळी पिंडच अन्नाचा । अन्नापासून उत्पन्न होतो अवघ्या जनाचा ।

—:०:—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम
वि: